

## सुरूची नाईक

# नर्मदा परिक्रमा

## एक विलक्षण अनुभूती

ई साहित्य प्रतिष्ठान

सादर करीत आहे

# नर्मदा परिक्रमा

## एक विलक्षण अनुभूती

लेखिका : सुरूची नाईक

# नर्मदा परिक्रमा

## हे पुस्तक विनामूल्य आहे

## पण फ़ुकट नाही

या मागे अनेकांचे कष्ट व पैसे आहेत .

### हे वाचल्यावर खर्च करा ३ मिनिट

१ मिनिट : लेखिकांना फ़ोन करून हे पुस्तक कसे वाटले ते कळवा

१ मिनिट : ई साहित्य प्रतिष्ठानला मेल करून हे पुस्तक कसे वाटले ते कळवा.

१ मिनिट : आपले मित्र व ओळखीच्या सर्व मराठी लोकांना या पुस्तकाबद्दल अणि ई साहित्यबद्दल सांगा.

### असे न केल्यास यापुढे आपल्याला पुस्तके मिळणे बंद होऊ शकते.

## दाम नाही मागत. मागत आहे दाद.
## साद आहे आमची. हवा प्रतिसाद.

दाद म्हणजे स्तुतीच असावी असे नाही. प्रांजळ मत, सूचना, टीका, विरोधी मत यांचे स्वागत आहे. प्रामाणिक मत असावे. ज्यामुळे लेखकाला प्रगती करण्यासाठी दिशा ठरवण्यात मदत होते. मराठीत अधिक कसदार लेखन व्हावे आणि त्यातून वाचक अधिकाधिक प्रगल्भ व्हावा, आणि अखेर संपूर्ण समाज एका नव्या प्रबुद्ध उंचीवर जात रहावा.

# नर्मदा परिक्रमा

## लेखिका : सुरूची नाईक, नागपूर

संपर्क: ९८२३६५३५११ (कृपया मेसेज करून वेळ ठरवावी)

संकेत स्थळ : www.thetbhet.wordpress.com.

ई-मेल: suruchisuruchister@gmail.com

या पुस्तकातील लेखनाचे सर्व हक्क लेखिकेकडे सुरक्षित असून पुस्तकाचे किंवा त्यातील अंशाचे पुनर्मुद्रण वा नाट्य, चित्रपट किंवा इतर रुपांतर करण्यासाठी लेखिकेची लेखी परवानगी घेणे आवश्यक आहे. तसे न केल्यास कायदेशीर कारवाई (दंड व तुरुंगवास) होऊ शकते.

This declaration is as per the Copyright Act 1957. Copyright protection in India is available for any literary, dramatic, musical, sound recording and artistic work. The Copyright Act 1957 provides for registration of such works. Although an author's copyright in a work is recognised even without registration. Infringement of copyright entitles the owner to remedies of injunction, damages and accounts.

प्रकाशक : ई साहित्य प्रतिष्ठा :

www.esahity.com

esahity@gmail.com

प्रकाशन : ३० जानेवारी २०२०

©esahity Pratishthan®2020

- विनामूल्य वितरणासाठी उपलब्ध.
- आपले वाचून झाल्यावर आपण हे फ़ॉरवर्ड करू शकता.
- हे ई पुस्तक वेबसाईटवर ठेवण्यापुर्वी किंवा वाचनाव्यतिरिक्त कोणताही वापर करण्यापुर्वी ई साहित्य प्रतिष्ठानची-लेखी परवानगी घेणे आवश्यक आहे

माझी ओळख

नर्मदे हर

खरंतर माझी ओळख देणे हा एक मोठा विरोधाभास आहे असे मी म्हणेन; कारण नर्मदा परिक्रमेने मला नर्मदामय केलं, तिथे "मी" म्हणून कुणी उरतच नाही. किंबहुना माझ्यामधील ही "मी" दूर व्हावी असंच माझं माझ्या नर्मदामैय्याला मनापासून सांगणं आहे. ह्या देहातून ही "मी" सुटली  तर माझ्या माईची माझ्यावर फार मोठी कृपा आहे असे मी समजेन.

या अनुभवकथन पुस्तिकेसाठी म्हणून जर माझी ओळख द्यायची असं म्हटलं तर मी कुणी लेखिका नाही हे मी आवर्जून सांगेन. आवड म्हणून लिहिलेल्या कथा, कविता कधीही पुस्तक स्वरूपात आजतागायत आलेल्या नाहीत. स्वतः ई साहित्य प्रकाशनाची संस्थापक सदस्या असूनही. कदाचित यामागे एक कारण असले पाहिजे. ते असं की माझ्याकरवी करवून घेण्यात आलेल्या नर्मदा परिक्रमेचं आणि साक्षात नर्मदा मैयाने माझ्या प्रारब्धात घातलेल्या अनुभवांचं ह्या देहाकडून लिहिल्या जाणारं हे पहिलं पुस्तक असावं ही देखील माझ्या नर्मदा माईची ईच्छा असेल कदाचित.

आणि म्हणूनच दुसऱ्या कुठल्याही ओळखीपेक्षा एक परिक्रमावासी, नर्मदाभक्त आणि अगदी माझ्या नावाचाच उल्लेख करायचा झाल्यास मला माझी ओळख “रेवारूचि-सुरुचि” म्हणून करून द्यायला आवडेल.

मनोगत

नर्मदे हर

आपण सर्वजणच अमुक एखादी गोष्ट करतो ती त्या मागे असलेल्या कारणांमुळे. मी अमुक केलं की असं होईल, म्हणून हे करायचं, आणि तमुक केलं की तसं होईल म्हणून ते करायचं. सरते शेवटी प्रत्येकाचा शोध एका ठीकाणी येऊन थांबतो. आपल्या सारखे सर्व सामान्य लोक त्याला "सुख" असं म्हणतात. आणि खरं सांगू का, या सुखाच्या शोधातच मला नर्मदा परिक्रमेचा आणि त्यातून मिळालेल्या अनुभूतीचा शोध लागला.

पी एच डी करणं मला फार कष्टप्रद जात होतं. शेवटचं प्रकरण हाताबाहेर जात होतं. नोकरी, घर, मुलाचा अभ्यास, स्वत:चा अभ्यास, यात मी इतकी वैतागून जात होते की सगळं सोडून पळून जावं सं वाटायला लागलं. नमूद करावे आणि करू नये अश्या अनेक कारणांनी मला गिळंकृत करून झालं होतं. नकळता मी डिप्रेशन नावाच्या आजाराचा शिकार व्हायला लागले होते, नव्हे झालेच होते.

पण यातून बाहेर पडायचं होतं, मार्ग सापडत नव्हता.. तात्पुरतं मन रमवायचं, आणि पुन्हा पुन्हा, अनेकदा या सगळ्या प्रश्नांनी आघात करायचे.. हे असच सुरु होतं. मात्र हत्ती जाऊन शेपूट उरावं इतकं पी एच डी चं थेसिस राहिलेलं. वयाच्या १३ व्या वर्षीपासून चं स्वप्न, जंगलात राहून अखंड मेहतिने काढलेले दिवस, हे सोडून द्यायलाही मन तयार नव्हतंच..अन विचार करता करता मी पुन्हा वयाच्या १३ व्या वर्षात पोहोचले. नर्मदा परिक्रमा करावी हा विचार त्यावेळी पहिल्यांदा मनात आला होता, तो विचारच माझ्या परीक्रमेचं बीज आणि या डिप्रेशनचा आधार ठरला, आणि माझा सुखाचा शोध सुरु झाला.

माझे गुरु पं.पु नाना महाराज तराणेकर यांच्या पोथी मध्ये वाचलेले नर्मदा माईचे अनुभव माझी प्रेरणा झालेत, त्यांचे आशीर्वाद माझं कवच झालं, आणि काही वेड्या लोकांचे अनुभव

माझं वेड झालेत. वेडात सुख असेल कदाचित··· हो असेलच··· या वेडाचा ध्यास लागला··· मन तळमळू लागलं..जळी, स्थळी काष्ठी पाषाणी फक्त माझी माउली दिसू लागली...

आस तुझी जीवा तुझी तळमळ । तुझ्याशीच नाळ जुळते माझी···॥१॥

ध्यास तुझा चित्ती लागियेला ऐसा । मत्स्यालागी जैसा जळावीण ॥२॥

पाऊले वळती तुझेचि नी वाट । मनी काठोकाठ तूची वसे ॥३॥

घातलीसे हाक अता लेकराला । फ़ेक पावलांना आप पडे ॥४॥

माय माऊलीचा करू हो गजर । "नरमदे हर" मंत्र दिधला ॥५॥

मज ज्ञान अल्प, तैसाचि संकल्प । तूचि आता कल्प पूर्ण करी ॥६॥

मैया किनाऱ्याला, घडो माझा वास । "रेवा मैया" श्वास जडो देवा ॥११॥

"सुरुचि" म्हणे रुचि रेवा चरणासी । शरणास दासी, सांभाळीजे ॥१२॥

संकल्प घेतला, आणि सगळं काही माझ्या माउलीवर सोडून दिलं. तिनीही जातीनं लक्ष घातलं आणि परिक्रमा पूर्ण करवून घेतली.

१ नोव्हेंबर २०१७पासून २२ मार्च २०१८पर्यंत चा कालावधी माझ्या अयुष्यात असा काही आला की त्यानंतर आयुष्याकडे बघण्याचा दृष्टीकोन बदलला , किंवा संपलाच असं मी म्हणेन ··· आई नर्मदेच्या सान्निध्यात आणि त्याही नंतर आज जे काही आहे ते, ते आहे इतकच मी सांगू शकेन एखादी गोष्ट आहे आणि म्हणून तिचा स्वीकार करायचा, म्हणजे त्या गोष्टीच्या असण्याचा स्वीकार करायचा तर एखादी गोष्ट नाही तर म्हणून ती नाही हे ही मान्य करायचं ..म्हणजे ठरवून नव्हे हं.. आपोआप, अगदी कुठल्याही प्रयत्ना शिवाय.. अशी काहीशी सवय लागली··· चांगली की वाईट ते माहित नाही···पण लागली. त्याचे फ़ायदे तोटे माहित नाही

आणि माहित करून घेण्याची इच्छा देखील नाही…आणि हे नेमकं कसं घडलं ते ही माहित नाही…

मात्र आता समोर येणाऱ्या प्रत्येक गोष्टीकडे साक्षीदाराच्या भुमिकेतून बघितल्या जातं. म्हणजे कसं तर एखाद्या कोर्ट केस मधला साक्षीदार नजरेसमोर आणू… जी काही घटना घडली ती या सक्षीदाराने पाहिली.. मात्र झालेल्या घटनेत त्याचा सकर्म सहभाग नाही, तो केवळ साक्षीदार आहे आणि जे झालं ते सांगण हेच त्याचं काम आहे.. आणि ते ही गरज पडली तर.. गरज पडली नाही तर फ़क्त तो अनुभव गाठीशी कुठेतरी असतो, इतकच! जेव्हा प्रत्येकच गोष्टींकडे असं पाहिल्या जातं तेव्हा त्याचा न आनंद होतो, न दु:ख! कारण मुळात आनंद किंवा दु:ख हे त्या त्या अपेक्षेवर अवलंभून असतं. इथे या साक्षीदाराला घडलेल्या घटने कडून कुठलीही अपेक्षा नसते.. त्यातून त्याला काहीही नको असतं… आणि म्हणूनच तो त्यावर विचार देखिल करत नाही, साक्ष देतो आणि मोकळा होतो…

"मोकळा होतो" हा शब्दच किती सूचक आहे नं…. म्हणजे तो बांधल्या जात नाही किंवा अडकून पडत नाही. म्हणजे समोर कहिही असो… तो तिथे असतो, पण त्यात गुंतत नाही… ते जे काही आहे ते आहे तोवर बघायचं, आणि ते संपलं की संपल. ते संपण्याचा आनंदही नाही आणि दु:ख तर अजिबात नाही.. मग दुसरं काहीतरी समोर येणारच.. आणि ते ही कधीतरी जाणारच.. हे माहितच आहे… या "काहीतरी" च्या मागे जाण्याची इच्छाच न होणं ही मोकळीक….मला सियाराम बाबांचे शब्द आठवले…. ते म्हणतात.. " मै तो सिर्फ़ तमाशा देखता हू" … तसं फ़क्त मोकळेपणानी तमाशा बघायलाच आवडू लागलय… मग समोर काहिही असो… पुन्हा तसाच तमाशा असावा अशी इच्छा नाही, तसा नसावाच असं ही मत नाही…. कारण काय समोर येतय हे आपल्या हातात नसतं आणि ते आपल्याला महित ही नसतं.. आपण आपली फ़क्त गंमत बघायची…ही गंमत बघायला मन आपोआप शिकलं ते मैयाच्या कृपे मुळे... अंगवळणी पडल्यासारखं झालं.. कुठला निर्णय घ्यायला लागला नाही का

कुठलं नियंत्रण ठेवावं लागलं नाही... खरं सांगू का.. सुखरूप आनंद काय असतो ते उमगू लागलं... जी अवस्था इतर कुठल्याही अवस्थेवर किंवा घटनांवर, अपेक्षांवर, व्यक्तीं वर अवलंबून नाही त्या अवस्थेला सुखरूप असं म्हणता येईल कदाचित...आणि दु:ख नाही म्ह्णून आनंद म्हणूयात.... आणि हे असं हसत खेळत, आईच्या पदराशी जसं लहान मूल घुटमळतं तसं त्या माईच्या किनाऱ्याशी घुटमळत, तिने दिलेल्या अनुभवाच्या शिक्षणातून असं काही साध्य झालं की आता दुसरं काही शिल्लक राहिलेलं नाही. जे काही मिळायचं होतं ते मिळून झालेलं आहे.. जे काही समोर येतय ते पानात वाढलेलं आहे, आणि जोवर ह्या जड देहाच्या पिंजऱ्यात हा जीव आहे तोवर ते जे काही समोर येणार आहे बघावच लागणार आहे.. मात्र ते बघताना एखादी फ़िल्म बघावी अशी त्रयस्थाची भूमिकाच मनाकडून आपोआप आणि कायम घेतली जाऊ शकणं हे केवढं मोठं भाग्य!

आता ह्यात दु:ख नक्कीच नाहीये.. सुख आहे का ते माहित नाही, कारण ते कसं असतं नक्की याची जाणीवच नाहीये….आणि आता ते जाणून घेण्याची इच्छा ही नाहीये, मात्र हे जे काही आहे त्याला, म्हणजे या अवस्थेला जर सुख म्हणत असतील तर मला समर्थ रामदास स्वामींची क्षमा मागून असच म्हणावं लागेल.."जगी सर्व सुखी अशी मीच आहे…"

आणि आता काहीही नकोय... हवाय तो फक्त ध्यास, माझ्या माउलीचा. माझं हे जे काही झालंय त्याला अनेक वेड्या लोकांची साथ मिळाली आणि माझ्यातलं हे वेड जोपासल्या गेलं, ज्याने माझ्या जीवनाचं सार्थक झालंय. मला काय मिळालय नक्की हे शब्दात सांगता येणार नाही, ती अनुभूतीच मोठी विलक्षण आहे.

श्वास श्वास रेवा, ध्यास ध्यास रेवा। अंतरीचा ठेवा रेवामाई॥१॥

प्रारब्धाचे देणे, म्हणोनी भोगणे। खंडून नुरणे अंती काही॥२॥

कर्पूराची जैसी, जळते आरती। येत काय हाती गंधा वीण?||३||

तोचि अनुबंध, तैसाची संबंध। देह ते प्रारब्ध, गंध रेवामाई॥४॥

काय आणि देणे, काय आता घेणे | रेवारुचि म्हणे रेवा रेवा ||५||

सुरवातीला मला अनेक जण म्हणाले, आपले अनुभव सांगू नयेत, सांगितले की परत तसे अनुभव यायचे नाही, मात्र माझी अनुभूती आणि गुरु आज्ञा म्हणतात, संचय करूच नये, मग अनुभवाचा तरी का करायचा? वाटून टाक.. जसं इतरांचं वेड घेऊन तुझं आयुष्य घडलं, ज्या आत्मानंदाची गोडी तू चाखतेयस, ती ही वाटून टाक..आणि म्हणून हे लिखाण...


रेवारूची-सुरुचि

संपर्क: ९८२३६५३५११

संकेत स्थळ : www.thetbhet.wordpress.com

# अर्पण पत्रिका

रेवाकाठी होत परिसाचे देणे। आतम्याचे सोने होईजे जी॥१॥

भाग्यवान देह, भाग्यवान जन्म। भाग्यवान, कर्म सुटे मागे

तुका वर्णे जैसे, आनंदाचि अंग। तैसा अंतरंग उजळीतसे॥२॥

आणिक हो जीवा, सांगा काय लागे। सर्व बंध, धागे, सुटल्यावरी?

मज नाही ठावो, दुजा कोण भावो। मज माझी लाहो "रेवारुचि" ॥३॥

आत्म्याचे सोने करणाऱ्या माझ्या रेवामाईच्या आणि खडतर वाटेवर स्वत: पायी चालून वेळी मला कडेवर उचलून धरणाऱ्या माझ्या प. पु नाना महाराज तराणेकर गुरु माउलीच्या चरणी

हे अनुभव पुष्प अर्पण.

# नर्मदा परिक्रमा

## एक विलक्षण अनुभूती

नर्मदा परिक्रमा एक विलक्षण अनुभूती भाग १

नर्मदा परिक्रमेचे अनुभव सांगताना सर्वप्रथम मी एक गोष्ट आवर्जून सांगू इच्छिते आणि ती अशी की ही नर्मदा परिक्रमा मी केलेलीच नाही. ही नर्मदा परिक्रमा माझ्याकडून माझ्या गुरुंनी आणि माझ्या नर्मदा माईनी करवून घेतेली आहे, लहान मुलाला आई जशी हात धरून चालायला शिकवते आणि त्याच्या पडणाऱ्या प्रत्येक पावलाकडे आईचं बारीक लक्ष असतं तसंच एका बाजूला गुरूमूर्ती प.पू नाना महाराज तराणेकर आणि दुसरीकडे माझी नर्मदा मैया यांच्या सुरक्षा कवचात माझी परिक्रमा पूर्ण झाली. सुरक्षा कवच असणं आवश्यक आहेच, आणि परिक्रमेतला काही भाग हा खरोखर घाबरवून सोडणारा आहे. मी भाग्यवान कारण हे सुरक्षा कवच मला मिळालं! कसं याचा उलगडा पुढे होईलच. परिक्रमेचं अनुभव कथन करताना माझ्या वाणीला अहंकाराचा स्पर्श होऊ देऊ नको ही प्रार्थना मी माझ्या मैयाला करेन. याच प्रार्थनेसोबत मी वाचकश्रोत्यांना एक विनंतीसुद्धा करेन ती अशी की जशी मी मैयाचं लेकरू आहे तसे आपण सर्वजण ही तिची लेकरे आहात, तेव्हा जो काही भाव आपल्या मनात आहे तो तिच्याचपर्यंत थेट पोहचवावा, मी तुमच्या आणि तिच्यामधील दुआ नाही तर तुमच्यासारखीच तिची एक बालिका आहे, मी निश्चितच भाग्यवान आहे कारण ह्या परिक्रमेची संधी आणि ती पूर्णत्वाला नेण्यासाठी मैया आणि गुरू यांची सोबत मला लाभली. बरेचदा आपण काही तरी करावं असं आपल्या मनात असतं आणि कुणाच्या तरी प्रेरणेने आपल्या त्या कार्याची नीव ठेवल्या जाते. माझ्या अनुभव कथनाने आपल्या पैकी एखाद्याच्या जरी मनात नर्मदा माईच्या परिक्रमेची इच्छा निर्माण झाली तरी माझं हे अनुभव कथन सफ़ल झालं असं मी समजेन. संपूर्ण आयुष्यच बदलवून टाकणारी ही एक तपश्चर्या आहे आणि ज्याच्या त्याच्या शक्तिनुरूप आणि प्रारब्धानुसार ती घडवून घेतल्या जात असते हेच समजून घेणं आवश्यक आहे.

नर्मदा परिक्रमाच का करायची?तुम्हाला नर्मदा परिक्रमा करायचा विचार कसा आला? साडेपाच महिने तुम्ही घराबाहेर राहिलात, घरच्यांनी कसं मान्य केलं? असे अनेक प्रश्न या वेळी तुमच्या मनात असणार आहेत. त्या सर्वांची उत्तरं मी माझ्या कडून देण्याचा प्रयत्न करेनच. तुमच्याकडून कदाचित काही असेही प्रश्न येतील ज्यांचे समाधान करण्याची क्षमता माझ्याकडे नसेल, अशी प्रश्न मैयावर सोपवून देऊयात, तिचं काय समाधान करायचे ते करेल! कदाचित तेच तुमच्या परिक्रमेचं बीज ही असेल? बघूयात.

तर नर्मदा परिक्रमाच का करायची? त्याची एक अख्यायिका आहे.

एकदा गंगा मैया आणि नर्मदा मैया तपश्चर्येला बसल्या होत्या. ज्यावेळी गंगामैयाची तपश्चर्या पूर्ण झाली त्यावेळी तिने शंकराला “मला तुमच्यात सामावून घ्या” असा वर मागितला आणि म्हणून शंकरांच्या जटेमध्ये गंगामाईला स्थान मिळालं. नर्मदा मैयाची तपश्चर्या पूर्ण झाली त्यावेळी “तुम्ही तुमच्या पंचायतनां सकट माझ्या मधे सामावून जा” असा वर तिने मागितला. आणि सर्व पंचायतनांसकट शंकर नर्मदा मैयामधे सामावून गेले. नर्मदा मैया मधे सर्व देवांचा वास आहे म्हणून नर्मदा मैयाची परिक्रमा ही सर्व देवांची परिक्रमा आहे. नर्मदा मैयाच्या किनारी बळी राजापासून तर ब्रम्हदेवापर्यंत असंख्य देव देवता, ऋषी मुनी यांनी तप केलं, आणि म्हणून नर्मदा किनारी असलेला प्रत्येक दगड हा शिवस्वरूप समजल्या जातो. इथे “ हर कंकर शंकर ” अशी उक्ती प्रचलीत आहे. आणि म्हणूनच परिक्रमा ही फ़क्त नर्मदा मैयाचीच करायची असते. बाकी कुठल्याही नदीला तिची परिक्रमा होण्याचं भाग्य लाभलेलं नाही. तसंच नर्मदा नदीचे महात्म्य सांगताना असं म्हटल्या जातं की सरस्वती मधे तीन वेळा स्नान करून पुण्य मिळतं, यमुने मधे सात वेळा स्नान करून पुण्य मिळतं, गंगेमधे एकदा स्नान करून पुण्य मिळतं मात्र तितकच पुण्य नर्मदेच्या केवळ दर्शनाने लाभतं. नर्मदा किनाऱ्यावर अनेक शक्ती

अदृष्य रुपात आजही तप करीत आहे आणि तिथली पवित्र कंपने आपल्याल्या त्या त्या ठिकाणी जाणवतात देखील!!

तुम्हाला नर्मदा परिक्रमा का कराविशी वाटली असं जेव्हा मला विचारल्या जातं तेव्हा खरंच जाणवतं की हा विचार मनात आला आणि पूर्ण झाला असं काही झालं नाही. त्यासाठी मधे बरीच वर्ष जावी लागली. थोडक्यात मी विचार केला आणि मी परिक्रमा केली इतकं सोपं हे गणित नाहीये, त्यासाठी गुरू आणि मैया य दोघांची ही इच्छा असावीच लागते. मी १४ वर्षांची असताना मला पहिल्यांदा नर्मदा परिक्रमा कराविशी वाटली, मात्र आज मी परिक्रमा केली त्यावेळी मी चाळीशीला पोचलेली आहे. अर्थात त्या वयात ही परिक्रमा करणं शक्य ही नव्ह्तं , आणि भाग्यतही नव्हतं म्हणून ती तेव्हा झाली नाही, आता होतं म्हणून आता झाली. माझे गुरू प. पू नाना महाराज तराणेकर यांची पोथी मला माझी आजी वाचायला सांगत असे. मी रोज एक पान अशीच पोथी वाचायचे. त्या पोथीमधे नाना महारांजानी जेव्हा जलेरी (नर्मदा मैया सतत डोळ्यापूढे ठेवून) नर्मदा परिक्रमा केली होती त्यातले अनुभव कथा रुपात सांगितलेले आहे. ते अनुभव वाचताना अंगावर काटा यायचा, वाटायचं खरंच नर्मदा असं दर्शन देते का? खूप इच्छा व्हायची, पण तो विषय तिथेच थांबून राहीला. मात्र या अनुभवातून एक अनुभव माझ्या कायम लक्षात राहीला तो इथे आपाल्याला मुद्दाम सांगतेय कारण याचा संबंध पुढे मला आलेल्या अनुभवाशी आहे. तर ज्या वेळी नाना महारांजानी परिक्रमा केली तो काळ आजच्या काळासारखा नव्हता. आजच्या सारख्या सेवा, ठिकठिकाणी आश्रम, अन्नदान किंवा अन्नछत्र ठायी ठायी नव्हते. मोबाईल सारखी व्यवस्था ही नव्हती आणि दळवळणाची साधन देखील नाही. रस्ते नाही, किनाऱ्यावरची वाट ही अतिशय बिकट आणि घनदाट जंगलाची…असा तो काळ. तर नानामहाराज जंगलातून एकटेच जात होते, संध्याकाळ व्हायला आलेली, भूक तहानेनी व्याकूळ नाना महाराज थोडी विश्रांती घ्यायला म्हणून एका झाडाखाली बसलेले, भूक खूप लागलेली, तहान खूप लागालेली, आणि तोंडने नामस्मरण सुरू. नाना थकले होते, त्यांचा किंचीत डोळा लागतो न लागतो तोच त्यांना आवाज आला, “बेटा दूध पाओगे?” बघतात समोर

एक गावकरी महिला सोन्याचा भला मोठा घडा घेऊन उभी. दूध म्हंटल्यावर नांनाची भूक बळावली आणि तो भला मोठा घडा तोंडाला लावून ते घटाघट दूध पिऊ लागले. दूध संपल्यावर घडा तोंडाचा काढतात आणि बघतात तो ती महिला तिथे नाहीच… आता हा सोन्याचा घडा परत कसा कारायचा? कोण असेल ती महिला जिने इतका किमती सोन्याचा घडा असा सोडून दिला असावा? नानांच्या लक्षात आलं, ती दुसरी तिसरी कुणी नसून साक्षात नर्मदा माई होती. नानांनी तिचा घडा तिच्या पात्रात अर्पण केला…. असे अनेक प्रसंग या पोथी मधे आहे.

माझ्या मनात नर्मदा परिक्रमा करण्याची प्रेरणा ही भक्ती पोटी नव्हे तर उत्सुकतेपोटीच निर्माण झाली होती..माझी उत्सुकता माझ्या  नर्मदा माईनी अशी काही शमवली की तिचं रुपांतर आता तिच्या भक्ती मधे आणि तिच्यावरच्या श्रद्धेमधे झालं आहे. मला नर्मदा परिक्रमा का करविशी वाटली याचं एक आणखी कारण आहे.किंबहूना ती अमलात कशी आली त्याचं कारण आहे असं म्हंटलं तरी चालेल. जुलै २०१७ मधे माझं पी.एच.डी चे सबमिशन होते. ते काम मला खरंच खूप जड जात होतं. त्यावेळी मी जरा डिप्रेशन मधे गेले होते, मात्र नर्मदा मैयाचे अनुभव ऐकले की खूप प्रसन्न वाटायचं…एक वेळ तर अशी आली की जणू ती मैया बोलावतेय मला असं वाटू लागलं. मला माझ्या बद्दल, आयुष्याबद्दल, अध्यात्माबद्दल बरेच प्रश्न बऱ्याच वर्षांपासून भेडसावत होते. काहीतरी वेगळं समाधान, कसली तरी तृप्ती मला हवी होती, पण नक्की काय हे काही समजत नव्हतं. अज्ञाताचा अखंड शोध सुरु होता अणि त्याची उत्तरं मला नर्मदा परिक्रमेत मिळतील असा विश्वास मला जाणवत होता. तर असे काही माहित असलेले आणि काही माहितच नसलेले कारणं घेऊन मी परिक्रमेला निघाले.

सुरवातीला मी काही महिने घराबाहेर राहणार म्हंटल्यावर अपेक्षेप्रमाणे माझ्या घरून ही विरोध झालाच, पण माझा हट्ट आणि त्याहून माझ्या मनाची होणारी घालमेल समजून घेऊन माझ्या घरच्यांनी मला परिक्रमेला जाऊ देण्याचा निर्णय घेतला. त्यांच्या या होकारा शिवाय मला जाता येणं शक्य नव्हतच. १ नोव्हेंबर २०१७ला ओंकारेश्वर येथून परिक्रमा सुरू करण्याचा

निर्णय घेतला. नागपूरहून मी, ठाण्याहून सौ डोंगरे आणि मुंबई हून सौ मंत्री अशा तिघी जणी सोबत परिक्रमा करू असा निर्णय घेतला…पण निर्णय घेणारे आपण कुणीच नसतो खरं…. ते सगळं तीच ठरवत असते…आणि हे ती नर्मदा मैया वेळोवेळी जाणवूनसुद्धा देते. कसं ते पुढच्या भागांमध्ये लक्षात येईलच.



नर्मदा परिक्रमा एक विलक्षण अनुभूती-भाग २

प्रत्यक्ष परिक्रमेच्या आधीच जेव्हा आशिर्वचनांची अनुभूती येते त्यावेळी……

परिक्रमा करण्या आधी अनिल दास महाराजांकडून संकल्प करवून घेतला. हा संकल्प केला त्यावेळी मनात खूप घालमेल होती. नर्मदा माईशी डायरेक्ट पण मनातल्या मनात बोलणं पहिल्यांदा सुरू झालं. समोर खळखळून वाहणारी नर्मदा नदी, तिचं जीव घाबरवणारच ते रूप आहे. तिच्या प्रेमाची आणि तिच्या माझ्यावरच्या ममतेची प्रचिती मला जरी आली नसली तरी आई लेकराला काय हवय हे समजून घेण्यात कधीच कमी पडत नाही. तीनी माझ्या मनाची घालमेल ओळखली मला म्हणाली यथाशक्ती परिक्रमा पूर्ण करेन असा संकल्प कर…. ती म्हणाली असच वाटलं मला…जसा एखादा विचार आपला नाही हे आपल्याला अचानक समजतं तसं झालं.. कुणितरी कानात सांगावं तसं वाटलं…परिक्रमा सुरुही झाली नाही आणि आईनी सांगीतलं..तुला जिथे गरज पडेल तिथे माझ्याशी निःसंकोच बोल, मी तुला मार्ग दाखवेन. परिक्रमा सुरु होण्याच्या आधीच मला आलेला हा अनुभव…

खरं तर या ही आधी मला एक अनुभव आला, माझ्या गुरु माऊलीचा.. मी परिक्रमेला जाण्याचा निर्णय घेतला आणि ठरल्याप्रमाणे मी इंदोरला आले. माझी आत्या इंदोरला असते तिच्याकडे मी मुक्कामाला होते. माझ्याकडे सगळेच नाना महारांजाचे अनुग्रहीत आहेत, पण अजून माझा अनुग्रह झाला नव्हता. अनेक वर्षांपूर्वी मी अनुग्रह घेणार होते, नाना महाराज ज्या भक्ताना अनुग्रह देणार होते त्या वहीत माझं नाव आणि अनुग्रह घेण्याची तारीख ही नमूद झाली होती, पण पुन्हा तेच….आपण काहीच ठरवत नसतो… नाना महारांजाची तब्येत बिघडली, त्यांनी देह ठेवला, आणि माझा अनुग्रह घ्यायचा राहून गेला. मला खूप वाईट वाटलं

होतं··· तेव्हा मी १५-१६ वर्षांची असेन. मी ठरवलं, आता अनुग्रह घ्यायचाच नाही. माझे गुरू नानाच···. मला दुसऱ्या कुणाच कडून अनुग्रह घ्यावासाच वाटला नाही··· आणि मी घेतला ही नाही. मनात मात्र मी नेहेमीच नानांनाच माझे गुरू समजत राहीले. तर गंम्मत अशी झाली की आत्ता म्हणजे नर्मदा परिक्रमा सुरू करण्याच्या दोन दिवस आधी मला आत्यानी विचारल, “काग?, तुझा मंत्र झालाय नं घेऊन?” आणि मला अचानक मंत्र घ्यावासा वाटू लागला. रात्री साडे अकराला मला खूप बेचैनी वाटू लागली आणि गुरुमंत्र हवाच हे प्रकर्षानी जाणवू लागलं. मी माझ्या आत्येभावाला सांगितलं··· त्याने सकाळी बाबासाहेब तराणेकर (नानांचे नातू) यांना फ़ोन केला. माझी आधी भेट झाली होती, मी परिक्रमेला जाणार हे सांगून नानांचा आणि बाबा साहेबांचा अशिर्वाद घेऊन आले होतेच पण आता मला गुरुमंत्र हवा होता. बाबासहेबांना परगावी जायचे असतानाही, लेकरू परिक्रमेला जातय म्हणून वेळात वेळ काढून, त्याच दिवशी मला गुरुमंत्र दिला. माझ्या परिक्रमेला निघण्याच्या आधीच माझ्या गुरुंनी मला पंखाखाली घेतलं..

गुरुबळ पाठीशी आणि मैया भोवताली असताना माझी परिक्रमा पूर्ण आणि सुकर कशी होणार नाही?

परिक्रमा सुरु झाल्या झाल्या अनेकांच्या पायाला छाले आलेले मी पाहिले, असं म्हणतात या कालावधीत जो काय त्रास होतो ते आपले भोग असतात, आपण कुणाला तरी काही तरी त्रास दिलेला असतो आणि तो अपल्याला परत मिळणार असतो···आपलं देणं झालेलं असतं, आपण घेणं आता बाकी असतं···. तो त्रास सहन करावाच लागतो.. आणि खरोखर सोबत असलेले अनेक परिक्रमावासी वेगवेगळ्या त्रासातून जाताना मी पाहिले. मला काहिही त्रास झाला नाही. पूर्ण परिक्रमेत मला ३ दा ताप चढला, आणि त्या त्या वेळेला मैयाचे अनुभव आले, मात्र शरीराला जखम, दु:ख, पोट खराब होणे, पाय दुखणे, पायाला छाले येणे असा काहीही त्रास मला परिक्रमेत झाला नाही···.मला झाला नाही म्हणण्यापेक्षा माझ्या माईनी आणि माझ्या

गुरुंनी तो वरचेवर झेलून घेतला..तो माझ्यापर्यंत पोहचूच दिला नाही…आणि हे मी इतक्या खात्रीपूर्वक फ़क्त येवढ्यासाठी सांगू शकते की मी एक अत्यंत सर्वसाधारण व्यक्ती आहे. माझ्या जीवनकालात किंवा गतजन्मांमधे मी अनेक चुका, अनेक पापं नक्कीच केले असणार आहे आणि तरीही मला त्रास झाला नाही कारण तो माझ्या गुरुंनी आणि मैयानी मला होऊ दिला नाही. अनेक पापकर्मांसोबत निस्वार्थ पणानी आणि निष्पाप मनानी एखाद तरी सत्कर्म माझ्या कडून करवून घेतल्या गेलं असलं पाहीजे की या जन्मामधे मला  नाना महाराज गुरू म्हणून लभले, त्यांचे आशिर्वाद मला मिळाले आणि काहीही त्रास न होता परिक्रमा करण्याचे भाग्य मिळाले आहे. म्हणून सुरवातीला मी जे म्हणाले तेच खरे..ही परिक्रमा मी केलेली नाहीच.

एक महत्वाचा आणि अगदी सुरवातीचा अनुभव मी नमूद करायला विसरले आहे, त्याला कारण पण तसंच आहे, ते असं की हा अनुभव मला नागपुरात, म्हणजे परिक्रमा सुरु करण्याच्या महिनाभर आधी आला… आश्चर्य वाटलं नं? सांगते. माझ्या घरापासून कोराडी देवस्थान हे साधारण २५ किलोमीटर आहे. पायी चालण्याचा सराव म्हणून मी इथे पायी जाण्याचं ठरवलं. नुकतेच पांढरे कपडे शिवून घेतले होते. तेही वापरून बघावेत कम्फर्टेबल आहेत की नाही म्हणून त्या दिवशी तेच घातले, दसऱ्याचा मुहूर्त साधला, आणि निघाले. रस्त्यात कुत्री त्रास देतात म्हणून एक काठी घेतली होती, आणि कमंडलू हातात घेऊन चालण्याचा सराव करावा म्हणून तो ही घेतला होता. पाठीवर १२-१३ किलोची बॅग पण होतीच. साधारण १५ की. मी अंतर चालून झालं होतं. उन फार होतं. तसे सकाळचे साडे आठ नऊ झाले असतील. एका हॉटेल समोर जरा सावली होती म्हणून तिथे जरा थांबले. तेवढ्यात आतून एक मध्यम वयीन तरुण धावत बाहेर आला " नर्मदे हर मैया जी, परीक्रमेचा सराव करता आहात का? कार्तिक द्वादशीला उचला परिक्रमा"   असं म्हणतच तो बाहेर आला. मला खूप आश्चर्य वाटलं. इथे नागपुरात मैयाजी म्हणून धावत येऊन मला हा नमस्कार करतो, याला कसं माहित मी परिक्रमा करणार ते? "मैयाजी थंड पाणी प्या, नाश्ता करा"   असं म्हणत माझ्या हातातून कमंडलू ओढून घेऊन एव्हाना गरम झालेलं पाणी बदलून ठंडगार पाणी त्यात दिलंसुद्धा.

त्याच्याशी छान ओळख झाली. गप्पा झाल्या. त्यांचं नाव अविनाश सोळंकी. ते दुबईला असतात, आणि नर्मदा खंडात ७ ठिकाणी अन्नछत्र चालवतात. त्यांची सासुरवाडी नागपूरला म्हणून ते इथे आले होते. हा माणूस मैया चा भक्त आहे. सुट्टी अभावी त्यांची परिक्रमा होऊ शकत नाही याची त्यांना फार खंत आहे आणि काहीतरी सत्कार्य म्हणून ते स्वखर्चाने आणि काही मदतीने हे ७ आणि पुढे येऊ घातलेले ३ अन्नछत्र चालवत आहेत. अविनाशजींनी माझा नंबर लिहून घेतला. दुसऱ्या दिवशी वेळ काढून घरी आले आणि परिक्रमेची पूर्ण माहिती दिली आणि एक पुस्तक मला भेट म्हणून दिलं. संपूर्ण परिक्रमेत जिथे जिथे मला नेटवर्क असेल तिथे तिथे मला यांचा दुबईहून फोन येत. फोन करून हा माणूस मला पुढची माहिती सांगायचा आणि एक मागणी करायचा…” मैयाजी मागच्या फोन नंतर काय अनुभव आले सांगा” . नेटवर्क अभावी बरेचदा फोन होत नसत. अविनाशजींच्या माध्यमातून माई मला सतत सोबत देत होतीच. आता सांगा, कोण कुठले हे अविनाश जी…मला परिक्रमेच्या महिना भर आधीपासून सोबत करत होते, ते अगदी परिक्रमा संपेपर्यंत. माझी परिक्रमा होणे हे खरंच सांगा, फक्त माझ्या निर्णयामुळे साध्य झालंय का? नाही. ह्या लेकराकडून परिक्रमा करवून घ्यावी हा माझ्या माईचा आशीर्वाद आणि माझ्या जन्मदात्यांची आणि पूर्वजांची पुण्याईच आहे. आणि हे जाणवून देणारे शिवाय अविनाशजींच्या मदतीचे अजूनही अनुभव आहेत.

लक्कडकोटची झाडी, नेमावर हे अनुभव मी विसरू शकत नाही…पण अनुभव सूचीमध्ये त्यांचा क्रमांक जरा नंतर आहे, पण त्या आधीचे विलक्षण आणि अविश्वसनीय अनुभव आहेत, ते पुढच्या भागांमध्ये येतीलच. संकल्प घेतल्या गेला, आता परिक्रमेला सुरवात करायची. आम्ही तिघी एकत्र होतो, आणि एकत्र राहू असं वाटत होतं. सौ मंत्री यांना चालण्याचा फ़ारसा सराव नव्हता असं त्या म्हणाल्या त्यामुळे संकल्प घेण्याआधी देखिल मोरटक्का ते ओंकारेश्वर आम्ही पायी चालून गेलो होतो, सराव करण्यासाठी. असं म्हणतात संकल्पात बळ असतं.. आणि हो, ते असतच! ते कसं समजलं याचा अनुभव सांगते. पण त्या आधी एक कबूली नामा मला द्यावासा वाटतो. संकल्प झाला होता, खरं तर आता माझी मैयावर पूर्ण श्रद्धा

असायला हवी होती, मनातून तशी इच्छा ही होती, पण कुठली तरी भिती मनात होतीच… ओंकारेश्वर ते मोरट्क्का मैया किनारी जाऊ नका असा सल्ला अनेकांनी दिला. तुमचं वजन जास्त आहे, तुम्हाला झेपणार नाही, वाट कठीण आहे असं ही सांगण्यात आलं… इथे माझ्या मनानी दोन कारणं पुढे केली.. १ कठीण असेल, काही झालं तर? परिक्रमा पूर्ण व्हायची नाही आणि दुसरं, सौ मंत्री आणि सौ. डोंगरे या दोघीही त्या मार्गाने जाण्यास तयार नव्हत्या… मीसुद्धा हाय वे नी जायचं ठरवलं… खरं तर ती मैयानी माझ्या मनाची घेतलेली परिक्षा असावी, मी त्यात नापास झाले आहे… आणि पुढे आलेल्या अनुभवांनंतर आज मला हे जाणवतय की त्या वेळी मी चूक केली. यथा शक्ती केलेला संकल्प हे माझ्या भित्र्या मनाला झाकणारं आवरण ठरलं.. संकल्प कसा असावा असं सांगताना एक गोष्ट मुद्दाम इथे सांगतेय, आधीच सांगतेय म्हणजे संकल्प हा शब्द जरी आला तरी तो पाळल्या जाईल आणि जी चूक मी केली ती इतरांकडून होणार नाही.

गोष्ट अशी आहे, एक व्यापरी होता, त्यानी ठरवलं, आता यापुढे आपण कुणालाही पैसे द्यायचे नाही, जे काही देणं असेल ते देऊन मोकळं व्हायचं आणि मग पुढे कुणालाही एक पैसा पण द्यायचा नाही. त्यानी ठरल्याप्रमाणे जे काही देणे होते ते पूर्ण केले आणि संकल्प घेतला… पुढे काही दिवसांनी एक सन्यासी त्या व्यापाऱ्याकडे आला, आणि म्हणाला मला तुमच्याकडून १ रुपये घेणे आहे. व्यापाऱ्याने संकल्प घेतलेला, तो म्हणाला मी काहीही झालं तरी पैसे देणार नाही. सन्यासी निघून गेला, काही दिवसांनी परत आला, तेव्हा व्यापाऱ्यानी त्याला दुरून बघितलं, मुलाला सांगितलं, जा बाबा झोपलेत म्हणून सांग… सन्यासाला तसं सांगितल्यावर सन्यासी म्हणाला मी वाट बघतो…पण आज मी माझे पैसे घेऊनच जाईन! बराच वेळ निघून गेला… व्यापाऱ्यानी मुलाला सांगीतलं, जा सांग त्या संन्याशाला, बाबा आजारी आहेत, तुला आता १ रुपया मिळनार नाही. मुलाने व्यापाऱ्याला समजवल, १ रुपया तर आहे, देऊन टाका नं…. व्यापारी आपाल्या मतावर ठाम… मुलाने सांगितलं, बाबा आजारी आहेत… सन्यासी

म्हणाला “मी वाट पाहीन”  अनेक दिवस निघून गेले, व्यापाऱ्याच्या घरासमोर संन्यासी ठिय्या मारून बसलेला…एक दिवस व्यापारी मुलाला म्हणाला..जा संन्याशाला सांग बाबा वारलेत. मुलाने संन्याशाला तसाच निरोप दिला…. संन्यासी म्हणाला “ अरे रे, माझा रुपया ही गेला आणि व्यापारी ही, आता याचा अंतिम विधी झाल्यावर मी माझ्या गावी परत जाईन”  मुलगा घाबरला… त्याने वडिलांना सांगितले…व्यापाऱ्याने मुलाला अंतिम संस्कारांची तयारी करायला सांगितलं… मुलगा बिचारा नाईलाजाने तयारी करू लागला…लोक जमा झाले, व्यापाऱ्याला चितेवर ठेवण्यात आलं, आता मात्र मुलगा घाबरला, आपल्या वडिलांना जिवंतपणीच अग्नी द्यायचा?... त्याचे हात थरथर कापू लागले… वडिलांच्या छातीवर डोकं ठेवून तो वडिलांना विनवू लागला..“बाबा अहो एका रुपयासाठी तुम्ही मरणसुद्धा पत्करताय? काय हा मूर्खपणा?.. व्यापारी काही ऐकेच ना..म्हणाला..अग्नी दे, पेटव चिता, पण मी रूपया देणार नाही… .मुलाने नाईलाजास्त्व चितेला अग्नी दिला, आणि आता चिता पेटणार तेवढ्यात त्या अग्नी चं रुपांतर फुलांमधे झालं… संन्यासी चितेजवळ गेला आणि साक्षात विष्णू रुपात समोर आला… व्यापाऱ्याला चितेवरून दूर केलं …  म्हणाला..संकल्प असावा तर असा… .

मी मात्र यथाशक्ती संकल्प केला.. म्हणजे कुठेतरी माझा विश्वास माझ्यावर आणि माझ्या मैयावर कमी पडला…  ती कनवाळूच आहे, मला त्रास होऊ नये याची काळजी ती घेतेच आहे, पण मी तिच्यावर श्रद्धा आणि विश्वास ठेवून, काही तरी नियम ठेवून संकल्प केला असता तर तोही तिनी पूर्णत्वाला नेलाच असता… पुन्हा परिक्रमेची संधी मिळाल्यास ही चूक माझ्याकडून होऊ देऊ नको असं मी तिला आताच विनवते. परिक्रमेचे नियम नक्की काय, त्याची कारणं नक्की काय हे खरं तर अजूनही हवं तसं मला समजलेलं नाहीये, पण १००% श्रद्धा हा नियम असायलाच हवा हे नक्की. भिती वाटणे म्हणजे श्रद्धा कमी पडणेच आहे आणि काही वेळेला माझ्याकडून ही चूक झालेली आहे. मात्र काही वेळेला माझ्या नर्मदा माईनी मला अगदी अभयाचं वरदान देखिल दिलं ते कसं ते ही माझ्या अनुभव कथनामध्ये येईलच.

संकल्प करून झाला होता. कार्तिक द्वादशी, १ नोव्हेंबर २०१७ हा दिवस. मी या अनुभव कथनामधे माझी रोजनिशी सांगणार नाहीये कारण ज्याच्या त्याच्या प्रकृती आणि प्रारब्धानुसार परिक्रमा घडत असते. मी इथे मला आलेले अनुभव कथन करणार आहे कारण माझ्या मते ते अनुभव मला मिळणं हेच महत्वाचं होतं.. तर परिक्रमेची वाटचाल  प्रत्यक्ष रित्या सुरु होण्याआधीचे अनुभव मी  आधीचे अनुभव मी सांगितले, आता  अनुभवाला सुरवात करू पुढच्या भागापासून··· ..नर्मदे हर



नर्मदा परिक्रमा एक विलक्षण अनुभूती- भाग ३
परिक्रमेच्या पहिल्याच दिवशी लागोपाठ अनुभव,
एक शुभ संकेत, आणि एक कोडं पडतं तेव्हा…

नर्मदे हर.

पहिल्या दिवशी ओंकारेश्वर ते मोरटक्का, साधारण ११ कि.मी चं अंतर होतं. मी मागे सांगितलं तसं संकल्प करण्याआधी सराव म्हणून आम्ही मोरटक्का ते ओंकारेश्व पायी गेलो होतो.. आता गम्मत बघा… अंतर सारखच, पण संकल्पामधे बळ असतं याची प्रचिती अगदी पहिल्याच दिवशी आम्हाला आली. ११ कि.मी अंतर चालायला आम्हाला आधी जवळ जवळ साडे चार तास लागले. चालण्याची सवय नाही, त्यामुळे २ ते ३ कि.मी अंतरावर आम्ही थांबायचो… मात्र संकल्प केल्यावर, म्हणजे तसं पाहता २ दिवसांनी लगेच हेच अंतर ३.३० तासात पार पडले..आणि त्यातही १ तास वेळ हा जेवण्यात गेला..मधे एक रोटी आश्रम लागतो तिथे दुपारच्या जेवणाची… (आता आपण भोजन प्रसादी हा शब्द जेवणासाठी वापरू)ची व्यवस्था असते. यापुढे आपण जेवणाला भोजन प्रसादी म्हणू याचं कारण आहे. ते असं की परिक्रमेमधे आपल्याला जे काही मिळतं तो नर्मदा माईचा प्रसाद असतो. बालभोग हा ही तसाच एक शब्द, सकाळच्या न्यहारीला बालभोग म्हणतात, तसंच पूर्ण जेवण असलं की त्याला म्हणायचं राजभोग! बरं  तर आता पुन्हा संकल्पाकडे वळू.

ओंकारेश्वर ते मोरटक्का, परिक्रमेचा पहिला दिवस आणि मनात खूप उत्साह होताच पण आपण इतकं मोठं ध्येय समोर ठेवलं ते पूर्ण होईल की नाही ही भीती होती. रस्त्याने चालताना त्या दिवशी आम्ही २० -२२ लोक असू. भाग्य बघा कसं असतं…  थोडं ऊन होतच..ऑक्टोबर हीट संपली नव्हती मी आणि सौ डोंगरे सोबत होतो, सौ मंत्री जरा पुढे होत्या. रस्त्यात आमच्या जवळचं पाणी संपलं… अगदी आम्ही नवीन परिक्रमावासी असल्याने अजून

“नर्मदे हर” ही सगळ्या प्रश्नांची आणि सगळ्या कुलुपांची किल्ली असते हे आम्हाला समजलं नव्हतं. पण स्थानीय लोकांना ते माहित असतं. तर पाणी संपलं होतं आणि आम्ही पाणी कुठे मिळेल का याचा थोडा शोध घेत होतो. इतक्यात एक सायकल वाला येऊन थांबला… . म्हणाला “ नर्मदे हर माताजी, छाछ पाओगे?” आम्ही पाणी शोधतोय, हा ताक विचारतोय… .मनापासून आनंद झाला… . आम्ही म्हणालो कैसा दिया, तर म्हणे “पाप करवाओगे क्या मैया जी, पैसा नही लुंगा, आपकी पानी की बोतल खाली है न, उसमे भर लो… .” खूप आग्रह करून जवळ जवळ ३ लिटर ताक त्यानी जबरदस्ती नी आम्हाला दिलच..मी आणि सौ डोंगरे भरपूर ताक पिऊन तृप्त झालो आणि वाटेत भेटणाऱ्या परिक्रमावासियांना देऊन ते संपवलं. पण तेव्हा खूप आश्चर्य वाटलं… .आणि जे भाव ताक पिऊन तृप्त झालेल्या आमच्या चेहऱ्यावर बघून तो ताक वाला आनंदित झाला होता तोच आनंद ते ताक पुढे भेटलेल्या परिक्रमावासियांना देऊन आम्हाला झाला… त्या ताकवल्यानी आम्हाला २ गोष्टी शिकवल्या.. एक, नर्मदे हर म्हंटलं की मग कुठलाही प्रश्न शिल्लक उरत नाही, आणि दुसरं म्हण्जे सेवा घेण्यापेक्षाही सेवा देण्यात जो आनंद आहे तो जास्त रसाळ असतो. ताक तेच, ते परिक्रमावासी ही आमच्या सारखेच..पण आनंद दुहेरी.

हाच विचार करत आम्ही एक रोटी आश्रमात पोचलो… कुणीतरी म्हणालं ऊन खूप आहे, काही तरी गोड खायला हवं..त्यावर एक परिक्रमावासी म्हणाला, “रास्ते मे रबडी का दुकान था… सोचा था ले लू..भूल गया” , आणि काय आश्चर्य? जेवायला बसलो तो पनात घट्ट रबडी! एका अनुभवाच्या धक्यातून निघत नाही तर लगेच दुसरा… तिसरा देखिल… जसं काही ती मैया सांगतेय की हा केवळ संयोग नाहीये.. मी आहे आणि मी तुमच्या सोबत आहे.

एक रोटी आश्रमात जेवण झाल्यावर मी आणि सौ मंत्री थोडं मागे थांबलो… एक रोटी आश्रम हे नाव जरा वेगळं वाटत होतं म्हणून चौकशी केली. त्या साधू महाराजांनी जे सांगीतलं तो परिक्रमेतला आणखी एक मोलाचा ठेवा… ते म्हणाले “रोटी कौन खाता है?... जिसे भूक

लगती है वो… . अब सोचिये, भूक क्या होती है? जिसके पूरे होने से आपको समाधान मिले वो… . फ़िर आप इच्छाओं को भूक कह सकते हो! किन्तू एक रोटी का मतलब ये है की ऐसी इच्छा जो पूरी होने पर आपको तृप्ती मिले. वही आपकी रोटी है… आप सुबह पेटभर खाना खाओगे और शामको आपको फ़िर भूक लगेगी… .तो एक रोटी मे काम नही चलेगा.. फ़िर ये भूक कौनसी है जो एक रोटी मे पूरी हो जाये?तो ये भूक है इश्वर प्राप्ती की..एक बार आपको ईश्वर प्राप्ती हो जाये तो ना कोई भूक बाकी बचती है और ना ही कोई इच्छा… बेटा जी आप हमारे पुत्री समान हो, और आप हमारे माता समान भी हो.. क्युंकी आप हमारे पुत्री हो हम आपको सलाह देंगे की इस एक रोटी की खोज करो, और उसे पाने की कोशिश करो… और आप हमारे माता समान है इसलिये आपको विनंती करेंगे की आप जगत माता बनो… . इसके लिये आपको कुछ करने की जरूरत नही है, आप जैसे अपने बच्चे के गुनाह गलतीयो को प्रेम से सवारते हो इसी प्रकार जगत की आपके प्रती होने वाली वो हर गलती, मा की तरह भूला दो… इससे जगत का नही आपके मातृत्व का विकास होगा, आपकी रोटी की तरफ़ आपका ध्यान बना रहेगा." असं म्हणून त्यांनी रुद्राक्षाची एक छोटीशी माळ माझ्या हाती दिली… .

आजचा हा तिसरा अनुभव होता… आजच्या आज अजून किती अनुभव आणि अजून काय काय मैया कडून मिळणार होतं याचा अंदाजही नव्हता. असच झालं … परिक्रमेच्या अगदी पहिल्या दिवशी नर्मदा मैयांनी एका वेगळ्याच अनुभवातून मला एक शुभ संकेतही दिला आणि एक कोडं ही घातलं… कोड्याचं उत्तर शोधायचं तेवढ माझ्या साठी शिल्लक ठेवलं. तसं पहाता ते ही तिनंच सोडवून दिलं, आणि कधी माहितिये का? माझी परिक्रमा शेवटच्या टप्प्यात होती त्या वेळी… म्हणजे जवळ जवळ साडे चार महिन्यांनंतर!

या एक रोटी आश्रमाच्या किंचित आधी मला एक आजोबा दिसलेत. वय सधारण ८० च्या आसपास. मला त्यांचं कौतुक वाटलं आणि या वयात हे आजोबा पायी परिक्रमा करताहेत म्हणून आश्चर्य ही वाटलं. मीच त्यांची चौकशी करायला सुरवात केली. हे आजोबा म्ह्णजे जरा

वेगळच रसायन आहे हे मला आमच्या गप्पांमधे जाणवू लागलं… आजोबा चालताना मधेच थांबायचेत, कुठेतरी शून्यात बघून नमस्कार करायचे, आणि मलाही नमस्कार करायला लावायचे… " बघ बघ, इथे इश्वराचं अस्तित्व जाणवलं तुला?" असं विचारायचे… मी पामर, मला काय जाणवणार? मी म्हणायचे "मला नाही समजत" ! मग असं दोन तिन वेळा थांबून झाल्यावर त्यांनी सांगितलं, वाऱ्याबरोबर मंद सुवास ज्या दिशेनी येतो, तिथे जाणवतो अगं ईश्वराचा वास… पण मला असा मंद सुगध ही आला नव्हता… मी आपलं आजोबांबद्दल आणि त्यांच्या साधने बद्दलच विचार करत राहिले. नक्की ह्यांची खूप साधना असणार आहे…

त्यांचं नाव त्यांनी मला नाईक असं सांगितलं… म्हणाले, मी नाईक, तू पण नाईक… काहीतरी नातं असेल आपलं! पण मला नं लेले काका म्हणतात. तूमच्या नागपूर जवळ कारंजा आहे नं? तिथे खोली आहे माझी! पण तसा मी पुण्याचा… माझे प्रश्न सुरू झाले त्यांना… मग कारंजाला कधी असता? काय करता तिथे? त्यांचं एक एक उत्तर मला अनेक प्रश्न निर्माण करून देणारं आणि नोर्मल उत्तरांपेक्षा वेगळं वाटत होतं… ते म्हणाले, तिथे मी सगळ्यांकडे लक्ष देतो. माझ्या खोलीत जाण्याची परवानगी नाही कुणाला! फ़क्त पुजारीच काय तो जाऊ शकतो… मला काही समजेना… आजोबा या वयात का उचचली परिक्रमा? यावर ते म्हणाले, अनेकांना भेट द्याय्चं मी कबूल केलं आहे… म्हणून उचलली… .आणि खरी गम्मत तर शेवटी आली… त्यांनी मला कसा शुभ संकेत दिला माहितिये? मी त्यांच्या त्या बोलण्याने अक्षरश: बुचकळ्यातच पडले… सांगते..हा अनुभव पुढच्या भागात पूर्ण करते

नर्मदा परिक्रमा- एक विलक्षन अनुभूती- भाग ४

परिक्रमेच्या पहिल्याच दिवशी लागोपाठ अनुभव, एक शुभ संकेत, आणि एक कोडं पडतं तेव्हा…

नर्मदे हर.

नर्मदे हर… तर मागच्या भागात आपण मला पडलेल्या कोड्याबद्दल बोलत होतो! लेले काका असं काय म्हणाले होते? मी इतकी बुचकळ्यात का पडले? या कोड्याचा उलगडा कसा आणि कुठे झाला ते आता सांगते.

लेले काकांशी माझ्या बऱ्याच गप्पा झाल्यात. साधना कशी करायची? माझे गुरू कोण? कुठले श्लोक म्हणायचे, काय वाचायचं असे अनेक विषय ते माझ्याशी बोलत होते.. खरंतर माझ्या बाबतीत त्यांनी फ़ार काही विचारलं नाही पण मी मात्र अनेक प्रश्न विचारू लागले. तेवढी मोकळीक तोवर बोलून निर्माण झाली होती. ते अगदीच प्रेमाने माझ्याशी बोलत होते… मधे मधे मला आशिर्वाद ही देत होते..“छान होईल बेटा तुझं सगळं” … असं ऐकून छान वाटत होतं, कुणी एक आजोबा, काही कारण नसताना, निस्वार्थ भावनेनी आशिर्वाद देतात हेच मुळात एक वेगळं फ़ीलिंग होतं. मला हे लेले आजोबा वेगळे वाटले, पण आवडले होते.

आमचं भोजन प्रसादी घेऊन झालं आणि लेले काका म्हणाले, बाळ, बरीच प्रश्न दिसतात तुझ्या मनात… बरं मी उत्तर देतो..तुला माझ्याबद्दल एक गोष्ट सांगतोच आता! आजोबा काय सांगतात याकडे मी कान लावून होते. त्यांनी जरा पॉज घेतला, मला थोडं बाजूला बोलावलं, आणि म्हणाले, नाही मी नाही सांगणार तुला माझ्याबद्दल… अरेच्या, अचानक काय झालं आजोबा, सांगा ना… .मी आग्रह केला. त्यवर ते म्हणतात… ” नको, माझ्याबद्दल तुला नर्मदा

मैयाच सांगेल काय ते! मी कोण आहे हे तुला तुझ्या नर्मदा मैयाकडून आणि तुझ्या सोबत च्या लोकांकडून समजेल… आणि ते ही तुझी परिक्रमा शेवटच्या टप्प्यात असेल त्या वेळी” .

मला आता मात्र फ़ारच वेगळं वाटू लागलं… पण एक शुभ संकेत मिळाला… . माझ्या परिक्रमेच्या शेवटच्या टप्प्यात असं आजोबा म्हणाले, म्हणजे परिक्रमा पूर्ण होणार हे नक्की. आजोबांना जास्त आग्रह न करता आम्ही पुढची वाटचाल सुरु केली. मी आता मझ्या मैत्रिणीसोबत होते आणि आजोबा त्यांच्या सोबत च्या पुरुष मंडळींसोबत. ती माझी आणि आजोबांची शेवटची भेट. काय आश्चर्य न? त्या नंतर पूर्ण परिक्रमेत मला लेले काका पुन्हा दिसलेच नाही. मी मात्र प्रत्येक आश्रमात ते येऊन गेले का ही चौकशी करायचे. म्हातारा माणूस, आपल्या पेक्षा पुढे जाणार नाही कदाचित असं वाटायचं.

पुढे माझ्यासोबत मंदार वाळिंबे, सुदिन पराडकर आणि त्याचे काका, आणि तांबे बाबा असे लोक  होते. सौ मंत्रींची परिक्रमा पूर्ण होऊ शकली नाही आणि सौ डोंगरे काही कारणास्तव वेगळ्या गृप बरोबर होत्या… आम्ही सोबत राहयचं ठरवलं असून ते तसं झालं नव्ह्तं!.असो.. तर लेले काकांबद्दल मंदार व गृप माझ्याकडून ऐकून होते. मी लेले काकांचा शोध घेतेय हे त्यांना महित होतं. तब्बल साडे चार महिने गेलेत… मला लेले काका भेटलेच नाही, मात्र एक दिवस अचानक माझ्या समोर जे काही आलं त्याने मी धन्य धन्य झाले… माझ्या भाग्याचा मलाच हेवा वाटावा अशीच गोष्ट.

नरसिंगपूर जिल्ह्यातल्या गुरसी गावात एका मंदिरात आम्ही आश्रय घेतला. तिथून पुढच गाव रमपूरा, फ़क्त ७ किमी. मी आणि तांबे बाबा गुरसी हून थोडं उशीरा निघालो..मंदार आणि मंडळी सकाळी लवकर निघून रमपूऱ्याला पोचली. तिथून मंदार चा फ़ोन आला, म्हणाला, “ताई आज रमपुराला मुक्काम करायचाय!” मी- काय? फ़क्त ७ किमी चालून मुक्काम? नाही रे, अशानी कशी पूर्ण व्हायची परिक्रमा. मी नाही मुक्काम करणार… . मंदार- पण ही रमपुऱ्याची मंडळी जाऊच देत नाहीयेत ताई… तुला मुक्काम करायचा नसेल तर तू दुसरी

कडून जा.. असं पुढच्या फ़ोन मधे मला सुदिनसुद्धा सांगत होता… त्या दोन तासात आमचे ३ ते ४ फ़ोन झाले… कुठे पोचलात, पुढचा रस्ता कसा असं आम्ही सतत कॉन्टेक मधे होतो. पुन्हा एक फ़ोन… मंदार म्हणाला, ताई नो ऑप्शन..तुला थांबायलाच लागेल..आणि आता जे मी सांगणार आहे त्याला तू नकार देऊच शकत नाही… तो म्हणाला, तुला लेले काका आठवतात?... मला वाटलं ते तिथे आहेत म्हणून मंदार आपल्याला थांबायला म्हणतोय..पण माहितिये का, ते तर नव्हते तिथे, मात्र तो आश्रम माझ्या गुरुबंधू नी तयार केलेला. माझ्या गुरुंचा वास तिथे… आता विषयच संपला होता… मंदारच्या एका वक्याने पिक्चर क्लीअर झाला..तो म्हणाला, ताई नाना महारांजाचा आश्रम आहे, तू मुक्काम करतेयेस, आणि लेले काकांबद्दल महत्वाची बातमी सांगायचीय.. लवकर ये.

साडे चार महिने, परिक्रमेचा जवळ जवळ शेवटचा टप्पा..अमरकंटकच आमचं नेक्स्ट टारगेट… . काय समजणार होतं मला लेले काकांबद्दल ???... “माझ्याबद्दल तुला नर्मदा मैयाच सांगेल काय ते! मी कोण आहे हे तुला तुझ्या नर्मदा मैयाकडून आणि तुझ्या सोबत च्या लोकांकडून समजेल… आणि ते ही तुझी परिक्रमा शेवटच्या टप्प्यात असेल त्या वेळी.” मला लेले काकांच वाक्य आठवलं… . उत्सुकता शिगेला पोचली… आणि मी रमपुऱ्याला!गेल्या गेल्या गुरुंचा प्रसाद मिळाला… आणि मग मंदार नी जे सांगितलं ते ऐकून मी सुन्नच झाले… “ताई लेले काका कोण माहितिये का? ते साक्षात शंकर महाराज आहे” पुण्याला शंकर महाराजांचा आश्रम आहे हे आपल्याला महितच असेल. दत्त संप्रदायातले हे संत सद्‌गुरू! मोठे आणि भेदक डोळे, अजानुबाहू आणि गुडघ्यावर हात ठेवून बसलेले अशी यांचि मूर्ती मी पाहिली होती. हे लेले काका म्हणजे शंकर महाराजच होते..मी विचारलं मंदार ला..तुला कसं समजलं रे?

तर त्याने धनंजय नाईक नावाच्या एक नर्मदा भक्ताची गोष्ट मला सांगीतली…

धनंजय नाईक हे दर वर्षी परिक्रमा करतात. ते शंकर महाराजांचे भक्त. दर वेळी शंकर महाराज त्यांना भेट देतात, पण ह्या साक्षातकाराबद्दल धनंजय नाईकांना उशीरा कळतं… या वेळी श्री नाईकांनी शंकर महाराजांना विनवणी केली की "मीच शंकर महाराज असं स्वत: च्या तोंडून सांगा, तरच माझा विश्वास बसेल" मी रमपुऱ्याला असताना लेले काका अमरकंटकला पोहचले होते. धनंजय नाईंकाना त्यांनी स्वत: सांगितलं " माझी वाट बघत होतास ना? मीच शंकर महाराज आहे" ही वार्ता वाऱ्यासारखी रमपुऱ्याला पोचली, आणि माझ्यापर्यंत आली … परिक्रमा झाल्यावर मी धनंजय दादांना फोन करून या प्रसंगाची खात्री करून घेतली होती.

मी खरंच भाग्यवान… परिक्रमेच्या आधी गुरुमाऊली मला पदरात घेते, श्री दत्तगुरू त्यांच्या अनेक रुपातून मला भेट देतात, माझी काळजी घेतात… लेले काकांनी मन भरून आशिर्वाद दिले आणि ठरवल्याप्रमाणे माझ्या कोड्याचा उलगडा माझ्याच गुरुंच्या ठिकाणी माझ्या डोळ्यासमोर आणला… या सगळ्या काळात एक घटना अजून घडली होती, आणि ती माझ्या नजरेतून सुटून गेली..पण मी त्यांचा नजरेतून सुटली नाही..शंकर महाराजांचं माझ्याकडे व्यवस्थित लक्ष होतं हे मला नंतर जाणवलं.

मी गरुडेश्वरला असतानाची गोष्ट. भालोद चे प्रतापे महाराज म्हणजे आई स्वरूप. मी त्यांची लेक..मूळचे नागपूर चे, त्यामुळे अजून थोडा सॉफ़्ट कॉर्नर… त्यांचे अनुभव पुढे सांगेनच, पण हे प्रतापे महाराज मला गरुडेश्वरला भेटायला आले.. हो खास मला भेटायला भालोद हून नर्मदा मैया क्रॉस करून नावेतून आले होते. त्या वेळी त्या नावेत शंकर महाराजांचे भक्त त्यांची मूर्ती घेऊन आले होते. गरुडेश्वर घाटावर मी शकर महाराजांच्या आरती आणि पूजे मधे सामिल होते..पण मी अनभिज्ञ होते… ..हे निम्मित्त मात्र होतं, संकेत होता, इशारा होता का काय ते माहित नाही, पण शंकर महाराज माझ्यावर लक्ष ठेवून होते हे समजायला मला साडेचार महिने लागले. नक्कीच मी पुण्यकार्य केलं असलं पाहिजे की असे संत सद्गुरू मला प्रत्येक ठिकाणी सांभाळून घेत होते. 'गुरुकृपा हि केवलम' म्हणतात तेच खरं. एक गुरू प्रसन्न असलेत की

सुख दु:खाची तमाच जाणवत नाही.. माझ्यासारख्यांना हे समजायला वेळ लागतो··· पण हळू हळू प्रचिती येतेच!गुरू आणि नर्मदा मैया यांनीच माझी परिक्रमा पूर्ण करवून घेतलीये असं मी का म्हणतेय ते आता तुमच्या लक्षात येईल. कारण जसे संत सद्गुरू माझ्या सोबत सुरवातीपासून होतेत तशीच माझी नर्मदा माई पण होती..आमचा दुसरा, म्हणजे मोरटक्क्यानंतर चा मुक्काम झाला टोकसर ला. परिक्रमा सुरू होऊन अजून आठवडा ही व्हायचा होता··· पूर्ण तयारी करून मी परिक्रमेला निघाले होते.. माझ्या बाबांचे चांगले महागडे आणि सगळ्यात छान समजणारे केचूआ कंपनीचे जोडे मी घातलेले होते··· आणि इतके चांगले जोडे असून ते टोकसर गावाच्या ५ कि.मी आधी फ़ाटले··· अजून परिक्रमेची जेम तेम सुरवात होती··· मात्र इथेसुद्धा मला वेगळाच अनुभव आला··· काय तो पुढच्या भागात मधे सांगते.



नर्मदा परिक्रमा एक विलक्षण अनुभूती- भाग 5-

परिक्रमेच्या सुरवातीला केचूआ चे चांगल्या प्रतीचे जोडे पूर्ण फ़ाटतात तेव्हा…

नर्मदे हर… माझे जोडे फ़ाटले… तो अनुभव आता सांगते..मोरट्क्का ते टोकसर म्हणजे गोमुख घाट असा साधारण १० किमी चा प्रवास. यात मधे परमहंस आश्रम लागतो. इथे आमची भोजन प्रसादी झाली आणि इथून पुढे कसं काय माहित नाही पण अचानक माझा एक जोडा पूर्ण फ़ाटला, त्याचं सोल आणि वरचा जोड्याचा भाग वेगळा होऊ लागला. मी चक्क जोडे हातात घेऊन चालू लागले. पण त्यावेळी मनात जे विचार आले ते एरवी माझ्या मनात आले नसते.

नर्मदा खंड ही तपोभूमी आहे आणि या परिसराचा परिणाम आपल्या मनावर झाल्याशिवाय राहात नाही. मुख्य म्हणजे तो इतका नकळत होतो की आपल्यासाठीसुद्धा तो एक आश्चर्याचाच भाग असतो. एरवी रस्त्यात जोडे फ़ाट्ल्यावर माझी थोडी का होईना चिडचिड झाली असती… निदान आता कसं करायचं ही घालमेल तर झालीच असती, पण या वेळी असं झालं नाही… जोडे फ़ाटले हे वास्तव माझ्या मनानी इतक चटकन स्वीकार केलं की त्याची वाच्यतासुद्धा सह प्रवाश्यांकडे झाली नाही… आपल्या सोबत या पुढे ज्या काही घटना घडणार आहेत त्या मैयाची कृपा असणार आहे असा विचार मनात आला… वाटलं, कदाचित आपण परिक्रमा अनवाणी केली पाहीजे असं काहितरी मैयाला सुचवायचं असेल. पुढच ३..४ किमी अंतर मी अनवाणी चालले. फ़ार फ़ार कठीण असतं ते. तेव्हा जे काय दगड गोटे बोचले असतील त्या प्रत्येक बोचण्यातून मला अनवाणी परिक्रमा करणा-यांचं मनोबल काय असेल याची कल्पनाच आली! नाही… मी तेवढ्या तयारीची नव्हती… मला अजून खूप खूप शिकायचं आहे हे मला तेव्हा खऱ्या अर्थानी उमगलं… ते फ़ाटकेच जोडे मी पुन्हा पायात घातले आणि जमेल तसं चालू लागले. टोकसर आले की चांभाराकडून शिवून घेऊ असं स्वत:ला धीर देत

मी टोकसरपर्यंत तशीच फ़ाटक्या जोड्याने पोचले खरे… पण टोकसर आणि पुढच्या तीन गावात चांभार नाही असं मला तिथे समजलं… ..आता काय करायचं?

अनवाणी चालण्याची क्षमता माझ्यात नाही हे मला समजलच होतं.तो विचार तिथेच सोडून मी झोपी गेले आणि मला शांत झोप लागली देखील! सकाळी गोमुख घाटावर मैया स्नानाला गेले होते. तिथे मैयाला विनवणी केली… आई योग्य तो मार्ग दाखव… मला हेच जोडे घालून परिक्रमा करायची होती, आणि याला ही कारण होतं, हे जोडे माझ्या बाबांचे.. त्यांना परिक्रमा करण्याची खूप इच्छा होती, आणि म्हणून त्यांच्या जोड्यांमधून मला या नर्मदा मैयाची प्रदक्षिणा करायची होती. भावनिक कारण हे असं होतं या जोड्यांमागचं. मैयामधे उतरले आणि तिला विनवलं, आई, शक्य असल्यास हेच जोडे सुधरवून शिवून घालता येतील असं काहितरी घडवून आण.

सकाळच्या साधारण सहा वाजताची गोष्ट असेल. मी पुढचा प्रवास थोडा अनवाणी, थोडा फ़ाटक्या जोड्यातून असा करू लागले. कांकरीया गावाच्या आधी एक छोटसं गाव लागतं पीतनगर. तिथे एक किराणा मालाचं दुकान दिसलं..सौ डोंगरेंच्या मनात आलं की फ़ेविक्विक नी जोडे चिकटवून बघावे..निदान चालायला थोडं सोपं जाईल. मी आणि सौ डोंगरे त्या दुकानासमोर बसलो, मी फ़ेविक्विक विकत घेतेलं आणि जोडा चिकटवायला म्हणून पायातून बाहेर काढायला लागले… इतक्यात एक माणूस अगदी धावत माझ्याकडे आला, त्यानी माझ्या पायातला जोडा जवळ जवळ ओढून घेतला आणि तो पळून गेला… ’ अरे बाबा दुसरा तरी घेऊन जा’ इतकंसुद्धा बोलायची संधी मला मिळाली नाही… आता अनवाणीच चालायचं… जोडाच नाही… मात्र त्या माणसाबद्दल माझ्या मनात रागसुद्धा उत्पन्न झाला नाही… एरवी कदाचित आपल्या जवळची वस्तू कुणी हिसकावून घेतल्यावर क्षणिक का होईना राग येईल..पण कसा काय नाही आला मैयाच जाणे… तो दुकानदार, मी आणि सौ डोंगरे आम्ही

सगळेच आश्चर्य चकित झालो होतो… दुकानदारानी आम्हाला चहा पाजला… आणि आम्ही पुढे निघालो..तो उरलेला एक जोडा मी तिथेच सोडून दिला आणि आता अनवाणी चालू लागले … .सधारण अर्धा किमि जाऊन झालं असेल नसेल, हा मघाचा जोडा पळवून नेणारा माणूस मैया मैया करत आमच्या मागे आला..त्याच्या हातात माझे दोन्ही जोडे होते, म्हणाला, "वो चामरदा की घरवाली को बाहर जाना था, इसलिये जूता जल्दी जल्दी लेकर गया मै. मै तो केवट हू..मुझसे जैसा बना मैने सिलवा दिया. अब आपको नंगे पैर नही चलन पडेगा" . मी काय विचार करत होते आणि तो बिचारा माझ्यासाठी किती धडपड करत होता..मी पैसे देऊ केले… आणि जबरदस्ती त्याच्या हातात ठेवलेच..तो तयार नव्हता पण पैसा हा पैसा असतो आणि गरीबाला गरज असते.. तसे मी काही फ़ार पैसे दिले नाहीत..आणि तसं करूनसुद्धा त्याचे उपकार कमी ही होणार नाहीतच… पण निदान काहीतरी समाधान… .तिथून पुढे एका गावात एक चांभार दिसला आणि त्याच्याकडून मग ते जोडे मी पुन्हा व्यवस्थित शिवून घेतले.

तिथून पुढे कांकरीया नावाच्या गावाला एका आश्रमात थांबलो. "आसन लगादो" असा आदेश मिळाला. आसन लावणे म्हणजे इथे विश्रांती करा, असा अर्थ होतो… त्यात भोजन प्रसादी घेणार हे येतच. इथला अनुभव मजेशीर होता. तास झाला, दिड तास झाला..पोटात भूकेनी खळ्बळ माजलेली आणि हा साधू काही भोजन प्रसादी चं नाव घेईना… शेवटी आमच्यातल्या एकाने हिम्मत करून भोजन प्रसादी चं विचारलं… तो रागवलाच..म्हणाला आप ही बना लो… आप तो बहोत पैसे वाले हो, आपको भोजन की क्या जरूरत? खरीद के खा लेना कही… " आम्हाला काही समजेच ना, असं काय झालं एकदम? मग त्यानी सांगीतलं, "आपका सामान देखो… दुनिया भर की चिजे उठाके लाये हो..ऐसे आता है कोई मैया के घर?.. मैया पर भरोसा नही, शहर से पढ लिख कर आते हो, और परिक्रमा परिक्रमा का ढोंग रचाते हो… अरे खाना भी ले लेना था साथ मे… " तो साधू चांगलाच चिडला होता. आमच्या

जवळच्या भल्या मोठ्या आणि वजनी बॅग्स पाहून त्याला आमचा वैताग आला… . मग तिथेच आम्ही प्रत्येक बॅग मधून अनावश्यक सामान, जास्तीचे कपडे वगैरे सगळं काढून गरीबांना देऊन टाकलं… आणि खरं सांगू… संचय हा त्रासदायकच… तिथे एक धडा असा मिळाला की संचय कुठला ही असो..तो वाईट..

आपण लोक नुसताच संचय करत असतो..पैशाचा, संपत्ती चा, नात्यांचा, माणसांचा, भावनांचा, आठवणींचा आणि मला वाटतं अगदी अनुभवांचासुद्धा! ते साठवून ठेवलं की वजन होणारच! त्यापेक्षा येईल त्या प्रसंगी, मिळेल त्या परिस्थित, गाठीशी आलेले क्षण, जगणं आणि विसरून जाणं हे खरं समाधानाचं साधन आहे, आणि असं वागता येण्यासाठीचा प्रयास ही असावी साधना… .

आम्ही सामान काढून टाकल्यावर त्या साधू महाराजांनी आम्हाला भोजन प्रसादी वाढली … ओझं उतरवल्याचा शरीराला आनंद झाला होता आणि मनालाही. इथून पुढे आमच्या जवळ दोन जोडी कपडे, एक पांघरूण (स्लिपिंग बॅग) आणि थोडे औषध..इतकच सामान होतं. यातलं काही हरवलं गेलं तरी त्याची तमा असणार नव्हती… मुक्त मनानी आम्ही पुढची वाटचाल सुरू केली.

पुढे रावेरखेडीला जाताना एका परिक्रमावासी मैयाजींना तब्येती मुळे एका गाडी वाल्याचा आधार घ्यावा लागला… लोकं अनोळखी परिक्रमावासी च्या मदतीला धावून येतात इथे. परिक्रमावासीच्या रूपात नर्मदा मैयाला बघणारी इथली ही स्थानीय मंडळी आणि या अन्नदाता स्थानीयांच्या रुपात परिक्रमा वासींना भेटणारी नर्मदा मैया, हा खरोखर विलक्षण प्रकार आहे. कोण कधी कुठे कुठल्या रूपात येईल आणि काय देऊन जाईल याचा अंदाजही बांधण कठीण आहे… आणि कधी कधी तर मैया चं अस्तित्व जाणवतं पण ती अदृष्य रुपात आपल्या सोबत असते हे अनुभावाताक येतं, सांगितलं तर विश्वास बसू नये असेही काही अनुभव येतात. असाच एक अनुभव पुढच्या भागात सांगते.

नर्मदा परिक्रमा – एक विलक्षण अनुभूती- भाग ६

माझ्या नर्मदा माईनी मला आणि माझ्या मनाला जणू सांगितलं, तू फ़क्त प्रयत्न कर, बाकी माझ्यावर सोड… तुला त्रास न होण्याची जवाबदारी माझी!

नर्मदे हर. रावेर खेडीला जाताना आज पहिल्यांदाच आमचं सतरा कि.मी चालून झालं होतं. अंग शिणून गेलं होतं. संध्यकाळी गारठा ही वाढला. मला जरा तापासारखं ही वाटू लागलं होतं. छानपैकी कढी खिचडी खाऊन झोपून जावं असं वाटत होतं. पण इथे परिक्रमेत असताना "मला कढी खिचडी द्या" असं कसं सांगणार कुणाला? खरं तर जे मिळेल ते माईचा प्रसाद म्हणून स्वीकार करायचं आणि तसं करता आलं तरच ते तप.. असं म्हणतात परिक्रमेत तुमच्या कडून तीन प्रकारची तप होतात. कायिक, वाचिक आणि मानसिक. सतरा किमि चालणं हे झालं कायिक तप. हो तपच म्हणेल याला मी कारण ही सुरवात होती. पुढे याहून ही जास्त चालावं लागणार होतं. सवयींच्या विरुद्ध जाऊन स्वत:ला नवीन साचामधे घडवणं हे काही तपा पेक्षा कमी असेल असं वाटत नाही. ऊन, पाऊस, थंडी, जंगल, डोंगर, दऱ्या आणि जे जे येईल ते ते स्वीकारत, त्यानुसार स्वत:ला तयार करत पुढे जात रहाणं ह्याला मानसिक धैर्य आणि निश्चय असावा लागतो. अर्थात नर्मदा माईच हे सगळं करवून घेते, पण तरीही अनेकदा मनोबळ खचेल अशीच अवस्था तयार होत असते. इथे होतं मानसिक तप. आणि अशा मानसिक आणि शारिरीक तपातून जाताना तुमच्या व्यक्तिमत्वाची सगळ्यात मोठी आणि ठ्ळक पणे आढळून येणारी बाब असते तुमची वाणी. देह, मन आणि वाणी यांच्यावर नियंत्रण आलं की पुढचं सोपं असत असावं, पण हे नियंत्रणच तर कठीण आहे ना… .या परिक्रमेत मला माझ्यावर किती नियंत्रण ठेवता आलं ते मला महित नाही, मात्र हे ठेवता येणं आणि ते कसं ठेवता येईल याचा अभ्यास करणं सुखरूप आनंदासाठी नितांत गरजेचं आहे हे मात्र लक्षात येतय! रावेर खेडीला एक परिक्रमावासी मैया जी ना गाडीतून जावं लागलं होतं. मला

दुपारपासूनच तापासारखं होऊ लागलं होतं… आपण आपल्या मनाचे इतके लाड करतो नं की फ़ार हट्टी जिद्दी बाळासारखं होतं ते. माझं मन ही मला त्रास देऊ लागलं होतं … "बरं नाहीये, जाऊ का गाडीनी?"..त्यानी मला दोन तिन दा विचारलं च… पण काय, अशा वेळी त्याला रागवून चालत नाही, त्याला समजवून चालत नाही… त्याला बडबडू देणं आणि त्याच्याकडे पूर्ण दुर्लक्ष करणं हाच उपाय रामबाण असतो. ती गाडी समोर होती, मैयाजी सोबत होत्या, आणि माझं वेडं मन हट्ट करत होतं… अचानक काहीतरी झाल्यासारख मी पुढे निघून गेले… गाडी दृष्टीआड होईस्तोवर मनाच्या हट्टाकडे अज्जिबात लक्ष दिलं नाही… . मात्र मग त्याला सांगितलं… गाडी आपल्यासाठी नाहीच… यथाशक्ती संकल्प घेतला की हे असं होतं … .तरिही समजवलं मनाला… .जेव्हा पाऊल उचलणं अशक्य होईक तेव्हा बघू काय ते… तोवर गाडी चा विचारही तुला शिवता कामा नये. समजलं त्याला ही बहुधा… पण असं हे मानसिक तप सुरू असताना मैया कशी साथ देते बघा… मला तापसारख वाटत होतं, गरम कढी खिचडी खायची इच्छा होती आणि रावेर खेडीला संध्याकाळच्या भोजन प्रसादीला गरमा गरम कढी भाताचा मेनू होता… काय म्हणावं या नर्मदा माईच्या प्रेमाला? इथेच अनुभव संपत नाहिये हा… मला रात्री ताप चढलाच… सकाळी ताप वाढला तर कसं चालायचं? इथेच थांबायचं का … असे प्रश्न मनाला पडू लागले… .आणि तसंच झालं..सकाळी ताप होताच, फ़ार नव्हता, पण एकशे एक तरी असावा! काल मला मनाकडे दुर्लक्ष करायला शिकवलं होतं मैयानी… आज तिनं माझ्या मनाचे लाड पुरवले… नाही नाही, मी गाडीत बसले नाही, तशी वेळच नर्मदा माईनी येऊ दिली नाही. खरं तर तापात चालणं आणि बॅग उचलून चालणं मला अजिबात शक्य होणार नाही असं मला वाटत होतं… .म्हंटलं बघू काय होईल ते..सुरवात तर करू! क्रोसिन घेतली होती… तसा ताप ही उतरला होता… मी बॅग पाठीवर घेतली आणि काय आश्चर्य? माझ्या बॅगला आज वजनच नसल्या सारखं वाटायला लागलं. माझी बॅग पाठीमागून कुणीतरी उचलून धरळी आहे असं वाटत होत… माझ्या नर्मदा माईनी मला आणि माझ्या मनाला जणू सांगितलं, तू फ़क्त प्रयत्न कर, बाकी माझ्यावर सोड… तुला त्रास न

होण्याची जवाबदारी माझी! आणि ती सोबत आहे याची प्रचिती अशी वारंवार देते की हे अनुभव चमत्कार नसून ते नर्मदा मैयाच्या उपस्थितीचीच खूण आहे हे समजू लागतं. अहो कोइन्सिडंस एकदा होईल, दोनदा होईल, तीनदा होईल… सारखे होतात ते खरंच कोइंन्सिडंस असतील कसे?

आता एक गम्मत सांगते. मला ताप असल्याने मी सकाळी आंघोळ न करताच निघालेले. बकावा नावाच्या गावी आंघोळ करू असं ठरवलं होतं, पण तिथे महिलांसाठी (मैया किनारी कपडे बदलण्याची) व्यवस्था नाही असं कुणितरी सांगितलं म्हणून मी पुढे निघाले. आता मी आंघोळ करून निघालेले नाही हे मला आणि माझ्या सोबतच्यांनाच माहित होतं. बकावा नंतर मर्दाना नावाचं गाव लागतं. तिथे एका घरात एका मैयाजींनी चहाला बोलावलं. चहा घेतला..त्या मैयाजी आपणहून म्हणाल्या, “दिदी आपको स्नान करना है तो कर लो, गरम पानी करवा देती हूं” ! आता सांगा, म्हणजे कायच म्हणायचं याला? असं कसं तिनी बरोबर विचारलं मला स्नानाचं? हा काही कोइंसिडंस आहे का? पण असं होतं… .असच होतं…

इथून पुढे भट्टयान नावाचं गाव येतं… आम्ही तिथं जाईस्तोवर दूपारचे तीन वाजून गेलेले. लांबच लांब रस्ता..न संपणारा… पण तिथे गेल्यावर जे काही पाहिलं आणि अनुभवलं ते “याचि देही याचि डोळा” अनुभवता आलं हेच भाग्य. संत साधू सत्पुरुष यांचा सहवास आणि यांची किमया काही औरच. आता मी नेमकं कशाबद्दल बोलणार आहे हे समजून घ्यायला थोडी वाट बघावी लागेल… पुढच्या भागाची

नर्मदा परिक्रमा- एक विलक्षण अनुभूती – भाग ७

संत सियाराम बाबांची भेट होणे हे सौभाग्य!

नर्मदे हर!!

आजच्या सातव्या भागात आपण एका महान संत पुरुषा बद्दल ऐकणार आहोत. तेली भट्ट्य़ान गावी मैया किनारी या बाबांचा आश्रम आहे. या बाबांच दर्शन होणं हेच खूप भाग्याचं म्हणावं लागेल. या बाबांकडे केवळ बघूनच शांत आणि समाधानाची अनुभूती येते. यांच स्मितहास्य बघितलं की आतून इतकं शांत वाटतं नं की त्याचं वर्णन करता येणं अशक्य आहे. बाबांकडे पाहिलं की असं वाटतं आपले सगळे कष्ट संपून एखाद्या मोठ्या कल्पवृक्षाखाली आपण बसलेलो आहे आणि मनात मात्र कुठलीही इच्छा शिल्लक रहिली नाही. विचार करा ना, ज्या कल्पवृक्षाची कामना आपण आपल्या कल्पितांच्या पूर्ती साठी करत असतो तो कल्पवृक्ष मिळतो पण कल्पित कामनाच उरत नाही… किती आनंद निनादत असेल त्या ठिकाणी? तसं काहीसं या बाबांच्या दर्शनाने मला झालं… . काही काही मागायची इच्छाच झाली नाही!

हे बाबा फ़क्त एका लंगोटीवर असतात. यांना सियाराम बाबा असं म्हणतात. सियाराम बाबांचं वय काय यावर सूद्धा जरा दोन वेगळी मतं आहेत. आश्रमातील लोक बाबांच वय ९५ सांगतात तर गावातली लोक १३५ च्या जवळपास असेल असं सांगतात. बाबांना नजर लागू नये म्हणून त्यांच वय कमी सांगण्यात असं गावकरी म्हणतात. गावातल्या ७० वर्षाच्या आजोबां म्हणतात “या बाबांना मी माझ्या लहानपणापासून असच बघतो आहे” .

सियाराम बाबांच वय कितीही असू देत. त्यांची साधना त्यांच्या चेहऱ्यावर दिसून येते. प्रशांत करुणेचा सागर असलेले त्यांचे डोळे बघितले की मनाला इतक शांत आणि प्रसन्न वाटतं कि माणूस तिथून उठून जाउच शकत नाही. सियाराम बाबा सकाळी लवकर उठून मैया स्नान करतात. उन पाउस थंडी काहीही असो गेली कित्येक तपं त्यांच्या या दिनचर्येत कधीही फरक

पडला नाही. बाबा बाहेर पडले की भक्तांची गर्दी जमा होते. बाबा कायम एका लंगोटीवर असतात. सुर्यानमस्कार घालून ते स्नानाला जातात. स्नान झालं की मैया पूजन आणि रोज स्वत:च्या हातांनी नारळ फोडतात. एका आपटण्यात नारळ फुट्लाच पाहिजे.

सियाराम बाबांच्या बाबतीत एक अजून गोष्ट सांगण्यासारखी आहे. ती म्हणजे बाबांच्या हातचा चहा. सियाराम बाबा सर्व भाविकांसाठी स्वत: चहा तयार करतात. पण ह्या चहाची गम्मत अशी आहे की हा चहा दिवसातून एकदाच तयार होतो आणि कितीही लोक येऊ देत, हा चहा संपतच नाही. एकदा सकाळी ज्यावेळी बाबा चहाच्या भांड्यात चहा साखर आणि दुध घालतात त्यानंतर तो चहा पुन्हा वाढवल्या जात नाही. तो आपोआप वाढत असावा कारण साधारण १०-२० लिटरच्या भांड्यातून ५०० भाविक आणि गावकरी, आश्रमातील मंडळी मनसोक्त चहा घेतात तरीही ते भांड कायम भरलेलं असतं. ही अतिशोयोक्ती नाही. हा ऐकीव प्रसंग नाही तर माझ्या डोळ्यादेखत मी हे पाहिलेलं आहे.

अजून एक गोष्ट सांगते. मागे जेव्हा मैयाला पूर आला होता तेव्हा सगळं भट्टयान गाव रिकाम करण्यात आलं. लोकांनी बाबानाही आश्रम सोडण्याची विनंती केली. बाबा मात्र तयार झाले नाही. “मैया को छोडके मै नाही जाउंगा” असं म्हणाले. मैया किनारी असलेल्या कडप्प्यावर ते बसून राहिले. मैयाला पूर आला, बाबांचे चरण बुडतील इतकंच पाणी आश्रमात आलं आणि आश्रमाला वळसा घालून गावाकडे निघून गेलं.. आता हे मी पाहिलं असं मी का म्हणते? तर गावातल्या घरावर चे पाण्याचे डाग मी पाहिलेत, छपरापर्यंत भिंती पाण्यात बुडाल्याचे डाग होते आणि आश्रमाच्या भिंतीवरचे डागही मी पाहिलेत… ते जेमतेम पावलं बुडतील, किंवा काही ठिकाणी जास्तीत जास्त गुडघे भिजतील एवढेच होते. लोक सांगतात, मैया नी पुराबद्दल बाबांना चरणस्पर्श करून माफी मागितली आणि तिच्या मार्गाने आणि विधिलिखिताप्रमाणे ती पुढे निघून गेली. तर असं आहे सियाराम बाबांचं व्यक्तिमत्व..त्यांची साधना अशी की साक्षात नर्मदा माई त्यांना प्रणाम करून जाते. माई चं आणि या सियाराम बाबांचं नातं वेगळंच आहे.

एक अजून आख्यायिका यांच्या बद्दल ऐकायला मिळते ती अशी- एकदा काही परिक्रमावासी बाबांच्या आश्रमात आले असता आश्रमातलं तूप संपलं होतं. परिक्रमावासीन्ना उपाशी ठेवणं हे सियाराम बाबांच्या नियमाविरुद्ध होतं. तूप यायला अजून दोन तास तरी लागणार होते. “वो कुछ नही, मैया जिसे घी उधार लेकर आओ और खाना पकाओ” बाबांच्या सेवकांना काही समजलं नाही. ते मैया मधून दोन डब्बे भरून पाणी घेऊन आणले आणि याच पाण्यात पुऱ्या तळून घेतल्या. अशी आहे बाबांची साधना, श्रद्धा आणि मैयाची त्यांच्यावरची कृपा. मी भाग्यवान म्हणून याची देही याची डोळा बाबांचं दर्शन झालं.

बाबांच्या आश्रमाची अजून एक कमाल सांगते. इथे येणाऱ्या प्रत्येक परिक्रमावासीला सुकी भेळ साधारण ३ वाट्या, ३ वाट्या डाळ आणि तांदूळ, खिचडीला लागाणारे सर्व मसाले व तेल, केळी, उदबत्ती चा पुडा, गाईच्या तुपाची बाटली आणि भिजवलेल्या फुलवाती, आगपेटी, कापूर असं सर्व सामान देतात. तुम्ही कितीही मोठी रक्कम दान कराण्यासाठी द्या, त्यातील फक्त १० रुपयेच घेऊन बाकी रक्कम तुम्हाला परत केली जाते. या सर्व सामाना सोबत पुरी भाजी ताक किंवा कढी, मसाले भात आणि पापड असे जेवण व हवा तितका चहा हे ही असतेच. आता सांगा, फक्त १० रुपयात हे सगळं कसं जमत असेल? पण जमतं आणि गेल्या अनेक वर्षांपासून हे असच सुरु आहे. न कुठे वाच्यता न पोस्टर, न डोनेशन..काहीच नाही..आहे नं कमाल?..असे साधू संत भेटणं आणि त्यांचे आशीर्वाद मिळणं हा कितीतरी मोठा अनुभव आहे! आयुष्यात समाधान म्हणजे काय हे बघायचे असेल तर एकदा तरी या आश्रमाला भेट द्या. इंदोरपासून फक्त २.५ तासाच्या अंतरावर हे गाव आहे. इथे आम्ही एक रात्र होतो, सकाळी मैया स्नान करून निघायचं तर पसारकर काकांचे जोडे बदलले गेले होते. जे तिथे होते ते त्यांना अजिबात कम्फर्टेबल नव्हते. पण तो प्रश्न अगदीच लवकर सुटला ... जोडे परत मिळाले नाहीत, पण अनुभव मिळाला.. कोणता ते पुढच्या भागात सांगते.

नर्मदा परिक्रमा- एक विलक्षण अनुभूती- भाग ८

नर्मदे हर.

पसारकर काका त्यांचे जोडे शोधू लागले होते ते काही सापडेना. वयस्कर गृहस्थ, अनवाणी चालणं कठीण होतं पण इलाज नव्हता. ते अनवाणीच चालू लागले. मागून मोटर सायकलवर एक माणूस आला आणि विचारलं "काका जी कल तो जूते थे? आज क्या हुआ?" आता इतक्या परिक्रमावासिंमध्ये हे काका त्या माणसाच्या लक्षात होते खरंच? की तो माणूस उगाच म्हणत होता? की अजून काही?... हो अजूनच काही होतं हे! काकांनी जोडे अदल बदल झाल्याचं सांगितलं. तो माणूस म्हणाला, "दुकान तो दो गाव दूर है, आपके रास्ते भी नही है, आईये आपको गाडीपर ले चलता हुं!" दोन गाव दूर हा माणूस स्वतःचा वेळ, पेट्रोल खर्ची घालून काकांना घेऊन जायला स्वत: हून तयार झाला··· पण इथे अजून एक पंचाईत··· गाडीवर बसायचं नाही असा काकांचा नियम··· मग आता काय? त्यावरही त्या माणसाने उपाय काढलाच! त्याला जणू मदत करायचीच होती. काका गाडीवर बसत नाही म्हणाले तर हा माणूस म्हणतो, " काकाजी आप चलते रहिये, मै दुकानदार को लेकर आता हुं" तो गाडीवर गेला, दुकानदाराला घेतलं आणि सोबात ३ ते ४ वेगवेगळ्या साईझ चे आणि प्रकारांचे जोडे घेऊन आला. दुकानदाराला परत सोडला आणि काकांच्या जोड्यांचे ही पैसे घेतले नाहीत, पण काकांनी काही एक रकम बळजबरी त्याला दिली.

इथे काय होतं माहितीये का? हे लोक इतका जीव लावतात नं की पैसे देऊ करणं हेसुद्धा अपमान केल्यासारखं वाटू लागतं. त्यांनी केलेलं हे प्रेम, दिलेला हा आदर आणि केलेली

मदत या सगळ्यांनी आपण भूतलावर नाही हेच जाणवू लागतं. अतिशय नि:स्वार्थ प्रेम असतं हे. जीवाभावाचे आणि जन्माचे नाते जुळतात इथे. आणि खरं सांगू का, ती नर्मदा माईच त्या त्या रुपात आपल्या बरोबर येत असते.! सांगा नं हजारो परिक्रमा वासी वर्षातली ८ महिने परिक्रमा करत असतात..एकाही परीक्रमावासियाला कधीही उपाशी राहावं लागत नाही, कधी कुठलाही त्रास होत नाही आणि काहीही अडचण आली तर ती विनासायास दूर होते. हे सामर्थ्य कुणाचं? इतक्या परीक्रमा वासियांची जवाबदारी कोण घेतं? कधी कुणाच्या तर कधी कुणाच्या रुपात येऊन, कधी गतजन्माचे राहिलेलें देणेघेणे म्हणून, तर कधी कृपा म्हणून ती नर्मदा माईच हे सगळं घडवून आणते असते नं?

खरंच या मोटार सायकल वाल्याने आदल्या दिवशी काकांना जोडे घालून पाहिलं असेल? काल काका जोडे घालून चालत होते आणि दुसऱ्या दिवशी त्यांच्या पायात जोडे नाही इतकी छोटीशी गोष्ट इतक्या बारकाईने त्या माणसाने लक्षात ठेवली असेल? आणि कशासाठी? तो माणूस खरंच तो माणूस असेल का? मला तरी वाटतं की ती माझी मैयाच असली पाहिजे. काकांचे जोडे सेट झाले, तो माणूस आला तसा मदत करून निघून गेला. आमच्या गाठीशी ही मैया भेट मात्र कायम देऊन गेला.

पुढे देखील असे अनेक अनुभव आलेत आणि प्रत्येक अनुभवातून मैयाची आपल्याला साथ आहे हे जाणवू लागलं. एक वेळ तर अशी आली की या मैया भेटीची ओढ लागू लागली. काहीतरी अडचण यावी म्हणजे मैया कुठल्यातरी रुपात येऊन ती दूर करेल असं वाटू लागलं आणि तिनी तशी भेट दिली की मग दुसरं काही नको असायचं त्यावेळी. बघा नं किती कमाल आहे, देवाकडे आपण काय मागतो, देवा संकट दूर कर, प्रवास सुखकर होऊदे मात्र या प्रवासात आम्ही संकट मागत होतो, " देवा काहीतरी अडचण येऊ दे" ! कारण ती दूर होणार हा विश्वास इतका प्रचंड वाढला आहे की ती दूर होण्याबद्दलची काहीही मागणी आमच्याकडून होत नव्हती…

सियाराम बाबांच्या दर्शनानी मन प्रसन्न झालंच होतं. इथून पुढे १५ की मी वर लेपा नावाचं गाव आहे. इथे आजचा मुक्काम करायचा असं ठरलं. लेप्याला जाताना वाटेत एका दुकानात पाणी प्यायला थांबलो असता त्या बाईनी भरपूर ताक आग्रहाने प्यायला दिलं.पुढे वाटेत एका बाईनी केळी दिली आणि त्यानंतर बिस्किटाचा पुडा मिळाला. १५ किमी च्या अंतरात इतकं खायला मिळालं की भूक लागायालासुद्धा वेळ मिळत नसे . पोट रिकामे होइच ना.

मी आणि सुरेखा ताई जरा मागेपुढे झालो. चित्रा ताई बरीच मागे होती. नाम जप करत करत चालायाचं होतं, आणि सोबत चाललं की गप्पा होत असत. पुढे गेल्यावर दोन्ही बाजूला उसाची शेती होती. माणसाच्या उंचीच्या दुप्पट तरी उंच असेल. वात साधारण ४ फुट असावी. आजूबाजूचं आणि समोरचं पण काही ही दिसत नव्हतं. झाडात खुसफूस खुसफुस व्हायचं तेव्हा थोडं बिचकायला व्हायचं पण भिती अशी वाटली नाही. जेव्हा मला थोड्सं दचकायाला झालं तेव्हाच माझ्या मागून एक बाई लाकडाची मोळी डोक्यावर लादून माझ्या मागून आली आणि म्हाणाली “पंछी घर बनाते है घास मे, उनको खानेके लिये लोमडी आती है, इन्सान को तकलीफ नाही देती”   आणि मग पुढे उसाची शेती संपेपर्यंत ती बाई माझ्या सोबत होती. पुढे एका मारुती मंदिरा जवळ मी थांबले आणि ती निघून गेली. त्या मंदिरापाशी कमालीची शांतता होती. बाम्बू च्या झाडांमुळे थंडही वाटत होतं. मी हनुमान चालीसा म्हंटली, थोडा आराम केला आणि पुढे निघाले. आतापर्यंत मला नेटवर्क नव्हतं मात्र थोडं पुढे गेले आणि मांगीलाल वर्मा यांचा फोन आला “दीदी कहां तक पोहोचे? हनुमान मंदिर दूर से दिख जाये तो बताना, मै लेने आ आउंगा”   मी मन्दिराहून पुढे आल्याचं मी सांगितलं तसा तो तातडीनं मला घ्यायला आला. तो गाडीवर आला होता आणि मी पायी. त्यांनी मला गावापर्यंत सोबत केली आणि मग चित्रा ताई आणि सुरेखा ताईला घ्यायला गेला. लेने क्यू आये ? विचारल्यावर त्यांनी जे सांगितलं ते ऐकून अंगावर काटा उभा राहिला. ज्या हनुमान मंदिरा पाशी मी १५ मिनिट थांबले होते तिथेच आदल्या दिवशीच एका महिलेवर बिबट्या ने हल्ला केला होता. तो बिबट्या जखमी असावा

असा गावक-यांचा अंदाज होता आणि म्हणूनच एकट्या दुकट्या ने तिथून जाऊ नये असे गावक-यांचे मत होते आणि हेच सांगायला मांगीलाल मला सतत फोन करत होता. मला दचकायला झालं तेव्हा ती बाई अचानक आली होती मागून… खुसफुस पण ऐकली होती मी.. पण मैयांनी मला भिती वाटू दिली नाही आणि ज्या ठिकाणी बिबट्याने हल्ला केला होता तिथे मी अगदीच निवांतपणे बसून हनुमान चालीसा म्हंटला होता… .हे सर्व काय आहे याचा विचार करण्यापेक्षा आलेला अनुभव अनुभवून मैयाला हात जोडणं मला जास्त सोपं आणि सुखकर होतं.मैया आपल्या सोबत आहे याची खात्री पटत जात होती.

मांगीलालला माझा फोन नंबर अविनाश कडून मिळाला. अविनाश जे अन्नछत्र चालवतो त्यातलं एक लेप्याला आहे. मांगीलाल या अन्नछत्राची पूर्ण जवाबदारी सांभाळतो आहे. इथे मांगीलाल ने जो पाहुणचार केला त्याला तोड नाही. दालाबाटी बटाटे वडा आणि भात असा हा बेत होता. इथे मध्यप्रदेशात शाही पाहुणचार म्हणजे दाल बाटी हे ठरलेलं आहे. खूप आपुलकीनी मांगीलाल आणि परिवाराने आमची सेवा केली. परिक्रमावासी म्हणूनच नाही तर आपल्या लेकी सारखं त्या माई नी आमचं केलं. माहेरवाशीण कशी बागडते माहेरी, तसं तिथे आमचं होत होतं. आता पुढे जाणं भाग होतं. दुसऱ्या दिवशी मी आणि सुरेखा ताई पुढे निघालो. कालचा बिबट्या चा प्रसंग ऐकून चित्रा ताई फार घाबरली होती. तिनी पुढचा प्रवास गाडीनी करण्याचा निर्णय घेतला शाली वाहनपर्यंत तिला मांगीलाल नी गाडीवर सोडून दिलं. मात्र या पुढच्या प्रवासात जे अनुभव आम्हाला आले ते चित्रा ताई अनुभवू शकली नाही याचं वाईट वाटत राहिलं. पण ज्याच्या त्याच्या प्रारब्धानुसार असे अनुभव येत असतात हे महत्वाचं. त्यात आपला काहीही सहभाग नसतो. पुढचे अनुभव लवकर सांगते, भाग ९ मध्ये. नर्मदे हर.

नर्मदा परिक्रमा- एक विलक्षण अनुभूती- भाग ९

नागराज दर्शन, केवळ ८ इंचांवरून!

नर्मदे हर

मी आणि सुरेखा ताई मांगीलाल भाई कडून पुढे निघालो. वाट तशी एकट होती, पण मोठी होती. रस्त्याने अगदी अधून मधून एखादी दुचाकी जाताना दिसायची. मी आणि सुरेखा ताई मनातून तशा शांत होतो पण कालचा बिबट्याचा प्रसंग कुठे तरी मनात होताच. भीती मात्र वाटत नव्हती. पुढे वाटेत वेदा नदी लागते आणि इथे मैया चा आणि वेदा नदीचा संगम आहे म्हणून या जागेला वेदा संगम म्हणतात. लेप्याला मैया किनाऱ्याहून वाट नसल्याने जाता येणा शक्य नव्हते म्हणून २ किमी पलीकडचा रस्ता घेऊन आम्ही चालायला सुरवात केली. मात्र नदीवर पूल आल्यावर आम्ही गोंधळलो. कारण पुलावर कुठेही नदीचं नाव लिहिलेलं नव्हतं. ही मैया का वेदा हे समजण्याइतकं मैयाचं रूप अजून आम्हाला अंगवळणी पडलं नव्हतं. रस्ता तर निर्मनुष्य. आता करायचं काय? मैया ओलांडायला नको होती. आम्ही थोडा वेळ वाट पाहिली. कुणी येता जाता दिसलं की विचारू असं म्हणून बराच वेळ होऊन गेला होता. आता तिचा पुकारा करण्याशिवाय हातात काही नव्हतं.

आम्ही दोघींनी मोठमोठ्याने नर्मदे हर च्या आरोळ्या द्यायला सुरवात केली. साधारण ५ मिनिट आमच्या नर्मदे हरला काही उत्तर आलं नाही. मात्र मग झाडी मागून नर्मदे हर चा आवाज आला आणि एक माणुस पुढे आला. निळ्या रंगाचा शर्ट, तपकिरी रंगाची पँट, आणि तपकिरी रंगाचा ओढणीवजा स्कार्फ त्याने घातलेला होता. दाढी मिशा आणि कपाळावर

कुंकवाचा टिळा लावलेला हा माणूस आपुलकीनी हसत हसत म्हणाला “जाओ जाओ ये नर्मादाजी नही है”  आम्ही त्याला काहीही प्रश्न न विचारताच त्यांनी उत्तर दिलं होतं. “आप यहा क्या कर रहे हो भाई जी”  विचारल्या वर दूरवर बोट दाखवत म्हणाला “रेत की खान में काम करता हु”  त्याने जिकडे बोट दाखवलं ते अंतर तसं बराच लांब होतं. आमचा आवाज तिथवर जाऊन अवघ्या ५ मिनिटात हा माणूस आला आणि आम्ही न विचारताच आम्हाला जायला सांगितलं यावर आमचा विश्वास तर बसत नव्हता पण किमया असते आणि त्यावर विश्वास आपोआप बसतोच …  तसे अनुभवच ती आपल्याला देत असते असा विचार करत आम्ही पुलावर चालू लागलो.

आम्ही जास्तीत जास्त ५०० मिटर चालून झालं असेल तोच पुला पलीकडून एक ट्रॅक्टर येताना दिसला. येणा जाणाऱ्याला नर्मदे हर करायचं म्हणजे तेवढाच आपला जप होत जातो म्हणून आम्ही नर्मदे हर करण्यासाठी थांबलो मात्र दोघी आश्चर्य चकित होऊन बघत राहिलो होतो. कारणही तसंच होतं. *आत्ता पाच मिनिटापूर्वी ज्या माणसाने आम्हाला जा म्हणून सांगितलं तोच माणूस समोरून ट्रॅक्टर घेऊन येत होता. असं कसं शक्य आहे? पण असं झालं आहे. आम्ही दोघीही एकाच वेळी एकमेकींकडे बघत होतो…  हा माणूस आता जेमतेम ५ मिनिटापूर्वी अचानक झाडीतून आला आणि आता हाच समोरून येतो आहे? बरं पुलापलीकडे जायला दुसरा कुठलाही रस्ता नाही, हा माणूस आमच्या मागून गेला नव्हता आणि मुख्य म्हणजे हे ट्रॅक्टर येताना आम्ही बघितलं होतं, ते फार दुरून येत होतं… .. आम्हाला दोघींनाही भ्रम झाला अस जरी मान्य केलं तरी आम्ही नर्मदे हर म्हणाल्यावर त्या ट्रॅक्टर वरच्या माणसाने “अभी तो नर्मदे हर किया ना?” अशा प्रकारचे भाव प्रदर्शित केले आणि गालातल्या गालात हसून पुढे गेला. आपण एखाद्याची गंमत करतो आणि समोरच्याचा उडालेला गोंधळ बघून “ क्यू कैसी रही”  असं विचारतो नं तसे भाव होते त्याच्या चेहऱ्यावर होते. आता आमची खात्री पटली होती. आम्ही दोघी आता केवळ रडायचे बाकी होतो. आमच्या कंठातून शब्दच फुटत

नव्हते. तो दृष्टी आड जाईपर्यंत आम्ही त्याच्याकडे बघत राहिलो. आणि मग पुढची वाटचाल सुरु केली. आम्हाला सावरायला तेवढा वेळ हवा होता.

पुढे निघालो आणि माकडखेर्डा गावाकडून पुढे मांडव्य ऋषींच्या अश्रमाचं आणि त्यांनी जिथे अनेक वर्ष तप केलं त्या गुहे चं दर्शन घ्यायचं होतं. सुरेखा ताईच्या पायाला छाले आले असल्याने आम्ही बरच हळू चालत होतो. गाव संपून आम्ही मैया किनाऱ्याने चालू लागलो. एकिकडे मैया, आणि दुसरीकडे जंगल असा हा रस्ता होता. वाटेत काही मध्यप्रदेशी परिक्रमावासी अम्हाला पार करून पुढे निघून गेले… " बहोत धीरे चलते हो मैया आप" असं ही म्हणाले… आणी झपाझप निघून गेले..पुढे एक ओढा येणार आहे हे आम्हाला पुढच्या परिक्रमावासिंनी फ़ोन वर सांगितलं होतं. गळाभर पाणी आहे, ओढा ओलांडून यायचं नसेल तर घनदाट जंगलातून ४ किमी चा फ़ेरा घेऊन यावं लागेल असं ही सांगितलं होतं. आम्ही खरं तर ती चार किमी दूर्ची वाट घेणार होतो, पण तशी वाट आम्हाला कुठेच दिसली नाही. आम्ही ओढयाजवळ पोहचलो त्यावेळी ते मागे भेटलेले मध्यप्रदेशी परिक्रमा वासी तिथेच बसून होते.." म्हणाले, आपके लिये रुके है एक घंटे से… आप सामान के साथ कैसे पार करोगी?, आओ हम आपकी मदद कर देते है" … ही बुद्धी त्यांना कुणी दिली असेल?

हा अनुभव इथेच संपत नाही… त्या परिक्रमावासींनी आमचं सामान घेतलं, आणि गळ्यापर्यंत पाणी असलेल्या त्या ओढ्यातून… ओढा कसला,… नालाच म्हणावा असा घाण होता तो..दलदल होती, तिथून पार करवून नाल्याच्या त्या बाजूला पोचवलं… आता आम्हाला जायचं होतं. आमच्या जवळचा दंड खाली पाण्यात खोचायचा आणि कुठे जरा ट्णक जमीन आहे याचा शोध घेवून मग तिथे पाऊल ठेवायचं..सगळी दलदल, पाऊल ठेवलं की गुडघ्यापर्यंत आत रुतायचं, आणि असं एक एक पाऊल टाकत हा ८ ते १० फ़ुटाचा नाला आम्हाला पार करायचा होता. मी पुढे आणि सुरेखाताई मागे असं आम्ही नाल्यात एक एक पाऊल चालू लागलो. आम्ही नाल्याच्या अगदी मध्य भागी होतो, पाण्याला खूप जोर होता, उभं

राहणं ही कठीण होत होतं आणि अशा वेळी मझ्या समोरून एक १० १२ फुटांचा नाग फ़णा काढून आमच्या दिशेने येताना जेव्हा मी बघितला तेव्हा माझ्यातले त्राण गेले… . विचार करायच्या आत तो माझ्या ४ फुटावर येऊन पोहचला होता… आता फ़क्त शेवटचं नर्मदे हर म्हणायचं आणि त्या नागराजापुढे शरण जायचे, इतकेच बाकी होते… सगळं संपलेलं होतं… तो आता माझ्यापासून जेमतेम १ फुटावर होता… मी फ़क्त स्तब्ध उभी होते, सुरेखाताई माझ्या मागे होती… . आधी प्राण मला सोडायचे होते… आणि माझ्यापासून साधारण ८ इंचावर येऊन या नागराजाने त्याची दिशा बदलली… आणि माझ्या बाजूने निघून गेला… त्याचा मला स्पर्श झाला नाही, मात्र पाण्याच्या हालचाली मुळे त्याच्यामधील ताकतीची कल्पना मला आली होती… तो निघून गेल्यावरही, गव्याभर पाण्यात मी आणि सुरेखा ताई, साधारण ५ मिनिट स्तब्ध उभ्या होतो… .

खरं तर हा अनुभव इथे ही संपत नाहीच… … या अनुभवामागे नर्मदा मैयाचं एक प्लानिंग होतं मात्र ते आम्हाला आम्ही मांडव्य आश्रमात पोहचल्या नंतर समजलं आणि मन अक्षरश: भरून आलं. ती नर्मदा माई किती कनवाळू आहे आणि आपल्या लेकरांसाठी आणि त्यांच्या भल्यासाठी ती कसे कसे मार्ग काढते हे जेव्हा जेव्हा जाणवतं आणि आठवतं तेव्हा तेव्हा मी नर्मदामय झालेली असते… असाच तो मांडव्य आश्रमातला नागाच्या अनुभवा नंतर चा खुलासा… पण काय ते पुढच्या भागात सांगते.

नर्मदा परिक्रमा – एक विलक्षण अनुभूती – भाग १०

गळाभर पाण्यातून आम्ही सुखरूप बाहेर आलो. हे श्रेय त्या परीक्रमावासियांना जातं जे एक तास आमच्यासाठी वाट बघत बसले होते.चिखलाने माखलेल्या ओल्या कपड्यांनी, जोडे न घालता, आम्ही पुढचे ३ किमी चालत मांडव्य ऋषींच्या् या आश्रमात पोचलो. आंघोळ केली आणि मगच भोजन प्रसादी वगैरे झालं. तिथे गेल्यावर मांडव्य ऋषी ज्या गुहेत तप करायचेत ती गुहा खाली जाऊन बघितली. इथे रांगत जावे लागते. आत गेल्यावर एका कोपऱ्यात बऱ्या पैकी ऊबदार,कोमट आणि बाकी गुहेत अगदी थंड असे दोन वेग वेगळे तापमान जाणवते. मांडव्य ऋषी अजूनही तिथे अदृश्य अवस्थेत तप करत आहे असे म्हणतात.

आता मला जो नागराजांचा खुलासा झाला तो सांगते. इथे बाहेर एक महादेवाची पिंड आहे. त्या पिंडीच्या चारही बाजूनी गोल तारेचं कुंपण केलं आहे आणि या कुंपणाच्या जमिनीवर एक भलं मोठं बीळ आहे. असं देवाला तारेच्या कुंपणात का ठेवलय असं विचारल्यावर त्या साधू महाराजांनी तारे खालच्या बिळाकडे बोट दाखवलं. दिवसातून एकदा केव्हातरी त्या बिळातून ८ ते १० फुटाचा नाग येतो, पिंडीला वळसा घालून साधारण मिनिट दोन मिनिट तसाच थांबतो आणि आल्या पावली, कुणालाही त्रास नं देता नाल्याच्या दिशेला निघून जातो. हे समजल्यावर अंगावर काटाच आला. आम्हाला ज्या नागराजांनी दर्शन दिलं ते त्रास द्यायला नव्हतं, त्यांनी आम्हाला नक्कीच आशीर्वाद दिला असला पाहिजे. हा अनुभव निश्चितच वेगळा होता. ज्या अनुभवात भान शिल्लक राहत नाही त्याला दिव्य अनुभव म्हणतात ना..? मग कारण

काहीही असो, त्यावेळी जी विचार शून्य मनस्थिती झाली होती कुठल्या ट्रान्स पेक्षा वेगळी नव्हतीच. काय पण मैयाची कमाल आहे नं? काही न मागता किती देते ती?

आम्ही दुपारची भोजन प्रसादी घेऊन पुढे शालिवाहन आश्रमाला निघालो. शालिवाहन शक गणना जिथून सुरु झाला ती ही जागा. यालाच नावडा टोडी असे ही म्हणतात. इथे पोचताना आम्हाला उशीर झाला होता. कारण असं की सांगितल्याप्रमाणे ही जागा ३ किमी नसून ती जवळ जवळ ८ किमीची निघाली. जवळ ओले कपडे होते त्यामुळे वजन वाढलेलं होतं. नाल्याच्या पाण्यामुळे सुरेखा ताई च्या पायाचे छाले फार दुखू लागल्याने वेग कमी झाला होता, दूरवर लाल भगवा झेंडा दिसत होता तिथवर जायचं होतं. हा सगळा जंगलाचा भाग. एखाद दुसरं शेत मध्ये. मैयाच्या पलीकडच्या किनाऱ्यावर महेश्वर शहर वसलेलं. तिथे मैया किनारी होणारी जी काय हालचाल होती तीच आम्हाला आधारासारखी वाटत होती. अंधार पडू लागला होता..आम्हाला अजून बरच अंतर आणि बराच वेळ पायी चालत राहावं लागणार होतं … पण मध्ये कुठेही थांबण्याची काहीही सोय नव्हती. आम्ही जीवाच्या आकान्तानी पावलं उचलत होतो. अजून किती दूर आहे आश्रम हे विचारायलासुद्धा तिथे कुणीच नव्हतं.

मैयाच्या पाण्यात अंधार मिसळू लागाला होता आणि आम्हाला कोल्हेकुई ऐकू येऊ लागली. आम्ही दोघी मैयाचा जप करत फक्त पावलं पुढे फेकत होतो आणि तितक्यात आम्हाला आवाज आला " बस थोडी दूर है, इधर से जाना, किनारे तराफ मत जाना" जरा नजर फिरवली तर एक २५ चा तरुण किनाऱ्याच्या वरच्या भागावर उभा राहून आम्हाला रस्ता दाखवत होता. त्यांनी दाखवलेला रस्ता जरा वस्तीकडे वळणारा होता त्यामुळे धीर आला, जरा पुढे गेल्यावर आश्रम दिसू लागला आणि हायसं वाटलं. आणि मग समजल की आम्ही किनाऱ्याने जाण्याच्या ओघात हळू हळू पात्राकडे जात होतो. जो रस्ता आम्ही धरला होता तो आम्हाला नदी च्या मध्यभागी नेऊन सोडणारा होता. हा माणूस योग्य वेळी दिसला नसता तर आमचं काय झालं असतं देव जाणे! आम्ही कदाचित बराच अंतर चालून नदीच्या मध्यभागी

गेलो असतो, तिथून आम्हाला पुन्हा परत यावं लागलं असतं आणि अंधार पूर्ण पडला असता तर कदाचित तिथेच कुठेतरी जंगलात, अन्न आणि निवाऱ्याशिवाय रात्र काढावी लागली असती. त्या किनारी चालताना आम्हाला कुत्र्या कोल्ह्याने खाल्लेले जनावरांचे सांगाडे बर्याच ठिकाणी दिसले होते..कदाचित आम्ही त्या जनावराचे सावजसुद्धा झालो असतो… पण मैया नी तसं होऊच दिलं नाही. ती तसं होऊच देत नाही.

शालिवाहन आश्रमात आल्या नंतर इथे बरेच परिक्रमावासी भेटलेत. आजच्या अनुभवाने खर तर मन धस्स झालं होतं. अशावेळी कुणीतरी आपलं माणूस जवळ असलं की खूप छान वाटत असतं. मैया सोबत होतीच पण ती आम्हाला दिसत नव्हती. मायेनं कुणीतरी डोक्यावरून हात फिरवावा अस वाटत होतं. पण इलाज नव्हता. भोजन प्रसादीची पानं घेतली होती. आम्ही पानावर बसलो. पानात वैदर्भीय वांग्याची भाजी वैदर्भीय चवीचा कांद्याचा झुणका आणि ज्वारीच्या भाकरी होत्या. हे सगळं बघून माझं मन आपल्या माणसाची आठवण काढत होतं.. आज मला आपुलकीचे दोन शब्द ऐकायचे होते .इथे मध्यप्रदेशात ज्वारी फार मिळत नाही. म्हणजे कुणीतरी महाराष्ट्रीय व्यक्तींनी इथे सेवा दिली आहे हे स्पष्टच होतं. आम्ही जेवून घेतलं.

मी थोडावेळ देवळाबाहेर असलेल्या झाडाखाली बसले होते. माझ्या बाजूला एक म्हाता-री नऊवारी लुगडं नेसलेल्या आजी येऊन बसल्या. त्या आजींनी माझी चौकशी केली. पायी परिक्रमा करतेय याचं त्यांना फार कौतुक वाटत होतं. त्यांनी माझं गाव विचारलं. मी नागपूरची आहे म्हटल्यावर आजींनी मला मिठीच मारली. माझ्या कपाळाचा मुका घेतला… ." माह्या गावची लेक हाय व तू" असं म्हणून माझी चक्क दृष्ट काढली… . मी निशब्द झाले होते, मला जे हवं होतं ते मिळालं होतं. ती माउली आपल्या लेकीची एकही इच्छा अपूर्ण ठेवणार नव्हतीच!! फक्त हे समजण्यासाठी आणि अंगवळणी पाडण्यासाठी अजून परिक्रमा पथावर वाटचाल होण गरजेचं होतं आणि अधिक अनुभूती पुढे या वाटेवर माझी वाट बघत होत्याच. पुढच्या भागात त्यांच्याबद्दल लिहेनच! नर्मदे हर.

नर्मदा परिक्रमा-एक विलक्षण अनुभूती- भाग ११

नर्मदे हर

शालिवाहन आश्रमातून दुसऱ्या दिवशी सकाळी सात वाजता पुढचा प्रवास सुरु केला. इथे आम्हाला सौ रेखा कुलकर्णी आणि सौ अनघा पूर्णपात्रे भेटल्यात. सौ मंत्री यांना देखील मांगीलाल भाई नी गाडीवर इथपर्यंत सोडून दिलं होतं. तसा गृप आता मोठा झाला होता पण सगळ्यांच्या चालण्याची स्पीड वेगवेगळी असल्याने आम्ही मागे पुढेच झालो होतो. आम्ही मौनी बाबा आश्रमात पोचलो तेव्हा दीड वाजला होता. आमच्यातील काहिंना तब्येतीची तक्रार असल्यामुळे त्यांनी त्यांच्या बॅग मोटर सायकल वाल्याला देऊन पुढे पाठवून दिल्या होत्या. माझ्या मनात मात्र मैया कृपेने तशी इच्छा कधीच झाली नाही आणि तशी वेळही माझ्यावर मैय्याने कधीही येऊ दिली नाही. माझ्या पाठीवरच ओझं हे माझ्या कर्मांच ओझं आहे तेवढ तरी वाहून न्यायलाच हवं हाच विचार मनात कायम असायचा, अर्थात तो टिकवून ठेवण्याची शक्ती ही मैयाचीच होती.

तर आम्ही आज २० किमी चाललो होतो. इथे आश्रमात आल्यावर ज्यांनी सामान पुढे पाठवून दिलं होतं ती मंडळी आपापलं सामान शोधू लागली. सामान काही सापडेना. प्रत्येकाच्या मनात आलं की मोटरसायकल वाला नक्की सामान घेऊन पळून गेला. आम्ही पायी येणार, तो गाडीवर.. आम्ही शेतातून, तो रस्त्यांनी… म्हणजे तो तर आमच्या तास दोन तास आधी पोहोचायलाच हवा होता. पण इथे तो आलाच नव्हता. आता काय करायचं?

या मंडळीकडे काहीच सामान नव्हतं. अंगावरचे कपडेच फक्त काय ते होते. कुणी तरी म्हणालं भोजन प्रसादी लागलीये. निदान ती तरी घेऊयात, मग बघू काय करायचं.

माणसाचं मन खूप निगेटिव्ह असतं. हे असं का असतं ते माहित नाही. पण असतं हे मात्र खरं. काहीही झालं तरी पहिला विचार मनात येणारा हा वाईटच असतो. खर तर बरेच वेळा ह्या वाईट विचारा सारखं वाईट सभोवताली काहीच नसतं. आपणच त्याला वाईट पणाची किनार लावून त्या परिस्थितीचं रूप अधिकच ओंगळवाणं करून ठेवतो आणि नसेल त्या विचारांच्या मागे धावून दु:खी होत जातो. हा जो मानवी स्वभाव आहे तो बदलता आला तर? कदाचित सुखाचा शोध थोडा सहज होईल··· पण ते काही घडवण आपल्या हातात नाही, आणि मग आपले भोग कसे भोगता यायचेत?... ... असो···

तेव्हाही आम्ही अशाच नकारात्मक भावनेतून त्या बिचाऱ्या मोटारसायकल वाल्याला काहीबाही बोलत होतो, अर्थात मनातल्या मनात. आणि ज्यांचं सामान आलेलं नव्हतं त्यांच्या मनातील ती काळजी त्यांच्या चेहऱ्यावर स्पष्ट दिसून येणं ही स्वाभाविक होतं. साधारण तीन वाजत आले होते. आता सामान असलेले लोक पुढे निघणार आणि नसलेले इथेच थांबणार हे न सांगताच स्पष्ट झालं होतं. मी निघायची तयारी केली. एक दोन परिक्रमावासी सोबत होते पण मी त्यांना ओळखत नव्हते. आम्ही थोडं अंतर चालून गेलो असता समोरून एका सायकल वर एक माणूस या मागे राहिलेल्या मंडळी चं सामान घेऊन येताना दिसला. त्याला विचारलं असता त्यांनी जे सांगितलं ते ऐकून आपल्या मनाचा फार फार राग आला.

त्या मोटरसायकल वाल्याची गाडी पंक्चर झाली होती. ते सामान आणि ती गाडी त्यानी बरच अंतर ओढत नेली आणि पुढे तो मोटरसायकल वाला एकटा गेला. तिथे त्यानी लोकांना गळ घातली आणि एका सायकल वाल्या माणसाला परिक्रमावासिंचं सामान नेऊन देण्याला तयार केलं. मग हे सामान त्याच्या सायकल वर लादलं आणि त्याला मौनी बाबा अश्रमात पाठवलं. इतकं सगळं करेपर्यंत त्याला निश्चितच बराच वेळ लागला असणार.. पुढे जवळ जवळ ६ लोकांचं ओझं सायकल वर वाहून आणणाऱ्या माणसाच्या शारीरिक त्रासाचा विचार करता त्याने फार मोठे कष्ट घेतले होते. आणि आम्ही काय काय विचार करत होतो बघा! मनाचे खेळ

सगळे… त्या वेळी समजलं.. रिऍक्ट व्हायचं नाही, अगदी जमेल असं नाही, पण प्रयत्न करायचा… . कारण आपण जसं व्यक्तं होतं तसं आजूबाजूला काहीच नसतं बहुतांश वेळी… हा एक धडा घेऊन मी पुढे निघाले.

पुढे कठोराला जाताना मी आणि सुरेखा ताई सोबत होतो. शेतातून जाणारा हा रस्ता होता. इथे आम्हाला रस्त्यात एका ने चहा आणि बिस्कीट पुडे दिले. कठोऱ्याला अविनाश चं एक अन्न छत्र आहे, तिथेच थांबायचं असा आदेश होता. मात्र आम्ही कठोऱ्यापर्यंत पोहचू शकलो नाही. ज्या दिवशी आम्ही अमुक ठिकाणी जायचं असं ठरवायचो त्यादिवशी आम्ही तिथवर पोहचूच शकायचो नाही. काही ना काही कारण व्हायचं आणि आम्हाला आधीच कुठेतरी मुक्काम करावा लागायचा. पुढे राजघाट नंतर आम्ही ठरवणंच सोडून दिलं. या वेळी इथे आम्ही खलघाटला मुकाम केला. इथली राम मूर्ती इतकी बोलकी आहे की समोरून उठायची इच्छा होत नाही. रात्री १२ वाजेस्तोवर मी या मूर्तीसमोर बांधून ठेवल्यासारखी बसली होती. त्यावेळी मनात काय विचार होते ते आठवत नाही. काही विचार नव्हतेच बहुधा. इथेही थंडी फार जास्त होती पण मैया कृपेने आम्हाला एक खोली मिळाली. पुरुष मंडळी मात्र कुडकुडत बाहेर झोपली होती.

इथे येताना एक तरुण, देखणा राजबिंडा सन्यासी रस्त्यात भेटला होता. अस्खलित मराठी बोलत होता तो. झपाझप पावलं टाकत होता. त्याची भेट झाली त्या वेळी मी आणि पसारकर काकू अशा दोघी सोबत होतो. " अभी कितना दूर है खल घाट" असं विचारल्यावर तो थांबला, म्हणाला, " माई आपण फक्त चालत राहायचं असतं, बाकी विचार करायचा नसतो " , मग मझ्याकडे पाहून म्हणाला, प्रश्न पडतात तुम्हाला, पण विचारत नाही तुम्ही..चांगलय, आपल्या प्रश्नांची उत्तरं आपल्यालाच शोधायला लागतात… .आता तुमच्या मनात जे प्रश्न आहेत ते सुटतील लवकर… फ़क्त एक करा, राम सोडू नका." आणि झपाझप पावलं ताकत तो पुढे निघून गेला.

पुढे खलघाट आश्रमात तो सगळ्या परिक्रमावासिंना जेवायला वाढत होता. खिचडी आणि कढीची भोजन प्रसादी होती. मला वाढता वाढता तो मधेच माझ्याकडे बघून स्मीतहास्य करायचा, आणि जणू काही मी काय विचार करते आहे ते त्याला समजतय असे भाव मला त्याच्या चेहऱ्यावर दिसत होते. भोजन प्रसादी झाल्यावर मी राम मंदिरा समोरा बसली होती तेव्हा तो सन्यासी तिथे आला, त्या राम मूर्तीकडे बोट दाखवलं आणि म्हणला… . "राम… … .राम राम मैया जी… " असं म्हणत तो सन्यासी निघून गेला, आणि मी त्या पाठमोऱ्या सन्याशाकडे बघत राहीले… तो आपल्या खोलीत निघून गेला आणि मग माझी नजर त्या सन्याशाने दाखवलेल्या रामाच्या मुर्तीवर स्थीर झाली. भान आलं तेव्हा १२ वाजले होते…

मला काहीही समजत नव्हतं… पण तो राम मला पुढेही अधून मधून आठवण करून देत होता स्वतःची..मात्र प्रत्येक वेळी एक वेगळा सन्यासी माझ्यापुढे येत आणि रामाची आठवण करून देत.. तीन वेगवेगळे सन्यासी, तीन वेगवेगळ्या प्रदेशात मला भेटलेत, मात्र ते जे वाक्य बोललेत ते शब्दश: सारखं होतं..खलघाट चा हा तेजस्वी सन्यासी म्हणाला, रामाला सोडू नका, आणि नंतर भेटलेले सन्यासी म्हणाले "बेटा राम को दूर मत करना कभी" आहे न आश्चर्य? इतकं सारखं वाक्य कसं काय बोललेत हे तिघं ही?

मैया किती करते आपल्यासाठी, आपल्याला जे काही आवश्यक आहे असे संदेशसुद्धा ती देते.. मात्र आपण कमी पडतो तिचे संकेत समजायला… ती आई आहे. ती प्रेमळ आहेच. पण बाळाला वळण लावायला आईला कधी कधी तिचा राग दाखवावाच पलागतो… असा राग आईने मला पण दाखवला आहे… त्या दिवशी जे झालं त्यावरून समजलं, तिच्या योजना खूप वेगळ्या असतात… त्या समजून घेण्याचा प्रयत्न ही करू नये.. ती म्हणते तसं करत रहावं, नाहीतर फ़टका दिल्याशिवाय राहयची ती..कसा फ़ट्का पडला त्या दिवशी… नेमकं काय घडलं की ती रगावली? पुढच्या अनुभवात सांगते नक्की.

नर्मदा परिक्रमा – एक विलक्षण अनुभूती- भाग १२

नर्मदे हर

नर्मदा माई ही आपली आई आहे आणि ती आपली काळजी घेते हे आतापर्यंत समजलं होतं. पण ती आपली आई आहे म्हणून ती आपल्याला वळण लावू शकते आणि गरज पडल्यास दट्ट्या पण देऊ शकते याची पण खात्री पटली सांगते..

खलघाट ते कठोरा जाताना मी आणि सुरेखा ताई पुढे आणि चित्रा ताई जरा मागे होतो. उसाच्या शेतातून जाणारी वाट होती. शेत जरी असलं तरी १०-१२ फूट उंचीचा उस होता त्यामुळे शेताच्या अलीकडचं आणि पलीकडचं दिसायचं नाही, आवाज मात्र यायचा. दोन शेतांच्या मधे मात्र थोडी जागा किंवा वाट असायची, पण नेमकं कुठे जायचं आहे हे बरेचदा समजायचं नाही. मग वीजेचे टॉवर म्हंजेच आमचा "दीपस्तंभ" असायचा… टॉवर ज्या दिशेला दिसेल तिकडे जायचं… म्हणजे कुठल्यातरी गावात आपण नक्कीच जाऊन पोहोचू … तर असच एकदा आम्ही टॉवर च्या दिशेने जात होतो पण काही केल्या अंतर कापल्या जाईना… बहुधा आम्ही रस्ता चुकलो होतो… तिथे विचारायला कुणीच नव्हतं. जेव्हा कुणी नसतं तेव्हा मैया असतेच… . आम्ही नर्मदे हर च्या आरोळ्या द्यायला सुरवात केली आणि ४ ते ५ हाकानंतर अम्हाला प्रतिसाद आला… "मैया जी सीधे चलते रहो, जब मुडना होगा मै बता दुंगा" . कुणी दिसेच ना.. मग बरोबर चार ते पाच वळणं त्या आवाजानेच आम्हाला लक्षात अणून दिले..आम्ही पुढे गेलो, तरी तो आवाज मात्र व्यवस्थित ऐकू यायचा… म्हणजे दुरून आवाज येतोय असं काही वाटायचं नाही… तो आवाज आमच्या बरोबरीने चालत होता असं

वाटू लागलं मात्र शोधायला जावं तर कुठे माणुस नावाच्या प्राण्याचा नामोनिशान ही नाही… मैयाला मनोमन धन्यवाद देत आम्ही पुढे गेलो, आणि गावा जवळ च्या वस्तीत पोहोचलो देखिल …

आता इथे आम्हाला मैया फ़टका देणार होती, पण हे आम्हाला माहितच नव्हतं. झालं असं की या गावा जवळच्या वस्तीत आम्हाला चहा साठी बोलावलं, पण आमची चहा घेण्याची इच्छा नव्हती, म्हणून चहा नको असं आम्ही सांगीतलं. तिथल्या मैयाजींचा आग्रह फ़ार होता… चहा नको म्हणालो तर जेऊनच जा असा आग्रह त्यांनी केलेला.. आमच्या पोटात जिथे चहाला जागा नाही, तिथे जेवण काय जेवणार.. आम्ही पुन्हा नको असं सांगीतलं. खलघाटला छान बालभोग झाला होता, त्यामुळे फ़ार भूक नव्हती, जेवणाची वेळ पण झाली नव्हती.. आता २-२.३० वाजता जेऊ, अता काय १० वाजता जेवायचं असा विचार करून आम्ही जेवणालासुद्धा सपशेल नकार दिला… बिचाऱ्या मैयाजींचं हृदय दुखावल्या गेलं असणार, पण आम्हा पामरांच्या ते लक्षातच आलं नाही…

तर गंमत अशी झाली, आम्ही पाणी पिऊन पुढे निघालो.. आणि बरच अंतर चालत गेलो … हळू थकवा येऊ लागला आणि आता काहीतरी हवं असं वाटू लागलं… म्हणजे चहा असला तरी चालेल… पण या गावात आम्हाला काळं कुत्रं विचारेना. लोक कुतूहलाने बघायचे, पण एकानेही चहाला असं म्हंटलं नाही… आता जिथे चहाच नाही विचारत कुणी, तर जेवणाचं काय?.. बसला की फ़टका! आम्ही त्या मैयाजींचं मन दुखावलं होतं, त्यांच्या श्रद्धेला मान दिला नव्हता, मैया च्या चहा आणि भोजन प्रसादीला चक्क नकार दिला होता..आणि आता आम्हाला न चहा मिळत होता नं जेवण..

दुपारचे तीन साडेतीन वाजून गेले तरी काही मिळेल याची शाश्वती दिसत नव्हती. आम्हाला आमची चुक कळली होती. आम्ही तिची मनापासून माफ़ी मागितली,दिलगीरी व्यक्त केली आणि मायच ती, तिचं हृदय द्रवलं… आपल्या उपाशी लेकरांना ती धडा देत होती, पण

त्यांना उपाशी बघणं तरी कसं जमेल एका आईला? एका शिवमंदिरात विसाव्याला थांबलो, तिथे चहा मिळाला.. मन भरून आलं.. तिची माफ़ी मागीतली ततक्षणी ती माऊली पावली होती! पुढे ब्राम्हण गावला जेवण तर मिळालं नाही मात्र सुरेखा ताईचे नातेवाईक भेटायला येणार होते. तिथे हि चमत्कारच घडला…  गावात जेवण मिळालं नाही हे जरी खरं असलं तरी ह्या नातेवाईकांनी आमच्या साठी घरून डब्बा आणला होता. त्यात पुरी, कोबी बटात्याची भाजी, घरचं लोणचं, खूप सारी फ़ळं म्हणजे जवळ जवळ २ डझन सफ़रचंद, २ डझन केळी, २ नग अननस, ३..ते ४ नग पपया, आणि भरपूर फ़राळ, ज्यात शेव, चिवडा, नमकीन, उपासाचा चिवडा, हे सगळं तर होतच, शिवाय भरपूर औषधंसुद्धा त्यांनी आणली होती. हे सर्व सामान आम्हाला ८ दिवस पुरेल याही पेक्षा जास्त होतं. मैयानी जितकं रागवलं होतं त्यापेक्षा कितीतरी जास्त कौतुक केलं होतं, माया केली होती… … .कानाला खडा लावला आणि त्यनंतर कधी ही कशाला ही नाही, किंवा नको असं म्हंटलं नाही.

परिक्रमा म्हणजे खरोखरीच विलक्षण असं गारुड आहे. इथे कुठल्या क्षणी काय होईल याचा काही नेम नाही. कठो-राचा मुक्काम छानच झाला, दुसर्या दिवशी विश्वनाथ खेडा नावाच्या गावाला मुक्काम करायचा असं आम्ही ठरवलं.. इथे अजून एक धडा मैयानी दिला… तेव्हा म्हणजे त्या वेळी आम्ही खूप घाबरलो होतो, कारण ह्या विश्वनाथ खेडा गावाच्या साधारण ४ किमी आधी एक अतिशय भिती दायक घटना आमच्या सोबत घडली. केवळ चार किमी अंतर असतानाही आम्ही त्या गावात पोहचू शकत नव्हतो… आम्ही कुठल्यातरी वेगळ्याच शक्तीच्या प्रभावाखाली असल्याचं जाणवत होतं मात्र तिथून सुटायला आम्हाला तब्बल तीन तास लागलेत… . ४ किमी अंतर चालायला तीन तास इतकं साधं हे गणीत नव्हतं कारण जे घडलं ते आकलनाच्या पलिकडचं होतं भितीनी आमचं धाबं दणाणलं होतं असं म्हटलं तरी चालेल.. अनुभव जरा मोठा आहे म्हणून पुढच्या भागात सांगते ... नक्की काय भयानक प्रकार घडला होता ते!

नर्मदा परिक्रमा – एक विलक्षण अनुभूती- भाग १३

नर्मदे हर

मागच्या अनुभवात मी तुम्हाला सांगीतलं की भयानक घटना घडली.. ती काय ते आता सांगते. आता तुमच्या पैकी किती लोकांचा यावर विश्वास बसेल माहित नाही पण काही चांगल्या शक्ती असतात तशा काही वाईट शक्ती ही असतात असं वाटू लागलं, अर्थात नर्मदा मैया सोबत असल्याने आमचं काही बरं वाईट नक्कीच होणार नाही याची खात्री होतीच. तरी जीवच तो, घाबरतोच थोडाफ़ार.. आणि भिती म्हणजेसुद्धा आपल्याला काही होईल अशी भिती वाटत नव्हती, मात्र हे जे काही सुरू आहे ते वेगळं आणि अनपेक्षित आणि त्याही पेक्षा अनाकलनीय आहे हे समजत होतं, बाकी काहीही समजतच नव्हतं अशीच ती घटना.

ब्राम्हणगावातून सुरेखा ताईच्या नातेवाईकांना निरोप देऊन आम्ही पुढे निघालो. इथून अगदी १० ते १२ किमी वर विश्वनाथ खेडा गाव आहे, तिथे काशीविश्वनाथाचं मंदीर आहे, तिथे रात्री चा मुक्काम करायचा असा विचार केला. एव्हाना रोजचं १० ते १२ किमी अंतर चालत असू, त्यापेक्षा जास्त नाही, म्हणजे विश्वनाथ खेडा तसं आमच्या चालण्याच्या टप्प्यात होतं. पण तरीही आम्ही तिथे पोहोचू शकलो नाही कारण मधे ही भयानक घटना आडवी आली.

तर झालं असं, आम्ही वाटेत होतो म्हणजे विश्वनाथ खेडा साधारण ४ किमी काय ते उरेलं असेल, रस्ता डोंगराळ होता आणि वस्ती नव्हती, मात्र अधुन मधून शेतं होती. रस्ता विचारत विचारत पुढे जायचं. इथे काय झालय मध्यप्रदेशात, नर्मदा नदीचं पात्र वाढवण्याचं काम सुरू आहे, म्हणजे धरणं जी बांधली आहेत ती ज्यावेळी मोकळी करणार त्यावेळी पाण्याची पातळी वाढणार आणि किनाऱ्यावरची गाव पाण्याखाली जाणार.. याला इथे “गाव डूब मे है” असं म्हणतात. आणि मग पुनर्वसित गावं तयार झाली आहेत. तर आम्हाला वाटेत तिघं तरूण मुलं दिसलीत. ती दारू गाळत होती.. त्यांना रस्ता विचारला, तर ती म्हणाली..”आप

तो पुनर्वसन मे जा रहे हो, किनारे वाला गाव तो उधर है”  असं म्हणत त्याने उजवीकडे आम्हाला जायला सांगितलं. त्यानी दाखवलेल्या दिशेला आम्ही साधारण ३ किमी चालून गेलो, तर तिथे एक म्हातारा माणूस बसला होता, त्याला पुढचा पत्ता विचारला, तो म्हणाला, “मंदिर तो हैम पर वो डूब मे है, इसलिये वहा कोई जाता नही, आपको न सोने को मिलेगा न खाने को.. अब तो गाव मे ३ ही मकान बचे है… गुंडो का राज चलता है वहा… कुछ हो गया तो क्या करोगे, आप तो पुनर्वसन मे ही जाओ…

आता तिथे काहीच नाही म्हंटल्यावर काय करायचं? न लाईट आहे म्हणे, आणि न काही सोय..मंदिर पण बंद, आणि स्मशान पण लागूनच आहे असं ही त्यानी संगीतलं..शिवाय “गुंडाराज चलता है”  असं ही तो म्हणाला.. आमच्यात एक मोठे गृहस्थ होते, ते म्हणाले, इतक्या पोरी बाळी सोबत आहेत, आपण पुनर्वसनला जाऊ… आम्ही पुन्हा पुनर्वसीत गावाकडे निघालो… ती दारू गाळणारी मुलं आता तिथे नव्हती, त्यांचं सामान होतं, मात्र तिथे एक आणिक म्हातारा बसला होता… त्याला विचारलं… .

तो म्हणाला “किसने बताया आपको… मंदिर तो शुरू है.. मै तो अभी उधरसे ही आया हू… आपको नाले के पास बताया होगा ये बात, है ना… अरे आपको जिसने बताया वो तो आदमी नही है..चकोडा है… ऐसे ही बताता है”  चकोडा म्हणजे चकवा, दिशाभूल करणारा … . बापरे, असं खरंच असतं? मग आम्ही त्याला त्या तीन मुलांबद्दल विचारलं..तर म्हणाला “कौनसे लडके, यहा तो मै ही बैठता हू..आपको गलत फ़एमी हुई होगी..यहा कोई तीन लडके नही थे”

आता हे ऐकून आम्ही अजूनच दांदरलो… आम्ही त्या तीन मुलांशी बोललो होतो! आम्ही त्याला म्हंटलं “आप चलो हमारे साथ. हमे मंदिर तक छोड दो”  तो हो म्हणाला… जरा हायसं वाटलं. तो पुढे आणि आम्ही मागे असं पुन्हा एकदा डूब गावाकडे चालू लागलो… वाट्लं चला, हा आहे, आता निदान निवारा तरी मिळेल, फ़राळाचं सामान आहे आपल्याकडे, त्यामुळे जेवण

नसलं तर नसलं.. काही अंतर चालून तो म्हणाला, “अब यहा से सीधा सिधा जाना, मुझे घर जाना है, मै जा रहा हू”  त्याला थांबायचा खूप आग्रह केला पण तो निघून गेला… मग आम्हाला एक चुन्यानी आखलेली लाईन दिसली, लाईन काय वाटच दिसली, अगदी बाणानी मार्ग पण दाखवला होता त्यावर.. वाटलं चला, परिक्रमा वासींसाठीच असावा, आम्ही त्या मार्गाने चालू लागलो, पण गाव काही येईना..मी सगळ्यात पुढे होते.. मी समोर जाऊन जरा बघायचं ठरवलं … पुढे एका ठिकाणी ती चुन्याने आखलेली वाट दिसेनाशी झाली होती… ती कुठेच जात नव्हती, मात्र तिथून पुढे बरच दूर एक छोट्सं मंदिर होतं… अगदी लहान, म्हणजे रस्त्यावर किंवा गावाबाहेर फ़क्त देवाची मूर्ती बसेल इतकं छोट्सं मंदिर नसतं का बांधलेलं… तसं.. आणी त्यामागे लाकडाचे ढीग रचले होते… ते पाहून मी मागेच वळले! आपली जबरदस्त दिशाभूल होते आहे हे समजत होतं, किंबहुना ती केली जातेय हे ही समजत होतं. आम्ही रामरक्षा आणि नर्मदाष्टक या दोन्ही चा जप सुरू केला..आणि सगळ्यानी एकत्र येऊन ठरवलं की आता पुनर्वसीत गावातच जायचं.. काही नाही तर निदान माणसं तरी दिसतील… .

वाटेत पुन्हा ती तीन मुलं दिसलीत.. न विचारताच म्हणालीत “डूब मे जाओ..इधर तो पुनर्वसित गाव है”  आम्ही लक्षच दिलं नाही आणि, एकदाचं पुनर्वसीत गावात येऊन पोचलो. इथे आल्यावर छान व्यवस्थित गाव दिसलं तेव्हा जिवात जीव आला. लोकांशी चर्चा केल्यावर समजलं, असा अनुभव या भागात प्रत्येक परिक्रमावासीयाला कमी जास्त प्रमाणात येतो, मात्र इजा किंवा इतर त्रास होत नाही, दिशाभूल मात्र होतेच… ! मात्र माई सोबत असते, ती वाट दाखवते. कुणी तिकडे डूब मधे जातं कुणी इकडे येतं..खरं तिथेच सोयी आहेत, हे ही समजलं

इथे आलो खरं, पण पुढे निवारा मिळणं काही सोपं नव्हतं.. भरपूर त्रास झाला.. कसा ते सांगते पुढच्या अनुभवात.. एक मात्र नक्की, आजचा दिवस खूप खूप विचित्र होता. केवळ आम्ही परिक्रमावासी आणि मैयाची लेकरं म्हणूनच आमचा निभाव लागला असणार.. अर्थात पुढचा त्रास भितीदायक नसला तरी विचित्र मात्र होता, कसा ते सांगते… लवकरच

नर्मदा परिक्रमा – एक विलक्षण अनुभूती- भाग १४

नर्मदे हर

तर कसं बसं आम्ही त्या चकोड्याला पार करून विश्वनाथ खेडा पुनर्वसन गावी येऊन पोहोचलो. तोवर संध्याकाळचे ६-६.३० झाले असतील. आता गरज मुक्कामाची.. तिथे एखादं देऊळ असेल ते पाहू, असं ठरवलं. देऊळ होतं, तिथे गेलो असता तिथल्या पुजाऱ्यानी सांगीतलं आत जागा नाही. आम्ही ५ जण होतो. काका काकू. आणि आम्ही तिघी मुली, मी सुरेखा आणि स्मिता कुलकर्णी. आता जागाच नाही म्हंटल्यावर काय करणार.. सगळं सामान घेतलं आणी दुसऱ्या निवाऱ्याच्या शोधात निघालो. भोजन प्रसादी आज मिळेल असं काही वाटत नव्हतं आणि जणू मिळणार नाहीच याच विचारात आम्ही सोबत असलेली फ़ळं किंवा फ़राळाचं खाऊन घेऊ असं ही मनोमन ठरवून टाकलं होतं. आता निवारा मिळणं आणि प्रात:विधी साठी जागा मिळणं हे महत्वाचं, कारण आम्ही गावात होतो. एखाद्या आश्रमात, किंवा गावाबाहेर असताना वावरात प्रात:विधीला जाणं शक्य असतं.. इथे गावात कसं काय जमणार? तेव्हा जागा अशीच हवी असणार होती जिथे निदान ही सोय तरी असेल…

मग शोधता शोधता एक अजून मंदीर सापडलं. ते छान ऐस पैस होतं. संत राम महाराज म्हणून होते, त्यांनी बांधलेलं राजाराम मंदिर हे. मंदिर म्हणजे एक मोठा वरांडा, आणि त्याला कमरेपर्यंत जाळी चारी बाजूनी, बाकी भिंत वगैरे काही नाही. म्हणजे थंडीपासून बचाव होणार नव्हताच, आणि अजून परवानगी मिळाली नव्हती. त्याच मंदिराच्या अगदी समोर एक शिवाचं मंदिर होतं, पण ते अगदीच उघडं होतं… राजाराम मंदिरात कुणीही नव्हतं म्हणून शिव मंदिरात गेलो, तिथे पुजारी होता, त्याला विचारलं… तो म्हणाला, मेरे यहा रह सकते हो पर

यहा नीचे डालने के लिये कुछ नही है, और मै तो सुबह तीन बजे भजन करता हू, आपको उठना पडेगा… म्हणजे हा पण पर्याय गेला..आम्ही खूप थकलो होतो… शेवटी आता कुणी नसलं तरी राजाराम मंदीरात डेरा टाकायचं ठरवलं आणि कुणाच्याही परवानगी शिवाय आम्ही आत जाऊन आसनं लावले. अजून भोजन प्रसादी आणि प्रात:विधी चा प्रश्न होताच! पण आता निदान रात्र कुठे काढायची हे नक्की करणं गरजेचं होतं.

तेवढ्यात तिथे एक माणूस आला, तो जरा विक्षीप्त वाटत होता. खरं सांगायचं संध्याकाळ्च्या त्या चकोड्यापासून आम्हाला हे गावच विचित्र वाटू लागलं होतं. कधी एकदा रात्र सरते आणि आपण इथून निघून जातो असं वाटू लागलेलं. तो माणूस आम्हा तिघींकडे टक लावून बघत बसला… आणि काही केल्या तो तिथून जाईना.. जवळ जवळ तास भर त्यानी तिथेच असं बघत बघत घालवला असेल. मग तो निघून गेला आणि अर्ध्याच तासात परत आला. त्याच्या हातात चहाची किटली होती. त्यानी आमच्या साठी चहा आणला होता. खरं तर तो चहा प्यावा की नाही असंच वाटत होतं पण तेवढ्यात त्या देवळाचा पुजारी आला. त्यानी मात्र आमचं स्वागत केलं. आमची चौकशी केली आणि आम्हाला खाली घालायला जाड सतरंजी आणी पांघरुणं पण देवळातल्या खोलीतून काढून दिली. देव्हारा उघडून दिला आणि " तुम्हारे मोबाईल चार्ज करके ताला लगा देना" असं म्हणून किल्लीसुद्धा आमच्याच जवळ दिली.

हे गाव न खरंच काहीतरी वेगळं होतं. आधी इथे पोहोचताना झालेला गोंधळ, मग निवाऱ्या-साठिचा त्रास आणि मात्र त्या नंतर झालेली मदत, सगळच विलक्षण… काय झालं, हा पुजारी परत जात नाही तोच समोरच्या देवळातला पुजारी आला, त्यानी एक किल्ली आणून दिली, " सामने टॉयलेट है, आप लोग जा सकते हो, बाथरुम भी है" असं सांगीतलं… बराच वेळपासून तग धरून बसलेल्या आम्ही मुली आधी त्या दिशेला धावलो. अंधार दाट झाला, ये जा पांगली की बाजूच्या रिकाम्या प्लॉटवर नेचर्स कॉल आटोपायचं आणि तोवर तग धरायची असंच ठरलं होतं, आणि दुसरा पर्याय ही नव्हता, पण हा ही प्रश्न आपोआप सुटला होता.

यानंतर मात्र कहरच झाला… तिथे एक मैयाजी आल्या आणी आम्हाला सगळ्यांना जेवणाचं आमंत्रण देऊन गेल्या. आम्ही भोजन प्रसादीला गेलो तेव्हा समजलं, बाईचा स्वयपाक, घरच्यांची जेवणं सगळं झाल्यानंतर आम्ही आल्याची बातमी त्यांना समजली. सगळं स्वयंपाक घर आवरून बंद केल्यानंतर, पुन्हा आमच्यासाठी या मैयाजींनी स्वयंपक केला होता.. " हमारे घर आजाओ ना सामान लेके" असं ही त्या विनवत होत्या, पण पुजाऱ्यानी केलेल्या मदतीचा तो अपमान झाला असता म्हणून आम्ही मंदिरातच झोपायचं ठरवलं, मात्र दुसऱ्या दिवशी सकाळी आंघोळ आणि बालभोगासाठी इथेच या असा मैयाजिंनी हट्टच धरला आणि छान गरम पाण्याची आंघोळ मिळाली. अगदी थोडावेळ आधीपर्यंत "इथून कधी जातो" असं वाटणारं गाव मैयाजींच्या आणि इतर मंडळींच्या सहकार्याने का होईना आता छानसं गाव वाटू लागलं होतं. सकाळी छानसा बालभोग करून आम्ही पुढे निघालो.

आता आम्हाला बऱ्यापैकी चालायची सवय लागली होती. जप होत रहावा म्हणून आम्ही मागे पुढे होऊन चालत असु. मी आणि सुरेखाताई पुढे, काका मधे आणि काकू आणि स्मिता मागे असे काहीसे आम्ही मागेपुढे झालो होतो. माझी आणि सुरेखा ताईची स्पीड बऱ्यापैकी मॅच होत होती, आम्ही हाकेच्या अंतरावर असायचो.

परिक्रमेत असे काही अनुभव येतात की त्यांचं नक्की कारण ठरवणं किंवा शोधून काढणं काही शक्य नसतं. असं का झालं असावं हा फ़क्त अंदाज आपण बांधत राहत असतो, आणि कालांतराने तो ही बंद होतो.. हे आपल्या बुद्धीच्या आकलना बाहेर आहे हे समजायला जितका वेळ लागेल तितकच काय ते… पण एक गोष्ट समजते.. आपलं नं काही तरी देणं घेणं जिथे कुठे शिल्लक असेल तिथे आपण न ठरवता कसे काय जाऊन पोचतो हे ती मैयाच जाणे, पण पोहोचतो मात्र नक्की. म्हणूनच परिक्रमा जरी एक असली तरी प्रत्येकाचे अनुभव वेगवेगळे असतात.

आमचा बालभोग छान झाला होता, आम्ही दोघी पुढे निघालो होतो, आणि आमची मागच्यांशी चुकामुक झाली. आमचे रस्ते बदलल्या गेले होते. फ़ोन वर जेव्हा आमचं बोलणं झालं तेव्हा समजलं की ते तिघं पार वेगळ्या रस्त्याला लागलेले आहेत, आणि आम्ही वेगळ्या रस्त्याने जात आहोत.अर्थात रस्ते जरी वेगळे होते तरी पुढे आम्ही कुठेतरी भेटणार होतो, पण या वेगळ्या रस्त्यात त्यांच्या वाट्याचे अनुभव त्यांना मिळणार होता आणि आमच्या वाटचे आम्हाला··· का झाल्या आमच्या वाटा वेगळ्या? कशा झाल्या? काय वेगळे अनुभव आले त्यांना आणि आम्हाला..? ते पुढच्या भागात सांगतेच..



नर्मदा परिक्रमा – एक विलक्षण अनुभूती- भाग १५

नर्मदे हर

तर मागच्या भागात आमचे मार्ग वेगळे झाल्याचे मी सांगीतले होते. ते कसे झाले ते आधी सांगते. मी आणि सुरेखा ताई पुढे होतो, आणि शेतात रस्ता विचारत आम्ही जात होतो, तर आम्हाला एका माणसाने सांगीतले, “उधर से मत जाओ, नाला है, नाले मे पानी बहोत ज्यादा है, और नाव खराब है, तुमको इंतजार करना पडेगा, इधर से जाओ, थोडा लंबा पडेगा पर सीधा सीधा रास्ता है, नवलाय को पोहोच जाओगे, चिच्ली जाने की जरूरत नही” . आम्ही न विचारता त्यानी आम्हाला हा रस्ता सांगीतला होता. खरं तर आम्ही लगेच फ़ोन करून मागच्यांना तसं सांगितलं देखिल, म्हणजे त्यांनासुद्धा हाच रस्ता घेता यावा.. पण मी मागच्या अनुभवात सांगितलं तसंच असतं.. वेगवेगळे अनुभव यायचे असतात, ते जसे नशीबात असतील तसे मार्ग आपल्याला मिळतात.

ज्या ठिकाणी दोन रस्ते जात होते तिथे एक पिंपळाचं झाड होतं, तिथून पुढे गेलं की एक छोटासा नाला होता, अगदी उडी मारून पार करता येईल येवढा, आणि तो पार करून मग डाव्या बाजूला रस्त्याला लागायचं होतं. आम्ही या दोन खुणा मागच्यांना फ़ोन करून सांगितल्या आणि अडचण आल्यास पुन्हा फ़ोन करा असं ही सांगितलं. आता गंम्मत कशी झाली बघा, त्यांना त्या खुणा दिसल्याच नाहीत… आणि त्या खुणा शोधत असताना त्यांना कुणितरी माणूस रस्त्यात भेटला आणि त्याने या मंडळींना दुसरा रस्ता दाखवला. या मागच्या मंडळीनी आम्हाला फ़ोन करण्याचा प्रयत्न केला पण आमच्या दोघिंचाही फ़ोन काही लागेना. आम्ही नो नेटवर्क झोन मधे असू, आणि आम्ही काही त्यांना फ़ोन केला नाही कारण ते त्या झाडापशी आले की करतीलच फ़ोन असं आम्हाला वाटत होतं. शेवटी चुकामुक झालीच.

आता आम्हाला आणि त्यांना, वेगवेगळे अनुभव कसे आले ते सांगते. आम्ही गावागावातून जात होतो. आमचा बालभोग झाला होता. सकाळ चे १० वाजले असतील. आम्ही छोट्याश्या छान टुमदार घरांची बांधणी बघत बघत जात होतो, तिथे कुठेतरी थोडं थांबून दहा पंधरा मिनिटाची विश्रांती घ्यावी म्हणून एका घराबाहेर असलेल्या छोट्या कट्ट्यावर बसू असं आम्ही ठरवलं.. आम्ही त्या कट्ट्याकडे जात असताना त्या घरातून एक छोटीशी, ३-४ वर्षांची मैया धावत घराबाहेर आली आणि तिला पकडायला म्हणून तिची आजी पण आली. आम्ही नर्मदे हर केलं आणि सामान खाली ठेवणार तितक्यात त्या आजी नी माझा हात धरला, आणि म्हणाली, " माताजी इधर बाहर नही अंदर विश्राम करलो.." तिनी मला अक्षरश: ओढून नेलं म्हटलं तरी चालेल.

आम्ही आत गेलो, जोडे मोजे काढले, सामान ठेवलं, हात पाय धुतले, तेवढ्यात ही छोटी मैया आपल्या इवल्या हातात पाणी घेऊन आली, आणि म्हणते कशी, "दीदी, चाय पिओगे के छाछ, अम्मा पुछ रही है" . आम्ही थकलो होतोच थोडं, ताक पिऊ असं सांगीतलं… . तेवढ्यात घरची सून बाहेर आली, तिनी आम्हाला नमस्कार केला, आणि म्हणाली… " आप तो इधर के नही लगते? इधर का खाना बहोत टेस्टी होता है, छाछ बादमे पीना, तूअर है घर के, मक्के की रोटी बना रही हू, खाना लगा दिया है, थाली भी सजा दी है, बस आप को खाना खाकर ही जाना है, अम्मा ने आपको खीचके लाया तब ही उनके मन मे था की आपको खाना खिला के ही भेजेंगे" .. आता यावेळी भूक फ़ार नसतानाही आम्ही नकार दिला नाही कारण मागचा फ़टका आमच्या लक्षात होता… गरमा गरम मक्याच्या भाकरी, घरच्या तुरीची उसळ, सरसो चं साग, वेळेवर तळलेले बटाट्याचे भजे, असं पोटभर आणि खरोखर चविष्ट जेवण आम्ही जेवलो, वरून पुन्हा घरचं ताक ही प्यायला दिलच! ती छोटी मैया, तिची आई, आणि तिची सासू, ह्या तिघीही जणू मैयाचीच रुपं होत्या… इतकी आपुलकी झाली त्या छोट्याश्या मैयाला की आम्हाला जाऊ द्यायला तयारच होईना ती.."अम्मा दिदी अपने घरमे ही सोयेंगे" असं

म्हणून रडू लागली… हेच ते.. काहीतरी देणं घेणं शिल्लक असेल आमच्या मागच्या जन्मींच … म्हणून हे असं घडलं!

आता त्या मागे रहिलेल्या मंडळी चा अनुभव सांगते. सांगीतल्या प्रमाणे त्यांना तो नाला लागला, त्यात भरपूर पाणी होतं, जवळच एक खराब झालेली नाव ही होती, आणि आता तो पार करायला साधन ही नव्हते. मंडळीनी तिथे अर्धा तास वाट पाहिली आणि आता पुन्हा मागे फ़िरून दुसरा कुठल्या रस्त्याने जाऊ असं त्यांनी ठरवलं. आणि परतून मागे वळणार तितक्यात तिथे एक सन्यासी आला, आणि म्हणाला, "दुसरी नाव आ ही रही है." त्याला कुणी सांगीतलं की नाव येतेय ते माहित नाही पण लागलीच पलीकडच्या काठावरून एक नावाडी आपली नाव ढकलत घेऊन येताना दिसला, आणि इकडे अलिकडे नाव घेऊन आला. साधू महाराज कोण होते माहित नाही, पण आमच्या, म्हणजे माझ्या आणि सुरेखा ताईच्या भाग्यात त्या महारांजाचं दर्शन घेणं नव्हतं आणि त्या मंडळीच्या भाग्यात या तिघी मैया, आणि अन्नपूर्णेच्या हातचं जेवण नव्हतं. पुढे आम्ही नलवायला भेटलो तेव्हा हे अनुभव एक मेकांना सांगितले. त्यांनी वर्णन केलेला तो सन्यासी नक्कीच कुणीतरी महान संत किंवा शक्ती असणार, कारण नाव येतेय हे त्यानी अचानक सांगीतलं… हे असच असतं..आमचे अनुभव आम्हाला मिळाले आणि त्यांचे त्यांना.. मैया मत्र आपल्या सर्वच लेकरांची व्यवस्थित काळजी घेते.

पुढे लोहाऱ्याला जाताना एक खूप मजेशीर अनुभव आला, एक खूपच आश्चर्यकारक अनुभव आला आणि एक संकेत ही मिळाला. मैया आपल्याला वेळोवेळी संकेत देत असते. ते फ़क्त समजणं गरजेचं असतं.. ते समजलं की तुमची पुढची परिक्रमा सहज आणि सोपी होते. लोहाऱ्या नंतर दत्तवाडा आणि मग पुढे राजघाट, या राजघाट च्या पुढे शूलपाणीची झाडी सुरू होते, पण आमच्या साठी हा राजघाटचा प्रवास अंगावर काटे आणणारा होता..पुढच्या अनुभवात सांगते.

नर्मदा परिक्रमा – एक विलक्षण अनुभूती- भाग १६

नर्मदे हर

लोहाऱ्याला जाताना लांबच लांब रस्ता लागतो, तो काही केल्या संपेच ना. वाटेत एक छोटं मार्केट लागलं. आम्ही बऱ्याच दिवसांनी जरा बरं मार्केट पाहिलं. पुढे शूलपाणीची झाडी येणार होती, काही नाही तर निदान औषधं तरी घ्यावी म्हणून आम्ही एका औषधाच्या दुकानात शिरलो. मीच आधी गेले, कारण माझ्याकडे विषेश काही औषधं नव्हते. तिथे औषधं घेतले आणि मागे वळून पाहीलं, एक बरीच म्हातारी, भगव्या रंगाची साडी नेसलेली सन्यासीण तिथे बसली होती. तिने माझी चौकशी केली, माझ्या डोक्यावरून हात फ़िरवला आणि लोहाऱ्याला माझ्या कुटीतच थांबा असं निमंत्रण दिलं. ती पायी पायीच पुढे निघून गेली… ती म्हातारी बाई पायी चालतेय हेच आश्चर्य तेव्हा वाटत होतं. मात्र त्याही पुढे अजून एक आश्चर्य चकित करणारा प्रसंग झाला.

हा लोहाऱ्याचा आश्रम आम्हाला सांगीतला त्यापेक्षा खूपच दूर निघाला. म्हणजे आम्हाला सांगितलं २ किमी आणि हा ६ किमी तरी असेल, आम्ही ही आपलं चलतोय, चालतोय तरी आश्रम यायचं नाव नाही. शेवटी एकदाचा आश्रम आला. कपिल मुनिंनी बांधलेला आणि त्यांनी साधना केलेला हा आश्रम. अतिशय प्रसन्न आणि रमणीय स्थान हे. आम्ही तिथे गेलो असता तिथे एक सुंदर कुटिया होती त्यातून एक मैयाजी बाहेर अल्या आणि म्हणाल्या “सब माताराम इधर आसन लगायेंगे” .. आम्ही सांगीतल्या प्रमाणे आत आसन लावलं आणि तिथल्या मुख्य माताजींच्या दर्शनाला आत गेलो. बघतो तर काय, मला मेडीकल च्या दुकानात भेटलेल्या याच

त्या माऊली! त्या माऊली आमच्या जरा आधी पायी निघाल्या आणि आमच्या बरच आधी येऊन पोहोचल्यासुद्धा.. आम्ही येण्या आधी त्या माऊलींचं संध्याकाळचं मैया स्नान आणि साधना आटोपली होती. रस्ता ही एकच होता··· आम्ही त्यांना त्यांचं वय विचारलं "सौ को ४ कम" असं सांगीतलं त्यांनी! म्हणजे ९६ वयाची ही बाई, तिथे मेडीकल च्या दुकानात मला भेटते, आणि आमच्या तास भर आधी पायी चालत आश्रमात येते म्हणजे काय? तिच्या पायावर डोकं ठेवून नमस्कार केला आणि विचारांना घुटमळूच दिलं नाही.

याच रस्त्यात एक मजेशीर अनुभव आला. काय होतं नं की आपण सतत नर्मदे हर चा जप करत असतो. त्यामुळे आपल्या तोंडून बरेचदा उत्स्फूर्तपणे नर्मदे हरच बाहेर पडतं. अगदी कुणी समोर दिसलं की नर्मदे शिवाय दुसरं काहिही निघत नाही. गंमत अशी झाली की रस्त्यात माझ्या मागे एक काळं-करडं कुत्र सारखं येऊ लागलं. नुसतं आलं तर ठिक आहे, ते भुंकायचं अधुन मधून, त्याला हकललं की जायचं पण पुन्हा यायचं. आणि एकदा तर ते झेप घेऊन माझ्या आंगावरच आलं··· मी खरं तर "आई गं" किंवा "ए अरे अरे" असं काहितरी ओरडायला हवं होतं, पण माझ्या तोंडून "नर्मदे हर" निघालं आणि हे कुत्रं "स्टॅच्यू" म्हणावं नं त्याला तसं एकदम भुंकायचं ही थांबल आणि आंगावर यायचं ही थांबलं··· मी दोन तीनदा मग नर्मदे हर म्हणून बघायचे··· ते आलं की मोठ्याने नर्मदे हर म्हणणार आणि ते लगेच भेदरल्या डोळ्यांनी माझ्याकडे बघत जागच्या जागी उभं राहणार··· . हे असं चार पाच दा झालं! एक तर त्याला मैया समजवत होती किंवा मैया त्याला रागवत होती ... अजून काय असेल?

अजून काय असेल याचं उत्तरही त्याच प्रवासात मिळालं. गाई आणि विषेशत: म्हशी आम्हाला बघून बिथरत असत असं मी बरेच दा नोटीस केलं होतं. आम्ही समोर दिसलो की त्या सैरावैरा धावत असत..मग आम्ही ही बिथरत (भितीने, एखादीचा शींग लागलं की परिक्रमा अर्धवट सोडावी लागेल ही भिती, आता दुखायची , मरायची भिती फ़ारशी वाटायची नाही) असू! एकदा मी एका गुराख्याला विचारलं, "हमारे हाथमे जो लकडी है उससे डरते है क्या

मवासी?” तर तो जे म्हणाला ते ऐकून आम्हाला खूप वेगळं आणि छान ही वाटलं. कारण आम्हाला आजवर अनुभव येत होते पण त्यामागचं कारण इतकं स्पष्टपणे समजलं नव्हतं. तो गुराखी म्हणाला, “डंडे तो इन्हे रोज ही पडते है, डंडे से ये नही डरते. आपके सफ़ेद कपडों से भी ये नही डरते. ये तो आपसे डरते ही नही है. आपके साथ बहोत सारी शक्तीया चलती रहती है जो आपकी रक्षा करती रहती है, ये उनसे डरते है. आप देखना मैया, काले जानवर ज्यादा डरते है, सफ़ेद कम डरते है, क्यो, मालूम है? इन्होने पिछले जन्म मे काले काम ज्यादा किये है इसलीये इनको काला रंग मिला.. और इनको इनके बुरे काम का दंड भी मिला है, और वो भी उन शक्तीयोंसे जो आपके साथ चल रही है. इसलिये ये ज्यादा डरते है, पर आपको डरने की कोई जरूरत नही है. मा नर्मदा आपके साथ साथ चल रही है, वो आप पर कोई संकट आने ही नही देगी” … … खरं हे असं असतं किंवा परिक्रमेबाबत असं म्हणतात हे माहीत होतं.. पुढे मला ते अनुभवायला देखिल मिळालं ..पण ती वेळ आली की मी ते लिहिनच… आत मात्र लोहा-राच्या पुढचा प्रवास आणि अनुभव आधी लिहिते.

कपिल आश्रमात ज्या मैयाजी होत्या त्या कपिलदुलारी माताजींच्या शिष्या. कपिल मुनिंची सेवा करणाऱ्या माताजी म्हणजे कपिलदुलारी माता. इथे अजून एक गम्मत ऐकली, बघायची संधी आली नाही. असं म्हणतात की इथे सात गायी आहेत, त्यांना सात नद्यांची नावं दिली आहेत. माताजी त्यांना खोलीतूनच आवाज देतात, तशी ती ती गाय उठून माताजींजवळ येते आणि मग माताजी दूध काढतात. मात्र आम्ही कपिल आश्रम सोडून पुढे निघाल्यावर कुणीतरी ही माहिती आम्हाला दिली आणि त्यामुळे त्या गोमतांचं दर्शन काही होऊ शकलं नाही.

पुढे शेतातलाच रस्ता होता. मझ्याजवळचं पाणी संपलं होतं. तिथे एक नाग मंदिर दिसलं म्हणून मी तिथे जरा विसावले, आणि आजूबाजूला बघू लागले. २ ते तीन मिनिटातच झाडीतून एक शेतकरी बाहेर आला आणि म्हणाला “ लो, तुम्हारे लिये जल लाया हू”  त्याला

कसं कळलं मला पाणी हवय? बाकी कुणी कुणी आजूबाजूला नसताना हाच कसा काय होता तिथे? झाडीतून कसा आला हा, आणि पाणी भरलेली पेप्सीची बाटली कशी आली याच्या जवळ? हे असले प्रश्न पडत राहतात, त्या प्रत्येक प्रश्नाला नर्मदे हर असं उत्तर द्यायचं.. थोडा वेळ आश्चर्य वाटतं , मग सवय होते… .मात्र हे नेमकं का होतं हे आत त्या गुराख्याने सांगीतलं होतं.

पुढे कठोरा मोहिपुरा मार्गे आम्ही दत्तवाडयाला जाऊन पोचलो. तिथे फ़ार रमणीय आश्रम आहे. तिथे इतकं छान वाटलं की दोन रात्री आम्ही तिथेच मुक्कम केला. इथे अंगणात एक मोठं शिवलिंग आहे. बाजूला बसून पूजा करायला जागा आहे. त्या ठिकाणी वेगळेच व्हायब्रेशन्स जाणवतात. खूप प्रसन्न आहे. मुख्य म्हण्जे इथे आसन लावण्याची व्यवस्था पहिल्या माळ्यावर आहे आणि आजुबाजूला झाडी नसून मोकळं माळरान आहे. त्यामुळे पहिल्या माळ्यावरून नजर जाईल तितक्या दूर फ़क्त नर्मदा माईच दिसते. तिथे बसून राहावं असंच वाटू लागतं.

इथे एक गम्मत झाली बरं का… मी वरच्या माळ्यावर बसून मैयाकडे बघत होते, आणि मला माईच्या आरतीचे सूर ऐकू येऊ लागले.. आता दुपारचे चारच जेमतेम वाजत आले होते, या वेळी आरती कोण करतय म्हनून माझी नजर शोध घेऊ लागली मात्र कुणी दिसेच ना. माझी पावले आरतीच्या दिशेने, आवाजाच्या दिशेने वळू लागली, मी खाली उतरले, आश्रमाच्या मागच्या दाराने बाहेर गेले तसा आरतीचा आवाज अधिकाधिक स्पष्ट होऊ लागला मात्र दिसत कुणीच नव्हतं… मी अगदी मैयाच्या पाण्यापर्यंत गेले, आजूबाजूला सगळीकडे पाहीलं, पण आता आवाज कुठून येतोय हे ही समजत नव्हतं. माझ्या चारही बाजुंनी आवाज आल्यासारख वाटत होतं. तिथेच एका दगडावर मी बसून राहीले.. आधी आरती झाली, मग अष्टक झालं, टाळ वाजवल्याचा अवाज पण येत होता… हळू हळू तो आवाज क्षीण होऊ लागला आणि नर्मदे हर चा जप ऐकू येऊ लागला… बॅग्राऊंडला मैयाची आरती..अडीच तास कसे निघून

गेले समजलं नाही… माझ्याकडून चक्क जप करवून घेण्यात आला होता!! माझं भान हरपलं होतं की काय, ते माहीत नाही… पण आरतीसाठी आश्रमात माझी शोधाशोध सुरु झाली, मी बाहेर गेल्याचं कुणीतरी माझ्या सोबतच्या मंडळीला सांगीतलं आणि मला बोलावायला सुरेखा ताई आली तेव्हा समजलं की अडीच तास निघून गेले आहेत… . नर्मदे हर चा जप आणि आरती अजूनही हळू आवाजात ऐकूच येत होती… .मग मला मोठ्या महारांजाच्या आरती मधले शब्द आठवले.. “मन हे स्थीर करूनी पहा, रेवा तीरी सद्गुरू ला” … .हा अनुभव खूप वेगळा होता, आणि हवाहवासा पण! मात्र पुढच्या अनुभवात म्हणजे राजघाटच्या प्रवासात “जे याचि देही याची डोळा” बघता आलं ते काही औरच होतं… प्रवास आणि तो अनुभव, पुढच्या लेखात सांगते.

नर्मदा परिक्रमा – एक विलक्षण अनुभूती- भाग १७

नर्मदे हर

आम्ही दत्तवाड्याहून पुढे निघालो तेव्हा थोडा उशीरच झाला होता. मयूरेश दादा सकाळी लवकर उठून पुढे निघून गेले होते. आम्ही बाकी मंडळी नंतर निघालो. त्यात गंमत अशी तेव्हा आमच्या सोबत अलकाताई कुलकर्णी पण होत्या. त्यांचा दंड आश्रमातच राहिल्याचं सधारण ४ किमी अंतर पार करून झाल्यावर लक्षात आलं. आता काय करायचं? उलटं परत जाणं शक्य नाही! एकटी बाई जाईल तरी कशी आणि थांबेल तरी कशी? मग थोडं थांबलो, तिथे रस्त्यावरून एक गावकरी माणूस सायकल वर जात होता, त्यानी ओळखलं की काहीतरी अडचण या परिक्रमावासींना आलेली आहे. त्यानी विचारलं आणि लागलीच म्हणाला 'आप चलते रहो, आपका दंड मै सायकल सेला देता हू… !' बिचारा आमच्यासाठी चार किमी गेला आणि दंड घेऊन आला.

खरं तर गावागावातून मार्ग दिला होता तसं आम्ही दही बेडा, पिप्लोद, देदला, कसरावद मार्गे राजघाटला जायचं ठरवलं आणि कसरावदपर्यंत आलो देखिल. इथून पुढे एकलदा आणि राजघाट. आणि राजघाट हून पुढे सुरु होणार परिक्रमामार्गातला सगळ्यात कठीण रस्ता, शूलपाणीची झाडी. पण गंमत माहितीये का, हा राजघाटपर्यंतच रस्ता काही साधा सुधा नक्कीच नव्हता. आम्हाला तरी तो शूलपाणी झाडी सारखाच कठीण वाटला.

कसरावद नंतर एक वाट शेतातून जाते. तिथे पुढे एक आश्रम लागतो. त्या आश्रमापर्यंत आम्ही नीट पोहचलो, तिथे आश्रमातले स्वामिजी नव्हते म्हणून तिथे जास्त थांबलो नाही आणि राजघाटला लवकर पोहोचता यावं हा हि एक हेतू होताच.. पण असं होत नसतं… इथून पुढचा रस्ता एकट होता, दोन्ही बाजूला बाभळीची जाळी होती आणि त्याहून गंमत म्हणजे दर पाचव्या

मिनिटाला दोन फ़ाटे.. कुठे जायचय काही काळायला मार्ग नाही. मग आम्ही लोकांच्या पाऊलखूणा बघायला सुरवात केली, जिकडे जास्त चपला जाताहेत तिकडे जाऊ, असं ठरवलं आणि एक दोन दा तरी गोल चक्कर मारून परत होतो त्याच जागी आलो. तसं पाऊलखूणा बघण ही काही चांगली कल्पना नव्हती कारण या कल्पनेमुळेच पुढे आम्हाला वेगळ्य़ाच भयाला बळी पडावं लागलं. झालं असं की चपलांच्या खुणा बघता बघता मला, स्मिताला आणि पसारकर काकांना बिबट्याच्या पाऊलखुणाही दिसल्या. माणसापेक्षा त्या जास्त होत्या… आणि आम्हाला वाट सापडत नव्हती, पण तो तिथला चांगलाच जाणकार असला पाहिजे असं आमचं मत होतं. मग आता सोबत राहायचं, फ़ारसं मागेपुढे व्हायचं नाही वगैरे निर्णय घेतले.

लहानपणी आपण काही गोष्टी फ़ार मन लावून करतो. माझी वाचनाची आवड माझ्या बाबांनी अगदी जीव तोडून पुरवली होती. बाकी आयुष्यात त्याचा फ़ायदा ही झाला पण नेमकं नको अशा ठिकाणी मला मी लहानपणी वाचलेले “रुद्रप्रयागचा नरभक्षक चित्ता” आणि जिम कॉर्बेट च्या वगैरे कथा आठवून गेल्या. मग आम्ही सगळे नर्मदे हरचा जप करत निघालो. सुदैवाने फ़ोनला रेंज आली आणि मयुरेश दादाला फ़ोन केला… तो एकटा गेला असावा इथून या विचारांनीसुद्धा थरकाप झाला. पण त्याला देखिल सोबत मिळाली होती. त्याला जसं जसं आठवेल तसं तसं तो सांगत होता आणि तसं तसं पुढे सरकत होतो. मात्र रेंज गेली… .

आता आम्ही किती दूर आहोत, कुठल्या दिशेला जायचय काहीही माहित नाही. अशा वेळी विजेचे दूरवर दिसणारे टॉवर फ़ार मदतिला धावून येत असते. आम्ही टॉवर च्या दिशेने चालू लागलो पण ते खूप दूर होते. आम्ही संध्याकळपर्यंत तिथे पोहोचू शकणार नाही असं वाटत होतं आणि रात्र इथे काढण्याबद्दल विचार करणं ही भयंकर होतं. आम्ही नर्मदे हर इतक्या मोठ्याने म्हणत होतो की जेणे करून ते त्या प्राण्याला ऐकू जावं आणि हो त्या मैयाला पण! तो येऊ नये आणि तिनी धावून यावं ह्या दोन इच्छा प्रबळ होत्या अगदी. झाली, त्यातली एक इच्छा पूर्ण झाली… तसं पाहता त्या दोन्ही इच्छा पूर्ण झाल्या..

झालं असं की दूरून एक पांढऱ्या रंगाचं पण मळकट धोतर घातलेला, अतिशय काळा सावळा… अगदी दगडासारखा काळ्या रंगाचा, डोक्यावर टोपी घातलेला आणि धुळीने माखलेला एक माणूस समोरून येताना दिसला.त्याला पाहून इतकं शांत वाटलं म्हणून सांगू! तो जसजसा जवळ येत होता तसं तसं त्याच्या चेहऱ्यावरच स्मितहास्य खूप ओळखीचं वाटत होतं.. त्याच्या डोक्यावरची टोपी ही क्षणभर मला मुकुटासारखी वाटून गेली… काही समजलं नाही मात्र मन प्रसन्न झालं. आता हा आपल्याला मदत करणार असं वाटायला लागलं. त्याच्याशी बोलावं इतका जवळ तो अजून आला नव्हता.. मात्र तो जवळ आला तो क्षण माझ्यासाठी खूप वेगळा आणि खूप अनपेक्षीत होता..

तो जवळ आला तसं आम्ही सगळेच त्याच्यावर तुटून पडतो की काय या आवेशात राजघाटचा चा रस्ता विचारू लागलो.. आम्ही ३-४ जण एकदम बोलल्यामुळे त्याला कळलच नसणार काही आणि म्हणून तो काही बोललाच नाही मात्र कमरेवर हात देऊन उभा राहिला … .

तो काळा सावळासा माणूस, हात कमरेवर, डोक्यावर टोपी, जी मला काही क्षणापूर्वी मुकुटासारखी वाटली होती, तो शांत मुद्रेने हसत होता… मी अवाक होते, काकांनी त्याला पत्ता विचारला… तो म्हणाला "अगले गाव तक मै आपके साथ चलता हू" … मी पसारकर काकुंकडे पाहिलं आणि आम्ही दोघीही एकमेकिंकडे पाहून काय म्हणालो माहितीये? अगदी काहिही न ठरवता, न चर्चा करता आमच्या दोघींच्या तोंडून काय निघालं माहितिये?.. मी म्हणाले "पंढरीचा विठोबा असावा तसाच आहे गं हा… .विठोबा आला धावून!" आणि पसारकर काकू काय म्हणाली माहितिये? "पांडूरंगा… आलास बाबा" ! त्या माऊलीकडे पाहून आम्हा दोघींना एकाच वेळी तो आठवावा आणि एकाच वेळी हे असे शब्द आमच्या मुखातून बाहेर पडावे! आम्ही दोघींनी फ़क्त हात जोडले, आणि त्या माऊलीच्या मागे मागे जाऊ लागलो. ठरल्या प्रमाणे त्या विठू ने आम्हाला पुढच्या पाड्यापर्यंत सोडले. पाच सहा घरं जेमतेम

असतील नसतील..पुढे जंगल कायम..पण आता जंगल विरळ होतं आणि पाठिमागे माणसांची वस्ती आहे हे माहित होतं त्यामुळे घाबरायला झालं नाही. टॉवर मात्र अजूनही थोडं दूर होतं.. त्या टॉवर चा शोध घेत घेत आम्ही कसं तरी राजघाट च्या रेवाश्रय गोशाला आश्रमात एकदाचे येऊन पोचलो.

इथे छानसं मंदिर होतं तिथेच आसन लावलं. इथून पुढे शूलपाणीची झाडी लागणार होती. आम्ही ट्रायल आताच पाहिली होती. त्यामुळे सगळ्यांनी सोबत राहयचं, गरम कपडे असू द्यायचे, औषधं असू द्यायची असं काही बाही सगळेच जण आपसात बोलत होते. माझ्याकडे स्लिपिंग बॅग तर होती मात्र सतत कोंबून ठेवल्याने ती विरळ झाली होती आणि जमिनीवर अंथरली असताना खालून पाठीला फ़ार थंड लागायचं.. अर्थात राजघाटपर्यंत मला त्याचं फ़ार वाट्लं नव्हतं मात्र झाडीत फ़ार थंडी असते, शिवाय झाडी मुळे काही मिळत नाही असाही एक विषय होता, त्यामुळे काही घ्यायचं असेल सामान तर ते इथेच किंवा बडवानी लाच घ्यावं लागणार होतं. सोबत फ़ारसा पैसा नव्हता. शिवाय झाडीत लूटमार होते, इथले आदिवासी लोक लुटून घेतात… अगदी बरेचदा अंगावर कपडा पण ठेवत नाहीत असं ही आधी वाचलं ऐकलं होतं. झाडीतून जायचं की नाही, हा ही एक विषय होताच मात्र काहिही झालं तरी झाडीतूनच जाईन असा माझा विचार पक्का होता. कोणते रस्ते उघडे आहेत आणि कोणचे बंद, हे ही अजून नक्की माहित नव्हते. धरणामुळे पाण्याची जी पातळी वाढते त्यामुळे बरेच रस्ते पाण्याखाली गेले होते असं समजलं होतं.

तसा राजघाट चा काही भाग पण डूब मधे होता, म्हणजे पुढे कधी इथे आल्यास तो दिसणार नाही हे माहित होतं. मी ज्यावेळी परिक्रमेचे इतरांचे अनुभव फ़ेसबुक किंवा इंटरनेट वर वाचायचे नं तेव्हाचे काही फ़ोटॊ माझ्या डोळ्यासमोर होते. एक दत्ताचं मंदिर मी पाहिलं होतं… ते पाण्याखाली जातानाचे फ़ोटो कुणितरी अपलोड केले होते पण मला काही केल्या त्या गावाचं नाव आठवेना. मात्र ते मंदिर आपल्याला बघायला मिळणार नाही कारण ते

पाण्याखाली गेलं आहे हे मला माहित होतं. सुंदरशा पायऱ्या, समोर खांब, आतमधे संगमरवरी फ़रशी, गाभाऱ्याला पण पायऱ्या आणि आत एकमुखी दत्ताची रेखीव मुर्ती असं ते पाण्याखाली गेलेलं मंदिर!..पण मला ते बघायला मिळनार नव्हतं आणि ते कुठे होतं ते मला अजिबात आठवत नव्हतं… जेव्हा जेव्हा डूब हा शब्द मी ऐकत असे तेव्हा तेव्हा मला ते मंदिर आठवायचं… .राजघाट च्या या सगळ्या गोष्टी सुरू असतानाही डूब चा विषय निघत होता आणि ते मंदिर मला सारखं आठवत होतं… . आणि अचानक ते मंदिर आठवून मला खूप हळहळ वाटू लागली… अगदी आधी वाटली असेल नसेल त्याहीपेक्षा जास्त. मझ्या हातात हळहळण्या पलिकडे काहीही नव्हतं.

संध्याकाळी मैयापूजा करायला आम्ही मैयावर जायचं ठरवलं. अंधाराच्या बरच आधी मैयावर जायचं होतं. साधारण दोन अडीच किमी अंतर असेल, फ़ार नाही. आम्ही मैयावर जायला गेलो तेव्हा कुणीतरी म्हणालं, नागपूरची एक बस पण परिक्रमावासिंना घेऊन आली आहे आणि मैया किनारीच्या आश्रमात त्यांचा मुक्काम आहे. मनात एकदम आपुलकीची भावना निर्माण झाली आणि त्यांना भेटायचं ठरवलं… . त्यांच्या आश्रमात जाऊन दोन चार शब्द बोलावे, छान वाटेल.. असं वाटलं आणि मनात विचार आला “ आज काहीतरी छान होणारे, आपल्या नागपूरची मंडळी भेटतात आहे हे तर आहेच पण अजूनही काही तरी नक्की होणारे छान” … कदाचित त्यात कुणी ओळ्खीचं भेटणार असेल, काय माहित नाही पण असे विचार मनात येत होते… आणि असच झालं देखील… मला तिथे गेल्यावर नागपुरची मंडळी भेटली पण अजून एक मोट्ठी भेट झाली… अगदी अशी की मी नकळत रडू लागले… . कोण भेटलं असेल तिथे मला? माझे आई वडील?.. नाही… पण तसंच कुणी… खूप खूप जवळचं … सांगते पुढच्या म्हणजेच १८ व्या भागात. अजूनही अनुभव आलेत राजघाटला… सांगते सांगते… . थोडा वेळ द्या मला.. तोवर ..नर्मदे हर!

नर्मदा परिक्रमा – एक विलक्षण अनुभूती- भाग १८

नर्मदे हर.

राजाघाटला मैया किनारी जाऊन संध्याकाळची आरती करायची होती. नागपूर हून काही मंडळी बस ने आली आहे ते समजलं , त्यांनाही भेट द्यायची होती. मी मैयाकिनारी जायला निघाली. कुणीतरी सांगीतलं होतं हा भाग पण डूब मधे जाणार आहे, इथलं मंदिर खूप छान आहे, त्याचं दर्शन घ्या, कदाचित पुढ्च्या वेळी ते दिसणार नाही. आणि असं सांगितल्यावर फेसबुक वर पाहिलेलं मंदिर मला आठवलं, जे मला आता बघायला मिळणार नव्हतं. मी मंदिरात जायचं पक्क केलं, आणि त्यादिशेने चालू लागले. ज्या क्षणी ते मंदिर माझ्या नजरेच्या ट्प्प्यात आलं त्याक्षणी माझे डोळे पाणावले. हे तेच मंदिर होतं जे पाण्याखाली गेलं असल्याचे फ़ोटॊ मी फ़ेसबुक वर पाहिले होते. राजघाट च्या पलिकडच्या तीरावर चिखलदा म्हणून गाव आहे, तिथून राजघाटला जोडणारा एक पूल आहे, तो बराच उंच होता, तरीही त्या पुलावर पाण्याची पातळी मागच्या वर्षीपर्यंत गेली असल्याने तो पूलही, आणि ते मंदिर पाण्याखाली गेलं होतं मात्र पाणी ओसरून यावर्षी ते बघण्याची संधी आम्हाला मिळालेली होती. तोच प्रकार चिखल्दाच्या मंदिरा बाबतीतही घडला, जिथे वासुदेवानंद सरस्वती महाराजांनी चातुर्मास केला होता. तेही मंदिर डूब मधे होतं आणि अनपेक्षीत पणे दर्शन झालं.

खरं तर हा डूब प्रकार मला अजिबात आवडलेला नाहीये. आपली संस्कृती, आपली देवळं, अनेक लोकांची घरं, अनेकांच भावविश्व जिथे रमलं त्या जागा, आठवणी, आयुष्य सगळं सगळं विस्कटत जाते असे मला वाटते… असो, हा वेगळा भाग झाला. आणि हो चिखल्याचे अनुभव पण आपण चिखल्यात पोचलो ना, झाडी आणि समुद्र पार करून की मग सांगेन.

तर आता आधी राजघाट चं हे मंदिर! इथली दत्तमूर्ती बघून रडूच आलं..वाटलं आपल्याला दर्शन देण्यासाठीच महाराजांनी आणि मैयानी सोय केली आणि पाण्याखाली गेलेलं मंदिर आपल्याला बघता आलं. शूलपाणेश्वराचं मंदिर मात्र बघता आलं नाही.. त्या ठिकाणी पूर्ण पाणी आहे आणि नवीन मंदिर बांधलेलं आहे दुसरीकडे… . पण ह्या राजघाट्च्या मंदिराचं आणि दत्ताचं दर्शन मात्र

झालं… ."भेटीलागी माझे मन उतावीळ, कधी मी पाऊले पाहीन डोळा"  असं काहीसं मन या मंदिरासाठी विव्हळत होतं, ते फेसबुक वरचे फोटो पहिल्यापासूनच अगदी… . झालं पूर्ण!

आता त्या नागपूरच्या मंड्ळींबद्दल सांगते. कधी नागपुरात असताना त्या माऊलींचं दर्शन नाही, ओळख नाही. मी नागपूरची म्हटल्यावर सगळी मंडळी माझ्याभोवती जमा झाली, अर्थात नागपुरात कोण कुठे राहतात याची चौकशी झाली. आणि मग, "तुम्ही आता झाडीत जाणार, काही सामान नागपूरला पाठवायचं असेल तर आमच्या जवळ द्या, तुमचा पत्ता द्या, आम्ही घरपोच करून देऊ"  असं आश्वासन दिलं. आमच्या नागपूरची लेक म्हणून मंडळींनी थोडे थोडे एकत्र करून ५०० रुपये दिले. आणि हे मैयासाठी आहे, यातून तुम्हाला लागेल ते खर्च करा असे सांगीतले. निरोप घेताना त्यातल्या एक मध्यमवर्गीय बाईना रडू आलं. "मला पण पायी करायची होती पण तब्ब्येतीमुळे होऊ शकत नाही तेव्हा आता तुम्ही नक्की करा असं त्या म्हणाल्या" … तेव्हा वाटलं, जाणवलं ही संधी मिळणं किती भाग्याचं आहे ते..

राजघाटला आम्ही दोन रात्री होतो. रस्ता कोणता घ्याययचा यावर चर्चा सुरू होती. पाणी कुठवर आहे, येवढ्यात पातळी वाढणार आहे का? कुणाकुणाची तब्ब्येत साथ देणार नाही असे वाटते, वगैरे अनेक गोष्टींवर चर्चा सुरू होत्या. मला लेप्याच्या मांगीलाल चा फोन आला. तो म्हणाला " दिदी, मेरे जमाई पुलीस मै है और वो पेट्रोलिंग का काम करते है. उन्हे रास्ते की जानकारी है. वो आपसे मिलने आयेंगे, पर थोडा लेट होयेगा"  आता संध्याकाळ्वे ८ वाजून

गेले होते, आता कधी येणार हा माणूस? म्हंटलं ९पर्यंत आला तर येईल, नाहीतर उद्याच येईल किंवा रस्त्यात भेटेल कुठेतरी, कारण ९ नंतर, रात्री जंगल रस्त्यातून इतक्या दूर कसं शक्य होणारे त्याला… . तसंच झालं, मांगीलाल चा जावई काही ९पर्यंत आला नाही. भोजन प्रसादी घेऊन आम्ही गाढ झोपी गेलो. आणि रात्री अकरा वाजता मला फोन आला, " दिदी मै मांगीलाल का जमाई, वो आपसे मिलना था"   मी म्हंटलं, कोई बात नही आप कल कहीं मिल लेना, या फोन पे ही बात करना, आपको बहोत दूर से आना पडता होगा, इसलिये नही आये तो भी चलेगा"  ..तो काय म्हणतो माहितिये? "दिदी मै आश्रम आगया हू, आप बाहर आजाते तो मिलना हो जाता"  … बाई ग, रात्री अकरा वाजता हा माणूस मला भेटायला आणि रस्ता समजवऊन द्यायला आला होता. "किधरसे आये"   असं विचरल्यावर समजलं, तो २५ किमी गाडी चालवून मला भेटायला आला आणि आता पुन्हा २५ किमी गाडी चालवून परत जाणार … ." त्याला म्हंटलं मी " आज यही रुक जाओ, आसन की व्यवस्था हो जायेगी"   तर नाही म्हणाला, मला रस्ता समजवून सांगितला, लिहून दिला आणि जाताना साधारण किलोभर फरसाण सगळ्यांसाठी देऊन गेला… . किती जीव लावतात ही लोक? कसे उपकार फ़ेडायचे यांचे?

अरे हो, एक अनुभव सांगायचा रहिलाच. मागच्या अनुभवात आमचे रस्ते वेगळे झाल्याचं सांगितलं होतं ना, तेव्हाचा अनुभव बरं का! मी आणि सुरेखा ताई वेगळ्या रस्त्याने गेलो आणि बाकी मंडळी वेगळ्या रस्त्याने, आठवतय न? तर त्या वेगळ्या रस्त्यावर बाकी मंडळीना कुणीतरी भोजन प्रसादीला बोलावलं होतं. आमच्या पसारकर काकू म्हणजे अगदी सालस आणि प्रेमळ बाई. तर त्यांना ज्या घरी जेवायला बोलावलं तिथे त्यांच्या स्वभावामुळे की काय माहित नाही पण ते कुटुंबीय काकुंना आजी म्हणूनच संबोधू लागले..खूप जीव लावला त्यांनी..इतका की १५ किमी अंतर असेल त्यांच्या गावाहून राजघाट, इथे आम्हा सगळ्यांसाठी ते डबा घेऊन आले. वीस-एक लोकांचा डबा, त्यात उपासाचं वेगळं आणि जेवायचं वेगळं, आणि हे सगळं ताजं गरम करून गाडीवर आणलं, जेवण होईस्तोवर ते दोघं बापलेक, म्हणजे

मोनिका आणि तिचे बाबा हे थांबले, आणि मग घरी गेले. अहो इतकच नाही , पुढचे ३ दिवस आणि त्यांच्या घरापासून ४० किमीपर्यंत ते आमच्यासाठी डबा आणत राहिले.. कोण हे लोक? काय संबध आमचे त्यांचे? पण नाही… काय संबध असं म्हणून चालायचे नाहीच, कारण त्याशिवाय का कुणी इतकं करतं? आणि ते आमचा आधार! ती आमची अन्नपूर्णा, आणि ती आमची नर्मदा माई… संबध कसा नाही म्हणायचा!

आता शूलपाणीच्या झाडीची तयारी करायची होती. थंडी फ़ार असणार होती. माझ्याजवळ स्लिपिंग बॅग होती खरी पण ती थोडी आतल्या आत गोळा झाली होती, झाडीच्या थंडीत तग धरणार नाही आणि जमीन थंड लागेल हे समजलं होतं, म्हणून एक स्लिपिंग शीट घेणं गरजेचं होतं. इतरांनाही तसं थोडं फ़ार सामान लागणार होतं. पण इथल्या मार्केट मधे सामान मिळालं नाही. आणि आता पुढे कुठ सामान मिळेल हे आम्हाला माहित नव्हतं. मग फोनाफोनी सुरू झाली आणि कुठून तरी हे सामान इथेच राजघाटला मागवून घेता आलं तर? असा विचार आला. स्मिताच्या मिस्टरांच्या ओळखीतून पुढे ओळख काढत काढत कुणीतरी एकजण सापडला, आणि तो सामान राजघाटपर्यंत आणून द्यायला तयारही झाला.. चला म्हणजे सामान मिळणार, पण गंमत माहितिये का, माझ्याकडे जास्त पैसेच नव्हते! आता याला त्याला मगून मला पैसे द्यावे लागणार होते, पण कुणाकडे किती असतील देवजाणे… मी मैयावर सोडून दिलं!..

सामान आलं, गरजेपेक्षा खूप चांगल्या प्रतीचं आणि रिजनेबल रेट मधे सामान आलं होतं. माझ्याकडे पुरेसे पैसे नव्ह्तेच, मी त्याला विचारलं? “आपके अकाउंट मे जमा करवा दू, मेरे पास पैसे नही है, मेरे हस्बंड आपके अकाउंट मे जमा करा देंगे” तो ही हो म्हणाला… चला काम जमलं खरं, पण असं होत नसतं.माझ्या मिस्टरांचा काही केल्या फोन लागेना.. तो दुकानदार म्हणाला “आरामसे देना दिदी कोई जल्दी नही है” .. त्याचं ठिक आहे हो पण आपलं काम आहे न देणं? हा माणूस आपल्याला ओव्ळखत नाही तरीही आपाल्याला “दिदी

आरामसे देना”  असं म्हणतो, म्हणजे दिदी त्याचे पैसे बुड्वणार नाही हा केवढा विश्वास! पुढे तर झाडी म्हणजे किती दिवस फोन बंद असणारे माहित नाही! काय करावं सुचेना, आणि अशातच माझ्या एका सरांचा  मला फोन आला. मी त्याना माझ्या मिस्टरांना निरोप द्यायला सांगितलं आणि ह्या दुकानदाराचा अंकाउंट नंबर पण दिला. आता त्याचा पैसा त्याला मिळेल म्हणून मी निश्चिंत झाले. नंतर ज्यावेळी फ़ोन लागला त्यावेळी मी “पैसे दिले का?” असं विचारलं तर सचिन (माझे मिस्टर) म्हणाले मला निरोप मिळालाच नाही… वाटलं सर विसरले असतील, म्हंटलं या दुकानदाराला सांगते असं असं झालय, मी देते तुझे पैसे, असं म्हणून फोन केला तर त्याचे पैसे त्याला त्याच दिवशी मिळाले होते… माझ्या सरांनी ते दिले होते… त्यांना फोन केला तर “माझ्याकडून काहितरी फुल ना फुलाची पाकळी, म्हणून मीच दिले ते पैसे”  असं सरांनी सांगितलं! मला हवं असलेलं सामान असं मैयानी मला कसं दिलं बघा!

शेवटी एकदाच सगळं सामान वगैरे झालं.. आता उद्या निघायचं, बडवानी गणेशपुरा भवती असा मार्ग होता, बडवानीला न जाण्यापेक्षा आतून पायवाटेने जाऊ वगैरे गोष्टी झाल्या … पण आपण ठरवतो तसं होत नसतं. आता हा प्रवास झाडीतून होणार होता. आम्ही काय होतं आणि काय अनुभव गाठीशी येतात यासाठी आतूर झालो होतो, कारण शूलपाणीची झाडी हे मैयाच हृदयस्थान आहे… तिथे ज्या ज्या अनुभूती येतात त्या खूप प्रभावी आणि अदभूत असतात.. या झाडीत असे खूप अनुभव आले… परिक्रमेत पहिल्यांदा २२ किमी चालून आम्ही भवतीपर्यंत पोचलो, पण हा प्रवास आणि हा मुक्काम ..इथून पुढे पण झाडीचा सगळाच प्रवास आणि मुक्काम कधी अंगावर शहारे आणणारा तर कधी कृतकृत्य करून सोडणारा, आणि कधी आकलना पलिकडचे असेच आहेत.. एक एक अनुभव सांगते, पुढच्या भागात.

नर्मदे हर

नर्मदा परिक्रमा – एक विलक्षण अनुभूती- भाग १९

नर्मदे हर

राजघाट ते भवती या प्रवासात मला खूप कमी बोलावंसं वाटू लागलं. अचानक काय झालं माहित नाही पण बोलूच नये किंवा रीॲक्ट होऊ नये कशावर, नुसतं आतल्या आत बघत राहावं असं वाटू लागलं.. कदाचित माझ्यातील आवेष, माझ्यातील नकारात्मकता, माझा माझ्यावरच्या ताबा या सगळ्या गोष्टी पुन्हा एकदा पडताळून बघाव्या असं काही मैया मला सुचवत होती का माहित नाही. मीच लिहिलेल्या एका अभंगाच्या ओळी मला राहून राहून आठवू लागल्या.

अरे किती उधळण। किती आतुरले मन

जरा घालावे कुंपण। आतल्या आत॥

आता पुरे वणवण। तृप्ती पाहिलेसे का।

माझे मज समाधा। आतल्या आत॥

बऱ्याच चढ उतारांचा हा रस्ता होता. तसं मनाचे ही चढ उतार जाणवत होते पण समजत मात्र नक्की नव्हते. ही उदासीनता नव्हती हे मात्र नक्की. माझं मन उदास नव्हतं पण अंतर्मुख होतं हे निश्चित!एखाद्या वाटेवर अनाहूत पणे पावलं पडत राहतात तसं काहिसं होत होतं. हे वेगळं होतं काहितरी… . जेव्हा आपल्याला काही समजत नाही तेव्हा ते मैयावर सोडून द्यायचं … मी ही तेच केलं..

“खरंच अहंकार हा फ़ार इतस्तत: पसरलेला रोग आहे, आणि मी यातून सुटले नाहीये..या रोगाची लागण आपल्याला सातत्याने होत असते आणि जिथे मनाला हा रोग जडला

तिथे त्याची अवस्था कमकुवत होत जाते, आणि तोकड्या फ़सव्या अहंकाराच्या आधाराची वाट बघत आणि शोधत आपण कसल्याश्या खोल दलदलीत सापडत जातो"   हे असे विचार माझ्या मनात रेंगाळत होते. मला अहंकार होता का? किंवा अजाणतेपणी तो गळून पडत होता का? माहित नाही, पण मैया वर सोपवलं की ती करते काहितरी…  दिवसभर हे वेगळं फ़िलींग मनाला चिकटून राहिलं खरं पण मुक्कामाला आल्यावर मात्र हे अनाकलनीय वेगळं वाटण काय आहे याचा अंदाज आला. "शूलपाणीची झाडी हे मैयाचं हृदय आहे आणि तिच्या हृदयातून जेव्हा आपण जाऊ तेव्हा आपल्या हृदयात हालचाल झाल्याशीवाय राहील का?" असा विचार माझ्या मनात आला आणि अचानक अनाकलनीय अनुभवाचं आकलन झालं. आणि हो, हा विचार मी केलाय असं मला वाटत नव्हतं, म्हणजे कुणीतरी हा विचार माझ्या मनात टाकलेला आहे मला समजत होतं.

भवतीला येण्या आधी आम्ही गणेशपु-राला भोजन प्रसादी घेतली.आधी तिथेच थांबायचा विचार केला होता पण सगळ्यांच्या मातानुसार पुढे आलो. इथे भवतीला एक किराणा दुकान आहे. त्याचा पत्ता आम्हाला कुणीतरी सांगितला. ह्या दुकानदाराचं दुकान आणि घर मोठं होतं. पण त्यानी आम्हाला घरात घेतलं नाही. दुकानासमोरच्या पायऱ्या आणि ओटा होता तिथे थांबा असं त्यानी सांगीतलं. आश्चर्य वाटलं. इतकं मोठं घर होतं की आम्ही सगळे त्यात सहज मावणार होतो, पण नाही. त्या दिवशी आम्ही पहिल्यांदाच अशाप्रकारे उघड्यावर झोपलो होतो. ही सुरवात होती. पुढे शूलपाणीची झाडी असो की पुढची परिक्रमा, आता असं झोपावं लागू शकतं, ह्याची ही पूर्वतयारी. जेवणाचं ही तसंच! तो दुकानदार म्हणाला "भोजन व्यवस्था नही है" आणि आज आम्ही तब्बल २२ किमी चाललो होतो. दुपारी गणेशपुऱ्याला मोनिका आणि तिचे बाबा डबा घेऊन आले होते त्यातलं थोडं अन्न शिल्लक होतं, आणि गम्मत म्हणजे "मैया जी अब मै घर नही लेकर जाउंगा खाना, आप साथ रखो"   असा आग्रह आज मोनिका च्या बाबांनी केला होता. गेले तीन दिवस ही दोघं जण आमच्या साठी डब्बा आणत होती (राजघाटला पण आली होती, मागच्या अनुभवात सांगितलय, आठवतय न?), आज ती दोघेजण ४० किमी गाडी

चालवून डब्बा घेऊन आली होती… आता उद्या यायचं नाही हे वचन घेउन त्या दोघांना आम्ही परत पाठवलं होतं. तर त्यानी दिलेलें थोडंसं अन्न म्हणजे काही पोळ्या आणि भाजी आम्ही कागदात गुंडाळून घेतली होती, आमच्या बरोबर एक तावसे दांपत्य पण होतं, त्यांनाही कुणीतरी भाजीपोळी बांधून दिली होती, आणि आम्ही अन्नाची जमवाजमव करतोय हे पाहून त्या दुकानादाराच्या बायकोनी त्यांच्या घरच्या सकाळ्च्या पोळ्या आणि बेसन असं अन्न आम्हाला दिलं. आजची भोजन प्रसादी अशी पार पडली… आणि अशा भोजनप्रसादीची ही पहिलीच वेळ!..आज पहिल्यांदाच आम्ही जवळ अन्न ठेवलं होतं आणि ते ही आग्रहाखातर! आम्हाला आज जेवायला मिळनार नाही हे कदाचित नर्मदा माईला माहित असावं, म्हणून तिने तसा आग्रह करवला त्या मोनिका च्या वडीलांकरवी!

आम्ही उघड्यावर झोपलो पण फ़ारशी थंडी वाजली नाही. शूलपाणी च्या झाडीतला पहिला दिवस पार पडला. खरं तर दिवस येतो आणि आल्यापावली काही अनुभव देऊन निघून जात असतो, त्या दिवसाने दिलेले अनुभव चांगले किंवा वाईटही असू शकतात, आपल्या प्रारब्धाप्रमाणे, आणि प्रारब्ध आधीच लिहिल्या गेलेलं असतं. त्यामुळे जे समोर येइल स्वीकारणे हाच एक मार्ग असतो. मग ते आनंदानी करा का दु:खाने, स्वीकार करावच लागणार!..असो

आता पुढचा टप्पा म्हणजे बोरखेडी. हीरालाल रावत चं घर. हा आणि इथून पुढचा भाग हा आदिवासी लोकांचा. पण अनुभव सांगण्या आधी त्या आदिवासींबद्दल लोक जे ऐकून आहेत ते सांगते, आता झालेला बदल सांगते आणि आधीच्या घटनांचं कारण ही सांगते. तर हे इथेले आदिवासी म्हणजे “मामा” परिक्रमा वासींना लुटून नेतात हे आम्ही ऐकून होतो. अर्थात आधी तसं व्हायचं देखिल! अगदी अंगावरच्या कपड्यासह लोकांना लुटून नेण्याचे अनुभव ऐकलेले आहेत. मात्र पुढे या लोकांना मदतही मिळत असे. असं का व्हायचं तर हा अतिशय गरीब आणि दुर्गम भाग. इथे सगळीच कमतरता, तेव्हा येणाऱ्या जाणाऱ्याला लुटून पैसा मिळतो हे एक कारण आहेच! पण यामागचं आध्यात्मिक कारण वेगळं आहे असं सांगितल्या जातं.

ह्या आदिवासिंना “मामा”  असं म्हणतात. मामा म्हणजे आईचा भाऊ. हे मैयाचे भाऊ, पण मग हे लूटतात कशासाठी? तर तुम्ही परिक्रमा करता म्हणजे तुम्ही तुमच्या आईकडे आलेले असता. लहान मूल आईकडे येतं तेव्हा ते आपला लवाजमा घेऊन येत नाही कारण आपल्या सर्व गरजा आई पूर्ण करणार आहे याची त्याला खात्री असते. किंबहूना आपल्या गरजा काय आहेत हे आपल्यापेक्षा आईलाच माहित आहे हे ही त्या बाळाला महित असतं. मग तुम्ही आईकडे आला आहात, तर तिच्यावर विश्वास ठेवा, असं म्हणून हे मामा लोक तुम्हाला लुटून घेतात आणि त्यानंतर तुम्हाला जी मदत मिळते त्यामुळे तुमचा तुमच्या आईवरचा विश्वास वाढतो.. तर असं हे कारण!

तर जेव्हा आम्ही हीरालालकडे आलो तेव्हा तिथे आधी ही बरेच परिक्रमावासी होते. म्हणजे एकूण ३० तरी लोक असतील. तसा हा हीरालाल म्हणजे मामांपैकीच एक असंही समजलं पण त्याच्याकडे पाहून असं अजिबात वाटलं नाही. त्याच्या अंगणात त्यानी मांडव घातला होता आणी सगळ्या परिक्रमा वासियांची आसन लावण्याची व्यवस्था तिथे केली होती. हिरालाल चं एक दुकानही होतं, तिथे छोट्या मोठ्या वस्तू मिळतात. ३० एक परिक्रमावासी एकत्र आल्यानंतर भजन, भक्तिगीतं , हरीपाठ असं म्हणत म्हणत भोजन प्रसादीची वेळ आली. आज भोजन प्रसादीला चक्क दाल बाटी आणि हलवा होता! शूलपाणीच्या झाडीत, जिथे मामा लोक लुटून घेतात वगैरे कथा ऐकल्या होत्या तिथे आम्हाला पंचपक्वान्नांचं जेवण मिळत होतं. आमचे मोबाईल चार्ज करायाला भरपूर जागा होती, शिवाय कुणाला काही हवं आहे याची चौकशी पण हीरालाल भाई अगत्याने करत होते! शूलपाणीतही असा अनुभव येईल असं अजिबात वाटलं नव्हतं, विशेषत: कालच्या भवती च्या अनुभवानंतर तरी!.. पण असं होत नसतं …  आपण जे ठरवू, किंवा जसा विचार करू त्यापेक्षा नक्कीच वेगळंच असं आपल्या समोर येतं…  या झाडीमधे आलेले अनुभव आश्चर्य चकित करणारे होते. असं म्हणतात की इथे नर्मदा मैया दर्शन देते. असं म्हणतात की इथे सप्त चिरंजीव दर्शन देतात… . खरंच असं होतं का… आठ दिवस हा झाडीचा प्रवास होता.. किती आणि कसे अनुभव आले यात?...  एकदा तर एक

अतिशय दैवी अनुभव आला, आणि चमत्कारच झाला…  माझ्या सोबतच्या शक्तींच सोबत असणं हे मलाच नाही तर माझ्या सोबत असलेल्या स्मीताला पण जाणवलं… त्या शक्ती नसत्या तर हे अनुभव सांगायला मी आज कदाचित शिल्लक राहिले नसते… .कशीकाय? सांगते पुढच्या भागात.



नर्मदा परिक्रमा- एक विलक्षण अनुभूती- भाग २०

नर्मदे हर

तर मागच्या भागात मी माझ्या शिल्लक न राहण्याबद्दल बोलत होते. तो अनुभव सांगतेच मात्र त्या आधीही काही झालं, ते आधी सांगते. तर हीरालाल भाईंकडून पुढचा प्रवास अतिशय खडतर असा प्रवास आहे. त्यामुळे तिथे आजकाल लोक पोर्टर करतात. उद्देश असा की ही गावातली मंडळी आजकाल लूटमार करत नाहीत. ती पोर्टरची कामं करतात. तर एका दगडात दोन पक्षी मारण्याचं हे काम, म्हणजे परिक्रमावासींना वजन उचलून जड खडतर वाटेवर चालावं लागत नाही आणि या मंडळींना पण मदत होते.

हा आमुलाग्र बदल झाला एका संताच्या कार्याने. इथे लखनगिरी बाबा म्हणून एक संत होऊन गेले. मामा लोक लूटमार करू नये यासाठी त्यांनी फ़ार कष्ट घेतलेत. असं म्हणतात की ते एक परिक्रमावासी होते आणि त्यांना देखील या मामा लोकांनी लुटून घेतलं. त्यानंतर त्यानी पुढे परिक्रमा केलीच नाही, इथेच राहून ते गावक-यांना समजवू शिकवू लागले व परिक्रमावासींची सेवा ही करू लागले. घोंगसा इथे त्यांचा आश्रम आहे. आता लखनगिरी बाबा नाहीत मात्र लूट्पाट आता बंद झाली आहे.

तर इथे आमच्या सोबतच्या परिक्रमावासींनी पोर्टर केले, मला देखील इच्छा झाली, मात्र त्या क्षणी माझ्या कानात कुणीतरी बोललं “हे काय करतेयेस तू? हे वजन म्हणजे फ़क्त सामानाचं वजन नाहीये, हे तुझ्या कर्माचं ओझं आहे आणि तू असं दुसऱ्या कुणाला देऊ शकत नाहीस” . मी दचकून आजुबाजूला पाहिलं. तिथे कुणीही नव्हतं पण मी हा आवाज ऐकला होता! आता मी पोर्टर करणं अशक्य होतं आणि म्हणून मी काही पोर्टर केला नाही. ती कठीण वाट मी बॅग घेऊनच पूर्ण केली.

घोंगस्याला लखनगिरी महारांजाच्या आश्रमात आलो तेव्हा समजलं, लूट्मार होणारा भाग आता संपला आहे. त्या अश्रमात आसन अशा ठिकाणी लावलं की डोळे उघडले की मैया दिसेल. इथेच याच आश्रमात आम्हाला एकदंत महाराज भेटलेत. एकदंत हे आम्ही ठेवलेलं नाव, ते कोण काय काही माहित नाही. पण अतिशय अवलिया माणूस.. स्वत: मध्ये मग्न असणारा..इतका मग्न की त्याला कुणाच्या अस्तित्वाची कधी काळजी ही वाटली नाही आणी कधी गरजही नाही. उंचपुरा, डोक्याला पागोटं, तोंडात फ़क्त एकच दात (म्हणून आमच्या पैकी एकानं त्यांचं नाव एकदंत ठेवलं), पांढरं धोतर आणि एक झोळी इतकच सामान. कुणी काही दिलं तर खायचं नाही तर कुठून तरी आपली व्यवस्था करून घ्यायची..काळजी नाही… एकदा त्यांना रस्त्यात एक बकरी दिसली, त्यांना भूक लागली असावी. त्यांनी त्या बकरीला पकडलं, दूध काढलं आणि सोडून दिलं.. दुध पिऊन घेतलं आणि झोपून गेले.. असा हा माणूस!

तर हे एकदंत महाराज त्या दिवशी आमच्या बरोबर होते. हे गांजा पीत असत. त्या दिवशी त्यांनी स्वतःच भोजन प्रसादीच शिजवून घेतलं आणि ते लवकर झोपले. आम्हाला झोपायला साधारण ९ तरी वाजले असतील. आमची जेम तेम पहिली झोप झाली असेल नसेल तो आम्हाला वेगळ्या भजनांचा आवाज ऐकू येऊ लागला. आमची पूर्ण झोपमोड झाली.. आम्ही बाहेर जाऊन बघतो तर या एकदंत महाराजांनी बऱ्याच काट्क्या गोळा करून आणल्या होत्या, त्यांची शेकोटी पेटवली होती आणि हात शेकत हा माणूस भजन गाण्यात मग्न होता. ते भजन गायचं थांबवणार नाहीत हे त्यांच्या हावभावावरून आणि एकदंरीत मग्नतेवरून स्पष्ट जाणवत होतं. आत जाऊन पुन्हा झोप लागणं अशा आवाजात शक्य नव्हतं.. मग काय आम्ही ही त्या भजनांना साथ देऊ लागलो.. करता करता ५ -६ लोक जमलीत आणि रात्री, मैया किनारी, थंडीत, शेकोटीची मजा घेत घेत भजन संध्या पार पडली.. सकाळी ४ वाजता एकदंत महाराज आंघोळीला गेले, आणि आपलं पूजा अर्चा निपटून पुढच्या प्रवासाला गेलेसुद्धा… कसलीही भीती नाही, काळजी नाही की काही काही नाही.. खऱ्या अर्थाने विरक्तीला पोहचून

भक्तीत मग्न असलेली ही मंडळी, साधू संतच नाही का? तर अश्या प्रकारे एकदंत महारांजाचं दर्शन झालं… पुढेही अधून मधून होत राहिलं.

आता सांगते तो शिल्लक न राहण्याचा अनुभव. रस्ता खडतर होताच. माझे पाय फ़ार घसरत होते. कारणही तसंच आहे, इथे या सगळ्या भागात मुरूम आहे, छोटे छोटे गोल गोल दगड ज्याला हिंदीत कंकड असं म्हणतात ते सगळीकडेच पसरलेले, त्यामुळे पाय घसरून कितीदा तरी पडायला होत असे. अशात मी तीनदा पडले आणि दोनदा वाचले. जेव्हा जेव्हा मी पडले तेव्हा तेव्हा मला खरंचटलंसुद्धा नाही, आणि त्यात काही विषेश असेल असा विचारही माझ्या मनात आला नाही मात्र ते नंतर जाणवलं की आपण पडून आपल्याला नं लागणं हा काही सर्व साधारण अनुभव नव्हताच. झालं असं की मी जेव्हा जेव्हा पडले तेव्हा तेव्हा माझ्या अंगाला जेवढी धूळ लागली असेल तेवढच काय ते लागणं… लक्षात येतेय का? धूळ लागली माझ्या अंगाला, दगड नाही.. मी ज्या ज्या वेळेला पडले ते जिथे धूळ असेल आणि दगड नसतील अश्याच ठिकाणी पडले होते!

पण नंतर जे झालं ते विलक्षण होतं. एका ठिकाणी थोडासा उतार होता आणि माझा पाय घसरला… खाली चांगली मोठाली दगडंच होती, आणि आता मी पडणार होते, माझं डोकं खाली सुळकेदार दगडावर लागून फुटेल असं माझ्या मागून चालणाऱ्या स्मीताला लक्षात आलं आणि ती कानावर हात देऊन बघत राहीली… हा क्षण होता फ़क्त… समोरचा माणूस आता पडेल हे दिसत असतं पण आपण काही करू शकत नसतो तो क्षण ... मी कमरेपासून पूर्ण आडवी झाले आणि आता बस… आदळणार… इतक्यात माझ्या कमरेखाली कुणीतरी आधार दिला आणि स्प्रिंगची बाहुली कशी झपाट्याने वर येते तशी मी आडव्याची उभी झाले! मला तर तो स्पर्श ही आठवतो, अगदी अजूनही, पण कदाचित माझा भ्रम असं म्हंटलं तरी स्मीताने जे पाहिलं त्याचं काय? ती म्हणाली, " अग? अशी पडता पडता कशी काय तु अचानक वर झाली?" आम्हा दोघिंनाही त्या क्षणी बावचळल्या सारखं झालं मात्र लगेच अंगावर काटा

आला··· त्या क्षणी माझं डोकं फुटेल इतका टोकदार दगड माझी वाट बघत होता··· काळ आला होता, पण वेळ आली नव्हती कदाचित! माझी परिक्रमा अजून शिल्लक होती, म्हणून असेल! अन्यथा हा अनुभव लिहायला मी शिल्लक नसते हे नक्की!

खरं तर इथे अजून एक गोष्ट झाली होती.हे डोंगर चढण्याच्या आधी माझ्या मनात अहंकार आला होता. मी आधी हिमालयन ट्रेक केले आहेत, तोच विचार माझ्या मनात आला." आपण तर ट्रेक केलेयेत, ते ही उंच उंच, हिमालयन, हे पर्वत काही इतके उंच नसतील, जमेल आपल्याला" असा विचार माझ्या मनात आला होता. तसं पाहता आत्मविश्वास असणं वेगळं आणि अहंकार असणं वेगळं. मला अहंकारच झाला होता··· आणि मैया परिक्रमा करताना आपण आपल्या स्वत:बद्दल विचार न करता मैयावर सोपवून द्यायचं असतं.. मी ते न करता. "आपल्याला कठीण जाणार नाही" असा विचार केला..

अभिमानी का मान हटाती, देती जीवन दान,

मैया अमरकंट वाली, तू है भोली भाली ... .

ह्या मैया भजनाची आठवण आली आणि समजलं ती कनवाळू असली अहंकारा सारखा रोग ती आपल्याला लागू द्यायची नाही आणि लागलाच तर त्याची शिक्षा म्हणजे त्याचं हरण केल्याशिवाय ती तुम्हाला पुढे जाऊ देणार नाही.

पुढचा रस्ता याहूनही फ़ार फ़ार कठीण होता. पण मार्ग जितका कठीण तेवढा देव जास्त आठवतो ना··· तसं असेल, प्रत्येक पावलावर जप करणं कसं असतं ते ह्या पुढच्या प्रवासात समजत होतं. खारा भादल, भादल खापरमाळ आणि भमाना हे तर अतिशय कठीण. आणि अशा कठीन प्रसंगी जे अनुभव येतात त्यांची तीव्रता आणि त्यांचा गोडवा दोन्ही खूप खूप अद्भूत असतात हे नक्की.

या शूलपाणीच्या झाडीत मैयाचं आणी सप्त चिरंजीवांचं दर्शन होतं असं म्हणतात असं मी मागच्या अनुभवात म्हंटलं आहे. मी आता तो अनुभव सांगेन मात्र खरोखरीच ते मैया दर्शन होतं का ते तुम्ही मला सांगायचय! हो म्हणजे मी फ़क्त अनुभव सांगणार आहे.. अंगावर काटा आणणारा… माझ्या परिक्रमेतला सगळ्यात मोठा, सगळ्यात महत्त्वाचा असा अनुभव म्हंटला तरी चालेल. उभ्या आयुष्यात हे असे काही अनुभव मी विसरूच शकत नाही असे आहेत. अनुभव जरा मोठाच आहे. याच भागात सांगता यायचा नाही.. तेव्हा पुढच्या भागात सांगते… पण एक नक्की… . हा अनुभव ऐकल्या वाचल्यावर तुमच्या डोळ्यात पाणी आलं नाही आणि तुम्हाला नर्मदा माईच्या दर्शनाची इच्छा झाली नाही तर नवल, असं मी म्हणेन!.. सांगतेच, पुढच्या भागात!

नर्मदे हर.

नर्मदा परिक्रमा – एक विलक्षण अनुभूती- भाग २१

नर्मदे हर.

मागच्या भागानंतर या वेळी वाचकांची उत्कंठा शिगेला लावणार नाही, पट्कन अनुभव सांगेन. तर हा रस्ता अतिशय कठीण, मात्र खारा भादल आणि भादल आणि खापरमाळ ही चढाई तर भमाना हा उतार. बाकीच्यांनी पोर्टर घेतल्यानंतर ती मंड्ळी सोबत सोबत चालू लागली आणि मी नकळत थोडी पुढे गेली. मयूरेश जी माझ्याहून पुढे निघून गेले होते. हे अंतर कसं वाढलं काही समजलं नाही. एका ठिकाणी अशी वेळ आली की समोर गेलेले मयूरेश जी पण दिसेनासे झाले आणि मागे असलेले बाकीचे लोक आणि पोर्टर्स पण दूर दूर वर दिसेना. पण मी चालत राहिले.

हा रस्ता कसा आहे ते आता सांगते. मी जे काही सांगते आहे यात यत्किंचीतही वाढ्वून सांगत नाही, जसे आहे तसे सांगण्याचा प्रयत्न करते आहे. मात्र रस्त्याचा अंदाज वाचकांना येण्यासाठी सविस्तर वर्णन करते. तर ही चढाई, आणि रस्ता जेम तेम दीड फ़ुटाचा. एका बाजूला पर्वत तर दुसऱ्या बाजूला खोल खाली नर्मदा माई. या रस्त्यावर सगळीकडे मुरुमाची खडी पसरलेली, आधार म्हणून धरायला काहीही नाही. नाही म्हणायला बाभळीची झाडी आहे पण काटे असल्याने ती फ़ार पकडता येत नाही, आणि आता झाडीही " झाडी" म्हणावी अशी रहिलेली नाहीये, बरीच विरळ झाली आहे.

तुमचा पाय घसरला तर तुम्ही खाली नर्मदा माईत पडाल असाच काहिसा हा मार्ग आणि पाय घसरण्याचा चान्स भरपूर. म्हणजे एक पाऊल पक्क रोवायचं आणि मग दुसरं उचलायचं..तेही पहिले रोवलेलं पाऊल पक्क असेल तर, आणि तसं झालं नाही तर घसरू

शकतो आपण… असा हा रस्ता, आणि चढाईचा एन्गल ही भरपूर असावा, अगदी खडी चढाई होती…

तर मागची मंडळी मागे, पुढची मंडळी पुढे… मी मधे. प्रत्येक पाऊल टाकलं की नाना महाराज आणि मैया यांचा धावा सुरू. आणि असं असताना एका ठीकाणी ही दीड फ़ुटाची वाटसुद्धा खचलेली, साधारण पुढचे अडिच तीन फ़ूट रस्ताच नाही. टांग टाकून जाणे तेच काय करावं लागणार होतं, आणि अशा ठिकाणी पाय घसरला तर? तर मी खाली पडणार होते, इतक्या खाली की तिथे पडल्यावर माझा मृतदेह ही सापड्णार नाही, कुणी शोधूच शकणार नाही. मी जरा वेळ वाट बघितली, मागचे लोक येतील, त्या पोर्टर्स चा आधार घेऊ आणि जाऊ. जवळ जवळ पाऊण तास झाला तरी कुणी येईना… मी वाट तर चुकली नाही न असा संशय पण आला.. फ़ोन करावा कुणाला म्हणून फ़ोन काढला तर नेटवर्क नाही…

आता मात्र मी खूप घाबरले होते..नाही नाही, मृत्यूला नाही, तो एक ना एक दिवस येणारच आहे. माणूस घाबरतो ते आपल्या माणसांच्या भावनांना. मला माझा मुलगा डोळ्यासमोर दिसू लागला. मी मेले तर त्याला निदान ते समजण तरी आवश्यक आहे न? आई परिक्रमेला गेली आणि परत आलीच नाही तर तो आयुष्यभर माझी वाट बघत बसेल… त्याची इश्वरावरची श्रद्धा ..त्याचं काय होईल? हे सगळे विचार त्या वेळी मनात आले. अर्थात मैया असं होऊ देणार नाही हा विश्वासही होताच, पण तरीही समोर मृत्यू असताना इतकं शांत आणि विचारी राहता यावं येवढी मी परिपक्व नाही हे मला माहित होतं. मी इथे जंगलात थांबू ही शकत नव्हते आणि पुढे जाऊ ही शकत नव्हते. मी रस्ता चुकलेले असेन तर वाट बघण्यात अर्थच नाही आणि पुढे जायचे तर आता उडी मारून जाण्याशीवाय पर्याय नाही. मी माझे जोडे काढले आणि त्या रस्ता खचल्या च्या पुढच्या रस्त्यावर फ़ेकले, म्हणजे अडिच फ़ुट पुढे… ते तिथे पोचले, वाटलं चला, आता मी पडले तरी मागून येणा-यांना समजेल. मग मी बॅग ही फ़ेकली… ती ही गेली… . मग मला जरा हायसं वाटलं, की आता तर नक्कीच माझा शोध घेतल्या जाईल.

आणि मग सगळ्यांचे चेहेरे आठवून, मैयाचा धावा करून, मुठी बंद करून, डोळे मिटून मी उडी मारलीच… दुसऱ्या क्षणाला मी त्या गॅप च्या पलिकडे आणि सुखरुप पोहचले होते. मी जीवंत होते. माझ्या अंगाला काही लागलय का हे मी चाचपडून बघू लागले, आणि ज्या वेळेला मी माझ्या दंडाला हात लावून चाचपडत होते त्या वेळेला मला तिथे काय जाणवलं माहितिये? लहान मुलाला बखोटीला पकडून आई कशी ओअढते न? तसं माझ्या दोन्ही दंडांना कुणीतरी धरलं होतं… तो स्पर्श मला जाणवत होता.. एकिकडे माझी गुरुमाऊली आणि दुसरीकडे माझी मैया असं मला धरून ती उडी पार करवून घेतली होती.. अजूनही रस्ता कठीणच होता पण मला आता धीर आला होता.. मी झपाझप पुढे पाऊलं टाकत होती आणि मन मात्र व्यक्त व्हायला धडपडत होतं.थोडा वेळ चालून झाल्यावर एक मोकळं आणि सुरक्षीत असं छोटंसं चौकोनी आकाराचं मैदाना सारखं लागलं. मी तिथे बसले आणी ढसढसा रडले.. फ़ोन बाहेर काढला..फ़ुल नेटवर्क होतं फ़ोन ला..बाबासाहेबांना (माझ्या गुरुंचे नातू, पण गुरुंसारखेच) फ़ोन लावला.. मी एकही अक्षर बोलू शकले नाही.. मी फ़क्त “ मी सुरुचि” इतकं बोलून रडू लागले. त्यावर बाबासाहेब म्हणतात “तू रडू नकोस, आजच सकाळी नाना महारांजाना पुन्हा एकदा सांगीतलय. लेकरू परिक्रमेला जातय, लक्ष असू द्या, हे बघ तू सुरक्षीत आहेस.. काळजी करू नकोस, शांत झालीस की फ़ोन कर” … हे असं होणार हे त्यांना महित होतं!

हा अनुभव इथेच संपत नाही.. हे तर गुरुंनी दिलेलं सांत्वन! मैया चं येणं अजून बाकी आहे! याच भागात सांगते.. तर तो फ़ोन झाल्यावर मी अजून पुढे गेले. आता रस्ता जरा मोठा ही होता आणि सुरक्षीत ही होता. घसरून पडण्याची भिती नव्हती.मी या चौकोनी मैदानावर तासभर तरी बसले असेन. मी पुढे निघाले आणि जरा वर चढून अजून एक मैदाना सारखे लागले तिथे बसले. हे अंतर चालून यायला मला अर्धा तास तरी लागला असावा. तिथे मी बसते न बसते तोच एक पस्तीशीची बाई भला मोठा हंडा घेऊन आली… मला म्हणाली “ हो गया रोना ढोना? अब जल पियेगी? एक घंटेसे तेरे लिये यहा बैठी हूं, कितने धीरे चलती हो मैया… ” ती बाई तिथे एक तासापासून मला पाणी पाजायला थांबलेली. मी पाणी प्यायली.. बोलता

बोलता मी तिला विचारलं “ मैया कहासे पानी लाती हो?” ती ही शांतपणे आणि सहजतेने म्हणाली “ ये नरबदा जी से” … मग मी तिला रस्ता विचारला, तिनी सांगीतला..आणि मी पुढे चालू लागले… मी पुढे गेल्यावर माझ्या डोक्यात लख्खं प्रकाश पडला तो असा.. मी रडतेय हे तिला कसं माहित? ती नरबदा जी हून पानी आणते म्हणाली, थोड्या वेळापूर्वी मी नर्मदा माई इतकी खोल पाहिली होती की तीत पडून केवळ मोक्षच शक्य होता! मग ही कसं पाणी आणते इतक्या खालून? मला मैयानी दर्शन दिलं होतं… साक्षात… मला तिच्या हातांनी त्या माईनी पानी पाजलं आणि मला समजलं पण नाही… माझे गुरू आणी माझी माय माझ्यासोबत आहे याची खात्री पटली, पण मी मूर्ख, तिच्या पायावर डोकं ठेवून नमस्कारसुद्धा केला नाही मी… पुन्हा एकदा रडू आलं... पण इलाज नव्हता… हे असं होतं… त्या शक्तीचा प्रभाव इतका जास्त असतो आपली मंद बुद्धी दीपून जात असली पाहिजे.. आपल्याला काहिही समजत नाही.. असाच प्रकारचा अनुभव पुढेही आला मला, धारेश्वर च्या पुढे… तेव्हाही ही माईला ओळ्खू शकले नाही, पण तो अनुभव धारेश्वर च्या भागात सांगते. आता इथून पुढे शांतीलाल पावराचं घर आणि तिथला अनुभव ही सांगते.. पण पुढच्या भागात. हे अनुभव लिहितानासुद्धा माझ्या अंगावर काटा येतो आहे… मला माझ्या आईची आठवण येते आहे, मला माझ्या चुकांची लाज वाटते आहे, आणि हे सर्व सोडून माझ्या आईच्या कुशीत शांतपणे जगावंसं वाटतय… आणि प्रत्येक वेळा हा अनुभव आला की ही ओढ प्रकर्षाने जाणवते. हा अनुभव तुम्ही वाचत असताना कदाचित मी माझ्या माईच्या कुशीत असेनही.. मैया जाणे… पुढचं पुढे बघून… तोवर थांबते…

पण शांतीलाल पावराच्या छोट्याश्या घरी त्याच्या घरचे ८ आणि आम्ही ११ लोक कसे राहिलो? अठरा विश्व दारिद्य कसं पाहिलं आणि त्या दारिद्यात राहणारा श्रीमंत माणूस आम्हाला कसा काय भेटला, शिवाय या वेळी मैयाने काय चमत्कार दाखवला, हे पुढच्या भागात सांगते.

नर्मदे हर.

नर्मदा परिक्रमा – एक विलक्षण अनुभूती- भाग २२

नर्मदे हर

नर्मदा माईनी दर्शन दिल्याचं मागच्या अनुभवात सांगितलं होतंच.. तिथून पुढे आधीच निघालेले मयुरेशजी बसलेले मला दिसले. मग आम्ही सोबत पुढे निघालो. जरा अजून पुढे जात नाही तर एक म्हातारे आणि आंधळे बाबा पाणी घेऊन बसलेले दिसले. परिक्रमावासी थकून येतात आणि त्यांना पाणी मिळावं म्हणून हे आंधळे बाबा कुठुनसे पाणी भरून आणतात. बंदच काय तर उघड्या डोळ्यांनी ही जिथे चालणं कठीण तिथे हा आंधळा मटका भर पाणी आणून फ़क्त परिक्रमावासींसाठी बसलेला असतो हे बघून आपल्याला डोळे आणि हातपाय असूनही आपण काहीच करत नाही याची लाज वाटते. बाबांचा प्रसाद म्हणून आम्ही घोट घोट पाणी प्यायलो..त्या बाबांनी अंगात एक जाकिटासारखं काहितरी आणि खाली पंचा असं घातलं होतं. आम्ही पुढे निघालो आणि मयुरेश जी अचानक मागे वळले.. आपल्या अंगावरचं उपरणं काढून त्यांनी त्या अंध बाबाच्या खांद्यावर घातलं, डोळे पुसले आणि काहिही न बोलता पुढे चालू लागले … .तो क्षण अंतर्मुख करणाराच होता. त्या वेळी मला फ़ारसं समजलं नव्हतं पण नंतर जाणवलं … तो मयुरेश जींना त्यावेळी कसलातरी झालेला साक्षात्कारच असला पाहिजे..

पुढे आम्ही शांतीलाल पावरा यांच्या घरी पोहचलो. एक साधारण २० फ़ुट बाय १५ फ़ूटची जागा, म्हणजे त्या शांतीलाल चं पूर्ण घर.. कदाचित अजूनही लहान.. या घरात २-३ गायी, ८-१० बकऱ्या, कोंबड्या, मांजरी, असंख्य उंदीर, आणि कुत्रे यांच्याशीवाय शांतीलाल, त्याची बायको, आणि ८ मुले राहात होती. शांतीलालचं सगळ्यात लहान मूल म्हण्जे २१ दिवसांची मुलगी. तिच्या अंगावर कपडा नाही. एका सिंथेटीक फ़ाटक्या साडीमधे तिला गुंडाळून ठेवली होती.बाकी मुलांच्या अंगावरचे कपडेही फ़ाटलेले होते.२१ दिवसांची बाळंत

बाई कामाला लागलेली होती. ते सगळं पाहून खरं तर दारिद्र काय असतं ते समजत होतं.. पण आता आम्हाला श्रीमंती काय असते हे बघायला मिळणार होतं.

आम्ही आजची रात्र तिथे राहणार म्हणजे आमची भोजन प्रसादी तिथेच होणार. शांतीलालकडे घरी फ़क्त ३ किलो तांदुळ आणि थोडीफ़ार चवळीची डाळ होती. एवढ्याश्या अन्नात आम्ही ११ अणि ते ७ अश्या १८ जणांच पोटभर जेवण होणं अशक्य होतं. शिवाय परिक्रमावासी थकून आले होते, भुका लागल्या होत्या. शांतीलालच्या बायकोनी तांदुळाचा डबा आमच्यासमोर आणून ठेवला आणि म्हणाली- "मैयाजी इतनाही चावल है घर मे. आज आप भोजन पा लो, हम आज नही पायेंगे, कल पा लेंगे" – हो, आमच्यासाठी ती आणी तिची मुलं उपाशी झोपायलाही तयार होती. घासातला घास देणं वेगळं पण आपल्याकडे काहिही नसताना आपल्या समोरचं ताट समोरच्यांना आदरानी खाऊ घालून स्वत: उपाशी राहणं हे जमण्यासाठी मनाची श्रीमंती असावी लागते. ज्यांच्याकडे धन आहे त्यांच्याकडे ही श्रीमंती असेल की नाही माहित नाही पण हा शांतीलाल मी पाहिलेला सगव्ळ्यात श्रीमंत माणूस होता. अंगावर घालायला कपडा नाही पण मन सोन्याहून चकचकीत आणि मोलाचंसुद्धा… मन खूप भरून आलं..

आमच्या जवळ एक कोरी ओढणी होती. त्या ओढणीचे सुरेखाताईनी झबले आणि टोपरे कापून दिले. मी सुरेखाताई आणी मयुरेश दादा आम्ही ते शिवले, अगदी हातानी, सुईदोरा घेऊन, मोबाईल च्या आणि मेणबत्तीच्या प्रकाशात. दुसर्या दिवशी सकाळी आम्ही शांतीलाल च्या बायकोला बसवलं, तिला आणि त्या छोट्या बाळाला औक्षवाण केलं. आमच्या जवळ जे काही थोडफ़ार होतं त्यातून काही पैसे जमा केले आणि हे झबलं टोपरं आणि पैसे त्या बाळाच्या अंगावर घातले.. तिचं नाव ठेवलं रेवा.. आमची रेवा…

ह्या आमच्या रेवाला आम्ही आता यापुढे केव्हा बघू आम्हाला माहित नाही. पण ह्या रेवाला आम्ही विसरणं शक्य तरी आहे का? जीचे चे आईवडील. स्वत: उपाशी राहून, घासातला

घास काढून आम्हाला भरवतात त्यांच्यापोटी रेवाच जन्म घेऊ शकते ना? काही तासांचा आमचा हा सहवास पण इथून पाय निघत नव्हता.. त्या घराशी, रात्रभर अंगाखांद्यावर नाचत असलेल्या उंदरा मांजरांशी, गुरांशी, अगदी भिंतीशीसुद्धा जन्म जन्मांतरीचं नातं आहे असं वाटू लागलं होतं. पण परिक्रमा पुढे न्यायला हवी होती आणि आम्हाला अजून मोठ्या बिकट रस्त्यावर वाटचाल करणं भाग होतं.

सकाळी लवकर निघालो, हा भला मोठा डोंगर जो चढून आलो होतो तो आता उतरायचा होता.आधी वाटलं होतं चढण्यापेक्षा उतरणं सोपं जाईल. पण तसं नव्हतं. एका वेळी अर्धेच पाऊल मावेल अशी वाट होती. मुरुमाची खडी होतीच. उतरताना सगळा तोल समोरच्या बाजूला जात होता. अशा वेळी पाय घसरला तर मोक्षच! मी बूट काढून घेतले होते, दुसरा पर्याय नव्हता. हा जवळ जवळ १२ किमी चा शेवट्चा टप्पा होता. तो कुणाचाही “शेवटचा टप्पा ” ठरेल असाच होता. त्याचं नाव होतं “भमाना” आणि मी त्याला “भयाणा” म्हणू लागले होते, भयानक असाच होता तो! पडण, सावरण अधुन मधुन होत होतं पण कुणाला फ़ारसं लागलं नव्हतं. मात्र त्या पडण्यातलं एक पडणं माझ्या आणि स्मीता साठी शेवटचं ठरलं असतं.

आम्ही एक एक पाऊल उतरत होतो, इथे दोन्ही बाजूला दरी होती मात्र डावीकडे काहीच आधार नव्हता आणि उजवीकडे किंचीत उंचवटा, म्हणजे लहान मुल पलंगावर झोपलं असेल तर ते पडू नये म्हणून आपण कशी उशी लावतो न अडकण म्हणून, साधारण तसा उंचवटा होता, मग पुढे खोल. आम्ही रांगेत उतरत होतो पण एकमेकांमधे अंतर ठेवून होतो, जेणेकरून एकाचा धक्का दुसऱ्याला लागून तोल जाऊ नये. स्मीता पुढे होती आणि मी मागे. सुरेखा ताई बरीच मागे होती आणि मयुरेश पुढे.. उतरता उतरता माझा पाय जोरात घसरला.. माझ्या पाठीला बॅग असल्याने माझी पाठ अन मान वाचली, मी जमिनीवर आडवी पडले आणि घसरू लागले, अगदी लहान मूल घसरगुंडी वर घसरतात तशी… किती प्रयत्न केले तरी मला थांबताच येईना… नशीब की मी उजव्या बाजूच्या त्या उंचवट्याचा आधारानेच घसरू लागले

आणि डावीकडे माझे पाय फ़ेकल्या गेले नाही ..नाहीतर मी घसरत घसरत खाली दरीत गेले असते. मी पडलेली पाहून सगळेजण जागीच स्थीर झाले ... दुसरं काहीच करता येणं शक्य नव्हतं. अगदी एक पाऊलही उचलून माझ्या दिशेला टाकणंसुद्धा कठीण.. माझा अंत सगळे बघणार पण कुणी काहीही करू शकणार नाही हे मला माहित होतं··· मी पडले होतेच आणि आता मी स्मीताला जाऊन आदळणार होते. मी जवळ जवळ १०-१२ फुट घसरून स्मीताला जाऊन आदळले··· स्मीता मात्र सावध होती म्हणून बर झालं.. ती चटकन गुढघ्यावर बसली आणि मला धरलं.. तिनी धरल्यामुळे मी थांबली, नाहीतर तशीच अजून किती खोल गेली असती मैयाच जाणे! मला थांबलेलं पाहून सगळ्यांच्या जिवात जीव आला आणि मग सगळे अगदी सावध आणि बहुतांश वेळा बसून बसूनच उतरत होते. मी इतकी घसरून खाली गेले पण मला फ़ारसं लागलं नाही, थोडं खरंचटलं. पाणीवरच्या बॅग चा खूप फ़ायदा झाला, माझ्या पाठीच्या कण्याचं रक्षण आणि स्पीडला थोडा अडसर हे दोन्ही फ़क्त बॅग मुळे शक्य झालं.

मी मनातून घाबरले होते. माझे हात पाय आता लटलटत होते. इथून पुढचा उतार अजूनच कठीण होता. एक पाऊलही पुढे टाकायची माझी हिम्मत होत नव्हती. इथेच बसून राहावं असं वाटू लागलं. खाली बघितलं तरी माझे डोळे फ़िरायला लगले होते, अजूनही इतकं उतरणं बाकी होतच. पण मैया कनवाळू आहेच. मागे येत असणाऱ्या पोर्टर प्रेम नी मला बघीतलं आणि तो धावत पुढे आला. त्या मंडळीना बऱ्यापैकी सवय असते. त्याने मला बॅग मागितली, आणि मी नाही म्हणाले··· . मग त्याने माझा हात धरून मला उठवलं आणि हात धरुन धरून १५- २० पावलांपुढे असलेल्या एका दगडावर नेऊन बसवलं··· मग तो पुन्हा मागे गेला आणि मागच्यांना घेऊन आला··· असं करत करत त्याने तो उरलेला भमाना मला हात धरून धरून पार करून दिला··· माझी परिक्रमा पूर्ण होणार होती, कारण आज मला काहिही झालेलं नव्हतं.

भमानाला उतरल्यावर आता चालायची इच्छा होत नव्हती. जवळच आश्रम असेल असं वाटत होतं पण तसं नव्हतं. आता मुक्कामाला पोहोचायला अजूनही आठ दहा किमी चालून जाणं बाकी होतं. संध्याकाळ्च्या आत मुक्कामाला पोचणं आवश्यक होतं कारण हा सगळा कच्चा आणि जंगलातला रस्ता होता. तसं भमाना गाव होतं, पण तिथे सोय नव्हती. तावसे काका काकूंना मात्र भमाना मध्ये जागा मिळाली, आम्ही बाकीचे तसेच मजल दरमजल करत पुढे जाऊ लागलो.

प्रत्येक स्थानाला काही महत्व असतं, काही ठिकाणचे कंपनं सुखावह असतात तर काही ठिकाणचे भयाण असतात. मुख्य म्हणजे असे टप्पे जर वारंवार, अगदी एका पाठोपाठ एक आले की विचित्र आणि कन्फ़्युस्ड वाटू लागतं. तसाच हा दहा किमी चा रस्ता होता. कधी छान वाटायचं तर कधी भयाण… पण फ़ायनली आम्ही सावरीयाला नर्मदा जीवन शाळेत जाऊन पोहोचलो..मित्रांनो, इथे पोहचलो पण हा ही आदिवासी भागच बरं का! म्हणजे अजून शूलपाणीची झाडी संपलेली नाही, मात्र आता उंच चढ आणि तार संपले होते. मैयाचं हृदय अजूनही पूर्ण पार व्हायचं होतं. नर्मदा जीवन शाळेतला मुक्काम आनंदमयी होता पण पुढे बोरी गावात आलेला अनुभव अजूनच वेगळा होता. मैया तुमच्या सगळ्या इच्छा पूर्ण करतेच … कसं ते सांगते बोरी गावाच्या अनुभवात, मात्र पुढच्या भागात.

नर्मदे हर

नर्मदा परिक्रमा – एक विलक्षण अनुभूती- भाग २३

नर्मदे हर

‘ नर्मदा जीवन’  शाळेत खूपच प्रसन्न वातावरण होतं. ती आश्रम शाळा होती आणि आजूबाजूच्या अदिवासी गावातली मुलं तिथे निवास आणि शिक्षणासाठी एकत्र आली होती. माझं आयुष्यच लहान मुलांच्यात गेलं आहे म्हणून असेल, मला इथे खूप खूप छान वाटलं. माझ्यात नवीन उत्साह भरल्या गेला. आता धडगाव साठी निघायचं होतं. तसं अंतर फ़ार नव्हतं पण ऊन फ़ार जाणवत होतं. खरतर नोव्हेंबर महिना होता हा तरीही ऊन फ़ार होतं.. दिवसभर पायी चालताना त्रास होत होता.

बरंच अंतर चालून झाल्यावर भूकही लागली आणि आराम करायलाही निवारा हवा असं वाटू लागलं, पण काय आश्चर्य, इथे सगळी घरं उघडी, आणि घरात कुणीच नाही. कुणाच्याही घराच्या आत कसं काय जायचं आपण.. भोजन प्रसादी तर दूरच पण सावलीची जागाही सापडत नव्हती. आज भोजन प्रसादीचं कठीणच झालं होतं. आता माधुकरी शिवाय पर्याय नाही पण मागणार कुणाकडे?

आम्ही प्रत्येक घरा घरांत डोकावून पाहात होतो.. बऱ्याच घरी फ़क्त लहान मुलंच होती.. आणि अनेक ठिकाणी घरं रिकामी पडलेली… शेवटी मयुरेशला एक घर सापडलं.. तिथे एक बाई होत्यात घरी. निवाऱ्याची जागा मिळाली आणि मयुरेश नी माधुकरी मागितली. तसं त्या बाईनी मक्याचं पीठ समोर आणून ठेवलं. आमच्याकडे न अन्न शिजवायला सामान न भांडी.. शिवाय मक्याच्या भाकरी येतात कुणाला? ते जाऊदे, नाही भाकरी तर जे होइल ते खाऊ एकवेळ, पण तवा, चूल, भांडी हे सामान? आम्ही आमचा प्रश्न मैयाजींना सांगितला… तिनी ते मक्याचं पीठ उचलं आणि आत घेऊन गेली.. आता जे पीठ होतं ते ही नव्हतं आमच्याजवळ, पण थोड्याच वेळात तिनी आवाज दिला.. “अब इतना सामान आपको दूंगी उससे अच्छा मैही आपको खाना बनाके खिला देती हू” … आयती भोजन प्रसादी मिळावी, आणि आराम

मिळावा अशीच इच्छा होती…  ती मैयानी पूर्ण केली. त्या मैयाजींनी मक्याच्या गरमागरम भाकरी आणि तुरीच्या दाण्यांची आमटी असं जेवण करून खाऊ घातलं. अन्नदानाचं महत्त्व काय असतं ते तेव्हा खरं समजलं… . ज्या वेळी माणूस शीजवून, कष्ट करून खायच्या परिस्थितीत नसतो, अंग लाही लाही झालं असतं, घसा कोरडा पडला असतो, तेव्हा मिळालेली गुळ भाकरीसुद्धा अमृतासारखी असते… . किती किती म्हणून भरभरून सदिच्छा त्या मैयासाठी आमच्या मनातून निघाल्या असतील म्हणून सांगू! अर्थात हे सगळं नर्मादा माईनीच तिच्याकडून करवून घेतलं पण त्या दिवशी तृप्त मनानी आमच्या सगळ्यांकडूनच शब्द निघाले " अन्नदाता सुखी भव" ..आपल्या जगात आपण खरंच किती "माजलेलो"  असतो हे इथे आल्यावर समजतं आणि प्रत्यक्षात हा "माज"  किंवा हा अहंकार कसा निरर्थक असतो हे समजू लागतं. परिक्रमावासींच्या सेवेची संधी मैयाने द्यावी हीच तिला विनंती आहे.

इथून पुढे राजबर्डीच्या आश्रमात थांबलो. अंगभर धूळ धूळ झालेली. हापशीच्या पाण्याने आंघोळ करून मग भोजनप्रसादी झाली. आज पहिल्यांदाच मी संध्याकाळी, थंड वेळेला, थंडगार हापशीच्या पाण्याने आंघोळ केली होती. बाधणार तर नाही अशी भिती होती, पण तसं काही झालं नाही. आज फ़ार थकलो होतो, निवांत झोपी गेलो. इथून पुढे सेल्कुवा, धडगाव, हरणखुरी, खुंटामोडी असा मार्ग होता. पुढचा मुक्काम कुठे करायचा असं काही ठरलेलं नव्हतं कारण आपल्याला ठरवता येत नाही असा अनुभव आधीच आला होता.

खरं तर असे अनेकदा अनुभव आलेत पण असं कुठे कुठे झालं ते नक्की आठवत नाही, पण काय झालं ते सांगते. आम्हाला असं वाटायचं बरेचदा की आम्ही फ़ारच हळू परिक्रमा करत आहोत. असं केल्याने आम्हाला चातुर्मास करावा लागेल.. चातुर्मासात चार महिने एका ठिकाणी राहायचं असतं, परिक्रमा करायची नसते. आणि तसं करणं मला तरी शक्य नव्हतं. त्यामुळे आम्ही पुस्तकं समोर ठेऊन उद्या किती किमी चालायला हवं, किंवा रोज किती किमी चाललो तर परिक्रमा कधी पूर्ण होईल असा विचार बरेचदा करायचो. पण असं काही होत

नाही, आम्ही ज्या दिवशी २० किमी चालायचं असं ठरवत असू त्या दिवशी काहीतरी होऊन आम्ही वीस किमी च्या आधीच मुक्काम करत असू. आणि ज्या दिवशी ठरवणार नाही त्या दिवशी जास्त चालून होत असे.. त्यामुळे आजकाल आम्ही ठरवणं सोडून दिलं होतं.. तो अधिकार फ़क्त मैयाचा होता.

तिनी ठरवल्याप्रमाणे पुढे आम्ही धडगावला थांबलो. इथे शूलपाणीची झाडी तशी संपली होती. म्हणजे एक भाग संपला होता असं म्हणू फ़ारतर, कारण माथासर झरवानी हा भाग अजून बाकी होताच. धडगावला आम्ही एका साधुकुटी मधे थांबलो होतो. तिथे एक दिवस थांबून विश्रांती घेऊन मग पुढे निघायचं ठरलं. आधी ते महाराज जरा कडक वाटत होते पण नंतर त्यांनी आमची छानच काळजी घेतली, आणि दुसऱ्या दिवशी आम्ही पुढे निघालो.

तर कुठे थांबायचं हा प्रश्नच नव्हता..रस्त्याने जाता जाता एक जीप आम्हाला बघून थांबली. त्यातून धुळे जिल्ह्याचे विकास जी जोशी उतरले, सोबत श्रीपाद म्हणून एक मुलगा होता, तो पुढे वडफ़ळी नामक गावात आम्हाला सेवा देणार होता. त्यांनी सांगीतलं की कुंडलला एका गुरुंजीकडे थांबा.ठरल्याप्रमाणे आम्ही तिथे गेलो. आम्हाला समोरच्या अंगणात आसन लावण्यास सांगितले, तसे आम्ही केले, मात्र त्या घरच्या लोकांशी गप्पा झाल्या असता त्यांनी आम्हाला स्वत:हून रात्री आपल्या घरात जागा दिली, दुसऱ्या दिवशी ही इथेच आराम करा असे सांगितले, इतकेच नाही तर त्यांच्या दोन्ही नोकरीच्या सुनांनी पूर्ण घर आमच्यावर सोपवलं आणि दिवसभर आपल्या नोकरीवर गेल्या. नोकरीवर जाताना त्यांनी आम्हाला स्वयंपाक घरात बोलावलं, काय सामान कुठे ठेवलय ते सांगीतलं, आणि काय लागेल ते करून घ्या असं ही सांगीतलं… त्या जाताना पूर्ण स्वयंपाक करून गेल्या होत्याच, या ही उपर काही लागलं तर घ्या असं बजावून त्या गेल्या होत्या. केवढा हा विश्वास! हे परिक्रमावासी आपल्या घरची काडी ही इकडची तिकडे करणार नाहीत हा विश्वास त्यांना मैया नी नाहीतर कुणी दिला?

रात्री त्या घरचा मोठा मुलगा घरी आला. आल्या आल्या त्याने आम्हाला नमस्कार केला आणि तो रडू लागला. पसारकर काकूकडे पाहून ३ वर्षापूर्वी वारलेल्या आईची त्याला खूप आठवण येत होती. तो खूप व्याकुळ झाला होता, त्याला स्वत:ला सांभाळता येत नव्हतं. तो आमच्याकडे बघून इतकच म्हणायचा " कैसे बताऊ, मुझे समझ नही आ रहा है…  मा चली गयी मेरी.. मा चली गयी"  .. पंचेचाळीशीतल्या माणसाला असं रडताना पाहून वेगळंच वाटत होतं.. आम्हा अनोळखी परिक्रमावासीं समोर रडून तो मोकळा होत होता हे महत्वाचं.

दुसऱ्या दिवशी आम्ही जरा उशीराच निघालो, पुस्तकात खुंटामोडी हे गाव १० किमी असं काहितरी दिलं होतं. तिथे मंदिरात सोय आहे असं समजलं होतं. रस्ता चढावाचा होता आणि साधारण ३ किमी चालून झाल्यावर रस्त्यात आम्ही विश्राम करायला जागा शोधली तर एका माणसानी आम्हाला एक मंदिर दाखवलं. आम्ही तिथे गेलो, फ्रेश झालो आणि पुढे खुंटामोडी किती दूर आहे विचारलं असता समजलं की हेच खुंटामोडी आहे! आम्ही १० किमी चालून आलो होतो? नाही नाही…  पुस्तकातलं अंतर चुक दिलं असावं.. नक्की काय होतं ते माहित नाही पण आज अजिबात थकवा आला नाही. इथे आम्हाला हरेंद्र नाईक म्हणून मोलगीचे राहणारे एकजण भेटले,, " आप भी नाईक और हम भी नाईक, अब तो आपको हमारे घर आना ही होगा"  असं आग्रहाचं निमंत्रण दिलं आणि आमचा पुढचा मुक्काम मोलगीला करण्याचं ठरलं.

खुंटामोडी ते मोलगी च्या प्रवासात आधी एक आवाज ,मग एक दूधवाला, आणि मग एक डॉक्टर भेटले. यापैकी हा आवाजाचा अनुभव जरा वेगळा आहे. मोलगीला नाईंकानी केलेलं स्वागत छानच होतं पण, मोलगी ते पांढरामाती च्या प्रवासाच्या अनुभवात असं काही आहे ज्याची वाट आपण सगळेच बघत आहोत. सप्त चिरंजीवांपैकी एक अश्वत्थामा बद्दल मी काहीतरी सांगणार आहे, हे नक्की.

नर्मदे हर

नर्मदा परिक्रमा – एक विलक्षण अनुभूती- भाग २४

नर्मदे हर.

खुंटामोडी ते मोलगी प्रवास मी एकटीने केला. म्हणजे मागे पुढे मंडळी होती पण अंतर बरच होतं. रस्ता गावातून, डोंगरातून असाच होता. ऊन छान पडलं होतं आणि वातावरण पण आल्हाददायक होतं. अंतर मात्र बरच होतं. काल खुंटामोडी जवळ वाटलं आणि पटकन आलं होतं तसंच आज मोलगी खूप खूप दूर जाणवत होतं.

या प्रवासात नं एक गंमतच झाली. रस्ता डोंगराळ होता त्यामुळे सरळ नव्हताच. खुप पुढे गेलेला मयुरेश दादा काही दिसत नव्हता. त्यामुळे रस्ता विचारावा लागणार होता. काही ठिकाणी रस्ता विचारायला लोक दिसत होते, मात्र काही ठिकाणी कुणीच नाही. एका ठिकाणी रस्ता जरा गोंधळात टाकणारा होता. मी थोडे थकले होते, म्हणून मी रस्त्याच्या कठड्याला टेकून उभे राहिले. मोठा रस्ता होता छान, पण गर्दी फ़ार नव्हती. एखादी गाडी येईल तेव्हा विचारू असं वाटून मी उभी होते. "इतक्यात माझ्या मागून आवाज आला, चक्क मराठीतून, तो समोर पूल दिसतोय तिथून खाली उतरून मग डावीकडे जा" … बाईचा आवाज होता… खूप ओळखीचा आवाज होता… मला आधी वाट्लं की मला भास होतोय, पण पुन्हा तोच आवाज आला… . दिसलं मात्र कुणीच नाही.

मागे शूलपाणीच्या झाडीत पोर्टर घेऊ नको असा आवाज आला होता नं, तसाच काहिसा, पण तो आवाज मला माझ्या आतून आल्यासारखा वाटत होता… मी पुढे चालू लागले आणि समोर गेल्यावर पुलावरून खाली उतरले. तिथे एक दुकानदार होता, त्याने पण त्या आवाजाने सांगीतलेल्याच दिशेला बोट दाखवलं… . त्या आवाजानी रस्ता बरोबर सांगितला होता… .

पुढे त्याच रस्त्यावर एक दुधवाल्या चं दुकान आणि छोटंसं होटेल होतं. त्यानी मला बोलवलं. हॉटेल अजून सुरू व्हायचं होतं, म्हणून त्यानी दुधाचं पाकिटच दिलं. आता याचं काय करणार? ते पाकिट तसंच दातानी फ़ोडून पिऊन टाकलं.. छोटं २५० एम एल चं पाकिट होतं. ते संपलं तर त्याने लगेच दुसरं दिलं, आणि "बस ये पी लो, फ़िर नही दुंगा"  असा आग्रह ही केला.. ते ही पाकिट मी प्यायले… गंमतच आहे, इथे परिक्रमेत काळा चहा मिळतो, म्हणजे इथे लोक तोच पितात, म्हणून… आणि मला चक्क अर्धा लिटर ताजं दुध प्यायला मिळालं.. अगदी नाश्त्याच्या वेळेवर… राजेशाही परिक्रमाच म्हणायची ना ह्याला? पुढे वाटेत एक दोन दा चहा झाला, आणि मोलगी गावात एका चौकात अचानक मला मयुरेश दादानी आवाज दिला.. तो एका डॉक्टरकडे बसला होता. त्या वेळी माझी टाच जरा दुखत होती, पण डॉक्टरला दाखवावं असं काही नव्हतं, मी सहन करू शकत होते आणि म्हणून मी काही तो विषय त्या डॉक्टरशी बोलताना काढला नाही. आम्ही चहा प्यायलो, सर्दी खोकल्याच्या काही गोळ्या जवळ असू द्या असं म्हणत त्या डॉक्टर ने आम्हाला दिल्या. आम्ही आता निरोप घ्यायला उभं राहिलो. माझ्या उभं राहण्याकडे पाहून त्या डॉक्टरांनी अजून दोन गोळ्या माझ्या हाती दिल्या.. म्हणाले " एडी मे दर्द है ना आपके, इसे ले लेना, कम हो जायेगा" … न मागता मला टाचेसाठी औषध मिळालं.

आम्ही मोलगीला नाईकाच्या घरी पोहचलो. छानसा टूमदार बंगला होता. त्यांनी आमची व्यवस्था खूप छान केली. खूप अगत्य केलं. कुंडल नंतर इथे पुन्हा घरचं जेवण जेऊन आनंद झाला. तो दिवस मुक्कम करून आम्ही दुसऱ्या दिवशी वडफ़ली साठी निघालो.हा भाग येतो नांदुरबार जिल्ह्यात. महाराष्ट्रात आल्याचं समाधान वाटू लागलं पण मध्य प्रदेशाच्या तुलनेत या भागात परिक्रमा वासींबद्दल बरीच उदासीनता आढळली. कारण काही कळलं नाही. मात्र सुरगस च्या शाळेत विश्रामाला थांबलो असताना अचानक एक माणूस माझ्याकडे येऊन मला नमस्कार करू लागला. परिक्रमा वासींना लोक नमस्कार करतात, त्यामुळे विषेश नाही.. पण हा म्हणाला " तुम्ही नागपूरच्या न मॅडम?" अरेच्या, हे कसं समजलं याला? " मॅडम ओळखलं

नाही का?, मी तुमच्या शाळेत आलो होतो नं माझ्या विद्यार्थ्याला घेऊन एक्जिबीशन साठी, दिल्लीला पण होतो आपण सोबत, इन्स्पायर अवार्ड साठी, तुम्ही त्याच आहात नं त्या भारतभरातून पहिलं बक्षिस मिळालेल्या..सगळ्या स्टुडंटला तुम्ही " उत्तरं कशी द्यायची" ते सांगितलं होतं नं मॅडम, मी आजपण तुमच्या टिप्स मुलांना सांगत असतो." अरे बापरे, तर हे सर मला छानच ओळखत होते, आणि या परिक्रमावासींच्या परिधानात, २०१३ नंतर म्हणजे ४ वर्षांनी यांनी मला ओळखलं होतं, खरंच अशा प्रकारे आपण कुणाच्या लक्षात राहू असं वाटलं नव्हतं. या शाळेत खरं तर परिक्रमावासीं साठी सेवा वगैरे प्रकार नाहीये, पण त्या दिवशी मिड डे मिल मध्ये मुलांबरोबर आम्हा सर्व परिक्रमा वासींना या शिक्षक मंडळींनी आग्रहानी जेवायला वाढलं.

नांदुरबार मधे मात्र परिक्रमा आणि परिक्रमावासंबद्दल खूप उदासीनता आहे. सुरगस च्या शाळेतून पुढे निघालो, बऱ्याच वेळाने पाणी कुठे मिळतय म्हणून पाहू लागलो तर नळ किंवा हापशी दिसेना, म्हणून एका घरी पाणी मागितलं… " पानी खतम हो गया" असं उत्तर ऐकू आलं. आश्चर्य आहे नं.. निदान पाण्याला कुणीच नाही म्हणत नाही, म्हणजे परिक्रमा वासी असो का नसो.. बरं हाच अनुभव अजून दोन तिन घरीही आला… . कारण काही कळेना… मात्र पुढे इथे कुठे रात्र काढायची वेळ आली तर सोय होणं कठीण आहे हे जाणवू लागलं.

तसंच झालं. आम्ही वडफ़ळीपर्यंत पोहचू शकणार नाही समजत होतं. दुपार उलटून गेली होती. छोटे छोटे आदिवासी पाडे आहेत इथे पण तसा हा जंगलाचाच भाग. जस जशी संध्याकाळ होत आली तशी थंडी वाढू लागाली. इथे निवारा शोधायला लागणं आवश्यक होतं. निवारा सापडत नव्हता, कुणीतरी म्हणालं समोर राम मंदिर आहे तिथे जा.. वाटलं, जमलं की.. पण तसं नसतं नं! अहो समोर दोन फ़ुटाचं रस्त्याच्याकडेला बांधलेलं राम मंदिर होतं.. इथे कुठे राहणार आम्ही? पुन्हा पुढे गेलो… पुन्हा एक छोटं मंदिर.. ते मोठं राम मंदिर काही सापडेना. जो कुणी रस्ता सांगत तिथे एक छोटं मंदिरच असे… आज कदाचित उघड्यावर झोपावं

लागणार होतं. मयूरेश दादा झपाझप पुढे गेला..मी आणि पसारकर काकू मागे पुढे होतो.. स्मीता आणि सुरेखा ताई मागे होत्या.

आम्ही आता पांढरा माती या गावा जवळ होतो. साधारण ४.३० झाले असावेत. एका झाडाखाली बरीच मुलं खेळत होती. आमच्या जवळ चॉकलेट होते, त्यातले काही मी त्या मुलांना दिले, आणि एक छोटासा मुलगा, ४-५ वर्षांचा असेल जेमतेम, तो माझ्याकडे पाठ करून बसला होता. त्यानी चॉकलेट घ्यावं म्हणून मी त्याला आवाज दिला. त्याच्या अंगावर कपडे आणि डोक्यावर केस नव्हते. ते रुपडं लोभस दिसत होतं.. मी त्याला आवाज दिला तसा तो माझ्याकडे वळला. त्याच्या गळ्यात तुळशी च्या माळेसारख्या पण चकत्या चकत्या च्या माळा होत्या. त्याच्या कपाळावर जखम होती आणि रक्ताचा ओघळ डोळ्यापर्यंत उतरला होता. अर्ध्या रस्त्यात येऊन थांबला, आणि "मुझे नही चाहिये टॉफ़ी, मै टॉफ़ी नही खाता असं म्हणून" म्हणून धावत धावत निघून गेला. त्या वेळी मला आश्चर्य वाटलं, इतका लहान मुलगा, इतकं लागलं असताना रडत कसा नाहीये, हाच विचार मनात आला आणि मुलांना चॉकलेट आवडतं, मग हा नाही का म्हणाला? असं ही वाटलं.मला त्या वेळेला बाकी काही सुचलं नाही. मात्र पुढे गेल्यावर त्या मुलाचे तेजस्वी डोळे, उंच कपाळ, चरचरीत नाक, आणि मुख्य म्हणजे प्रचंड आत्मविश्वास, हे सगळं मला जाणवलं.. त्याच्या डोक्यावरची भली मोठी जखम आणि त्याही अवस्थेत तो अतिशय शांत होता हे ही नंतर लक्षात आलं… नंतर जाणवलं, की कदाचित हे सप्त चिरंजीवांपैकी अश्वत्थामा तर नसतील? मला नक्की माहित नव्हतंच, पण असच वाटलं की अश्वत्थामाच होते. पुढे मी अनेक साधू महात्मे आणि पारिक्रमावासींशी हा प्रसंग शेअर केला असता मला अश्वत्थाम्याचे दर्शन झाले असा निष्कर्ष निघाला. पुढे महेश्वरला स्वामी हृदय गिरी महाराज, आणि परिक्रमेनंतर श्री सतीश चूरी (नर्मदा परिक्रमावासी, लेखक आणि अभ्यासक) यांना ही विचारले असता त्यांनी स्थळ आणि काळ यांचा संदर्भ देऊन त्या काळात आणि साधारण त्या वेळेला व त्या पट्ट्य़ामधे अश्वत्थामा दर्शन देतात असे अनेकांचे अनुभव

असल्याचे सांगितले. नर्मदा परिक्रमेत, शूलपाणी च्या झाडीत झालेले हे दर्शन म्हणजे सौभाग्याची परिसीमाच नाही का?

आम्ही निवारा शोधत असताना घडलेला हा प्रसंग, पण त्या वेळी मला मात्र काहीही सुचलं नाही. हे अश्वत्थामा असतील असा विचारही डोक्यात आला नाही, आणि असंच नर्मदा माईनी दर्शन दिलं तेव्हाही झालं होतं.इतकच काय तर अगदी पहिल्या दिवशी शंकर महारांजांनी दर्शन दिलं त्या ही वेळेला असच. ह्या शक्तींच्या प्रभावामुळे असेल पण आपल्या मनावर आणि बुद्धीवर परिणाम होतोच. कदाचित ह्यांच्या तेजामुळे त्या झाकोळून आणि दिपून जात असतील.

एव्हाना निवारा शोधायला गेलेला मयुरेश दादा कुठेच दिसत नव्हता. मी आणि पसारकर काकू बरच अंतर पुढे चालून आलो तरी त्याचा काही अतापता नव्हता, आता दोन रस्ते होते, कुणीकडे जायचं? आम्ही ठरलेली किल्ली वापरली आणि मोठ्या मोठ्याने नर्मदे हर चा गजर सुरु केला, आणि खूप दुरून, खोलातून आल्यासारखं मयुरेश दादा चं नर्मदे हर ऐकू आलं. आम्ही त्या दिशेनी गेलो तर रस्त्याच्याकडेला पायऱ्या उतरून खोल वर एक घर होतं. त्यांच्या शेतातून पुढे गेलं की एक मंदिर होतं, त्या मंदिरात तो थांबला होता. एक व-हांडा, आणि चार खांब असच ते मंदिर, पण डोक्यावर छत मिळालं होतं आणि जेवणही मिळणार होतं. आजची रात्र चांगली जाणार होती… उद्या आम्ही वडफ़ळी आणि तिथून पुढे जाणार होतो. वडफ़ळिच्या मुक्कामात मला खूप आनंददायक असं काहितरी मिळालं आणि सोबत पुन्हा काही संकेत. मनाचा काही आजारी भाग काढून फ़ेकायची संधी ही मिळाली, आणि काही अनुभव..आपल्या सोबत सतत मैया आहे हे माहीत असणं वेगळं, आणि तिची विनवणी केल्यावर दर दहा मिनीटांनी “मी आहे सोबत” याची त्या माऊलीने प्रचिती देणं वेगळं… ते ही घनदाट जंगलात..मी अगदी एकटी असताना… . आणि अक्षरश: दर दहा मिनीटाने… २० किमी च्या अंतरात… पण ते आता पुढच्या भागात सांगते.

*नर्मदा परिक्रमा – एक विलक्षण अनुभूती- भाग २५*

*नर्मदे हर.*

सकाळी लवकर उठून आम्ही वडफ़ळीकडे निघालो. अंतर फ़ार नव्हतं पण काल संध्याकाळी नक्कीच पूर्ण झालं नसतं. वडफळीला पोचतो तोच तिथे श्रीपाद, जो मागे आम्हाला विकास जी जोशी,राहणार धुळे, यांच्या सोबत भेटला होता त्याने आमचं स्वागत केलं.. तिथल्या आश्रमाच्या दारशी आले आणि पुन्हा माझं मन हळवं झालं. दाराच्या पाटीवर " जय गुरू नाना " असं लिहिलं होतं. नाना माहाराज माझे गुरु, आणि श्रीपाद हा माझ्या नाना परिवारातलाच एक बंधू. माझं हळवं होण्याचं कारण असं की ज्या ज्या वेळेला मला काही वेगळे अनुभव आले त्या त्या वेळी माझे गुरू आजुबाजूला आहेत असा संकेत मला मिळत जात होता. मी शूलपाणीत असताना, उडी मारून जाण्याचा तो प्रसंग, त्या वेळी माझ्या दोन्ही दंडांना कुणीतरी पकडल्याचं मला जाणवलं होतं आणि नंतर लगेच मला नर्मदा माईनी दर्शन दिलं होतं. काल मला अश्वत्थामांचं दर्शन झालं आणि आज हा " जय गुरु नाना" चा मिळालेला संकेत. खरं तसंच पुढे भालोद (गुजरात) मध्ये प्रतापे महारांजाच्याकडेही अनुभव आला, पण आपण भालोदला पोचलो की मी तो अनुभव सांगेन.

मी अगदी प्रत्येक दिवसाचे वर्णन करत नाहीये, मात्र जे जे अनुभव मला येताहेत ते आणि परिक्रमे मधे एकूण माझं बदलत गेलेलं आयुष्य आणि त्याची कल्पना येईल असे बदलत गेलेले विचार मी मंडण्याचा प्रयत्न करतेय. रोजनिशी लिहिण्याची माझी इच्छा नाही. बरेचदा वाचकांची इच्छा ही अनुभव वाचण्याची असते, मात्र त्यांचा झालेला परिणामसुद्धा लक्षात घेणं माझ्या मते गरजेचं आहे. किंबहुना ते जास्त महत्त्वाचं आहे कारण ज्यांची परिक्रमा झाली आहे त्यांच्या अयुष्यात दु:ख का शिल्लक राहात नाही, आणि परिक्रमा केलेली मंडळी कायम त्या परिक्रमेतून बाहेर कशी येत नाही याची ही कारणं आहेत असं मला वाटतं. एखाद्या व्यक्तीची

परिक्रमा झाल्यानंतरही त्या व्यक्तीला मैया किनाऱ्याची ओढ आयुष्यभर लागून राहते ते या परिणामांमुळेच.

आपली मैया आणि आपले गुरू आपल्या सोबत आहेत असे संकेत कायम मिळत राहिल्याने परिक्रमा पूर्ण होईल आणि विनाविघ्न होईल हे समजत होते, मात्र अजून आत्मपरिक्षण होणे गरजेचे होते. माझ्या पात्रते बाहेर, केवळ पूर्वजांच्या पुण्याईने ही संधी मला मिळाली होती आणि माझा प्रवास योग्य दिशेने वळावा यासाठीच हे घडते आहे असे मला वाटू लागले होते.

वडफ़ळीला बालभोग आणि बाकी कामं आटोपून आम्ही माथासर साठी निघालो. माथासरपर्यंतचा प्रवास उत्तम झाला, गुजरात चं सौंदर्य बघून मन प्रसन्न झालं मात्र लांबच्या लांब पसरलेली खेडी संपता संपेनात. परिकथेतलं गाव असावं असं हे माथासर, डोंगर उतारावर वसलेलं आहे. मुक्कामाच्या ठिकाणी व्यवस्थित पोहचलो. आजपर्यंतच्या रात्री आम्ही बरेच दा उंदीर मांजरासोबत एकत्रपणे, त्यांना अंगाखांद्यावर घेऊन, आनंदाने घालवल्या होत्या. आता भैरवनाथांच्या श्वानांची वेळ होती. आम्हाला आसन लावायला सांगीतलं ते एक बांधकाम सुरु असलेलं घर होतं. भिंती उभारल्या होत्या, बाकी काम अजून बाकी होतं. तिथे फ़ारसा कुणाचा वावर नसावा आणि म्हणूनच ३-४ कुत्री तिथे येऊन बसत असावीत. आम्ही त्यांच्या जागेवर अतिक्रमण केलं असणार, मात्र ती कुत्री त्यांचं घर सोडायला काही तयार नव्हती… कितीदाही हाकललं तरी ती आपली आतमधे येतच.. शेवटी पर्याय नाही असं समजलं आणि आम्ही त्यांच्यासोबत रात्र घालवली. ती पण इमाने इतबारे आमच्या पायाशी लोळण घेत पडून राहिली..

तेव्हा विचार आला.."ठिक आहे, आजची एक रात्रच घालवायची आहे" … मग लक्षात आलं, गेले कित्येक दिवस आम्ही हाच विचार करत रात्री घालवत आहोत, आणि असं केल्याने ती रात्रही सुखाची गेली आहे आणि कसला आकसही उरलेला नाही. खरंच आयुष्य असच

आहे. इथे कसलाही आकस ठेवणं योग्यच नाहिये. दिवस आज चा असतो आणि तो संपतो ही आजच. तो संपणारच असतो त्याच्या स्वतःच्या गतीने. गती वाढत असते ती आपली. त्या दिवसात मावणारही नाही इतके अपेक्षांचे ओझे आपण त्या दिवसावर लादत असतो. ते ओझे वाहता वाहता तो दिवस दमलेल्या थकलेल्या अवस्थेतच येतो तसा निघून जातो, आपल्या अपेक्षांचे, आपले ओझे आपल्याला व्याजासकट परत देऊन!आणि आपण उद्या येणाऱ्या दिवसावर पुन्हा ते ओझे लादायला तयार झालेलो असतो. आपल्याला फ़क्त हे समजत नसतं … . अरेच्या, हे असे विचार मी फ़रसे कधीच केले नाहीत, इतका वेळच कधी मिळाला नाही, आणि हो असे अनुभवही नाहीत..म्हणजे हे विचार मी केले म्हणायचेत का करवून घेतले म्हणायचेत?.. काहिही असो, मी काहितरी शिकतेय हे महत्त्वाचं आहे. आणि हे काहितरी माझ्या ह्या आणि कदाचित पुढच्या जन्मांचे मार्ग सुकर करणारं आहे असं वाटतय!

तर माथासर हून पुढे निघून आता झरवानीला जायचं होतं. हा प्रवास साधारण वीस ते पंचवीस किमी चा असेल, पुस्तकात १६ दिलं आहे मात्र १६ नक्की नाहिये. आणि महत्त्वाचं म्हणजे या पट्ट्यात एकही गाव नाही. जंगल वाट आहे, मात्र सायकल, किंवा मोटरसायकल जात असतात अधुन मधून, पण निवाऱ्याचं ठिकाण, पाण्यासाठी काही ठिकाण असं या भागात काहीही नाही, आणि ही वाट घनदाट जंगलातून जाते. झाडांची दाटी इतकी आहे की बऱ्याच ठिकाणी आकाश दिसत नाही, वर पाहिलं की फ़क्त झाडांच्या फ़ांद्यांचे लेयर दिसतात एकावर एक. आणि आजूबाजूला पाहिलं तर किर्र जंगल. हे जंगल आम्हाला एका दिवसात पूर्ण करायचं होतं. कारण रस्त्यात काहीही निवाऱ्याची जागा आम्हाला मिळणार नव्हती आणि जमेची बाजू म्हणजे हे आम्हाला माहीत होतं. थोडी भीतीही होतीच कारण लेप्याला कळलेला प्रसंग थोडासा मनामध्ये होता. तरीही आता पुढे एकटं जायचं असं मी नाही तर माझ्या मनाने ठरवलं.आपण आपले आणि आपल्या मनाचे खूप लाड करतो आणि त्यामुळे ते फार लाडावलेलं आहे असा विचारही त्या वेळी माझ्या मनात आला.खरं पाहता ज्या वस्तूंना आपण माझी वस्तू असं म्हणतो त्या वस्तूंवर मालकी हक्क हा माझा असायला हवा. म्हणजे माझा मोबाईल किंवा माझी गाडी

केव्हा माझी बॅग या सर्व माझ्या गोष्टी आहेत आणि यांची मालक मी आहे म्हणून त्या माझ्या मतानुसार किंवा माझ्या म्हणण्यानुसार त्यांनी वागायला हवं असा माझा समज आहे.आणि असाच विचार करायचा झाला तर ज्यावेळी मी माझं मन असं म्हणते त्यावेळी माझ्या मनाने माझ्या मर्जीनुसार वागायला हवं हेही खरं आहे. पण असं खरंच होतं का? मी मनाची मालक असून बहुतांशवेळी किंवा नेहमीच म्हणा माझं मनच माझ्यावर मालकी हक्क गाजवत असतं.माझं मन माझ्या म्हणण्यानुसार वागत नसतं तर मला त्याच्या मर्जीनुसार वागायला भाग पाडत असतं. अतिशय वेड मन असतं हे. लहान मुलासारखं फार हट्टी असतं. आणि आपणही या मनाचे लाड पुरवून त्याला हट्टी बनवत असतो. आईने जशी लहान बाळाला सवय लावावी तशी लागते तसंच या मनाचं आहे. एकदा का आपण त्याचे हट्ट पुरवत आलो की ते आपल्या हाताबाहेर जाऊन हट्ट करू लागतं. त्याच्यावर ताबा मिळवणे कठीण मात्र त्याच्यावर ताबा मिळाला तर सगळ सोपं. असे विचार माझ्या मनात येऊ लागलेत.

थोड्याशा घाबरलेल्या मनाला ताब्यात घेऊन त्याचा हट्ट न पुरवता या जंगल वाटेतून एकटच पुढे जायचं असं मी ठरवलं. कितीही रागावलं तरी मधून मधून आपलंच टुमणं लावलं नाही तर ते हट्टी मन कसं म्हणायचं?माझं मन उगाचच माझं लक्ष आजूबाजूच्या किर्र झाडीकडे ओढून ओढून नेत होतं आणि मी त्याचं लक्ष दुसरीकडे वळवण्याचा प्रयत्न करत होते. कधी ते जिंकत तर कधी मी. मात्र ,शेवटी इतके वर्षांच लाडावलेलं मन जेव्हा जास्त वेळा जिंकू लागलं तेव्हा मी मैयाचा धावा सुरू केला. तिला म्हटलं आई माझं मन ऐकत नाहीये मात्र त्याच्याकडून ऐकून घ्यायचं आहे हे नक्की, तेव्हा आता तूच काय करशील ते कर मात्र माझ्या सोबत तू आहेस असे संकेत मला देत राहा.मी पुढे निघाली आणि चालू लागली माझ्या मनाकडे अजिबात लक्ष न देता.

एका ठिकाणी मात्र हे मन उडी मारून बाहेर आलंच. अतिशय घनदाट जंगल, किर्र झाडी खूप थंड वातावरण, एक प्रकारचा विचित्र वास तिथे येत होता. पुढचा रस्ता हा झाडांच्या बोगद्यातून गेल्यासारखा वाटत होता. माझं मन म्हणत होतं बघ इथून पुढे जायचं का? का

मागून येणाऱ्या परिक्रमावासीची वाट बघायची? त्या बोगद्यात जायच्या आधी इथे थोडावेळ बसायचं का? मन बऱ्यापैकी घाबरलं होतं आणि तिथे बसण्याचा निर्णय मी घेतला. निदान थोडा वेळ तरी का होईना या मनाने मला जिंकलं होतं. मी मैयाला विचारलं, "मैया काय करू थांबू की पुढे जाऊ?" आणि तितक्यात माझ्या डोक्यावर प्रेमाने टपली मारावी तसा मला भास झाला आणि ताबडतोब मनात विचार आलेत,"इथे थांबून तू सुरक्षित आहेस असं तुला वाटतंय का? तशीही जंगलात आहेस, तेव्हा जर काही होणे असेल तर ते इथेही होऊ शकतं,मग जे होणार आहे त्याचा विचार करू नकोस, इथे बसून फक्त आणि फक्त वेळ जाईल बाकी काहीही होणार नाही. त्यापेक्षा चटकन उठ आणि चालायला लाग, मैया तुझ्या सोबत आहेच" .

आता मात्र मी जिंकले आणि मन हरलं होतं. मी पुढे चालू लागले.त्या बोगद्या सारख्या दिसणाऱ्या रस्त्यावरून थोडे पुढे गेल्यानंतर समोरून तीन लहान मुलं माझ्या दिशेने येताना दिसली. त्यांना पाहून धीर आला, वाटलं ही लहान मुलं जर येत आहेत या रस्त्याने तर घाबरण्याचं काय कारण पुन्हा एकदा मी मनाला धीर दिला आणि मी जिंकले. मैया ने वचन दिल्याप्रमाणे ती मला दर दहा मिनिटांनी संकेत देत राहिली.पुढच्या प्रवासात मला अनेक वेगवेगळे अनुभव आलेत आणि मी या घनदाट जंगलात एकटी नाही, मैया माझ्या सोबत आहे याची खात्री पटली. आता माझं मन पूर्णपणे हरलं होतं आणि मी जिंकले होते. मला पहिल्यांदा ती तीन लहान मुलं दिसली आणि मी एकटी नाही हे समजलं. त्यानंतर आजूबाजूच्या जंगलातून कुठून तरी लाकूड तोडण्याचा आवाज ऐकू येऊ लागला त्यामुळे माझ्या व्यतिरिक्त इथे कुणीतरी आहे असा आभास मला झाला.हा लाकूड तोडण्याचा आवाज बंद झाला आणि लगेच थोड्याच वेळात इतक्या घनदाट जंगलातून मला रेडिओवर जुनी गाणी ऐकू येऊ लागली. अभी ना जाओ छोडकर हे पूर्ण गाणं व्यवस्थित ऐकू आलं, मात्र आवाज कोणत्या दिशेने येतो आहे ते समजलं नाही.असं करत करत जवळ जवळ अर्धे अंतर मी येऊन पोहोचली असेल.म्हणजे आता झरवानी साधारणपणे 12 13 किलोमीटर शिल्लक असेल आणि माथासरसुद्धा साधारण तितकच मागे पडलं असेल. अशा ठिकाणी माथासर किंवा झरवानी होऊन आपली बरीच गुरं

घेऊन या वेळी कुणी गुराखी बाई कशी काय थांबली असेल या घनदाट जंगलात? पण मी पुढे गेली तेव्हा ती बाई आपल्या गुरांसकट एका झाडाखाली बसलेली होती. मी तिच्याजवळ गेली तशी ती उठून उभी राहिली. तिने मला नर्मदे हर केलं आणि मी पण तिला नर्मदे हर केलं. ती म्हणाली,"झरवानी तक जाओगी? चलो मै भी उधर ही जा रही हू" .. आता तर मला खूपच छान वाटू लागलं. झरावानी च्या थोडं जवळ येईपर्यंत ही बाई माझ्या सोबतच चालत होती. झरवानी साधारण चार किलोमीटर बाकी असेल तिथपर्यंत ती माझ्यासोबत चालत होती, नंतर जंगलातल्या एका आडवाटेने ती निघून गेली.

खरं मैया सोबत आहे हे माहित असतनाही मला का भीती वाटली असा विचार मी केला असता मला त्यामागचं कारण उमगलं. भीती ही मृत्यूची वाटत नसते, कारण तो अटळ आहे हे आपल्या पैकी प्रत्येकाला जन्म झाला त्या क्षणापासून माहित असते. भीती असते ती एकतर एकटेपणाची किंवा उगाच अंगावर ओढवून घेतेलेल्या जबाबदारींची. हे एकटे चालणं कठीण असतं ते अडकणाऱ्या पायांमुळे. नाळ तुटता तुटत नाही. मग सैर भैर व्हायला लागतं. त्यासाठी काहीतरी उपाय शोधायला हवा. कदाचित आज मला तो उपाय मिळाला होता. अर्थात तो उपाय अमलात आणणं खूप कठीण आहे पण मनापासून मी प्रयत्न करणार आहे.

आता जो उपाय मी तुम्हाला सांगणार आहे तो उपाय काही फार मोठा असा नाही. किंवा मी काही जगावेगळं सांगणार आहे असंही नाही. किंबहुना मी जे सांगणार आहे ते आपल्या सर्वांना माहीतच आहे. मलाही माहीतच होतं. फक्त या प्रवासात मला ते मनापासून पटलं इतकच! अर्थात ते अमलात आणणं जरी कठीण असलं तरी प्रयत्न करणं तितकं कठीण नाही,हे जेव्हा समजतं तेव्हा निदान प्रयत्न करून बघण्याची इच्छा होते..वेळ खूप लागणार आहे हे मला माहीत आहे. हे पूर्णपणे होईल की नाही हेही सांगता येत नाही कारण हे होणं फार फार कठीण आहे. म्हणून एक छोटासा मंत्र आहे, आणि हा मला मिळालेला मी तुम्हाला पण सांगणार आहे… मला बराच फायदा होतोय यांचा… तुम्हालाही होवो… .होईलच… मात्र पुढच्या भागामधे सांगते हं.

नर्मदा परिक्रमा – एक विलक्षण अनुभूती- भाग २६

*नर्मदे हर.*

तर मागच्या भागात मी एका मंत्रा बद्दल बोलत होते. तसा हा मंत्र मला कुणी दिला हे आधी सांगते. झरवानी ते गोरागाव या प्रवासात मी आणि पसारकर काकू सोबत होतो. आम्ही दोघी बऱ्यापैकी मागे होतो. हा रस्ता उताराचा आणि जंगलाचा रस्ता होता. इथे आमच्या मागेपुढे एक साधू चालत होता. एका ठिकाणी थोडं थकलं असताना आम्ही दोघी रस्त्याच्या कठड्यावर बसलो असता हे साधू महाराजही तिथे आलेत. आम्ही दोघी बसलेल्या पाहून ते आमच्या समोर असलेल्या बाकावर बसले. पसारकर काकांच्या मागच्या परिक्रमेत ते काकांना भेटले होते, त्यामुळे त्यांची थोडीफ़ार ओळख होती. त्यानुसार त्यांनी काकांची चौकशी केली आणि काकूला विचरलं, “काकाजी आगे चले गये क्या?, आणि मग ते म्हणाले, ऐसाही होता है परिक्रमा में, कोई किसीका नही होता… आणि शेवटी ते म्हणाले, *जीवन तो एक परिक्रमा ही है*”

या सगळ्याचा मी नीट विचार केला असता या जीवनात प्रत्येक जण आपापल्या वाटेवर जातो आहे आणि इथे कुणीही कुणाचं नाही, इथे प्रत्येकाला आपला मार्ग एकट्यानेच चालायचा आहे, असा काहिसा निष्कर्ष माझ्या मनाने काढला.त्याचबरोबर इथे आपलं काहीही नाही हे ही समजलं पण ते अमलात कसं आणायचं हा प्रश्न कायम होता. तेव्हा आपण आपल्या स्वत:ला वारंवार समजावून सांगण्याशिवाय हे समजणार नाही हे लक्षात आलं आणि त्याप्रमाणे मी स्वत:ला समजवू लागले.

पुढे, म्हणजे बरच पुढे, गुजरात मधे असताना कांदरोज नंतर मला एक साधू महाराज भेटले. त्यावेळी ते माझ्या सोबत, म्हणजे थोडं फ़ार मागेपुढे होते. ते म्हणाले, “अकेले चल रही हो?”.. मी सांगितलं, अभीतक कुछ लोक साथ थे, अब मै अकेले चल रही हू.” ते म्हणाले, “बहूत

अच्छा, अकेले ही चलो, वैसे भी यहा तुम्हारा कुछ नही है. एक मंत्र बताता हू, याद रखना तो आसानी होगी”  मला वाटलं हा मंत्र चालताना संकट येऊ नये म्हणून असेल किंवा, तत्सम काही असेल, पण तो मंत्र होता *“इदं न मम.*

ते म्हणाले “ बेटा जी, ना ये दिन तुम्हारा है, ना रात, ना ये शरीर, ना ही कोई रिश्ता.. जो तुम्हे मिल रहा है वो तो समय का दान है, जैसे मिला है वैसे ही चले जायेगा, रहेगा नही.. तो इसलिये तुम्हे जब भी कोई भी चीज मिले, उसे जीने से पहले खुदको यकीन दिलाओ, कहो के ये मेरी नही है, जितने समय तक मेरे पास है वह मेरे लिए है, परंतु मेरा उसपर अधिकार नही है. जब तुम्हारा अधिकार ही नही है तो उसके प्रती कैसा ममत्व? कैसी ममता? बस कहते जाओ..इदं न मम..!

अगदी हाच विचार मी आधी केला होता आणि इथे या साधू महारांजानी माझ्या विचार करण्याची दिशा योग्य आहे असा संदेश दिला. तर असा हा मंत्र, इदम न मम… अगदी हातवर पडलेल्या प्रसादापासून तर अंगावरच्या दागिन्यासकट, पोटच्या गोळ्यापासून तर कपाळाच्या कुंकवापर्यंत..इदं न मम..ज्यावेळी मी पुढे महेश्वरला गेले तिथे तेव्हा पोटच्या गोळ्या बद्दलच्या जिव्हाळ्या विषयी बराच सत्संग झाला, पण तो महेश्वर च्या भागात लिहीन.

पुढे हरि धाम आश्रमात म्हणजे गोरा कॉलोनी नंतर, गुवार इथे आम्ही मुक्काम करायचं ठरवलं. इदं न मम हे तोपर्यंत घर करून होतच. इथे विचारांनी अजून एक दिशा घेतली. ह्या “मम”  बद्दलचे विचार मनात येऊ लागले. हे माझं नाही…  पण माझं काय आहे हे समजून घेण्या आधी हा “मी”  माहित असायला हवा! अर्थात ह्या मी पेक्षाही ह्या “मी” कडे पुरवलं जाणारं लक्ष जास्त धोकादायक असावं असं वाटलं. काय झालं, गुवारला हरि धाम आश्रमात असताना बरेच गांजा धारी परिक्रमावासी आजूबाजूला होते. तिथे तो गांजा चा वास पसरला होता. मला अजिबात सोयीचे वाटत नव्हते. आणि तेव्हा विचार आला, ह्या मनाचे फ़ार जास्त लाड पुरवले जात आहेत. आपल्याला वाटलं तसं झालच पाहिजे हा अट्टहास कशासाठी?आणि

जगावयाच्या प्रत्येक दिवशी आपण, म्हणजे आपलं मन काहितरी ठरवतं आणि त्या मागण्या पूर्ण करण्यात आपला दिवस जातो..दिवस दिवस जाता जाता आयुष्य जातं. ह्याच्याकडे त्रयस्था सारखं बघता येईल का? म्हणजे आपण अनोळखी माणसाशी कसं तेवढ्यापुरतच बोलतो, तसं करायचं.. आता नेमकं उत्तर मला पुढे मिळालंय पण ते पुढेच सांगेन. विचारांची दिशा बदलत गेली हे मात्र सांगू शकेन.

इथून पुढे आम्ही आनंद आश्रमात गेलो. काही जागा खूपच सकारात्मक असतात. तसाच हा अनंद आश्रम. तिथल्या मंदिरात माणुस हरवून जाईल अशी शांतता आणि असेच कंपंन देखिल. पंचतारांकित आश्रमांसारखा हा आश्रम, निटनेटका, पॉश, आणि भरपूर सुविधा देखिल. गुजरात मधे धनाची आणि मनाची दोन्ही श्रीमंती बघायला मिळते. मोठाले बगीचे, कारंजी आणि काय काय. जेवणसुद्धा अगदी पंचपक्वान्नांनी भरपूर होतं. जेवण झाल्यावर गरमा गरम दूध. झोपायला मोठ्याला खोल्या, आंघोळीला ऐसपैस बाथरुम. परिक्रमेत आल्यानंतर असं वैभव पहिल्यांदाच बघितलं. खरं सांगू, अगदी पहिल्यांदाच फ़ोम च्या मऊ मऊ गादीवर बसलेल्या एखाद्या गरीब लहान मुलाला जे कौतुक वाटत असेल नं तसं वाटलं तेव्हा… हे आपलं नाही हे त्या मुलाला महित असतं, मात्र तो क्षण महत्त्वाचा आणि तेवढा जगायचा, हेही त्याला माहित असतं. म्हणूनच तो कौतुकानी सगळं अनुभवत असतो मात्र हे मला मिळालं पाहिजे ही आसक्ती निदान त्या वेळी तरी त्या मुलाच्या मनाला शिवत नाही. अगदि तसं काहीसं झालं होतं.. इदं न मम, म्हणजे नक्की काय ते समजलं होतं आणि म्हणूनच जे मिळतय ते बोनस होतं सगळं. ते सुख जितका वेळ आहे तो क्षण त्या सुखाचा, इतकं महत्त्वाचं.

इथे जेवण आणि नंतरची शेकोटी वगैरेची मजा घेऊन आम्ही आमच्या खोलीत गेलो. आम्ही ६ जण होतो. इथे एक विचित्र अनुभव आला. इतकी सकारात्मक जागा आणि असा विचित्र अनुभव? काही समजेना.. झालं असं की रात्री बारा साडेबाराच्या सुमारास, अचानक मयुरेश दादा झोपेत मोठ्या मोठ्यांदा ओरडू लागले, खूप घाबरले होते ते, त्यांना दरदरून घाम

फुटला होता. आम्ही सगळे झोपेतून जागे झालो पण मयुरेश दादा मात्र अजूनही ओरडत होते. त्यांना जागं केलं तेव्हा काहितरी भयंकर स्वप्न पडल्याचं त्यांनी सांगितलं. काहीतरी अघटित घडावं तसं..नक्की काय ते मी विचारलं नाही पण अंदाज आला मला! खूप विचित्र वाटलं त्यावेळी. इतक्या सकारात्मक जागी हे असं स्वप्न? पण असं नसतं. अश्या स्वप्नांचा आणि जागेचा संबंध नसतो. तो संबंध तुमचा आणि तुमच्या साधनेचा असतो. हे मी खात्रीपूर्वक सांगते कारण असाच अनुभव मला चिखल्दा इथे आला. अगदी वासुदेवानंद सरस्वती, म्हणजे मोठे महाराज, माझ्या गुरुंचे गुरु, यांनी ज्या ठिकाणी चातुर्मास केला तिथे मी थांबले होते, त्याच मंदिरात.. अगदी त्याच खोलीत. तरीही आला तसा अनुभव, पण मी आता सांगणार नाहीये. आपण चिखल्द्याला जाऊ न तेव्हा सांगणार आहे.

आता दुसरा अनुभव सांगते. गुवार हून पुढे आम्ही सगळेच आगे मागे होऊ लागलो. मी काका आणि काकू मागे आणि मयुरेश दादा, सुरेखा ताई आणि स्मिता पुढे. पण आम्ही इतके दिवस बऱ्यापैकी सोबत जात असल्याने ताटातूट होईल असं काही वाटलं नाही. मात्र तपोवन आश्रमाच्या मुक्कामा नंतर तशी ताटातूट होईल याचे संकेत मिळू लागले. तपोवन आश्रम मैया किनारी आहे. आम्ही दत्त जयंती तिथेच केली. आणि दत्त जयंतीलाच, दत्त जन्मानंतर लगेच, मला मयुरेश दादा चा फ़ोन आला.. " कुठे आहेस?, लवकर किनाऱ्यावर ये, लग्गेच" . मी किनाऱ्यावर गेली तर समोर पाण्यावर लांब लचक मगर मैया तरंगत होती. अगदी १० -१२ फुटावरुन तिचं दर्शन झालं. तो किनारा रमणीयच आहे. तिथे जप केला असता अतिशय मन लावून जप झाला. खूप समाधान कारक वाटू लागलं. मात्र ताटातुटीचा तो अनुभव इथेच आला.

इथे जप केल्यानंतर मला कुणाच सोबत जाऊ नसे असं मनातल्या मनात वाटू लागलं, पण असं बोलून दाखवणं योग्य नव्हतं. आम्ही एका परिवारासारखे सोबत होतो, त्यामुळे असं करणं मला प्रशस्त वाटत नव्हतं. पण परिवार म्हंटलं म्हणजे गुंतणं आलं. बंधनं आलीत.. आणि तीच सोडायला आपण परिक्रमेला आलो आहोत. द्वीधा मनस्थिती होऊ लागली तशी मैयाने ही

काळजी घेतलीच. आता मी एकटी, काका काकू, आणि सुरेखा मयुरेश आणि स्मिता असे गृप आपोआपच पडलेत. आता आमचे मुक्कामाचे ठिकाण एक असे मात्र चालताना आम्ही वेगवेगळे चालत असू. या आधी तावसे काका काकू आमच्यापासून असेच वेगळे झाले होते. आणि असेच अनेक लोक एकत्र येतात आणि वेगळे ही होतात. याला कारण आहे. आपण माणसं आहोत. आपल्या सोबत कुत्रा मांजर जरी असलं तरी कालांतराने आपल्याला त्याचा लळा लागतो. मग हाडा मासाची माणसं सतत सोबत असतील तर लळा लागणं स्वाभाविक आहे. परिक्रमेच्या मूळ हेतू लाच जर तडा जात असेल तर अर्थ तरी काय? आणि म्हणून ती मैयाच असं काहीतरी घडवून आणत असते. जेणेकरून तुम्ही तुमच्या संकल्पासाठी योग्य पद्धतीने तयार व्हाल.

मी माझा जप झाल्यावर आश्रमात परत आली तोवर ही मंडळी पाठीवर बॅगा लावून तयार होती. मला माझं आवरून तयार व्हायला वेळ लागणार होता. मी मंडळी ना पुढे जायला सांगीतलं आणि त्याप्रमाणे मंडळी पुढे गेली. आता पुढे कोण कुठे जातं, कोण कुठे थांबतं माहित नाही. पुढचा आश्रम तसा जवळ होता. मी एकटेच निघाले. रस्त्यात मला एक म्हातारे गृहस्थ भेटलेत आणि “रामानंद आश्रम मे स्वामीजी के दर्शन करके जाना असं सांगितलं” . मी रामानंद आश्रमात पोचले. तिथे आसन लावायला म्हणून ऑफ़िस मधे गेले तर तिथे आधीच सुरेखा ताई, स्मीता आणि मयुरेश पोचले होते. ते ही इथेच थांबणार होते. आम्ही पुन्हा एकदा एकत्र आलो. हा असा खेळ भालोदपर्यंत सुरू होता, आणि तिथून पुढे मात्र आम्ही वेगवेगळे झालो.

इथे रामानंद आश्रमात खूप छान अनुभव आला. तिथे गादीवर सध्या स्वामी अभिराम दासजी त्यागी महाराज आहे. दिसायला अगदी रामदास स्वामींसारखे. अतिशय तेजस्वी. त्यांचा सत्संग खूप वेगळा असतो. तिथे आलेला अनुभव आणि सत्संग या दोन्हीबद्दल पुढच्या भागात सांगते.

*नर्मदा परिक्रमा – एक विलक्षण अनुभूती- भाग २७

*नर्मदे हर.*

रामानंद आश्रमात जाण्या आधी रस्त्यात मला एक म्हातारे गृहस्थ भेटलेत. त्यांनी सांगीतलं रामानंद आश्रमात अवश्य जा, तिथे तुम्हाला तुमच्या अनेक प्रश्नांची उत्तरं मिळतील. तिथे सत्संगांची एक पद्धत आहे. तिथे एक पाळणा आहे, त्या पाळण्यावर आपण आपले प्रश्न लिहायचे आणि नाव मात्र लिहायचं नाही. स्वामी अभिराम दास महाराज आपल्याला आपल्या प्रश्नांची उत्तरं देतात.आणि त्या सत्संगाला बरीच मंडळी मुद्दाम म्हणून उपस्थित राहतात म्हंटल्यावर मला तिथे जावसं वाटलं. शिवाय संत महात्म्याचं दर्शन होणार.

खरं तर काय प्रश्न विचारावा असाच प्रश्न पडला, कारण माझ्या प्रश्नांची उत्तरं मला हळू हळू आणि आपोआप मिळत होती. म्हंटलं, बघू, वेळेवर जर वाटलं काही विचारावसं तर विचारू नाहीतर राहिलं. आमच्यापैकी अनेकांनी परिक्रमा पूर्ण होईल का असं विचारलं होतं. मला ते अजिबात विचारवासं वाटलं नाही. आमच्यातील एकाने *"गुरू कसा करावा" * असा प्रश्न केला. त्याचं उत्तर देताना ते म्हणाले, *"आपको खुद गुरू करनेकी जरूरत नही है. जब आपके नसीब मे गुरू का आना लिखा होगा, तब आपका गुरू आपको खुद ढुंढ लेगा. आप गुरु ना ढुंढ सकते है, ना आप उनकी योग्यता परख सकते है. जिस गुरू की योग्यता आप ने परख ली हो वो आपका गुरू हो ही नही सकता" *. इथे मला माझा अनुभव आठवला. परिक्रमेच्या आधी मला गुरुमंत्र मिळाला होता. हा अनुभव खरं तर मी आधी ही सांगितला आहे, आपल्या या लेखमालिकेच्या दुसऱ्या भागात, पण संदर्भ लागावा म्हणून पुन्हा सांगते.

मी परिक्रमेला जाण्याचा निर्णय घेतला आणि ठरल्याप्रमाणे मी इंदोरला आले. माझी आत्या इंदोरला असते तिच्याकडे मी मुक्कामाला होते. माझ्याकडे सगळेच नाना महारांजाचे अनुग्रहीत आहेत, पण अजून माझा अनुग्रह झाला नव्हता. अनेक वर्षांपूर्वी मी अनुग्रह घेणार होते, नाना महाराज ज्या भक्ताना अनुग्रह देणार होते त्या वहीत माझं नाव आणि अनुग्रह घेण्याची तारीख ही नमूद झाली होती, पण पुन्हा तेच… .आपण काहीच ठरवत नसतो… नाना महारांजाची तब्येत बिघडली, त्यांनी देह ठेवला, आणि माझा अनुग्रह घ्यायचा राहून गेला. मला खूप वाईट वाटलं होतं… तेव्हा मी १५-१६ वर्षांची असेन. मी ठरवलं, आता अनुग्रह घ्यायचाच नाही. माझे गुरू नानाच… . मला दुसऱ्या कुणाच कडून अनुग्रह घ्यावासाच वाटला नाही… आणि मी घेतला ही नाही. मनात मात्र मी नेहेमीच नानांनाच माझे गुरू समजत राहीले. तर गंम्मत अशी झाली की आत्ता म्हणजे नर्मदा परिक्रमा सुरू करण्याच्या दोन दिवस आधी मला आत्यानी विचारल, “काग?, तुझा मंत्र झालाय नं घेऊन?” आणि मला अचानक मंत्र घ्यावासा वाटू लागला. रात्री साडे अकराला मला खूप बेचैनी वाटू लागली आणि गुरुमंत्र हवाच हे प्रकर्षाने जाणवू लागलं. मी माझ्या आत्येभावाला सांगितलं… त्याने सकाळी बाबासाहेब तराणेकर (नानांचे नातू) यांना फ़ोन केला. माझी आधी भेट झाली होती, मी परिक्रमेला जाणार हे सांगून नानांचा आणि बाबा साहेबांचा आशिर्वाद घेऊन आले होतेच पण आता मला गुरुमंत्र हवा होता. बाबासहेबांना परगावी जायचे असतानाही, लेकरू परिक्रमेला जातय म्हणून वेळात वेळ काढून, त्याच दिवशी मला गुरुमंत्र दिला. माझ्या परिक्रमेला निघण्याच्या आधीच माझ्या गुरुंनी मला पंखाखाली घेतलं..स्वामी अभिरामदास महारजांनी अगदी चपखल सांगीतलं होतं.

माझ्या मनात अचानक माझ्या आयुष्याबद्दल विचार येऊ लागले. आयुष्यात मी जे काही केलं ते अगदी मनापासून केलं. लग्न झालं तेव्हा जेमतेम बीएससी होते, तिसऱ्या वर्षीची परिक्षासुद्धा लग्ना नंतर दिलेली. त्या नंतर एम एस सी करायला घेतलं, दिवस राहिले, आणि मला एम एस सी बंद करावं लागलं. मग कंप्युटर कोर्स, शाळेची नोकरी, दोन विषयात एडिशनल बीए, बीएड, पुन्हा एकदा एमएससी आणि मग पी.एच.डी. हे सगळ अगदी जीव

लावून केलं मी. मात्र यातली प्रत्येकच गोष्ट पूर्ण केल्यानंतर मला जाणवायचं हे आपल्या अयुष्याचं ध्येयं नव्हतच मुळी! मग आपल्या आयुष्याचं ध्येय काय आणि ते नक्की कसं सापडेल?.. हाच प्रश्न विचारायचा, बघूयात काही उत्तर मिळतय का? ठरलं! मी हाच प्रश्न अभिराम दास जी त्यागी महाराजांना एका कागदावर लिहून दिला, खाली नाव लिहिलं नाही, "एक परिक्रमावासी" इतकच लिहिलं.

अभिरामदास महाराज जेव्हा मंडपात आले तेव्हा त्यांनी सगळ्या भाविकांकडे मोठ्या प्रेमाचा कटाक्ष टाकला. मी मान खाली करून बसल्या जागेवरूनच त्यांना नमस्कार केला तसा त्यांनी आश्वासक नजरा माझ्याकडे टाकल्या, "हा बच्चा, मै समझ रहा हू" असं काहीसं त्यांच्या नजरेतून मला जाणवलं. माझ्या प्रश्नाचं उत्तर देताना त्यांनी भगवद गीतेच्या १२व्या अध्यायातले अनेक दाखले दिले.

"तुम जो कुछ कर रहे हो वो दिलसे कर रहे हो, उसे ईश्वर के लिये करो, ये समझ के करो की ये तुम्हे तुम्हारे इश्वर ने दिया हुआ कार्य है जिसे तुम्हे कोई अपेक्षा ना करते हुये करना है. इस कार्य करने मे ही तुम्हारा भला है. तुम अपने सही रास्ते पर चल रहे हो. तुम परिक्रमा मे आये हो, ये भी तो एक दिशा है! परिक्रमा मे आना अपने आप मे ही आपको मार्गदर्शन कर रहा है. आध्यात्मिक अभ्यास पर ध्यान बनाये रखे, आपका मार्ग आपको मिल रहा है, आपके उसके काफ़ी करीब है."

जो सहज प्रश्न माझ्या मनात होता त्याचं सहज उत्तर मला मिळालं होतं. असाच एक प्रसंग भालोद गुजरात मधे पण आला. पण ते त्यावेळी सांगेन. रामानंदस्वामी आश्रम खूप छान देखरेख ठेवून अद्ययावत आहे. इथे कुणीही साधकानी यावं, आपली साधना करावी, अगदी विनामुल्य. साधकांसाठी इथे वाचनालयाची सोय आहे. सन्यास्यांसाठी वेगळी सोय आहे. साधनेला अतिशय पोषक आणि शांत वातावरण आहे. शिवाय इथे राम मंदिर खूप प्रसन्न आहे आणि स्फ़टिक लिंगांचं शिवमंदिर आहे. एकंदरीतच आश्रम खूप रमणीय आहे.स्वामी

अभिरामदासजी महाराज स्वत: जातीनी लक्ष देऊन सगळ्या सोयी बघतात. त्यांच्या दिनचर्येत सकाळची पूजा अर्चा, व्यायाम अणि सत्संग असतो तर संध्याकाळी ते आश्रमापासून २ -३ किलोमिटर असलेल्या गोशाळेत पायी जाऊन गो पूजन करतात आणि तिथेच जवळ असलेल्या शिव मंदिरातसुद्धा आरती आणि अभिषेक करतात. प्रेमळ, आणि सात्विक संत आहेत स्वामी अभिरामदास महाराज. याच महाराजांचा अजून एक अनुभव म्हणजे मी ज्यावेळी त्यांच्याशी बोलत होते, म्हणजे मला माझ्या प्रश्नाचे उत्तर मिळाल्या नंतर, सत्संग झाल्यानंतर, मी नमस्कार करायला गेले त्यावेळी ते जे वाक्य मला बोलले तेच वाक्य पूर्ण परिक्रमेत अजून तीन सन्यास्यांकडून मला ऐकवायला मिळा्लं. ते वाक्य होतं “सब ठिक है बेटा, बस राम को मत छोडना” .. अगदी हेच शब्द, खलघाटला जात असताना एका तेजस्वी सन्यास्यानी मला बोललेलं मी मागच्या अनुभवात सांगितलेलं आहे. आज ते वाक्य जेव्हा दुस-यांदा आणि जसं च्या तसं ऐकलं तेव्हा त्यात काहीतरी संकेत आहे असं वाटलं मात्र उत्तर नीट सं मिळालं नाही, कारण ते पुढे मिळणार होतं.

आज इथून पुढे खरंतर कुंभेश्वरला जायचं होतं पण आज अजिबात ऊन नव्हतं, वातावरण थंड आणि रोगट वाटत होतं. चालायचा कंटाळा आणि आळस येत होता. याचं कारण ही होतं. ओखी नावाचं सायक्लोन येऊ घातलं होतं. आम्ही मैया किनारी चालत होतो. कधीही पाऊस पडेल असं वातावरण झालेलं. रस्त्यात छोटे छोटे पाडे दिसत पण सगळेच गरीब, तरीही मध्य प्रदेशातल्या गरीबी पेक्षा ही गरीबी जरा कमी होती. आता आज जास्त चालणं योग्य नव्हतं कारण रस्त्यात कुठे पावसाने धरलं तर आश्रय ही मिळणार नव्हता.

इथे कुणीतरी आम्हाला सांगितलं की वांदरीया नावाच्या गावाला पण रामानंद आश्रम आहे. आम्ही तो शोधत शोधत निघालो. एक छोटासा आश्रम सापडला. छानसा बगीचा एक किचन दोन खोल्या आणि व-हांडा. आम्ही वऱ्हांड्यात आसनं लावतो न लावतो तोच धो धो पावसाला सुरवात झाली. जसा काही हा पाऊस आम्ही पोहोचण्याचीच वाट बघत असावा.

आम्ही सुखरूप पोहोचावं म्हणूनच की काय आम्हाला कुंभेश्वरपर्यंत न जाण्याची बुद्धी झाली असावी.

पाऊस थांबल्यावर आम्ही मैया किनारी गेलो तेव्हा समजलं, जे झालं ते योग्यच झालं. इथे किनाऱ्याचि वाट दगडांचीच होती आणि पावसात त्यांच्या खालची वाळू वाहून जाते, त्यामुळे चालणं कठीण. बरच झालं आम्ही वांदरीयाला थांबलो. असं काहीतरी संकेत ती मैया आपल्याला देतच असते. अगदी व्यवस्थित लक्ष ठेऊन असते आपल्यावर.

इथे वांदरीयाच्या आश्रमात आधी आम्हाला आसनं व-हांड्यात लावायला सांगितली होती. आत एक खोली रिकामी होती. बाहेर खूप थंडी ही होती पण तिथला गडी माणूस काही आम्हाला आत डोकावून पण बघू देईना. आम्हाला आज इथे उघड्यावर थंडीतच झोपायला लागणार होतं. आम्ही सहा सात जण होतो आणि हा गडी माणूस एकटाच होता. आम्ही स्वयंपाकाला त्याची मदत केली. कढी खिचडी आणि उपासाची बटाट्याची भाजी असं भोजन प्रसादी चं जेवण तयार झालं. त्या गडी माणसाला काय वाटलं माहित नाही, पण जेवण झाल्यावर त्याने खोलीचं दार आम्हाला उघडून दिलं, म्हणाला, “बाहर थंडा है, अंदर आसन लगा लो.” आत एक खूप मोठं मारुती रायांचं फ़्लेक्स लावलं होतं.खूप बोलकं चित्र होतं ते. असं वाटलं ते म्हणताहेत, “मला केव्हाही आवाज द्या, मी आहेच पाठीशी!” आणि असच एक मारुतीरायांचा फ़्लेक्स मला जोगी टिकरीया ते अमरकंटक रस्त्यावर असलेल्या देवरा नावाच्या गावी, जिथे आम्ही मुक्काम केला होता त्या धर्म शाळेत पण होते. तेव्हा ही हे मारुती राया “मी आहेच पाठीशी, हवं तेव्हा आवाज दे” असं म्हणताहेत असं वाटलं होतं. आणि याहूनही पुढे, म्हणजे साधारण बरगी कॉलनी च्या पुढे मला एक वेगळाच अनुभव आला. कदाचित मला मारुती रायांचं दर्शन झालं, पण नक्की माहित नाही. तो अनुभव मात्र आता इथेच सांगते. वाचकांची लागलेली लिंक सारखी तोडावी लागतेय, ते मनाला पटत नाहीये.

तर तेव्हा माझ्यासोबत सुरेखा ताई वगैरे मंडळी नव्हती. नारेश्वरला माझ्या नर्मदा माईनी मला माझे “नर्मदा वडील” दिले. तो अनुभव मग सांगते आधी हा मारुती रायांचा अनुभव सांगते हं. हे नर्मदा वडील, त्यांना मी “बाबा” म्हणते, ते माझ्या सोबत असतानाची गोष्ट.त्यांचा पाय फ़ार दुखत होता. अगदि २ किमी चाललो ना की ते बसून जात, इतका त्रास होत होता. मग मी त्यांना म्हंटलं “ तुम्ही एखादा रिदम धरून चाललात तर कदाचित पाय कमी दुखेल” त्यांनाही ते पटलं, आणि दोघांनी हनुमान चालिसा चा रिदम ठरवला. हनुमान चालिसा एकदा म्हणायला साधारण ४ मिनिट लागतात. आम्ही ठरवलं, ११ वेळा अहुमान चालीसा होईस्तोवर थांबायचं नाही. म्हणजे साधारण ४५ मिनिटे सलग चालायचं. असं केलंलं हे तंत्र बरच उपयोगी पडलं. मग आम्ही तेच वारंवार करू लागलो. या वेळी अधुन मधून आम्हाला एक परिक्रमावासी दिसत असे. त्यांच्या जटा होत्या, काळी सावळी पण सुद्दढ शरीर, ६ फ़ूट उंची, कमरेला पांढरा पंचा, हाती कमंडलू, असे बाबा दिसत होते. ते आम्हाला अधुन मधूनच दिसत. शक्यतो आम्ही जेव्हा ४५ मिनिटाचा टप्पा पार करून आराम करत असू तेव्हा ते आमच्या पुढे जात असत. मात्र आम्ही त्यांच्या पुढे गेलेलं मला आठवत नाही. तर एका ठिकाणी आम्ही आराम करत असताना ते पण तिथे आले आणि आमच्या समोरच्या खडकावर बसले. नर्मदे हर झालं. मी त्यांना विचारलं “महारज जी, परिक्रमा मे हो?, कहासे उठायी आपने परिक्रमा?” ते म्हणाले “हा. वैसे तो मै परिक्रमा मे ही हू, कई सालों से परिक्रमा कर रहा हू” . माझे प्रश्न पुन्हा सुरु झाले, मी विचारलं “कोई और भी रास्ता है क्या? आगे पिछे तो आप दिखते नही हो, बस बीच बीच मे दिखते हो?” आम्ही रस्ता मार्गाने जात होतो. मला वाटलं हे महाराज किनाऱ्यावरून जात असतील आणि अधून मधून रस्त्यावर येत असतील, म्हणून मी त्यांना हा प्रश्न विचारला होता. ते म्हणाले “रास्ते तो बहोत होते है, तुम बुलाते हो तो मै आ जाता हू यहा,अब इतनी बार बुलाया तो आना तो पडेगा ना! नही बुलाओगे तो नही आउंगा” , मला काही कळेना, मी कधी या बाबांना बोलावलं? म्हंटलं जाऊ दे, हा कुणी ब्रम्हचारी बैरागी बाबा दिसतोय, बोलला असेल असच काहीबाही. ते साधू महाराज निघून गेले. मी आणि बाबा पण थोड्या वेळाने निघालो,

मात्र मनात विचार येतच राहिला.. मी या बाबांशी तर बोलले पण नाही आधी, मग मी बोलावलं आणि खूप दा बोलवलं,असं ते बाबा का म्हणाले? उत्तर सापडे ना.. म्हंटलं जाऊ दे, आपण आपला हनुमान चालिसा सुरू करू… . अहो काय सांगू, असा विचार मनात येतो न येतो तोच समजलं, आतापर्यंत किमान ५५ वेळा तरी हनुमान चालिसा म्हणून झाला असेल! इतका धावा तर आपण त्या मारुती रायांचाच करतोय… अगदी निरपेक्ष भावनेनी! ““हा. वैसे तो मै परिक्रमा मे ही हू, कई सालों से परिक्रमा कर रहा हू” . रास्ते तो बहोत होते है, तुम बुलाते हो तो मै आ जाता हू यहा,अब इतनी बार बुलाया तो आना तो पडेगा ना! नही बुलाओगे तो नही आउंगा” .. बाबांचे शब्द माझ्या कानात घुमू लागले आणि समजलं… हे तर खुद्द मारुती राया! काय नशीबवान आहे हो मी? नर्मदा परिक्रमा घडते काय, अश्वत्थामा, नर्मदा माई आणि आता मारुती राया दर्शन देतात काय… अजून काय हवय सांगा? असो..

तर आता पुन्हा परत येऊ रामानंद आश्रमातल्या त्या मारुती रायांच्या फ़्लेक्स पाशी. तिथे खूप शांत झोप लागली. आणि दुसऱ्या दिवशी आम्ही कुंभेश्वरला निघालो. कुंभेश्वर हून आम्हाला पुढे जाताच येईना. आम्हाला तिथेच ३ दिवस थांबून रहावं लागलं..का?पण तिथे राहून आम्हाला ३०००० वर्ष नर्मदा किनारी राहण्याचं पुण्य मिळालंय… ..कसं ते पुढच्या भागात सांगते.

*नर्मदा परिक्रमा – एक विलक्षण अनुभूती- भाग २८*

*नर्मदे हर.*

आज आम्ही कुंभेश्वरला पोहचणार होतो. इथे आमची राहण्याची व्यवस्था सौ जागृती सोमण यांच्या घरी केली होती. जागृती अतिशय लाघवी मुलगी, माझ्याच वयाची साधारण, किंचीत लहानच. आणि तिचे यजमान म्हणजे रवी भाऊ, ते ही अतिशय जीव लावणारे होते. आम्ही इथे पोचलो आणि पावसाला सुरवात झाली. पुन्हा एकदा जाणवलं, पाऊस आम्ही पोहोचण्याची वाट बघत होता. आम्ही मैया किनाऱ्यानी आलो होतो, त्यामुळे घाट चढून वर आलो आणि समोर आनंदी चेहऱ्याच्या जागृती मैया नी आमचं स्वागत केलं. इथे ३ दिवस राहण्याचं महत्त्व आहे. इथे एकदा नर्मदा स्नान झालं की १०००० वर्ष काशीला राहण्याचं पुण्य मिळतं. आमचं २ दा स्नान झालं. पण बाकी दिवस मात्र थंड वातावरण असल्याने घरातच स्नान केलं, मैयावर स्नान केलं नाही. २०००० वर्ष रहिल्याचं पुण्य मिळाल, अजून किती हवं आता? असो. इथे शनी देवाचं मंदिर तर आहेच मात्र त्यांच्या दोन्ही बायकांची पण मंदिरं आहेत. त्यांची नाव आहेत छोटी पनोती, आणि मोठी पनोती. तुमचे होत नसलेले कार्य यांच्या दर्शनाने पूर्ण होतात. आपण बरेचदा " पनोती लागली"  असं म्हणतो बहुधा त्याचं कारण हेच असावं. या पनोती देवींची कृपा कुठेतरी कमी पडत असावी नक्की.

कुंभेश्वरला असताना ओखी वादळाचे वारे जोरात वहात होते. असं समजलं होतं की विमलेश्वरला २०० परिक्रमावासी अडकून पडले आहेत कारण वादळामुळे नावा समुद्रात सोडल्या जात नाहियेत आणि अजून पुढचे १०- १२ दिवस नावा सोडल्या जाणार नाहीयेत. बाकी जे परिक्रमावासी आमच्या पुढे चालताहेत ते पण काही दिवसात विमलेश्वरला पोहचणार आहेत, तेव्हा तिथे अजून जास्त परिक्रमावसी होतील आणि गर्दी खूप होईल. त्यामुळे आम्ही असू तिथेच ३ दिवस, मग पुढे पुन्हा ३ दिवस असं थांबत थांबत पुढे जायचा विचार केला. जे

लोक अडकले आहेत ते आधी मोकळे झाल्याशिवाय आम्हाला नावेत बसायचा नंबर मिळणार नाही. त्यामुळे घाई करण्यात काही अर्थ नव्हता. कुंभेश्वर च्या पुढे जिथे जिथे ३ दिवस राहण्याचं महत्त्व आहे तिथे तिथे आम्ही राहिलो. ओखी वादळामुळे होणाऱ्या नुकसानाची चर्चा सुरू होती, आम्हाला मात्र अगदी पुण्याची कमाई या वादळाच्या येण्यामुळे घडून आली. अन्यथा, चातुर्मास करायचा नाही म्हणून आम्ही ३-३ दिवस न थांबता चातुर्मासाच्या आधी परिक्रमा पूर्ण करण्याचा प्रयत्न करत होतो.

इथून पुढे शुकदेवला जायचं होतं. शुकदेव मंदिर खूप छान आहे. इथे येऊन प्रसन्न ही वाटत आणि नकळत त्या वैराग्याची मागणी मागावी असं होऊन जातं.

*शुकासारिखे पूण वैराग्य ज्याचे*... ..पूर्ण वैराग्याचे धनीच ते··· लहान पणी शिकलेला श्लोक आठवून गेला. इथे ज्या मैयाजींनी आम्हाला भोजन प्रसादी खाऊ घातली तिच्या दोन लहान लहान कन्यका तिला सोडीनात, काम करू देई ना, आम्ही तीला म्हंटलं तू लेकींना बघ, आम्ही करतो प्रसादीचं, तर ते तिला पटेना, दोन लहान लहान मुली सांभाळत, चुली जवळ त्यांना बसवून मैयाजींनी स्वयंपाक केला. खरंच इतकं करतात हे लोक आपल्यासाठी नं!

दुसऱ्या दिवशी काय झालं कळेना, पण आतापर्यंत मागे पुढे, एकत्र राहणारे आम्ही ६ लोक वेगवेगळे झालो. मयूरेश, स्मीता आणि सुरेखा पुढे निघाले, मी काका आणि काकू मागून निघालो. इथे आम्हाला शेतातून रस्ता होता. मात्र इथे गम्मतच झाली. आम्ही दोन्ही गृप्स रस्ता चुकलो. चुकलो म्हणजे काय, एखादी वाट धरली की बरच लांबपर्यंत जायचं आणि ती वाट अचानक कुठल्या तरी केळीच्या बागेपाशी येऊन बंद व्हायची, म्हणजे पुढे वाटच नाही, मग पुन्हा मागे यायचं, दुसरी वाट धरायची, मग ती पण अशीच बंद!, अशा ३ ते ४ वाटा करून झाल्या, चांगल १२-१३ किमी अंतर चालूनसुद्धा आम्ही पुन्हा जिथून सुरू केलं तिथेच! आज मुक्कमावर पोहचू की नही असं वाटू लागलं. आता काय करावं समजेना. इथे या बागांमधे चिटपाखरू नाही, विचारायचं तरी कुणाला? एक अजून वाट होती जरा दूरून, म्हंटलं ती पण

करून पाहू, आता दुसरा उपाय तर नाहीये. त्या वाटेवर पुढे गेलो, तिथे एक घर होतं. ते घर बघून इतका आनंद झाला म्हणून सांगू, वाटलं चला, म्हणजे काही नाही मिळाली वाट पुढे तर निदान इथे मुक्कम तरी करता येईल. ते घर पाहून आम्हा तिघांनाही आधार मिळाल्यासारखं वाटलं आणि त्या दिशेने आम्ही चालू लागलो. घराजवळ पोहचलो तर घर बंद, गेल कित्येक दिवस य घरात कुणीच आलं गेलं नसावं. समोरच्या खिडक्या बंद, बाहेरून त्यावर कोळीष्टकं जमलेली, अंगणात गवत उंचंच उंच वाढलेलं,आणि सगळ्यात कमाल म्हणजे कमालीची भयाणता आणि गूढता तिथे आम्हाला तिघांनाही जाणवली. अचानक नकारात्मक लहरी यायला लागल्या असे वाटू लागले. आता इथून कसंही करून बाहेर पडायचं, बस! आम्ही पुन्हा एकदा मागे वळलो.

जिथून आम्ही त्या शेतात आलो होतो तिथपर्यंत पुन्हा मागे गेलो, आणि नर्मदे हर चा धावा सुरू केला. तिसऱ्या मिनिटाला एक माणूस मागून आला आणि म्हणाला, जो रस्ता बंद किया दिखेगा वहा से जाओ. आता गम्मत अशी झाली होती की ५ वाटा होत्या, त्यातल्या ४ आम्ही धुंडाळून झाल्या होत्या आणि एका वाटेवर झाडं, ओंडकी टाकून ती वाट बंद केली होती, मात्र तिथे पुढे वाट आहे अशी शंका ही आम्हाला आली नाही इतकी वाट लहान होती, वाटलं पुढे एखादी बाग असेल. पण तीच वाट बरोबर होती. त्या वाटेवर पुढे केळीची बाग होती, पण ती बाग ओलांडून मग पुढे रस्ता होता. केळींचे घड च्या घड लागलेल्या बागांतून, कमरेपर्यंत वाकून, त्या झाडांखालून गेल्या नंतर, म्हणजे साधारण अर्धा किमी असं चालल्या नंतर आम्हाला एक ओढा लागला, तो पार करून समोर चा छोटासा टेकडी सारखा उंचवटा पार करायचा होता, मग आम्ही कोटेश्वराच्या रस्त्याला लागणार होतो.

हा ओढा जरी तसा लहान असला तरी तिथे खूप चिखल होता. गुडघ्यापर्यंत अगदी. बुट काढून मी चप्पल घातली. ती फ़सली आणि तुटली, शेवटी अनवाणी चालण्याशीवाय पर्याय नव्हता. कसा बसा तो ओढा, तो डोंगर अनवाणी पार करत करत आम्ही पुढे गेलो खरं, पण

तेव्हा पायात जे काटे बोचले, अगदी बाभळी चे काटे बोचले तेव्हा अनवाणी परिक्रमा करणा-यांचा धैर्याचं आणि साधनेचं सामर्थ्य काय असेल याची कल्पना आली. या काट्यांनी मल २-३ दिवस त्रास दिला. पुढची परिक्रमा अनवाणीच करायची अशी कल्पना यावेळी तिथे पहिल्यांदा सुचली. गम्मत आहे नं, मला काट्यांचा त्रास होत होता मात्र परिक्रमा करावीशीच वाटत होती. किंबहुना काटे बोचून पाय दुखत होता तरी पुढच्या वेळी अनवाणी चालण्याची तयारी मनानी कशी काय दाखवली कोण जाणे?मात्र इथेच पुढे एक गम्मत झाली. माझी चप्पल तुटली होती. आश्रमात गेल्यावर बरेच दा जिथे शौचालयाची सोय नसते तिथे बाहेर जंगलात जाव लागायचं अशा वेळी स्लीपर चं काम पडायचं. आता माझ्याजवळ स्लीपर नव्हत्या, आणि दर वेळी फ्रेश व्हायला जायचं म्हणजे रात्री बूट घालून जावं लागणार होतं. पण ईलाज नव्हता. ज्या चपला असतील त्या घालून जायचं असं मी ठरवलं. आश्रमा बाहेर बऱ्याच चपला होत्या, आणि मी त्या फ़क्तच थोड्या वेळा साठी वापरणार होते, त्यामुळे खरं तर कुणी आक्षेप घ्यावा असही काही नव्हतं, मात्र इथे एक गम्मत झाली आणि एक, नव्हे दोन नव्हे तर तब्बल तीन ते चार दिवस ती गम्मत होत राहिली, कारण तो निव्वळ योगायोग नव्हता. सांगते. कुणाच्या चपला त्या व्यक्तीला न विचारता घालून जाणं मला प्रशस्त वाटत नव्हतं. "घालून जाऊ न कुणाच्या तरी "असा विचार मी केलाच होता खरं पण माझं मन धजलं नाही आणि त्या दिवशी अनवाणीच जंगलाच्या दिशेने गेले. मात्र रस्त्यात मला एक बाई भेटली, ती कुणी गावातली असावी, नुकतीच ती झाडीतून बाहेर आली होती, "मैयाची मेरी चप्पल पहन लो, काटे गड जायेंगे" असं म्हणत तिने तिच्या चपला दिला. दुसऱ्या दिवशी पुजारी महारांजानी दिल्या, आणि तिसऱ्या दिवशी एका परिक्रमावासीं नी दिल्या… मी एकदाही रात्री अनवाणी गेले नाही.

पुढे कोटेश्वरानंतर मात्र मी एकटीने चालण्याचा निर्णय घेतला. म्हणजे बाकी लोक आगे मागे असत.. मात्र चालताना मी सर्वात पुढे असायची, अगदी साधारण ३-४ किमी पुढे. असं होतं परिक्रमेत. बरेचदा आपण आपल्या ध्येयापासून दूर जातोय, आणि अयोग्य (म्हणजे आपल्या ध्येयपूर्ती च्या दृष्टीने अयोग्य) असलेल्या लोकांमधे आपण आपले ध्येय विसरतोय असं

वाटू लागलं की मैया आपल्याला त्या समूहापासून दूर करते. तसंच झालं, मात्र किंचितही एकटेपण किंवा भिती वाटली नाही. याऊलट जेव्हा जेव्हा मी एकटी चालायचे तेव्हा तेव्हा मला वेगळे आणि विलक्षण अनुभव मिळत जायचे.

पुढे, म्हणजे कोटेश्वराहून पुढे सिसोदरा आणि त्याहीपुढे कांदरोज नावाचं गाव होतं, आज तिथवर जाता यावं असं वाटत होतं. दुपारचे ३-३.३० वाजले असतील, कांदरोज अजून ८-१० किमी दूर होतं. पहिला टप्पा सिसोदरा, इथे आल्यावर मग पुढे जाता येईल का हा विचार करायचा. मी निघाले. थोडं अंतर चालून झाल्यावर रस्त्यात एका ठिकाणी चार बायका बसल्या होत्यात, त्यांना सिसोदरा कुठेय ते विचारलं.. " हमारे साथ चलो, हम भी उधर ही जा रहे है" असं म्हणत त्या उठल्या आणि चालू लागल्या. जणूकाही मी आली की उठायचं असं ठरवलं होतं त्यांनी, इतक्या पटकन उठल्या त्या. गप्पांमधे समजलं, त्यातल्या एकीचं माहेर नागपूर चं होतं… ती माझ्याशी छान मराठीत, अगदी नागपूरी मराठीत बोलू लागली. मी एकटी नसून माझ्या गावचं माणूस मला सोबतीला मिळालं होतं… सिसोदरा कधी आलं समजलच नाही. तिनी मला घरी बोलावलं पण तिचं घर बरच लांब असल्याने मला ते शक्य झालं नाही..पुढे कांदरोजची वाट दाखवून त्या चौघी आपापल्या घराकडे वळल्या.

आता रस्ता बराच एकट होता. घाट होता. इथे चौकात मला दोन माणसं दिसलीत, त्यांना विचारून मी रस्ता निश्चित करून घेतला. ती दोघं म्हणाली " मैया जी आप १.३० घंटे मे पोहोच जाओगे, लोग छोटा रास्ता बतायेंगे तो वो मत लेना" कुणी काही सांगितलं की त्याला प्रतिप्रश्न न करता जे सांगीतलय ते ऐकायचं असं एव्हाना ठरलं होतं, कारण आपल्यापेक्षा स्थानीय लोकांना माहिती जास्त आणि चांगली असते. त्यांनी सांगितल्या प्रमाणे मी चालू लागले. साधारण एखाद तासाने ही मंडळी माझ्या मागून पुन्हा आलीत आणि मला रस्त्यात थांबवलं. " मैयाजी, बस अब थोडाही बचा है, अब थोडा विश्राम कर लो" तसा अजून अंधार पडायला वेळ होता. मी थकले पण नव्हते, आणि विश्राम करण्यासारखं ते स्थानही नव्हतं. म्हणून मी

विश्राम करत नाही असं म्हणताच त्या मोटर सायकल वर मागे बसलेल्या माणसाने पिशवीतून एक छोटासा स्टूल बाहेर काढून माझ्या पुढे ठेवला. “मैयाजी पाच मिनिट तो बैठो” असं म्हणत लगेच एक थरमास आणि चहाचे तीन कप काढले, आणि आम्हा तिघांसाठी चहा ओतला … “आप को चाय पिलाना था” असं म्हणत चहा माझ्या हाती दिला. विचारलं तेव्हा समजलं, मला मघाशी ही दोघं ज्या चौकात भेटली होती, तिथून ८-१० किमी दूर आणि चौकापासून माझ्यापर्यंत ३ ते ४ किमी असे १४ किमी दुरून या दोघांनी माझ्यासाठी चहा आणि बिस्किटं आणली होती! फ़क्त चहा देण्यासाठीचा हा आटापिटा… का तर मैयाजी एकट्या चालताहेत, रस्त्यात काही नाही, त्यांची सेवा करायला हवी, ही एक सदभावना! काय म्हणावं याला?

याच रस्त्यावर पुढे एक हनुमानाचं मंदिर लागलं, आणि तिथे पण एक छानसा अनुभव आला… बरेचदा काही अनुभव फ़क्त अनुभवावे असे असतात… त्यातलाच एक… . म्हणाल तर काही झालंच नाही, आणि म्हणाल तर सारं विश्व माझं झालं, असा हा अनुभव… आणि हो,कांदरोज्ला पोहचल्याक्षणी मी आनंदाने रडूच लागले, हो, असच काहीतरी दिसलं मला तिथे … . पण या भागात नाही हं सांगणार… पुढच्या म्हणजे २९व्या भागात सांगते.. तोवर नर्मदे हर!

*नर्मदा परिक्रमा – एक विलक्षण अनुभूती- भाग २९*

*नर्मदे हर.*

तर सिसोदरा गावातल्या त्या दोन तरुणांनी दिलेला चहा पिऊन त्यांना निरोप देऊन मी पुढे निघाले. छान सोनेरी ऊन पडलं होतं. अजून सूर्यदेव व्यवस्थित दिसत होते, मात्र संध्याकाळचा गारवा हळू हळू जाणवू लागला होता. वातावरण प्रसन्न होतं. रस्त्याच्या दोन्ही बाजूला शेतं आणि खुरटी झुडपं होती. अगदी प्रत्येकच झाड वेगळं असावं असं वाटत होतं. जवळ हनुमानाचं मंदिर आहे असं सांगीतलं होतं, म्हणून ते येईस्तोवर हनुमान चालीसा म्हणत जावं असा विचार मनात आला, आणि मी हनुमान चालीसा सुरू केली. तेव्हा मला एक आनंददायक अनुभव आला. आता हा अनुभव आहे की माझ्या मनातल्या प्रसन्नतेचा आणि एकरूपतेचा भाग आहे ते नाही सांगता येणार, पण आनंदाची परिसीमा काय असते आणि तो आनंद इतका तेजोमय कसा असतो हे अनुभवण्याची संधी मला मिळाली हे नक्की.

मी हनुमान चालीसा म्हणायला सुरवात केली, मी आजूबाजूला झाडांकडे, रस्त्याकडे बघत बघत, आपल्याच नादात हनुमान चालीसा म्हणायला सुरवात केली. एक ओळ झाली आणि मी उजवीकडे बघत असताना, माझ्या डाव्या बाजूने कुणीतरी दुसरी ओळ म्हणतय असा भास झाला, मी डावीकडे पाहीलं तर तिसरी ओळ ऐकू आल्याचा भास झाला, माझ्या समोर, थोडं अंतर दूर कुणी तरी ती म्हणतय असं वाटू लागलं… .जसं कुणीतरी माझ्यासोबत हनुमान चालीसा म्हणत म्हणत जातय… मग काय, ज्या झाडाकडे बघीन ते झाड, ज्या दगडाकडे बघेन तो दगड, आभाळ, वाळलेली पानं… अगदी जिथे जिथे माझी नजर जाईल ते सगळंच माझ्याबरोबर हनुमान चालीसा म्हणतय असं वाटायला लागलं, किंवा असं जाणवायला

लागलं म्हटलं तरी चालेल. अश्या परिस्थितीत मी एकटी चालतेय असं मला जाणवलं देखील नाही, किंबहुना ही सगळी सृष्टी माझ्या सोबत आहे आणि माझ्यात समरस झाली आहे असच वाटू लागलं. खरं सांगते त्या वेळेचा जो आनंद आणि उत्साह आहे तो मला शब्दात मांडताच येत नाहीये. तुम्ही विचार करा न, करून तर बघा, सगळं जग, सगळी सृष्टी जेव्हा तुम्हाला सोबत करत असते त्या वेळेला अजून दुसरं काय हवं असेल तुम्हाला? *"And, when you want something, all the universe conspires in helping you to achieve it."* मला पाओलो सेलो च्या अल्केमिस्ट मधलं वाक्य आठवलं पण खरं सांगू हे त्याहीपेक्षा मोठं होतं, कारण इथे मला कुठलीही अपेक्षा नव्हती…  मला काहीही नको असताना सगळी सृष्टी मला मिळाली होती.ती ही अगदी अचानक. माझा हा आनंद कशावरच अवलंबून नव्हता, आणि म्हणूनच तो अक्षय आहे असं मला वाटतं.

हा अनुभव घेत घेतच मी कांदरोज च्या आधी येणाऱ्या हनुमान मंदिरात आले, तिथे मारुती रायाच्या दर्शनाच्या वेळेस मला पुन्हा तेच जाणवलं जे मी मागच्या एका अनुभवात लिहिलं आहे. *कधीही हाक घाल,मी तुझ्या सोबत असेन* असं मारुतीराया म्हणत होते जणू, आणि याची प्रचिती होऊन मारुती रायांचं दर्शन झाल्याचा अनुभव आपण वाचला आहेच, मात्र प्रत्यक्ष भेट देण्यापूर्वी मला असे संकेत अनेकदा मिळत गेलेत हे महत्त्वाचं. ते त्या त्या वेळेला आपल्याला समजत नाही मात्र म्हणून ते नसतात असं नाही. माझं हे आनंदाचं पर्व मी एकटी असताना जास्त तीव्रपणे जाणवत होतं… असेल, कारण तो आनंद आता शेअर होत नसावा … . आणि म्हणूनच की काय कांदरोज चा अनुभव मला आला.

कांदरोज च्या अश्रमात पाऊल ठेवत नाही तोच समोर खुर्चीवर एक सत्तरी च्या जवळपासचे गृहस्थ काहीतरी वाचन करत बसले होते. मी अजूनही माझ्या आनंद पर्वातच रममाण होते. मी माझं आसन लावलं, हातपाय धुतले आणि बाहेर पायरीवर जाऊन शांतपणे बसले. माझी परिक्रमा सुरु होण्या आधीपासून चे सगळे दृश्य माझ्या नजरेसमोर

चित्रपटासारखे येत होते. कसं माझं पीएच. डी. चं सबमिशन झालं, कसे मी लोकांचे अनुभव ऐकायला जायची, अरविंद मुळे काकांना भेटायला गेले असतानाचा आमचा संवाद सांगते. मी त्यांना भेटायला गेले त्यावेळी मी परिक्रमेला कधीतरी जावं एवढी इच्छाच फ़क्त मनात होती, मात्र ती अतिशय तीव्र होती. माझं कधी जायचं हे काहीही ठरलं नव्हतं.काकांनी विचारलं " ताई कधी जाताय तुम्ही परिक्रमेला?" मी सांगितलं, "कदाचित ओंकारचं म्हणजे माझ्या मुलाचं बी ई झाल्याशिवाय काही जाता येणार नाही" मात्र मुळे काका बोलून गेले "ताई मला तर वाटतय तुम्ही याच वर्षी जाणार" … . आणि असे काही चक्र फ़िरले की जुलै मधे झालेल्या ह्या संवादानंतर नोव्हेंबर मी परिक्रमेला गेले देखिल!, तर असे सगळे विचार मी करत त्या आश्रमासमोरच्या पायरीवर बसले होते, तितक्यात मागून आवाज आला, "सुरुचि ताई, या या, इथे भेट होईल असं वाटलं नव्हतं हो, कशी सुरु आहे परिक्रमा?"

बापरे, माझं नाव घेऊन, चक्क मराठीतून, आणि इथे गुजरात मधे कोण मला आवाज देतय? मी मागे वळून पाहीलं आणि मला अक्षरश: रडूच आलं. समोर खुर्चीवर एक सत्तरी च्या जवळपासचे गृहस्थ काहीतरी वाचन करत बसले होते, तेच माझ्याशी बोलत होते… ते मुळे काकाच होते. नागपूरहून आजच इथे आले होते… .मी त्यांना बघितले होतं पण अजिबात ओळखलं नाही..का कोण जाणे! मी त्यांना बघावं, बघूनही मला त्यांना ओळखता येऊ नये, नेमके त्यांचे विचार त्या वेळी माझ्या मनात यावेत, आणि मागून त्यांनी मला आवाज द्यावा… हे सगळं कसं एखाद्या मुद्दाम आखलेल्या योजने सारखं नाही वाटत? मी व्यक्त होण्याच्याही पलिकडे होते त्यावेळी…

*"जेव्हा आवडी भक्त जाहले।* *भक्तामाजी देव गवसले* *भजू कूणास, कुणी भजणे।* *भजनची आकळले अंती हो॥*"

अशी काहीशी माझी अवस्था झाली होती त्यावेळी. पण त्यावेळी मला एक मात्र जाणवलं. मी एकटी चालू लागले आणि त्या नर्मदा माईनी माझी जास्त काळजी घेणं सुरु

केलं.मला एकटं वाटू नये याची जबाबदारी तिनी घेतली, त्यासाठी सगळी सृष्टी मला देऊ केली सोबतीला, आणि इथे माझ्या परिक्रमेची सुरवात करून देणारे मुळे काका पण भेटवलेत!..

माझ्या बरोबर पण मागून येणारी मंडळी ही रात्री इथे येऊन पोचली होती.दुसऱ्या दिवशी सकाळी मला किंचित ताप होता. राजपराला जाऊन मी मुक्काम करावा असं मला वाटत होतं. तिथे जगदीश भाई परमार म्हणून एकजण सेवा करतात, तिथे चहा पाणी आणि प्रसादीची व्यवस्था आहे. हे अंतर फ़ार नाही, ७-८ किमी असेल, त्यामुळे इथे रात्री मुक्कामी थांबावं असा बाकी मंडळींचा विचार नव्हता, मात्र तब्येतीमुळे मी थांबून जाईन असं मला वाटत होतं. म्हणजे थोडक्यात निदान रात्री मुक्कामाला सोबत असणारी ही मंडळी उद्यापासून सोबत नसणारच… पण मी असा विचार केला होता, मैयाने नाही. काय झालं कुणास ठावूक, माझ्या मागोमाग, एक एक करून सगळेच इथेच थांबायचा विचार करू लागले, आणि थांबले पण!..एक दिवस मुक्काम करून दुसऱ्या दिवशी वेणूग्रामकडे जायला निघालो.

या रस्त्यात अनुभव म्हणून नाही पण राष्ट्रीय एकतेची भावना अजूनही सामान्य जनमानासत शिल्लक आहे हे जाणवलं. काही अंतर चालत गेल्यावर आम्हाला एका मुलाने बिस्किटाचे पुढे दिले, प्रत्येकी २, मोठाले आणि अगदी आग्रहाने. यात काय राष्ट्रीय एकता? आहे ना, हा मुलगा मुस्लीम धर्माचा, मात्र त्याचा परिवार गेल्या अनेक वर्षांपासून परिक्रमा वासींना बिस्किट देतात, आणि नर्मदे हर चा गजर करून परिक्रमावासिंच्या पाया देखील पडतात. आणि तरीही या परिवाराला सेवा करण्याचं समाधान पूर्णपणे मिळत नाही. त्या मुलाशी बोलणं झालं तेव्हा तो म्हणाला, " हमे बहोत अच्छा लगता है परिक्रमावासीयों की सेवा करना, हम चाहते है की परिक्रमावासी हमारे घर मे आये, पर हम मुस्लीम है इसलिये लोग हमारे यहा नही आते. हम पहले मांस मच्छी खाते थे, पर अब नही खाते, फ़िर भी लोग घर पर खाने के लिये मना करते है, इसलिये बिस्किट देना ही ठिक है" . इथे नर्मदा सगळ्यांचीच आई आहे, हे बघून छान वाटलं.

असाच नाही पण खूप वेगळा आणि खूप रोमांचक अनुभव दमगढ च्या आधी म्हणजे दम्हेडी नंतर जे जंगल लागतं तिथे आला..पण तो आता सांगणार नाही, तो तेव्हाच सांगेन..आता मात्र एक मजेदार किस्सा सांगते.

पूर्ण परिक्रेमेत तुमच्या सोबत जर कोणी कायमरित्या चालत असतील तर त्यातली एक म्हणजे आपली नर्मदा मैया, जिला इथे या भागात "मैया जी" असं म्हणतात, आणि दुसरे म्हणजे "पारले जी" . गुजराती प्रेम हे फ़ारच गोड आहे आणि पारले जी सारखंच स्ट्राँग आहे. इथे इतके बिस्किटाचे पुढे रोज मिळायचे की जीव नकोसा होऊ लागला..आणि इतक्या प्रेमानी ते दिल्या जायचे की नाही म्हणायला काही वावच नाही.काही खाल्ली, जी खाल्ल्या गेली नाही ती पिशवीत जमा केली. आता वजनही सहन होईना, शेवटी माझ्याजवळची ५ पाकिटं मी रस्त्यात दिसलेल्या लहान मुलांना देऊन टाकली. पण असं करून मी बिस्किटांपासून सुटले असं मला वाटलं होतं तरी असं नव्हतं. दगडू महाराज आश्रमातून बाहेर पडत नाही तोच १० बिस्किटांच्या पुड्याचा मिळून जो एक मोठा पुडा असतो तो मला देऊ करण्यात आला.."मी दिलेली बिस्किटं तू देऊन टाकलीस काय? घे तुला दुप्पट देते, घ्यावीच लागतील तुला" असं ती मैया म्हणत असावी बहुधा… आणि खरं सांगू, यानंतर मात्र फ़ार बिस्किटं मिळालीच नाहीत … हे १० पुडे बरेच दिवस चाललेत मला…

या गुजराती लोकांच्या बोलण्यावर न अज्जीबात विश्वास ठेऊ नये… फ़ार गांभिर्याने घेऊ नका हो, एक गम्मत आठवली म्हणून लिहिलं असं. सांगते, तुम्ही कुठल्याही गुजरात्याला कुठलाही पत्ता विचारा " अभि हयीच छे" हेच उत्तर आपल्याला मिळतं. आता खरी गम्मत या "हयी" शब्दाची आहे. हयी चा अर्थ १ किमी ते ७ किमी असा कितीही असू शकतो. अभि हयी छे म्हंटल्यावर ७-८ किमी तरी चालावं लागेल हा विचार मनात पक्का असू द्यावा लागतो. अर्थात गुजरात संपता संपता त्याची सवय होतेच… असो, हा झाला गमतीचा भाग.

पुढे “हयी”  च्या नादी न लागता एका इंद्रेश्वर महादेव मंदिरात आसन लावलं. इथून पुढे वेळूग्राम आणि भावपुराला जायचं होतं, मात्र भावपुऱ्याच्या ही पुढे सरसाडला आम्ही मुक्काम केला. या मुक्कामात एका छान कुटुंबाशी ओळख झाली. पुढे वढवाणा ते मणीनागेश्वर फ़ार सुंदर म्हणजे अगदी रमणीय रस्ता आहे, तो अनुभवला. मणीनागेश्वरला एका सन्याश्याशी सत्संग झाला, आणी भालोदला माझ्या जीवनाला पुन्हा एक दिशा मिळाली. भालोद हे स्थान माझ्यासाठी अतिशय महत्त्वाचं, प्रेमाचं आदराचं आणि जिव्हाळ्याचं स्थान आहे कारण इथे आलेला अनुभव माझ्या परिक्रमेतला अत्यंत महत्वाचा अनुभव आहे. पण मी तो पुढच्या म्हणजे ३० व्या भागात सांगणार… . नर्मदे हर.

*नर्मदे हर.*

इंद्रेश्वर महादेवपासून आतापर्यंत अधून मधून सोबत असणारे पसारकर काका काकू मागे पडलेत आणि मयूरेश सुरेखा ताई पुढे आणि स्मीता आणि त्या नंतर मी असे चालू लागलो. एकट्याने चालण होत होतं तरी अजूनही या बाकी मंडळी एकतर मुक्कामावर किंवा अधे मधे सोबत भेटत असत. *मात्र अनुभव येतात ते एकट्याने जास्त, हेच खरं*. आजचं हे अंतर बरच लांबचं होतं. वाटेत चहा, ताक वगैरे काहीही आज मिळालेलं नव्हतं. लोक वस्ती गावा गावापुरती दिसत होती मात्र गावामधे बरीच अलिप्तता जाणवली.खरं तर मला भावपुऱ्याला थांबायचं होतं पण तो रस्ता जरा डवीकडे वळून जात होता, आणि भावपुऱ्याचा रस्ता तिकडे जातोय हे काही मला कुणी सांगितलच नाही. म्हणजे पुढे चालणारे मयुरेश सुरेखा आणि स्मिता हे नक्की कुठे गेलेत हे ही मला माहित नव्हतं, आणि जसा रस्ता जातो तसं तशी मी चालत होते, वाटेत एका ठिकाणी दोन परिक्रमावासी मुक्काम करताना दिसलेत, त्यांनी सांगितलं, की भावपुरा मागे राहिलं आणि आता बरच अंतर पुढे राहण्याची सोय नाही. ते दोन परिक्रमावासी मध्यप्रदेशी होते. त्यांची चालण्याची क्षमता आणि गती माझ्यापेक्षा खूपच जास्त होती, त्यामुळे पुढे मला एकटीनेच जाणं भाग होतं.वाटेत एक नदी ओलांडून जायची आहे हे समजलं. नदीचं पात्र बरच मोठं होतं. जोडे काढून चालावं लागणार होतं. नदी कुठून उतरायची हेच समजत नव्हतं. अचानक आभाळ भरून आलं होतं आणि पाऊस पडेल की काय अशी भिती वाटत होती. नदी मधे उतरून जायला एक बराच खोलगट रस्ता होता, पण नक्की हाच रस्ता आहे की नाही हे ही समजत नव्हतं. नदीवरचा पूल तुटलेला असल्याने कदाचित याच रस्त्याने ये जा होत असली पाहीजे. असा विचारच करत होते तो एक माणूस मोटर सायकल हातात घेऊन समोरच्या बाजुने नदी उतरू लागला. त्याने खुणेनेच रस्ता बरोबर असल्याचे सांगीतले आणि इतकेच नाही तर आपली गाडी एकीकडे उभी करून थोडं अंतर माझ्या सोबत चालून वळणानंतर चा रस्ता मला समजवून सांगीतला.

पुढे एका घळीतून जावं लागतं. तिथे पुन्हा रस्ता चुकेल की काय अशी भिती होती. मात्र ती ही आपोआप दूर झाली, तिथे डोक्यावर काहीतरी घेऊन दोन युवक माझ्या मागून नदी ओलांडून आले. त्यांना मी रस्ता विचारला पण त्यांना ओ म्हणता ठो कळेना. त्यांची भाषा मला काही केल्या समजेना.. आता काय करावं, आली का पंचाईत.. पण ती जिकडे जातील तिकडे जायचं, मी ठरवलं… जस्तीत जास्त काय होईल, थोडी वाकडी वाट होईल पण रात्रीचा निवारा नक्कीच मिळेल… मी त्यांच्या मागोमाग चालू लागले, अगदी काहीही माहिती नसताना. हा रस्ता म्हणजे दोन्ही बाजूला टेकड्या, त्यांच्या वर घनदाट झाडी, आणि मधून रस्ता… त्या टेकड्यांच्या पलिकडे काय आहे याचा अंदाजही येत नव्हता.कदाचित एखादी नदी, कदाचित माझी नर्मदा माई, कदाचित शेतं किंवा घनदाट जंगल.. अगदी काहिही असण्याची शक्यता नाकारता येत नव्हती.थोडं दूर गाव दिसलं तेव्हा हायसं वाटलं. गावात मात्र एका दुकानात एका बाईनी सांगीतलं, “तुम्हारे साथवाले उधर आखरी वाले घर मे गये है, वहा जाओ” … अरेच्या म्हणजे नाही नाही म्हणता म्हणता आम्ही सगळे पुन्हा एकत्र येणार होतो… हा खेळ काही समजेना.

हे गाव होतं सरसाड. ज्या घरचा पत्ता त्या बाईनी दिला होता ते होते रमणभाई शंकरभाई. नर्मदा माईचे परम भक्त. बघा नं ती मैया आपल्याला अशा तशा कुठल्याही ठिकाणी नेतच नाही. जिथे तिच्या लेकरांची व्यवस्थित सोय होणार असेल, त्यांचा आदर होणार असेल अशाच ठिकाणी आपला दाणा पाणी तिने लिहिलेला असतो.

शंकर भाईंना भेटल्यावर, त्यांच्याशी बोलल्यावर त्यांची आणि त्यांच्या संपूर्ण घराण्याची पुण्याई लक्षात येते. समाधान सुख काय असतं ते शंकरभाईंच्या चेहऱ्यावर वाचावं. नर्मदा माईनी या भक्ताला स्वतःच्या किनाऱ्यावर कसं आणि का ठेवून घेतलं हे ऐकलं तेव्हा क्षणभर त्यांचा हेवा वाटून गेला, पण त्या हेव्यामागे कुठलाही वाईट विचार नव्हता, आणि एक गम्मत सांगू का, काही काळानंतर मला ही नर्मदा माईनी तेच सुख दिलं ज्या बद्दल मला शंकर भाईंचा हेवा वाटत होता. तो प्रसंग होता महेश्वर चा, पण तो जर मी आताच सांगितला तर शंकर भाईंच्या

बद्दल चं बोलणं अर्धवट राहून जाईल, म्हणून तो अनुभव आपण महेश्वर च्या भागात वाचू. मात्र एक नक्की, इथे परिक्रमेते तुमची एकही इच्छा अपुरी राहात नाही हे मी सांगू शकेन.

तर आता शंकर भाई रमण भाईंबद्दल सांगते. रमण भाइंची नर्मदा परिक्रमा झाली होती. त्यामुळे त्यांना परिक्रमावासिंच्या गरजा आणि त्यांना हवं असणारं प्रेम आपुलकी याबद्दल माहिती होती. आम्हाला माईनी एका परिक्रमावासीयाच्या घरीच आणलं होतं, पण हेच काही ते विशेष नाही जे मी तुम्हाला सांगणार ते काहीतरी वेगळंच आहे. शंकर भाई रमण भाईंच्या केवळ एक नाही तर दोन परिक्रमा झाल्यात. त्या नंतरही गोरा कॉलोनी इथे त्यांनी १२ वर्ष परिक्रमा वासींची सेवा केली. इतकच नाही तर त्यांचे मोठे भाऊ आणि आता त्यांचे लहान भाऊ देखिल परिक्रमा करत आहेत. घरी असलेल्या लहानग्या म्हणजे ८ महिन्याच्या बाळाला बाकी काही बोलता येत नाही मात्र नर्मदे हर करता येतं. ज्या कुटुंबातच आई नर्मदे चं वास्तव्य आहे तिथे आम्हाला रहाण्याचा योग आला हे भाग्यच नाही का?

सरसाड च्या कुटुंबानी आमची खूप मन लावून आणि खूप सेवा केली. अगदी तिथून निघताना पाय निघेना अशी अवस्था होत होती, मात्र आपलं ध्येय हे परिक्रमा करण आहे, आणि ज्या अडकून पडण्यापासून दूर जाण्यासाठी वैराग्याची देवी नर्मदेची आपण परिक्रमा करत आहोत तिच्याच भक्तांच्यात जीव लावून अडकून पडायचं? नाही नाही, इथून पुढे निघणं भागच होतं. आम्ही मोठ्या जड पावलांनी शंकरभाईंचा निरोप घेतला.

सरसाड ते भालोद चा प्रवास आज करायचा होता. मधे वढवणा आणि मणिनागेश्वर ही स्थानं लागतात. हा रस्ता जंगलातून जातो आणि अत्यंत रमणीय रस्ता आहे. उंच सखल वाट, आजूबाजूला जंगली फ़ुलांनी डवरलेली वाट, केशरी, जांभळी, गुलाबी फ़ुलं, वळणं घेत घेत जाणारा ओहोळ… खूपच प्रसन्न असा हा रस्ता आम्ही अगदी एन्जॉय करत करत गेलो. वढवाणा च्या हनुमान मंदीराबद्दल सांगते. मोठी मूर्ती आणि अतिशय प्रसन्न असं हे स्थान आहे. मंदीराचं बांधकाम असं आहे की भल्या मोठा हॉल असलेल्या या मंदिराला तीन चार दालनं

आहेत मात्र कुठल्याही दालनातून बघितलं तरी ही मूर्ती आपल्याकडेच बघतेय असा भास होईल. मंदिरांच्या भिंतीवर वाल्मिकी रामायण कोरलेलं आहे. मंदिराच्या आतील घंटे खाली उभं राहिलं की भान हरपल्या सारखं होतं इतके कंपन तिथे जाणवतात. आम्ही मंदिरात गेलो त्यावेळी आमच्याव्यतिरिक्त कुणीही तिथे नव्हतं. मंदीर थोडं उंचावर आणि गावापासून लांब असल्याने तिथे खूप शांताता ही होती, खरं तर इथेच राहावं असं वाटत होतं पण त्याबद्दल विचारायलाही कुणीच नसल्याने पुढे जाण्याचा निर्णय घेतला. हनुमान चालीसा ११ वेळा म्हणून मी पुढे निघाले.

इथून पुढे मणिनागेश्वराचं स्थान आहे. अत्यंत प्राचीन आणि अत्यंत जागृत. पण त्या आधी झालेली एक गम्मत सांगते. जसं जसं मणिनागेश्वर जवळ येत गेलं तस तसं लोक वस्ती तुरळक होत गेली. मात्र मधेच कुठेतरी गावातून एक कुत्रा आमच्या मागे मागे चालू लागला. आधी काही काळ तो कुत्रा अगदी शहाण्यासारखा फ़क्त मागे मागे येत होता, मधेच काय झाले कोण झाला, तो कुत्रा माझ्याकडे पाहून भुंकू लागला. अगदी दात ओठ खाऊन अंगावर आल्यासारखा करू लागला. मी घाबरले, आणि माझ्या तोंडून नर्मदे हर चा आवाज आपसुकच बाहेर पडला, आणि काय गम्मत माहितिये, हा कुत्रा बटन दाबावं तसा एक्दम खाली बसला आणि भुंकायचं थांबलाच. मला हे पहिल्या वेळेला लक्षातच आलं नाही, मात्र असाच प्रसंग तीन चार दा झाल्यावर समजलं, नर्मदे हर म्हटलं की हा थांबतो. कदाचित माझा नर्मदे हर चा जप कमी होत असेल म्हणून की काय, मणिनागेश्वरपर्यंत हा कुत्रा माझ्या मागे मागे येत राहिला, आणि माझा जप जणू माझ्याकडून या कुत्र्यानी करवूनच घेतला.

मणिनागेश्वरला पोचल्यावर छान दर्शन झालं. इथे छोटी छोटी खूप मंदिरं आहेत. इथे मुक्कामाची छान व्यवस्था आहे. माझा बालभोग झाला नव्हता, मला थोडी भूकही लागली होती. खाली भंडाऱ्याची तयारी सुरू होती त्यात पुरी भाजी तयार होताना दिसत होती. चला म्हणजे इथे बालभोग होईल असं वाटलं. पण गंमत माहितिये का, आज नं मला धिरडे खावेसे वाटले अचानक, आणि आपला महाराष्ट्रीयन चिवडा पण… पण इथे तर भाजी आणि पुरीची

तयारी होती, अर्थात जे मैया पानात वाढेल ती प्रसादी… धिरडे आणि चिवडा जसा आला तसा माझ्या मनातून निघूनही गेला. मी तिथल्या स्थान धारी बाबांचं दर्शन घ्यायला म्हणून त्यांच्या निवासाकडे गेले हे बाबा कर्नाटकाचे होते. त्यांनी माझी चौकशी केली. मी मराठी आणि नागपूरची आहे म्हटल्यावर त्यांनी आपुलकीनी आणि मराठीत " या या" असं म्हंटलं… " हमको थोडा थोडा मराठी आता है" , असं ही ते म्हणाले. त्यांचा छान सत्संग झाला.. आणि शेवटी जाता जाता त्यांनी मला बजावलं, "यू नीड टू गेट डिटॅच विथ एवरी थिंग, यू हॅव टू… ..थोडा समय लगेगा, पर ध्यान से करोगी तो हो जायेगा" . मला भेटणारी प्रत्येकच मोठी व्यक्ती मला गुंतू नको हेच सांगतेय, मात्र ते करायचं कसं हा मोठा प्रश्न माझ्यापुढे होता, कारण आपण सर्व सामान्य माणसं कधी न कधी या मोहांना बळी पडतोच… मी त्यांना माझा प्रश्न विचारला तर ते म्हणतात " मै तुम्हे जवाब नही दुंगा, क्युंकी तुम्हे कोई और इसका जवाब देने वाला है " .. मी नंतर त्यांना आग्रह केला नाही. मात्र हे कोण सन्यासी आहे हे जाणून घेण्यासाठी मी त्यांचा परिचय विचारला.. ते म्हणाले "धिस इज द फ़र्स्ट स्टेप टुवर्डस अटॅचमेंट..यूर क्यूरोसिटी … क्या जरूरत है हमारे बारे मे जानने की? जो आपको जानना है वो आगे मिलेगा ये हमने बता दिया है… अब और मत सोचो.. ये लो, ये खाओ, तुम्हारे महराष्ट्र का है" असं म्हणत त्यांनी एका द्रोणामधे मला महाराष्ट्री पद्धतीचा चिवडा दिला… ..आता काहीच क्षणांपूर्वी मला चिवडा हवा होता, तो मिळाला होता, पण तेव्हा वाटलेली तीव्र इच्छा आता चिवडा समोर असूनही तितकी तीव्र वाटत नव्हती… तसंच काहीसं धिरड्याबद्दलही झालं… इथेच, मणिनागेश्वरालाच… . आणि हो, आजवर ज्या मगर मैयांला बघायची, तिचं दर्शन घ्यायची इच्छा होती ती पण पूर्ण झाली… पण नक्की काय झालं ते पुढच्या भागात सांगते.. हो माझ्या प्रश्नांची उत्तर पण मला पुढे मिळाली… कशी ते पुढच्या म्हणजे ३१ व्या भागात सांगते.

नर्मदे हर

*नर्मदा परिक्रमा – एक विलक्षण अनुभूती- भाग ३१*

*नर्मदे हर*

मणिनागेश्वराच्या त्या संन्यास्यानी अगदी वेळीच माझी शिगेला पोहोचलेली उत्कंठा थांबवली, आणि खरंच आहे, मला काय गरज त्या सन्यासाबद्दल जाणून घेण्याची न? आपण उगाच धावत असतो बरेचदा, गरज नसताना… ती धावपळ करून झाली, थकलो की मग समजतं, याची गरजच नव्हती… पण ते वेळेवर समजलं असतं तर तो वेळ, आणि ती धावपळ कुठल्यातरी गरजेच्या गोष्टीसाठी उपयोगात आणता आलं असती असं वाटतं… सत्पात्री दान कसं असतं तसं… पण हेच तर आयुष्य आहे न!.. असो

आता धिरड्याची गोष्ट. मी चिवडा खाल्ला. कुणीतरी मराठी व्यक्तिंनी तो त्यांना दिला होता, माझी इच्छा ओळखून त्यांनी तो मला दिला. आता तो खाऊन झाल्यावर माझ्या मनात धिरड्याची आठवणसुद्धा शिल्लक नव्हती. खाली बालभोगासाठी मंडळी बसली होती. मला बसायला जागा नव्हती म्हणून तिथल्या एका शिष्याने मला पाक घराच्या पायरीवर बसायला सांगीतलं. मी पाक घरात डोकावत होते, सहज म्हणूनच. एका शिष्याने मला ४ पुऱ्या आणि भाजी वाढलेली ताटली दिली. “चार पुरी ज्यादा हो जायेगी, हमको बस २ ही चाहिये” असं म्हणून मी त्याला ताटली परत केली, त्यानी दोन पुऱ्या कमी करून पुन्हा मला ताटली दिली, बघते तर त्यात २ पुऱ्या, एक धिरडं होतं, ते ही मुगाचं, आणि भाजी होती. “ये चीला तो खा लो मैया, पुरी पसंद नही है तो चीला तो पसंद होगा, वैसे कल का है, पर अच्छा है” तो म्हणाला … . आता काय म्हणू मी… मी इच्छा व्यक्त पण केली नाही, फ़क्त विचार आला माझ्या मनात, आणि पूर्ण झाली इच्छा.

बालभोग करून आम्ही पुढे भालोद च्या मर्गाने निघालो. भालोद च्या प्रतापे महाराजांबद्दल ऐकून माहित होतं. ते आपल्या नागपूरचे, म्हणून भेट व्हावीच असंही वाटत होतं. शिवाय त्यांनाही कुणीतरी माझ्याबद्दल बोललेलं आहे हे माहित होतं. मी भालोदला पोहचले. अगदी जिथे दत्ताचं मंदिर आहे त्याच्या ४-५ घरं दूरपर्यंत उदबत्तीचा सुगंध येत होता. मंदिरात गेले आणि मला एका क्षणात रडू आलं. आनंदानी.मी मंदिरात गेले आणि आत बसते तो समोर मोठ्या महाराजांची इतकी जीवंत मूर्ती आहे की क्षणभर प्रत्यक्ष महाराजच बसले आहेत असं वाटू लागलं. त्या मूर्तीवरून काही केल्या नजर हटेच ना. मनात कसलेही विचार नव्हते मात्र डोळ्यातून पाणी घळघळा वाहात होतं. प्रतापे महाराज आतून बाहेर आले, त्यांनी सगळ्या परिक्रमावासींचं स्वागत केलं आणि "ती नागपूरची सुरुची कोण आहे हो तुमच्यापैकी " असं माझ्या नावासकट माझ्याबद्दल विचारलं.. इतकच नाही तर " माझ्या गावाची आहे ती " असं आपुलकीचं बोलणं ऐकून गहिवरून आलं मला. माझी महाराजांची भेट झाली. अगदीच प्रेमळ आहेत महाराज… माझी माऊलीच ती. त्यांनी माझ्या डोक्यावरून हात फ़िरवला तेव्हा इतकं शांत वाटलं की ते मला शब्दात सांगता यायचं नाही. आता इथेच थांबायचं, निदान ३ दिवस तरी, माझ्या मनानी ठरवून टाकलं. दुपारी पुण्याची काही मंडळी आली होती, त्यांनीच भोजन प्रसादी केली होती, ती घेतली. ती घेण्या आधी प्रतापे महाराजांनी मला आत, म्हणजे जिथे भोजन प्रसादीची व्यवस्था असते तिथे बोलावलं. म्हणाले " हे बघ मी तुला काय दाखवतोय" असं म्हणत त्यांनी मला जे दाखवलं ते पाहून मला अजूनच भावुक व्हायला झालं. तिथे माझ्या गुरुमाऊलीचा, माझ्या नानांचा फ़ोटो होता. "तुला तुझ्या गुरुंनी पाठवलय बरका इथे" ते म्हणाले. मग आता काय, जिथे माझी गुरुमाऊली ती जागा माझ्यासाठी किती आनंदमयी असणार! भोजन प्रसादी झाली आणि पुण्याची मंडळी गाडीनी परत निघाली.आता संध्याकाळ होत आलेली. प्रतापे महाराजांनी त्यांच्या परिक्रमेच्या गोष्टी सांगीतल्यात. अगदी पत्रकारापासून तो आतापर्यंतचा प्रवास सांगीतला, आणि तिथे भालोदला

असणाऱ्या दत्त मूर्तीची ही गोष्ट सांगीतली. ती तर सांगतेच मात्र आधी या मूर्तीबद्दल सांगते तुम्हाला.

काळ्याशार मूर्तीचं हे रूप खूप मोहक आहे. या मूर्तीची एक गम्मत आहे. या मूर्तीमधे सगळे च्या सगळे चक्र अगदी व्यवस्थीत दिसतात. शिवाय गोमुख पण दिसतं. अत्यंत बोलकी मूर्ती आहे ही. तर आता थोडक्यात ह्या मूर्तीची गोष्ट सांगते. ही मूर्ती ज्यांच्याकडे होती त्या बाई अविवाहित होत्या आणि आता म्हाताऱ्या झाल्या होत्या. त्यांच्या वडिलांना त्यांनी वचन दिलं होतं की मी अविवाहित राहून या देवाची सेवा करीन, पण वयपरत्वे ते आता त्यांच्याकडून होत नव्हतं आणि म्हणून ती मूर्ती कुणाकडे तरी सोपवणं भाग होतं. या मूर्तीबद्दल प्रतापे महाराजांच्या कानावर आलं आणि दर्शन घेण्यासाठी तरी आपण इथे भेट देऊ असं त्यांनी ठरवलं. इकडे त्याच रात्री त्या बाईंना स्वप्न पडलं, त्यात ती मूर्ती बाईंना म्हणाली, " उद्या जो पहिला माणूस मला भेटायला येईल त्याला मला दे" .. बाईंनी मूर्ती महाराजांच्या स्वाधीन केली आणि भालोदला मग पुढे तिची स्थापना झाली आणि तेव्हापासून प्रतापे महाराज ह्या मूर्तीची सेवा करताहेत.

भालोदला मोठ्या महाराजांनी ज्या जागेवर बसून साधना केली तिथे आता एक खोली बांधली आहे. मी इतकी भाग्यवान आहे की त्या खोलीत बसून ध्यान करण्याची संधी मला मिळाली. तीथे खोली तयार केली आहे हे समजल्यावर " मला ती बघता येईल का?" असं मी प्रतापे महाराजांना विचारलं.. "बघू नकोस गं नुसती, तुझी माळ घेऊन ये, बस तिथे, ध्यान कर, जप कर, बघ तुला कसं वाटतं ते" महाराजांचं हे उत्तर ऐकून आनंदाला पारावारच राहिला नाही माझ्या. खरंच तिथे ज्या वेळी मी बसले आणि जप केला त्या वेळी माझ्या अंगावर काटा उभा राहिला होता. वेळ कसा गेला मला समजलच नाही. महाराजांनी आवाज दिला तेव्हा एक-दीड तास निघून गेला होता. मी शरीराने तिथे होते पण मनाने, आत्म्याने कुठे होते हे मला सांगताच येणार नाही.

बाहेर येऊन चहा कॉफ़ी झाली आणि महाराज म्हणाले " बस आता जरा वेळ, एक गम्मत बघ"   आता अजून काय दाखवणार होते महाराज? मी वाट बघत होती. त्यावेळीपर्यंत बाकी परिक्रमावासी एकतर बाहेर गेले होते, किंवा काही अजून आराम करत होते. थोड्या वेळात एक मोर मंदिरात आला. अगदी न घाबरता त्यानी महाराजांच्या हातून दाणे खाल्ले. मोठ्या महाराजांच्या मूर्ती समोर बराच वेळ रेंगाळत राहिला, आणि मग पुन्हा बाहेर निघून गेला. त्याचा हा नित्यक्रम आहे. दिवसातून तो दोन दा येतो, मोठ्या महाराजांना नमस्कार करतो, प्रतापे महाराजांच्या हातून दाणे खातो आणि जातो! कुणाचं काय नशीब आणि कुणाचं काय कर्म काही सांगता येत नाही बाबा. हा कुठला जीव या योनीत आला असेल आणि का? असा सहज प्रश्न माझ्या मनात येऊन गेला.

रात्रीची भोजन प्रसादीची वेळ झाली. आज पुण्याची मंडळी नसल्याने कामाचं बोझा एकट्या मावशींवर पडणार म्हणून "अगं जरा स्वयंपाकचं बघ, ये मी तुला सांगतो काय कुठे ठेवलय ते"   असं म्हणत महाराज मला स्वयंपाक घरात घेऊन गेले.." तो फ़्रीज उघड, बघ तिथे एक वाटी आहे, ती उचल अन लाव तोंडाला, तुला सोलकढी आवडते नं, तुझ्यासाठी काढून ठेवली सकाळी"   मला माझ्याबद्दलही कदाचित माहित नसेल तितकं महाराजांना कसं माहित? मला त्यांना काहीच सांगावं लागलं नाही…  आणि याचा कहर म्हणजे आमचा दुसऱ्या दिवशीचा संवाद, पण तो नंतर सांगते.. आधी आज रात्रीचा विलक्षण अनुभव सांगते.

मी माझं आसन मोठ्या महाराजांच्या मूर्ती समोर लावलं होतं. अगदी समोर.. म्हणजे डोळे उघडले की पहिले मला जर काही दिसेल तर ती मोठ्या महाराजांची मूर्ती, अगदी अश्या ठिकाणी माझं आसन लावलं होतं मी, पण काय झालं माहितीये…  खरं तर मला पण माहित नाही काय झालं नक्की, जे समजलं ते असं…  मी मोठ्या महाराजांच्या मूर्तीकडे बघत बघत अंथरुणावर अंग टाकलं. त्या नंतर किती तरी वेळ मी मूर्तीकडे बघतच होते. मला कधी झोप लागली, झोप लागली की नाही ते ही मला आठवत नाहीये, आणि समजत पण नाहीये, पण

सकाळी चार वाजता मला प्रतापे महाराजांच्या आवाजाने भान आले, ते म्हणाले "अरे वा, जागी आहेस तू, चल मग नर्मदा स्नान आणि काकड आरती करू. कधी उठलीस?" त्यांनी मला पाहिलं तेव्हा माझे डोळे उघडे होते मात्र मी रात्री जशी अंतरुणावर पडले होते तशीच होते आताही! भिंतीला टेकून उश्या ठेवल्या होत्या मी आणि मोठ्या महाराजांकडे बघत होते रात्री, इतकच आठवतय! माझे डोळे कधी बंद झाले, पुन्हा कधी उघडले, मी झोपले की झोपलेच नाही… काही काही समजलं नाही. मात्र मी खूप फ्रेश होते… हे असं कसं झालं असेल? नक्की काय झालं असेल?... असो

मी प्रतापे महाराजांबरोबर नर्मदा मैयावर जाऊन आले, स्नान करून आले आणि मग जे मी बघितलं ते विलक्षणच होतं. गाभाऱ्यात मंद प्रकाश होता. गाभाऱ्यासमोर उंबराच्या झाडाखाली मी बसले होते आणि महाराज आत पूजा करत होते. मूर्ती स्नान झालं तेव्हा महाराजांनी मला बोलावलं आणि मूलाधार चक्रापासून सहस्त्रहार चक्रापर्यंतची सगळी चक्र त्यांच्या वलयासकट फ़िरत असल्याचं मला जाणवलं. दोन खांदे आणि छातीवरचं गोमुख अगदी स्पष्ट जाणवलं. आणि ती मूर्ती मंद स्मीत करतेय माझ्याकडे पाहून असा भास झाला. गंमत म्हणजे यावेळी तिथे आम्ही तिघंच होतो. मी, प्रभू दत्तात्रेय आणि प्रतापे महाराज. असा पार पडला हा काकड आरतीचा सोहळा.

आज दुपारी इथे अजून काही परिक्रमावासी ही आले होते. त्यांनी दाल बाटी चा बेत बनवला होता. मात्र मला उपास असल्याने मी भगर खाल्ली. ती भगर घ्यायलासुद्धा मीच दुकानात गेले होते तेव्हा एक गायत्री मंदिर मला दिसलं. खूप जाण्याची इच्छा झाली मात्र भगरीसाठी उपास असलेली मंडळी वाट बघत असतील म्हणून मी मोह टाळला. मात्र त्याच संध्याकाळी महाराज मला त्याच मंदिरात घेऊन गेलेत. मी न मागता, न विचारता. ही संध्याकाळ माझ्यासाठी खूप महत्त्वाची आहे कारण इथे झालेला संवाद हा मोलाचा संवाद आहे. " मी भाजी घ्यायला जातोय. कोण कोण येणार?" असं महाराजांनी विचारलं.. मी चटकन

“हो”   म्हंटलं. मग महाराज पुढे आणि मी मागे, आम्ही भाजी बाजारात जाऊ लगलो. या वेळी माझ्या मानात जे काही प्रश्न आले त्याची उत्तरे प्रतापे महाराजांनी मी न विचारता मला दिलीत. मला समजेचना असं कसं होतय.. पण ते समजण्याची कुवत माझी नसावी, मी मात्र अनुभव गाठीशी ठेवला आहे, आणि तुम्हालाही तो सांगणार आहे मात्र पुढच्या भागात..म्हणजे ३२ व्या भागात. नर्मदे हर.



*नर्मदा परिक्रमा – एक विलक्षण अनुभूती- भाग ३२*

*नर्मदे हर.*

तर भालोद च्या प्रतापे महारांजाकडे मी असतानाची गोष्ट तुम्हाला मागच्या भागात सांगत होते. मी आणि महाराज भाजी घ्यायला निघालो होतो. ते पुढे आणि मी मागे. आता महाराज काय बोलतात आणि काय सांगातात याची मी वाट बघत होते. माझ्या मनात विचार आला, किती साधना असेल न महाराजांची, पण *साधना म्हणजे नक्की काय?* म्हणजे करायचं काय नेमकं? माझ्या मनात विचार आला आणि महाराज बोलू लागले, म्हणाले "तू मांजरीचं पिलू पाहिलयस का?" मी म्हंटलं हो, बघितलय, "आणि माकडाचं?" प्रतापे महाराजांनी मला विचारलं.. हो ते पण पाहिलय मी, पण त्यांचं काय.."बरं मग आता मला सांग कुणाचं पिलू जास्त सुरक्षीत असतं बरं, आणि का?".. मी थोडा विचार करू लागले तोच प्रतापे महाराजांनी उत्तर दिलं, "मांजरीचं, कारण मांजरीच्या पिलाला आई तोंडात उचलून घेऊन जाते. या ऊलट माकडीणीचं पिलू बघ. त्याने आपल्या आईला घट्ट धरून ठेवलं असतं. म्हणजे समजा एका झाडावरून दुसरीकडे उडी मारताना ह्या पिलाने आईला धरलेला हात सुटला तर पिलू खाली पडेल नाही का, इतक्या उंचीवरून पडल्यामुळे त्याचा कदाचित कपाळमोक्ष ही होईल. पण मांजरीच्या पिलाला आई तोंडात घेऊन जात असते. पिलाला काहिही करावं लागत नाही. ते आपलं आरामात इकडे तिकडे बघत असतं. याऊलट माकडीणीचं पिलू भेदरलेलं असतं, ते जीवाचे हात करून आईला धरत असतं… बेटा, आपण मांजरीचं पिलू बनायचं माकडीणीचं नाही. म्हणजे काय करायचं माहितीये? आपली माऊली, आपली गुरुमाऊली सांगेल तितकच करायचं, काळजी करण्याची गरज नाही. आपण फ़क्त आपल्याला स्वत:ला त्या माऊलीच्या स्वाधीन करायचय. आपण कुठे जातोय, का जातोय, हे बघण्याची आपल्याला गरज नाही.

आपल्याला म्हणून काहीही धरून ठेवण्याची गरज नाही. आपण आपल्याला त्या माऊलीच्या स्वाधीन केलं म्हणजे पुढचं सगळं ती बघते, आणि हो, इथे हात सुटायची अजिबात भिती नसते, कारण आपण हात धरलेलाच नसतो. तुझ्या गुरुंनी तुला काय संगितलय ते कर, बाकी साधना काय; कशी याचा विचार करू नकोस… ते सगळं तुझे गुरू तुझ्याकडून करवून घेतीलच" साधना कशी करायची याचं सरळ साधं उत्तर मला प्रतापे महाराजांनी समजवून सांगितलं… मला आता छान समजलय, साधना कशी करायची तर मांजराच्या पिलासारखी!

आम्ही भाजी घेतली, सरस्वती मंदिरात जाऊन आलो.. सकाळी मला ज्या मंदिरात जावसं वाटत होतं तेच हे मंदिर. प्रतापे महाराज म्हणाले, " खूप छान मंदिर आहे हे.. ही सरस्वती प्रसन्न झाली नं की ज्ञान आपोआप येतच..ते घ्यावं लागत नाही, फ़क्त ते तिनी प्रसन्न होऊन दिलं पाहिजे.." मला अचानक अन्नपूर्णा स्तोत्र आठवलं. ते माझ्या रोजच्या म्हणण्यात असतं म्हणून असेल, त्याची शेवटची ओळ फ़ारच खरी आणि अर्थपूर्ण आहे. अन्न म्हणजे खाद्य, पण कशाचं खाद्य याचा उलगडा या शेवटच्या ओळीत होतो. अन्नपूर्णा म्हणा, पार्वती म्हणा, देवी म्हणा.. सर्व शक्तीचीच रूपं..आणि या स्तोत्रात दान मागितलेलं आहे..

*"भिक्षां देही कृपावलंबन करी, मतान्नपूर्णेश्वरी" * असं म्हणत या मातेला कृपेची भिक्षा मागीतली ती नेमकी कशासाठी तर

*"अन्नपूर्णे सदापूर्णे,* *शंकर प्राणवल्लभे*

*ज्ञान वैराग्य सिद्ध्यर्थम* *भिक्षां देहीच पार्वते" *… .

तर ज्ञान आणि वैराग्याची भिक्षा या शक्तीरूपानी आपल्याला द्यावी अशीच प्रार्थना त्या सरस्वती रूपी शक्तीला आणि वैराग्याची भिक्षा मोक्षदाईनी, पापनाशीनी, वैराग्यदायीनी नर्मदेला करून आम्ही पुन्हा आश्रमात जाण्यासाठी निघालो.

चालता चालता प्रतापे महाराज पुन्हा बोलू लागले. म्हणाले *"तू लहान मूल आणि आई यांचं नीट निरिक्षण केलेय का?* आईला खूप कामं असतात त्यावेळी आई आपल्या तान्ह्या बाळाला खाली ठेवते आणि बाळ रडू लागतं. पण आईला कामं असतात, मग त्याचं मन रमावं म्हणून आई त्या बाळाला खेळणी देते, बाळ रमतं थोडा वेळ, मग पुन्हा रडू लागतं. मग आई बाळाला थोडे मुरमुरे किंवा असच काहीसं देतं, तेव्हा ही ते रमून जातं, मग रडलं की आई कणकीचा गोळा देते त्या बाळाला खेळायला… मग बाळ पुन्हा रमतं… मात्र एक वेळ अशी येते की जेव्हा आई त्या बाळाला कशातच रमवून ठेवू शकत नाही. तीला त्या बाळाला उचलून घ्यावच लागतं.बेटा थोडी फ़ार साधना,जप केला की आपल्याला समाधान वाटू लागतं,आपण आपल्या आईच्या जवळ आहे असं वाटू लागतं. हे थोड्यावेळेचं समाधान म्हणजे आई नी आपलं मन रमण्यासाठी दिलेल्या खेळण्यांपैकी एक आहे. एकदा त्यातून बाहेर पडलं की मग येते सिद्धी किंवा तत्सम खेळण्यांची वेळ. त्यावेळी आपण आईच्या जवळ आहोत म्हणून आपल्याला अमुक तमुक सिद्धी प्राप्त झाल्या आहेत असं साधकाला वाटू लागतं… तेही एक खेळणंच असतं… मूळात साधक आई हून दूर असतो. मग त्यानंतर येते कणकेच्या गोळ्याची वेळ, 'आपण जणू या विश्वाचा रचैताच आहोत' या भावनेनी ते लहान मूल कणकेच्या गोळ्यातून वेगवेगळ्या वस्तूंना आकार देत असतं, तसाच प्रकार साधकाचा होतो, मात्र ज्या वेळी ह्या सगळ्यात मन रमत नाही आणि आता कुठलही खेळणं, इच्छा माणसाच्या मनाला मोहवू शकत नाही त्या वेळी ती आई आपल्याला तिचा सहवास घडवून आणते. यात एक गोष्ट लक्षात ठेवण्यासारखी आहे ती म्हणजे आईने बाळाला जरी दूर ठेवळ असतं तरी तीचं लक्ष त्याच्याकडे असतच.. ती त्याला पडू झडू देत नाही. तर आपल्याला काय करायचं आहे? कुठल्याही गोष्टीत मन रमू न देता तीचा धावा करायचा आहे, कशातही न रमणारं मूल कायम जेव्हा "आई मलाकडेवर घे" ही एकच मागणी शांतपणे, आईला त्रास न होवू देता, पण सातत्यानी आईकडे करेल त्या बाळा बद्दल आईच्या मनात लवकर करुणा उत्पन्न होईल आणि कशातही न रमणाऱ्या बाळाला आई चटक उचलून कवेत घेईल."*

प्रतापे महाराज बोलत होते आणि मी ऐकत होते. किती साध्या शब्दात आणि मला समजेल अशा भाषेत महाराजांनी किती मोठी गोष्ट सांगीतली होती! आपल्या सारख्या सर्व सामान्य माणसांना अनेक आमिषं मोहवत असतात. त्या आमिषांकडे धावताना आपण कधीच आपल्या ह्या गुरुस्वरूप, ईश स्वरूप आईचा विचार करतच नाही. आपण रमावं म्हनून तिने दिलेल्या खेळण्यांमागे आपण धावत राहातो. मागच्या एका अनुभवामधे मी *"इदं न मम" * चा मंत्र सांगीतला होता, आणि त्याही आधी सियाराम बाबांचं वाक्य सांगितलं होतं.." मै तो सिर्फ़ तमाशा देखता हू" म्हणजे काय तर "नो इन्व्होलव्हेंट" . अर्थात प्रत्येकच आईच्या जवळ असलेलं मूल आपल्याला हेच सांगत असतं, मार्ग वेगळे असतात… इतकच!

अजूनही मी आणि महाराज रस्त्यातच होतो, आश्रमात पोहोचायला अजूनही वेळ होता. माझ्या मनातले प्रश्न कमी झाले होते पण संपले नव्हते. माझ्या मनात पुन्हा एक नवा प्रश्न उभा राहिला. मग समाधानाचं काय? ते का मिळत नाही? कसली तरी तळमळ कायमच माझ्या मनाला का असते? *मला नक्की काय हवय?* जे हवं आहे असं वाटतं ते मिळाल्यावरही तळमळ संपत का नाही?... . एका पाठोपाठ एक प्रश्न माझे प्रश्न येत राहिले मात्र ते प्रतापे महाराजांना कसे समजत याचंला आश्चर्यच वाटत! महाराज पुन्हा बोलू लागले " अगं ज्या दिवशी तुला समाधान मिळेल त्या दिवशी तुझी तळमळ बंद होईल, मात्र तुला समाधान तेव्हाच मिळेल जेव्हा तुला हवी असलेली, हवी असलेली म्हणण्यापेक्षाही तुझ्यासाठी आवश्यक असलेली गोष्ट तुला मिळेल तेव्हा खरं समाधान मिळेल की नाही तुला? *तळमळ ही फ़ार आवश्यक आहे बाळा*, *कारण जोवर तळमळ आहे तोवर आपण धडपड करू*... तोवरच आपण हालचाल करू. आता प्रश्न आहे तुला काय हवय याचा.. तुझ्या पेक्षा तुझ्या आईला जास्त आणि चांगलं माहित आहे की तुला कशाची गरज आहे.. म्हणजेच काय? तू एकदा का आई जवळ गेलीस की तुझ्या समाधानाची प्राप्ती झाल्याशिवाय राहणार नाही. मग तुला समाधानासकट सारं काही जर आईच्या जवळ गेल्यावर मिळत असेल तर तळमळ कशाची व्हायला हवी? समाधानाची का आईची? आईची तळमळ धरलीस तर सारं काही तुझंच आहे,

आणि तुला समाधान मिळत नाही कारण अजून तू आईच्याकडेवर नाहीस.. तिनी तुला थोडं दूर ठेवलय! आणि तुला कशातही न गुंतता तिचा धावा करायचय, तिनी उचलून घेतलं की तळमळही संपेल आणि समाधानही मिळेल. तळमळ असणं आवश्यकच आहे. जोवर यात्रा आहे तोवर तळमळ आहे. जोवर शोध आहे तोवर यात्रा ही आहेच!

आम्ही आश्रमात पोहचलो. संध्याकाळची प्रसादी आदि आटोपून आता उद्याची तयारी करायची. उद्या इथून निघायचं होतं. मी माझी बॅग भरत होते. महाराज माझ्याजवळ आले आणि एक पिशवी माझ्या हाती दिली. त्यात एक निळ्या रंगाचं मफ़्लर होतं. आणि एक मऊसूत धोतराचं पान. म्हणाले हे घे, माझ्याकडून तुझ्यासाठी काहितरी. ते मऊसूत धोतर अंगावर पांघरलं की आजही मला माझ्या तळमळीची आठवण येते आणि ती योग्य दिशेनी वळावी यासाठी प्रयत्न होऊ लागतात.

भालोदच्या या प्रवासात मला एक माहेर मिळालं. एक माऊली मिळाली. भालोद हून निघताना आम्हाला निरोप देताना महाराज काही अंतर चालत आले. आता त्यांना नर्मदे हर करून पुढे निघायचं, पण पाऊल निघेना.. एखादं लहान मूल कसं आईला बिल्गून रडू लागतं तशी मी व्याकुळ झाले. प्रतापे महारांनी माझ्या डोक्यावर हात ठेवला " म्हणाले, बाळ असं नाहीनं करायचय आपल्याला? माझे आशिर्वाद तुझ्या पाठीशी आहेतच.. बरं ऐक, तू समुद्रपार करून गरुडेश्वरला आलीस नं की मला फ़ोन कर. मी तुला भेटायला येईल." आणि खरोखर ज्या वेळी मी प्रतापे महाराजांना फ़ोन करून गरुडेश्वरला आल्याचे सांगितले त्यावेळी सगळी कामं सोडून फ़क्त माझ्यासाठी ही माऊली नर्मदा पार करून गरुडेश्वरला मला भेटायला आली. त्या ही वेळेची गोष्ट इथेच सांगते.

प्रतापे महाराजांना त्यांच्या कार्यासाठी समाज गौरव पुरस्कार देण्यात आला होता. तेव्हा तो मोठ्या महारांजाच्या पायावर घालायला म्हणून गरुडेश्वरला येताना ते तो सोबत घेऊन आले होते. मोठ्या महारांजाच्या पायाला लावून तो पुरस्कार परत घेतेवेळी महाराज तिथल्या

पुजाऱ्याला म्हणाले.. “हा पुरस्कार मोठ्या महारांजाच्या पायाला लावला आहे, आता तो माझ्या लेकीच्या हाती द्या”  असं म्हणत तो पुरस्कार माझ्याकडे दिला आणि “ तुझ्या जबाबदाऱ्या संपल्यात की तुला मालसामोट च्या आदिवासी क्षेत्रात काम करायचं आहे, तिथल्या बांधवासांठी तू काहितरी करावंस, केलं पाहिजेस”  असं सुचवलं. मला एक अजून मार्ग आणि एक अजून दिशा मिळत आहे असच वाटू लागलं.

भालोद हून पुढे अविधापर्यंत मी आणि पसारकर काका काकू सोबत होतो, मात्र पुढे माझा जगदीशमढी चा रस्ता चुकले आणि मी एकटीच गुमान देवकडे निघाले. आता माझी आणि काका काकुंची ही ताटातूट झाली. इथून पुढे नारेश्वरपर्यंत मी एकटीच होते, अगदी मागे पुढेही आतापर्यंत सोबत असलेली मंडळी नव्हती. इथल मंदीर फ़ारच सुरेख मात्र आश्रम तितकाच अव्यवस्थित होता. महिला आणि पुरुषांसाठी वेगळी व्यवस्था नव्हती, त्यातून मी एकटी… पण आपल्या पेक्षा आपल्या त्या आईला आपली काळजी कशी असते ते मला पुन्हा एकदा जाणवलं… .

इतकच नाही तर आपल्या भेटणाऱ्या प्रत्येक व्यक्तीचे आणि आपले ही त्या व्यक्तीला भेटण्यामागचे काहितरी कारण असतेच. कुणीच कुणाला उगाच भेटत नाही. प्रत्येकाचं काहीतरी देणं घेणं शिल्लक असतं आणि ते पूर्ण करत करत हा प्रवास तुम्हाला करायचा असतो. हे जेव्हा अनुभवातून जाणवतं तेव्हा खात्री पटते… सोपान दादा, एक परिक्रमावासी मला असेच भेटलेत..२ -३ दा, वेगवेगळ्या ठिकाणी… आणि ते का भेटले ते कारण मी तुम्हाला पुढच्या अनुभवात सांगते. शिवाय अंकलेश्वरला आलेला मजेशीर अनुभव, आणि गुमान देव ते बिमलेश्वर चा प्रवास हेही सांगते पुढच्या म्हणजे ३३ व्या भागात.

नर्मदे हर.

*नर्मदा परिक्रमा – एक विलक्षण अनुभूती- भाग ३३*

*नर्मदे हर.*

गुमानदेव हनुमान मंदिराबद्दल मी बोलत होते. इथे मी पोहचले त्या आधी हायवे वरून चालत होते. एका पेट्रोल पंपावर पाणी भरायला थांबले तेव्हा एक गंमतच झाली.माझे कपडे मळले होते. चेहरा एव्हाना बराच काळवंडला होता. डोक्याला तेल, पाणी,शाम्पू काहीही नव्हतं. इतकच काय तर केस विस्कटलेसुद्धा असावेत. मी पाणी प्यायला वॉटर कुलर पाशी गेले तसं मला चौकीदारानी हटकलं.."क्यू हात लगा रही हो, पानी चाहिये तो मांग लो ना" तो जरा ओरडूनच म्हणाला..मी अगदी विनम्रतेने पाणी मागितलं तसं त्यानी एका बाटलीत पाणी भरून मला दिलं आणि "अपनी बोटल मे भर दो" असं म्हणाला. ज्या बाटलीत त्यानी मला पाणी दिलं ती बाटली स्वच्छ नव्हती… जरा जास्तच अस्वच्छ होती.."पानी पीने के लिये चाहिये, साफ़ बोटल मे दो, नही तो मेरी बोटल मे दो" मी म्हणाले. आमचा हा संवाद ऐकून तिथेच असलेली दोन माणसं आपसात इंग्रजी मधून बोलत होती, माझ्याकडेच पाहून एक माणूस दुसऱ्याला म्हणत होता- "her bag is branded but clothes are too dirty, either she is from better family background or must have stolen the accessesories"त्यांना वाटलं मला समजलं नसेल, आणि मी ही तसंच दाखवलं. त्या चौकीदाराला माझी बॉटल देऊन पाणी मागितलं. मग ती दोघं मला विचारू लागली. "कहा से आई हो? कहा जाना है? त्यातल्या एकाने तर चक्क "इतना महंगा सामान कहा से आया" असं विचारलं. "मेरा है" मी सांगितलं… हे सगळं पाहून मला गम्मत वाटत होती. मी माझा परिचय न देण्याचं ठरवलं, आणि पुढे काय होतं ते बघावं असं ठरवलं, मात्र तेवढ्यात अजून एक माणूस आला, ज्याला परिक्रमेबद्दल माहित असावं, त्यानेच इतरांना मी परिक्रमावासी असल्याचं सांगितल्यावर ती दोघं निघून

गेलीत.आपला परिचय खरंच कशा कशावर अवलंबून असतो नाही? *म्हणजे कपडे, रूप, अवतार ह्या बाह्य रुपात आपण किती गुरफ़टलेले असतो!* मी इंग्रजी मधे बोलून त्यांना थांबवू शकले असते पण असं करावं असं वाटलच नाही. आणि तशाने मी नाही तर माझ्यातला अहंकार बोलला असता. नाही का? मात्र ज्यावेळी अंकलेश्वरला पोचले त्यावेळी मला बोलावच लागलं. गुमानदेव नंतर अंकलेश्वर चा तो अनुभव पण सांगते.

तर मी गुमानदेव मंदिरात पोहचले. तिथलं मंदिर छानच आहे मात्र परिक्रमावासींसाठीची जागा बरीच अस्वच्छ होती. बहुधा साफ़ सफ़ाई करणारे लोक नसावेत इतकी अस्वच्छ. महिला पुरुषांसाठी वेगळ्या जागा नाही, बाथरूमला आतून कडी नाही, आणि मी एकटेच.कुठे आसन लावू असा विचार करत करत मी जागा बघत होते. “अकेली है क्या, आजा, मेरे पास लगाले आसन, चिंता मत कर, मै तो हू ना तेरे साथ, सभी है” एक पन्नास पंचावनी च्या माताजी मला म्हणाल्या. त्यांनी आपलं आसन बाजूला सरकवून भिंतीकडची जागा मला दिली. माझ्या बाजूला स्वत: आसन लावून कुणी पुरुष मंडळी च्या बाजूला मला आसन लावावं लागू नये ह्याची काळजी घेतली. म्हंटल्या प्रमाणे त्यांनी मला सोबत केली. अगदी मी स्नान करत असताना त्या दाराबाहेर उभ्या होत्या, माझ्या सामानाची त्यांनी काळजी घेत होत्या. मी पयाला तेल लावत असताना “मी तेल लावून देऊ का” असं विचारलं, आणि ज्या प्रेमाने आणि हक्काने त्या माझी काळजी घेत होत्या त्याच प्रेमानी “ मेरे घुटने पे तेल मल के दे ” असं अधिकारानी सांगितलं. माझी काळजी घेणारी आणि माझ्याकडून सेवा करणारी, मला अचानक पणे भेटलेली ही माताजी मैयाच नाही का? सकाळी मात्र हा गृप पहाटेच निघून गेला. मी थकले असल्याने थोडी उशीराच उठले. जाताना त्या मला सांगून गेल्यात “ आजाना अपने पैर से, मैया सोचेगी तो मिलेंगे आगे” ..मात्र गुमान्देव ते अंकलेश्वर त्या मला भेटल्या नाहीत. मात्र अंकलेश्वर ते बलबला कुंड त्या मला पुन्हा भेटल्यात.

गुमानदेव ते अंकलेश्वर प्रवास हा अगदी हाय वे नी होता. अनेक लोक गाडी थांबवून " अंकलेश्वर तक छोड दू क्या ?" असं विचारायचे. मात्र अंकलेश्वरला मजेशीर अनुभव आला, मागे पेट्रोल पंप वर आला होता तश्या सारखाच! अंकलेश्वरची गोष्ट आहे. माझ्या जवळची पर्स तुटली होती, तिच्या बेल्टला गाठ मारून ती मी गळ्यात अडकवत असे. ती गाठ मानेला टोचून सोलल्या सारखं झालं होतं. मला स्लीपर ही घ्यायच्या होत्या, म्हणून मी एका दुकानात गेले आणि "नर्मदे हर" म्हणाले. "जाओ आगे, कुछ नही मिलेगा" असं उत्तर आलं. मला खरोखर वस्तू विकत घेणे गरजेचं होतं. मी म्हणाले, "मुझे मांगना नही है, खरीदना है" . "पैसे है?" त्यानी पुन्हा कन्फ़र्म केलं. "क्या चाहिये?" मला हव्या असलेल्या पर्सकडे बोट दाखवताच तो हसला … "तुम्हारे बस की नही है. महंगी है" मी म्हंटलं "दिखाओ" , त्याने दाखवली, मी बाजूला ठेवून दिली. मग त्याच्याच दुकानात मी स्लीपर पाहिल्या.. मग मी मोजे पण पाहिले, असं करत करत मी ५००-६०० रुपयापर्यंत पोचले. पर्स चाचपडली. माझ्याकडे कॅश होती, पण वाटलं ती राहू द्यावी, जिथे कार्ड चालणार नाही अशा ठिकाणी वापरावी म्हणजे पुन्हा ए.टी.एम शोधून पैसे काढण्याची गरज नाही. मी काही बोलणार इतक्यात तो म्हणाला "क्या हुआ, पैसे नही है क्या, फ़ालतू मे टाईमपास करते है, चलो निकलो यहासे" . *आजपर्यंत आयुष्यात असं कधीच झालं नव्हतं. इतकं घालून पाडून कुणी कधीही बोललं नव्हतं. खरं तर मला खूप राग यायला हवा होता, खूप वाईट वाटायला हवं होतं,पण यातलं काहीही झालं नाही. माझ्या मनानी त्याच्या या वागण्याची दखलच घेतली नाही बहुधा. "इदं न मम" चा मंत्र काम करून गेला.* मात्र मला वस्तू खरोखरीच हव्या होत्या… मी म्हंटलं… "कार्ड या नेट बँकिग चलेगा? तो आश्चर्याने पाहू लागाला. मग मी परिक्रमावासी असल्याचं सांगितल्यावर मात्र त्यानी मला खूप आग्रहानी चहा पाजला!

अंकलेश्वरला मला भेटायला माझा मानलेला भाऊ, भैरव पारेख येणार होता. २००९ मधे केलेल्या हिमालयन ट्रेक सारपासपासूनची आमची ओळख आणि अगदी घरगुती संबंध. हा भैरव ३ तास प्रवास करून फ़क्त मला भेटायला आला होता. येताना त्याने माझ्यासाठी पांढरे

कुर्ते, लोणचं, चटणी आणि बराच खाऊ आणला होता. या खाउंमधे इडली सांबार आणि पिज्झा पण होता. किती तरी दिवसांनी मी हे खाल्लं असेल! अगदी सगळं सगळं लक्षात ठेवून आणलं होतं त्यानी..हो एक कॅडबरी पण… कॅडबरी म्हणजे माझा वीक पॉइंट अगदी. ती कॅडबरी मला ३-४ दिवस पुरली. खूप दिवसांनी घरचं कुणी तरी भेटलं. खूप आनंद झाला होता. मी एकटी चालत असताना मैया माझी जास्त काळजी घेते हे पुन्हा जाणवलं. भैरव काही काळ माझ्या सोबत चालला आणि पुन्हा आपल्या घरी परतला.

मी आता बलबला कुंडाच्या रस्त्यावर होते. भैरवला नर्मदे हर करून ५च मिनिट झाले असतील, ह्या गुमानदेवला भेटलेल्या माताजी पुन्हा भेटल्या..म्हणाल्या "आ गई मातारानी, मैया ने मिला दिया फ़िरसे, अब जब तक साथ है साथ रहेंगे, जब साथ छूट जायेगा तब नर्मदे हर" त्या माताजींनी कुठलीही ग्वाही दिली नाही. सोबत राहू असं आश्वासन दिलं नाही. *जब तक साथ है तब तक साथ रहेंगे* या साध्या शब्दात किती प्रवाही विचार जाणवतो… आयुष्य असं प्रवाही असावं नं, नर्मदे सारखं… .जे आहे ते स्वीकारून, आत्मसात करून पुढे चालत राहायचं … ..कुणाच्या कुठल्या बोलण्यातून, वागण्यातून काय शिकायला मिळेल काही सांगता येत नाही. ती रात्र आम्ही सोबत होतो. माझा आणि त्या माताजींचा साथ बलबला कुंडपर्यंतचा… पण माहितिये का, दुसऱ्या दिवशी चालता चालता माझ्या मनात विचार आला तेव्हा एक लक्षात आलं… "जब तक साथ है, साथ रहेंगे" … म्हणजे कदाचित जोवर मी नर्मदा मैया च्या सोबत आहे, म्हणजे माझी श्रद्धा, माझा विश्वास, माझं प्रेम, माझी भक्ती ही सगळी जोवर आहे तोवर ती माझ्या सोबत असणार आहे! कुठलीच कमिटमेंट न देता ती जन्म जन्मांची कमिटमेंट देऊन गेली, हे मला समजलच नाही… ! मला माझ्याच कवीतेचा काही ओळी आठवल्या,

*हाय किती रे मी अज्ञानी.*.

*हात जोडले, धूप लावले*

*नतमस्तक मी फुले वाहूनी*

*अन हृदयीच्या तम गाभारी*

*दीप लावणे गेले विसरुनी… * *हाय किती रे मी अज्ञानी!*

आता बलबला कुंडा बद्दल सांगते. तिथे एक कुंड आहे, ज्यातून बुड्बुडे निघतात म्हणून त्याला बलबला कुंड असं म्हणतात. पण हे बुडबुडे असेच निघत नाही, “नर्मदे हर” म्हंटलं की निघतात… मी कितीतरी वेळ हा खेळ खेळत होते. त्या वेळी मी कुंडावर एकटीच होते. नाही म्हणायले काही बगळे आणि काही कावळे पण आजूबाजूला होते. ते कुंडाच्या आजूबाजूला गवतात बसत. मी मोठ्याने नर्मदे हर म्हंटलं की उडून जात, अन पुन्हा येऊन बसत. बुडेबुडे आणि हे पक्षी बघणं अगदि एंजाॅय केलं मी.इथे बलबला कुंडला एक ज्योतिर्मयी मैया म्हणून संन्यासिनी आहेत. त्यांच्याशी भेट झाली. त्या पुण्याच्या आणि मराठी भाषिक. त्यांना भेटून छान वाटलं. त्यांनी मला एक छान भेट दिली. माझे गुरू नानामहाराज तराणेकरांचा एक खूप जुना फ़ोटो आहे. नाना महाराजांची तूला करत असतानाचा. तेव्हा नाना महाराजांना मोठ्या महाराजांनी मांडीवर घेतल्याचं फ़ोटोमधे स्पष्ट दिसतय. आणि फ़ोटो एडिटींग च्या जमान्याच्या आधीच आलेला आहे. बलबलाकुंड चा मुक्काम छान झाला. बलबला कुंडला अनेक मध्यप्रदेशी महिलांनी येऊन माझी चौकशी केली. त्या म्हणाल्या “ अरे छोरी को अकेले चलता देखा था.. पहुच गयी की नही ठिकसे पुछ लिया” … कुणी आपलं कसं चौकशी करेल तसं त्या ४ -५ अनोळखी मैया, ज्यांनी मला एकटं चालताना पाहिलं होतं त्यांनी येऊन येऊन माझी चौकशी केली.

पुढे हनुमान टेकडी, हांसोट च्या प्रवासात माझी काठी तुटली. मी ट्रेकिंग स्टिक घेतली होती, पण त्याची काही गरज नसते. आपला साधा बांबू चा दंड घ्यावा, तो उत्तम. आता ही तुटलेली काठी जोडणे नाहीतर दुसरी घेणे ..काहीतरी करावं लागणार होतं. हनुमान टेकडीला आधी भेटलेले पाठक काका भेटलेत. त्यांनी तारे नी माझी काठी बांधून दिली. तो दिवस रात्री

भजन कीर्तनात गेला..आता पुढचा टप्पा महत्त्वाचा. विमलेश्वरचा इथून पलिकडे च्या तीरावर नावेतून जावं लागतं. नावेतून जायचं; पण गेलो आणि बसलो असं होत नाही. आधीच ओखी मूळे भरपूर नंबर लागलेले. इथे किती वेळ वाट बघावी लागणार नेम नाही. लोकांना ५ दिवससुद्धा वाट बघावी लागली होती आणि आश्रय म्हणाल तर एक मांडव घातलेला, बस… तिथे आधीच २०० ते २५० लोक होते.. आणि नुसतं वाट बघण्या पलिकडे काहिही करता येण्यासारखं नव्हतं.

कसा झाला माझा नावेतला प्रवास. छोटीशी लाकडी नाव ती.. रात्रीच्या प्रवासात काय काय झालं? किती वेळ, किती दिवस मला वाट बघावी लागली विमलेश्वर ला? कसा होता नावेतला अनुभव? भिती वाटली, की अजिबात वाटली नाही? लाईफ़ जॅकेट्स नसताना डोक्यावर उभं आभाळ घेऊन, ओलं होत होत गेले तेव्हा नक्की काय अवस्था होती? असे प्रश्न तुम्हाला पडणं स्वाभाविक आहे. उत्तर सांगते न.. पण पुढच्या भागात.

*नर्मदा परिक्रमा – एक विलक्षण अनुभूती- भाग ३४

*नर्मदे हर.*

मी विमलेश्वरला पोहचले त्यावेळी दुपार झाली होती. जेवणं नुकतीच आटोपली होती. खूप गर्दी होती तिथे. लोक सारखे नावेच्या ठेकेदाराच्या ऑफ़िसकडे डोळा लावून बसलेले. तिथे पद्धत अशी की कुणीतरी एका परिक्रमावासीनी ४० परिक्रमावासी जमवायचे, त्याची यादी द्यायची, मगच तो ठेकेदार नंबर काढेल. अनेक जण ४० चा गट तयार करायच्या मागे लागलेले. काही जण ज्यांच्याकडे जास्त नावे त्या गटांचा शोध घेताहेत… नुसता गोंधळ… मला काही समजत नव्हतं. मी आपली आसन लावायला जागा शोधतेय.

एक जागा मिळाली..टाळूच्या फ़ोडा सारखी मध्य भागी. ती ही जरा सरकवा सरकवी करतच. माझ्या एका बाजूला एक मराठी संन्यासी आणि दुसऱ्या बाजूला एक सत्तरीच्या आजी होत्या. हे दोघे ही गाडीनी परिक्रमा करत होते. मी आसन लावलं त्यावेळी त्या संन्याश्याने माझी मदतच केली, पण खरं सांगू का… कधी कधी उगाचच मदत घेतली आपण असं वाटू लागतं नं तसंच झालं. अगदी दोन्ही बाजूनी तसं झालं. झालं असं की हे संन्यासी बुवा उठता बसता मला काय काय सांगू लागले. सत्संग असता तर कदाचित बरं वाटलं असतं पण हे संन्यासी बुवा फ़राळाच्या पदार्थांच्या रेसीपी सांगू लागले, आणि दुसरीकडे असलेल्या आजी या संन्यासी बुवांचे गा-हाणे करू लागल्या.मला आता या दोघांपासून सुटका करवून

घ्यावीशी वाटत होती आणि ती मिळाली… ते मागे मणिनागेश्वरला आणि भालोदला मला सोपान दादा म्हणून एक मराठी परिक्रमावासी भेटले होतेत, ते ही विमलेश्वरला होते.

घडत असलेला हा प्रकार त्यांनी बघितला आणि “ताई इकडे या, इकडे आसन लावा, थोडी अडचण होईल, पण या इकडे च” . असं म्हणाले. मी पडत्या फ़ळाची आज्ञा घेतली.

अरे हो, मागे मी मगर मैया च्या दर्शनाबद्दल बोलले होते पण लिहिण्याच्या ओघात तो अनुभव नमूद करायला विसरलेच बहुधा! आता सांगते.तर मणिनागेश्वरला मी धिरडे आणि चिवडा मिळ्यालाचा अनुभव सांगितला होता न, तेव्हाच तिथल्या मंदिरात दर्शन घेऊन झाल्यावर मी मैया किनारी जाऊ असं ठरवलं. जरा पायऱ्या उतरत नाही तर वरच्या पाय- यांवरून सोपान दादाचा आवाज आला, “ताई मगर बघायची का, वर या, खाली नका जाऊ, एक नाही तर दोन मोठ्या मोठ्या मगरी आहेत.” मी धावत वर आले, वरून बघते तर एका चिंचोळ्या जमिनीच्या भागावर एक भूरी आणि तिच्या अगदी खलोखाल एक काळी मगर होती. आम्ही बरच वर होतो, पण तरी त्या मगरी स्पष्ट दिसत होत्या.. तरी शेपटीपासून तर डोक्यापर्यंत पूर्ण लांबीचा विचार केला तर पाच साडेपाच फूट नक्की असतील… .

*भूरे मगर पे करे सवारी*

*हाथ कमल का फ़ूल*

*सबको देती रिद्धी सिद्धी*

*हमे गयी क्यु भूल..*.

*मैया अमरकंठ वाली*

*तुम हो भोली भाली… *

असं एक भजन आम्ही रोजच म्हणत असू. आज या भुऱ्या आणि काळ्या अश्या दोन्ही मगरींच दर्शन झालं. मैया च्या वाहनाचं दर्शन झालं म्हणजे तीचं ही झालच .. ती मगर म्हणजे मैया चेच रूप… . अनपेक्षीत पणे पहिल्यांदा हे दर्शन झालं मात्र मग मैया किनारी चालताना

नजर सारखी मैयाच्या पाण्यावर झालेल्या हालचालींकडे असायची. पुन्हा केव्हा मगर मैया दिसेल या आशेनी का होईना मैया सतत डोळ्यांसमोर राहू लागली, आणि हो, अनेक दा पुढे मगर मैया दिसलीच हे काही वेगळं सांगायला नको, कारण नर्मदा माई कधी ही कुठलीही इच्छा अपूर्ण ठेवतच नाही. पुढे जिथे जिथे दर्शन झालं ते आठवणीनी सांगेन बरं का… .आणि मी विसरली तर तुम्ही आठवण करून द्या नक्की.

असो तर आता पुन्हा विमलेश्वरला येऊयात. तर ह्या सोपान दादांनी मला त्यांच्या बाजूला आसन लावू दिलं आणि मी संन्यासी आणी आजींच्या तावडीतून सुटले. सोपान दादा इथे येऊन दोन दिवस झाले होते, आजचा तिसरा दिवस होता. ओखी वादळा मुळे गेली काही दिवस बोटी समुद्रात सोडता आल्या नसल्याने परिक्रमावासींना इथेच मुक्काम करावा लागत होता. खरं तर सोपान दादा नंतर ३ दिवसाने मी आले होते पण सोपान दादांनी असं काय केलं माहित नाही, पण त्यांच्याच नावेत आणि त्याच दिवशी, म्हणजे रात्री च्या फ़ेरीत माझा नंबर लागला. मला इथे २४ तास देखिल वाट बघावी लागली नाही. मी जेव्हा सोपान दादांना विचारलं तर म्हणाले “माताजी हमारे गाव की है, और अकेली है, हमारे साथ रहेगी तो सहायता होगी- इतकचं बोललो मी” , कमालच झाली.. लोक ५- ५ दिवस वाट बघताहेत आणि मला एकही दिवस पूर्ण वाट बघावी लागली नाही.

आमची रात्र फ़ेरी होती. १.५ वाजता तयार असावं लागणार होतं, त्यामुळे बॅग पॅक असायला हवी, शिवाय प्लास्टिकची बॅग घेऊन त्यात ती बांधून ठेवायची, म्हणजे मग नंतर काही घालयचं नाही, काही काढायचं नाही… . स्लीपिंग बॅग सकट मी सगळं पॅक केलं खरं, पण आता बसायलासुद्धा काही नव्हंतं, आणि पांघरायलासुद्धा… कुड्कुडण्या शिवाय पर्याय नाही… . तरीही, सोपान दादा ने कुठूनशे दोन पोते आणले आणि रात्री १० ते १.५ त्या पोत्यांवर बसून आम्ही झोपायचा प्रयत्न केला… पण झोप लागली नाही. सगळ्यांची हीच अवस्था. शेवटी भजन, मैयाची गाणी असं हळू हळू सगळेच परिक्रमावासी गाऊ लागले, काही हौशी माताजी

एकत्र येऊन भजनांवर नाच करू लागल्या, देवळातली भजन मंडली पण ढोलक आणि इतर वाद्य घेऊन साथ देऊ लागली..खूप उत्साहात आणि आनंदात वेळ कसा गेला समजलं नाही.. १ वाजला..१ वाजता नावाड्याने आवाज द्यायला सुरवात केली. ४ नावा सुटतात. प्रत्येकी मधे ४० परिक्रमावासी. नाव म्हणजे काही मोठी नाही ह्रं… लाकडी, मधे पाट्या ठोकलेली, अगदी लहानशी..आम्ही सगळे एकत्र झालो आणि आता नावेकडे जायची वाट बघू लागलो… खरी कसोटी तर इथून पुढची आहे. इथे समुद्र देवात जोडे चप्पल घालून जाता येत नाही, ते किनाऱ्यावरच सोडावे लागतात. मी नुकत्याच अंकलेश्वरला घेतलेल्या स्लीपर्स सोडून दिल्या आणि पायी चालू लागले. किर्र अंधार, त्यात पायाखाली आधी दगडं, मग कोरडी वाळू. मला अनवाणी चालण्याची सवय नाही.. तीन चारदा तरी पडले असेल मी… शेवटी एका ठिकाणी शिट्टी वाजली आणी थांबा, असा नावाड्याचा आवाज आला… अजून भरती हवी तशी आली नाही. नावा सोडता येणार नाही, वाट बघावी लागेल… सोसाट्याचा आणि गारेगार वारा, माझ्याकडे एकेमेव पोतं… बाकी सगळं बॅगेत… .मला शिंका यायला लागल्या.. काही केल्या थांबेनात, डोकं धरलं, ताप येईल असं वाटू लागलं, पण करणार काय? पण मैयाची पण कमाल असते. ह्या सोपान दादानी चक्क नावाड्यालाच मागून माझ्यासाठी एक ब्लँकेट आणलं आणि " ताई, इथेच गार पडल्या तुम्ही, घ्या पांघरा" असं म्हणून चक्क पांघरून पण दिलं… .गारवा इतका होता की थंडी पूर्ण गेली नाही, मात्र खूप, अगदी खूपच आधार झाला मला त्या ब्लँकेट चा. तिथे आम्ही २.५ वाजेपर्यंत होतो, म्हणजे आम्हाला १.५ तास वाट बघावी लागली.. शेवटी एकदा नावाड्याने आमच्या नावेचा नंबर घेतला.जस्सा नावाड्याने ४ नंबर उच्चारला तस्से सगळेजण बोटीच्या दिशेने धावू लागले. सोपान दादा तर त्यांची बॅग घेऊन सर्वात आधी धावले. कदाचित जागा मिळण्यासाठीची ही घाई असावी. मी मात्र जरा आजारी, म्हंटलं जिथे मिळेल तिथे बसेन, पण आता धाववत नाही माझ्यानी… .मी हळू हळू चालत नावेपाशी पोचले. सगळ्यांची नावेत चढायची धड्पड सुरू होती कारण नावेचा काठ हा खांद्या इतका उंच.. हातावर जोर देवून चढायचं म्हणजे कसरत. त्यातून ती नाव काही स्थीर म्हणून नाही, पाण्यावर

तरंगती नाव स्थीर राहील कशी? आणि हो मांडीपर्यंत पाय पाण्यात असणार होते. नावेचा धक्का लागून काही लोक पडत होते. मी चढूच कशी? काही समजेना.. मी शांत पणे उभी राहून विचार करत होते… . तेवढ्यात सोपान दादा धावत माझ्याकडे आले आणि माझी बॅग घेऊन गेले, ती नावेत ठेवून परत आले आणि मला नावेत चढायला मदत केली. मी कशीबशी नावेत चढले, चढले काय, सोपान दादांनी मला अक्षरशः ओढलं. त्यांनी माझ्यासाठी जागा पण धरून ठेवली होती, अगदी इंजिन च्या बाजूला, जेणेकरून मला इंजिनची ऊब मिळेल! ते माझ्या समोर बसले होते आणि नावाड्याचं ब्लँकेट मी पांघरलं होतच. मी नावेच्याकडेला होती, माझ्या डावीकडे पाणी, समोर सोपान दादा, मागे परिक्रमावासी आणि उजवीकडे इंजिन. तीन बाजुंनी माझं प्रोटेक्शन छानच जमलं होतं आणि डावीकडे समुद्र भगवान दर्शन, बसल्या जागेवरून ओटी भरायची व्यवस्था, बाटलीत पाणी बदलून घेण्याची व्यवस्था आणि शिवाय ब्लँकेट अशी सोय माझी करण्यात आली होती.

हा पूर्ण प्रवास खूपच वेगळा आणि “हटके” असाच होता. बोट चालू लागली तसं इंजिन गरम होऊ लागलं.. ते जास्त गरम होऊन मला पायाला चटके बसू लागले… .हलायला देखिल जागा नव्हती. नाव खचाखच भरली होती. एकीकडे चटका आणि दुसरीकडे गार पाण्याच्या लाटा… अंगात ताप.. काय अवस्था झाली असेल? अजूनही भरीस भर म्हणून असे अनेक प्रकार घडलेत, लाईफ़ जॅकेट वगरे सोपस्कार काहीही नव्हते आणि अचानक एक जोराचा हिसका नावेला बसला… आम्ही सगळेच बऱ्यापैकी उसळलो… असं काय झालं होतं?. तो जोरदार हिसका का बसला… काय वाटलं तेव्हा… हे सगळं सांगते पुढच्या भागात.

नर्मदा परिक्रमा – एक विलक्षण अनुभूती- भाग ३५

नर्मदे हर.

आम्ही नावेत बस लो होतो. माझ्या पायाला चटके बसत होते, अंगात ताप होताच. समोर सोपान दादा होते आणि त्यांचा मला खूप आधार वाटत होता. माझा नावेतला हा पहिलाच प्रवास. नक्की काय असतं ते मी पहिल्यांदाच बघणार! बघणार असं म्हणंणं चुकिचं आहे कारण लाटांशिवाय काहीच दिसत नव्हतं. आणि लाटा बघितल्या की गरगरायला होत होतं, का ते सांगते. समोरून येणारी लाट ही चांगली मोठी आणि उंच दिसायची. असं वाटायचं ही आता आपल्या अंगावर आदळणार पण पाण्याच्या फ़ोर्स मुळे की नाविकाची कमाल म्हणायची माहित नाही, ती लाट आमच्या नावे खाली जायची आणि आमची नाव चांगलीच उंच फ़ेकली जायची. ती समोरून येणारी लाट जेव्हा मागे निघून जायची त्यावेळी समोर दुसरी लाट तयार असायची मात्र आधीची लाट निघून जाता जाता आमची नाव जशी वर उचलल्या जायची नं लाटेमुळे, तशीच चांगलीच खाली पण आदळल्या सारखी व्हायची. म्हणजे, अशी कल्पना करा की ज्या वेळी समोर लाट आहे त्यावेळी नाव अशी खोलगट भागात आहे, म्हणजे आपण एखादी वस्तू पाण्यात सोडली की कसं क्षणभर ती वस्तू तळाशी जाते आणि पाणी चारी बाजूला उसळतं नं तसं काहितरी… असं वाटू लागायचं की पाणी खाली गेलय, आणि लाट आली की उसळी बसून नाव वर उचलल्या जातेय… ..आकाश पाळण्यात बसल्यावर कसा पोटात गोळा येतो, तसं होत होतं… सगळी मंडळी फ़क्त आणि फ़क्त देवाचा धावा करत होती. माझा हनुमान चलीसा, नर्मदाष्टक आणि जे येत असेल नसेल ते सगळं म्हणून झालं होतं..आणि पुन्हा सुरुच होतं… आणि अशा वेळी, अचानक आमची नाव खूप जोरात हलली..हिसका बसला, आता ही नाव उलटून, भर समुद्रात जलसमाधी मिळते की काय असं वाट्लं…

झालं असं होतं की आमच्या पुढे तीन नावा होत्या. या नावाड्यांची एक पद्धत आहे नाव हाकायची. समोरचा नावाडी मागच्या नावाड्याला टॉर्च नी वाट दाखवतो. खरंतर या वेळी परिक्रमावासिंनी आपले टॉर्च बंद ठेवावे अशी सक्त ताकीद दिली असते. पण तरीही या सूचनेचं गांभीर्य माहित नसल्या मुळे काही परिक्रमावासी टॉर्च लावून समुद्र बघण्याचा प्रयत्न करतातच. तसंच झालं. हे नावाडी अगदी सिरियली टॉर्च दाखवतात मागच्या नावाड्याला. म्हणजे पहिल्यानी दुसऱ्याला दाखवल्यावर मग दुसरा तिसऱ्याला दाखवेल… असं काहीतरी आहे. जिथे कुठे थोडं वळण घ्यायचं असतं तेव्हा हा टोर्च चा सिग्नल जास्त उपयोगी पडतो. तर झालं असं की पहिल्या आणि दुसऱ्या नावे नंतर तिसरी नाव ही वळली. आता आमची नाव वळायची होती. टॉर्च प्रमाणे आमच्या नावाड्याने नाव वळवली देखिल. मात्र हा टॉर्च नावाड्यानी दाखवलेला नसून तो नावेतल्या कुण्या तरी परिक्रमावासी नी सुरू केला होता. त्यामुळे आमची नाव योग्य वळणापेक्षा थोडी आधी वळली आणि त्या ठिकाणी बेटासारखं काहितरी होतं त्याला जाऊन किंचित आदळली. नशीब म्हणा की हा भाग नावाड्याच्या चटकन लक्षात आला आणि त्याने प्रसंगावधान राखून ती नाव जोरात आदळू न देता दुसरीकडे वळवली मात्र तरीही हिसका बसलाच! हा लहानसा हिसका देखील खरं तर इतका जोरात होता की जोरात नाव आदळली असती तर काय झालं असतं ही कल्पना करण्याचं धाडस माझ्याकडून आजही होत नाहीये. त्यावेळी मनात कुणी म्हणजे कुणीच नव्हतं. देवाची आठवणं काय असते ते तेव्हा अनुभवलं. देव आठवले की कुणिच कसं आठवत नाही हे ही तेव्हाच समजलं, आणि हो.. भालोदला प्रतापे महाराज म्हणाले होते ती ईशवराला आळ्वण्याची तळमळ किती तीव्र असू शकते ते ही तेव्हा चांगलच समजलं.

तो हिसका सावरल्या नंतर नाव बर्यापैकी शांतपणे हाकल्या जात होती. एव्हाना मला चटके बसणं कमी झालं होतं कारण या हिसक्यामुळे आणि लाटांमुळे संपूर्ण नावेत पायाशी पाणी जमा झालं होतं. तापलेला भाग थोडा थंड झाला होता, किंवा हिसका, लाटा या प्रकारात मी बसणारा चटका विसरत होते.. नक्की काय होतं ते आता आठवत नाही. पण नाव थोडी

शांत झाल्यावरची गंमत सांगते. माझ्या समोरचे सोपान दादा अचानक " ताई सोडा, सोडा प्लीज"  असं ओरडून मला म्हणाले.. मला कळलच नाही की ते असं काय म्हणताहेत? मात्र मग लक्षात आलं. मी माझ्या अंगावरचं ब्लँकेट घट्ट धरून, ओढून घेतलं होतं आणि मी सोपान दादांच्या मागे बसले होते.. अहो, त्या ब्लँकेट सोबत मी सोपान दादांच्या शर्टाची कॉलर अनावधाने इतकी गच्च आवळली होती की ते ओरडून म्हणत होते "ताई आता गळफ़ास लागेल,सोडा" … मी सोडल्यावर ते म्हणाले "म्हणजे आज आमचा शेवट होताच.. नर्मदा मैयात बुडून मेलो असतो एकतर नाही तर सुरुची मैयाने दुसरा मार्ग ठेवलाच होता" … वाचलो बाबा.. असो…

मग हळू हळू उजाडू लागलं तेव्हाचं दृश्य खूपच रमणीय आणि अवर्णनीय होतं. एकीकडे चंद्र होताच आणि आता सूर्य ही उगवणार.. या दोन्हीची जणू साक्ष द्यायला आमची नाव भर समुद्रात हळूवार वाहातेय..त्या वेळेला कुणीतरी मोबाईल काढून गूगल मॅप का अजून कुठलंस ऐप आहे महित नाही पण त्याच्या वर आपण कुठे आहोत ते पाहिलं.. आणि ते जेव्हा समजलं तेव्हा त्या नावाड्यांबद्दल मनात खूप आदर निर्माण झाला. हे नावाडी आपल्या कामात इतके पारंगत असतात की रात्री अंधारात नाव चालवतानासुद्धा त्यांना दिशांचं जबरदस्त भान असतं की ते आकाशातल्या ता-यांच्या पोझीशन वरून नावेची दिशा कायम करतात. त्या ऐप वर असं दिसत होतं म्हणे की आपली नाव ना समुद्रात आहे ना मैया मधे. अगदी मैया आणि समुद्र भगवानांचं पाणी जिथे एक होतय त्या पट्ट्यावर आपली नाव प्रवास करतेय. एकीकडे ४० परिक्रमावासीयांचे जीव त्या नावाड्य़ांच्या जीवावर प्रवास करत असतात. त्या चाळिसांची जबाबदारी त्यांच्यावर असतेच आणि ह्या चाळीस परिक्रमावासिंयांच्या श्रद्धेचीसुद्धा जबाबदारी ते चोख निभावत असतात. इतका पायी प्रवास केल्यावर या परिक्रमावासिंची परिक्रमा खंडीत होऊ द्यायची नसते. मैयातून नाव नेल्या जात नाही आणि समुद्राच्या अक्राळ विक्राळ लाटांच्या वाटेला ते नाव जाऊ देत नाही. ही नाव अगदी बरोबर मैया आणि समुद्र जिथे मिळतात तिथून जाते.

५ तासाचा हा प्रवास आता संपत आला होता. थंडी अजूनही तशीच होती. आता सगळेच थकले होते आणि त्यामुळे सगळेच शांत होते. रात्रीच्या लाटांमुळे सगळे पूर्ण ओले झाले होते. आता ते खारं पाणी अंगाला टोचल्यासारखं वाटत होतं. अंगावर रेती रेती झाली होती. कधी एकदा मिठी तलाईला जाऊन आंघोळ करते असं झालं होतं. ताप होता की नव्हता काही माहीत नाही पण खूप थकवा आला होता. झोप झाली नव्हती, भूक लागली होती पण तोंडाला चव नव्हती. आम्ही पोचलो एकदाचं. आता उतरायचं खाली.. पण इथे पुन्हा तेच.. खाली दलदल. अगदी गुडघ्यापर्यंत पाय गचकन खाली जाईल इतकी दलद्ल होती. सोपान दादांनी मला पुन्हा मदत केली. आधी पेक्षा मी आता जास्त थकले होते. नावेतून खाली उतरणं कठीणच होतं, पण उतरले कशीबशी सोपान दादांच्या मदतीनी. काठीचा आधार घेत घेत दलदल पार केली आणि मिठी तलाईला येऊन पोचले.

इथे प्रचंड गर्दी. सगळेच परिक्रमावासी एकच घाई करत होते. अजिबात जागा नाही. स्त्रीयांसाठी आंघोळीची वेगळी व्यवस्था नव्हती. अगदी प्रात:विधी आटोपायला पण सोय नव्हती. जी होती फ़ार अस्वच्छ होती. शेवटी आंघोळ न करता फ़क्त कपडे बदलायचं ठरवलं आणि पुढे कुठे नीट स्वच्छ आंघोळ करू असं ठरलं. कपडे बदलायला म्हणून बॅग उघडली. ती प्लास्टीक च्या पोत्यात बांधली होती म्हणून आतले कपडे कोरडे राहतील असं वाटलं होतं मात्र तसं झालं नाही. एकूण एक कपडा ओला गच्च होता. चादर, लुंगी, कपडे, अगदी स्लिपिंग बॅग पण पाण्यात भिजवून ठेवावी इतकी ओली झाली होती. आता कपडेसुद्धा बदलता येणार नव्हते. उपाय काही नाही. शेवटी सगळे कपडे धुतले. स्लिपिंग बॅग, सामान ठेवण्याची बॅग सगळं सगळंच धुतलं. अंगावरसुद्धा रेती रेती झालेली, त्यामुळे दोन तीन बादल्या पाणी तसंच अंगावर घेतलं… आता सगळे कपडे ओले.. अंगावरचे देखिल… ते वाळेपर्यंत वाट बघून पुढचा प्रवास करायचा होता.. ईलाज नाही.

सोपान दादा आणि मंडळींची सोबत येवढीच होती. इथून पुढे जे मिळेल ते मिळेल. पण माझं नेहमीचं वाक्य मी पुन्हा एकदा म्हणेन. माई फ़ार कनवाळु आहे. ती तुम्हाला वाऱ्यावर सोडत नाहीच. थोडी परिक्षा घेते मात्र तुम्ही तिला शरण असलात तर ती तुम्हाला कुरवाळून घेतल्याशिवाय राहात नाही.

या वेळी माझी तब्ब्येत बरीच बिघडली होती. आणि हे सांगायलासुद्धा माझ्याजवळ कुणी नव्हतं. पण माझी इतकी काळजी घेतल्या गेली की मला घरच्या मंडळींची कमतरता पण भासली नाही. सांगते कसं ते.

मला दोन ते तीन दिवस बराच ताप होता.मी तापातच नारेश्वरला पोचले. तिथे गेल्यावर मला जेवायची देखिल ताकत नव्हती. कशीबशी बॅग ठेवली, आसन लावलं आणि झोपले. मी थंडी नी कुडकुडत होते. आश्रमाच्या हॉल मधे माझ्या खेरीज एक दोन परिक्रमावासी अजून असतील, बाकी आश्रम रिकामाच. मी बहुधा कण्हत असावे, कारण माझ्या बाजूचे एक काका मला अधून मधून “बरं वाटत नाहीये का?” असं विचारत होते. त्यांनी त्यांचं पांघरूण माझ्या अंगावर घातलं आणि म्हणाले “तुम्हाला ताप आहे बहुतेक ताई, औषध घेतलं आहे का… ” मी औषध घेतलं नव्हतं.. पण घेणं गरजेचं होतं. त्या काकांनी माझ्यासाठी खालून ताट वाढून आणलं, मला औषध दिलं. माझ्यासाठी रूमसुद्धा शोधून दिली. माझं सगळं सामान रूम मधे नेऊन दिलं. मी फ़क्तच आराम केला, पण रात्री पुन्हा मला फ़णफ़ण ताप चढला. आता डॉक्टर बोलावणं भाग होतं. डॉक्टर शोधणं त्यांना बोलवणं सगळच काकांनी केलं. रात्री माझ्या कपाळावर थंड पाण्याच्या पट्ट्या पण ठेवल्यात. कोण कुठले हे काका, पण काय संबध असतो नाही? दुसऱ्या दिवशी जेव्हा मला बरं वाटलं तेव्हा मी त्यांना नमस्कार केला तर रडलेच ते. म्हणाले मला देवानी मुलगी दिली नाही. ती आज नर्मदा माईनी दिली. आता इथून पुढे तुझी परिक्रमा होईस्तोवर मी तुझ्या सोबत असेन. आणि इथून पुढे तू माझी लेक आहेस..तेव्हापासून मी त्यांना “बाबा” असंच म्हणते. आणि हो, त्यांनी मला सक्त ताकिद दिलीये, की त्यांना “अहो

बाबा”  न म्हणता “ए बाबा”  म्हणायचं. तर तेव्हापासून हा माझा नर्मदा बाबा शेवटपर्यंत माझ्या सोबत होता.

इथून पुढे मंदार वाळिंबे आणि वंदना ताई परांजपे हे दोघं सोबत होते.

मालसर, शिनोर गुजरात चा प्रवास करत तिलकवाड्यापर्यंत आम्ही सोबत होतो. मालसरला जाताना वाटेत आम्हाला चुडैल माता मंदिर लागलं. मी या आधी चुडैल मातेचं मंदीर बघितलं नव्हतं. गुजरात चा हा भाग तसा बऱ्यापैकी निसर्ग रम्य आहे आणि गुजरात मधले आश्रमसुद्धा बरेच पॉश आहेत. तसाच एक आश्रम मालसर चा. कणकेश्वरी आश्रम. खरं तर वंदना ताई आम्हाला दुसऱ्या एका आश्रमात घेऊन जाणार होत्या, पण तिथे आम्ही गेलोच नाही. जागा बघता बघता वाटेत आम्हाला एक खूप आकर्षक, मीतभाषी आणि खरोखर प्रसन्न आणि सुंदर अशी कणकेश्वरी आश्रमाची सेवीका दीपिका भेटली. खूप आदरानी ती आम्हाला कणकेश्वरी आश्रमात घेऊन गेली. तिथे पाऊल ठेवलं आणि आम्ही चौघही अवाक होऊन बघत राहिलो…  मालसर मधे आम्ही खरं तर राहणार नव्हतो, पुढे जाणार होतो, पण आम्ही चौघही एकमताने तिथे थांबून गेलो.. सकाळी साडेनऊ वाजताच मुक्काम केला …  अगदी ६ ते ७ किमी चालून चक्क थांबलो! असं काय होतं तिथे? सांगते पुढच्या भागात.

*नर्मदा परिक्रमा – एक विलक्षण अनुभूती- भाग ३६*

*नर्मदे हर.*

एकतर दीपिका च्या मनमोहक व्यक्तीमत्वाने आम्ही भारावून गेलो होतो. त्यात तिची अतिशय विनम्र विनंती आणि अतुलनीय तेज आम्हाला तिच्या आश्रमात जायला भाग पाडत होतो “भोजन प्रसादी तो कर लीजीये, फ़िर चले जाना अगर आपको रहना नही है तो” असं म्हणत ती आम्हाला घेऊन गेली. भोजन प्रसादी करून निघूयात असं म्हणत आम्ही तिथे गेलो खरे पण आत पाऊल ठेवताच चौघांनीही एकमताने आज मुक्काम करायचं ठरवलं. अतिशय प्रसन्न वातावरण. कमालीची शांतता आणि विलक्षण कंपन तिथे जाणवत होते. शिवाय सुबत्ता ही होतीच. आम्ही एका हॉल मधे आसन लावलं. भला मोठा हॉल आणि आम्ही चौघंच. गंमत म्हणजे इतके जास्त चार्जिंग पॉईंट्स होते की सगळ्यांचे सगळे मोबाईल आणि पोवर बँक एकाच वेळी चार्जिंगला लावता आले. परिक्रमेत अनेक ठिकाणी मोबाईल नेटवर्क नसतं आणि चार्ज करण्याची पण सुविधा बऱ्याच ठिकाणी मिळत नाही. आम्हा चौघांनाही जाम आनंद झाला होता. खरं तर तुम्ही म्हणाल यात काय आहे असा खूप आनंद होण्या सारखं? पण हीच मजा आहे माहितिये का. एखादी छोटी जरी गोष्ट झाली नं तरी त्याचा इतका मोठा आनंद होतो की काय सांगावं! कदाचित छोट्या छोट्या गोष्टींमधे मोठा मोठा आनंद मानायला शिकतं मन, आणि मग आपण सतत आनंदीच राहतो. इथे अशा अनेक छोट्या छोट्या गोष्टी आम्हाला मोठे मोठे आनंद देत होत्या. त्यातली एक म्हणजे टेबल खूर्चीवर बसून जेवण. जेवण चारही ठाव, अगदी लोणचं पापड कोशींबीर आणि गूळसुद्धा. त्यात तव्यावरच्या गरमा गरम पोळ्या, आणि स्वयंपाक करणा-यांच्या आणि तो वाढणाऱ्या कर्मचारी मंडळीच्या चेहेऱ्यावरचं समाधान ह्या सगळ्यांनी मन खूप तृप्त झालं होतं. आम्ही जेवून विश्रांती घेतली आणि संध्याकाळी मी बाबा

आणि मंदार बाहेर जाऊन आलो.माझी टाच थोडी दुखत होती, हे समजल्यावर एक म्हातारऱ्या श्या बाई, आश्रमाच्या सेवीका तेल घेवून आल्यात. अगदी नको नको म्हणताना देखिल स्वत:च्या हाताने माझी टाच चोळून दिली. येवढी मोठी बाई आपली सेवा करतेय असं काय केलं होत् हो मी? *ही सेवा माझी नाहीये हे मला समजत होतं कारण ही सेवा होती मैयाची*, आणि मैयाच ती करत होती. मी माध्यम होते, आणि हा विचार मनात येईस्तोवरच काय तो दु:खाचा खेळ चालतो. मग काय होतं समजत नाही. आजी मला एक्यूप्रेशर देत होत्या. मी बेंबीच्या देठापासून ओरडत होते, मात्र मला बरच आराम पडला होता. इतका की संध्याकाळी मी बाहेर जाऊन मंदिरं बघून आले होते.डोंगरे महारजांची समाधी, ६०० वर्ष जुनं गणेश मंदिर, अंगारेश्वर मंदिर असं सगळं बघून आलो.

ह्या अंगारेश्वर मंदिराची एक अख्यायिका आहे. हे मंदिर अतिअप्राचीन आहे. याची निर्मिती नक्की केव्हा झाली हे काही माहित नाही मात्र हे मंदिर मुस्लीम राज्यकर्त्यांनी ते सत्ते मधे असताना जमीन दोस्त करण्याचे अनेक प्रयत्न केले होते. इंग्रज राजवटी मधे ही असे प्रयत्न झाले आणि त्या आधीही जेव्हा जेव्हा ह्या मंदिराकडे कुणी वक्रदृष्टी केली त्या त्यावेळी या मंदिरावर निखारे पडत आणि ह्या मंदिराला कुणी हात लावू शकलं नाही असं इथल्या पुजा-यांनी सांगितलं.. निखाऱ्याला हिंदी मधे अंगारे म्हणतात आणि या मंदिराचं नाव अंगारेश्वर पडलं. अशी ही कथा.

अरे हो मालसर च्या आधी राणापूर चा एक अनुभव सांगायचाच राहिला. मी मंदार बाबा आणि वंदना ताई असे आम्ही सोबत होतो. बाबाचा पाय दुखत होता. शेतातली सगळी वाट होती. जिथे पोहोचणे होते तिथवर आम्ही पोहोचू शकलो नाही. आता कुठे थांबायचं? बरच अंतर काही दिसलं नाही. मग मंदार जरा पुढे झाला आणि जागा बघू लागला तो त्याला एक मंदिर दिसलं पण मंदिरात झोपायला परवानगी नव्हती. समोर पोर्च होता आणि उजव्या

बाजूला एक खोली पण होती. तिथे राहता येईल असं वाटलं. आम्ही आत गेलो. पोर्च मधे झोपण्याची परवानगी मिळाली. आता भोजन व्यवस्थेचं काय ते बघायचं.

मंदिराच्या वर तिथेल्या व्यवस्थापक बाई राहात होत्या, त्यांच्याशी जेव्हा चर्चा झाली तेव्हा त्यांचं माहेर प्रकाशा चं असल्याचं समजलं. त्या बाई मराठी होत्या मूळच्या, त्यामुळे त्यांना ही आमच्या बद्दल आपुलकी वाटली आणि कढी खिचडीच्या भोजन प्रसादीची व्यवस्था बाईंनी करून दिली. आता आम्ही निवांत झालो आणि काही मदत हवी असेल तर म्हणून त्या बाजूच्या खोलीत गेलो. गप्पा करता करता तिथेच आसन लावावं का असा विचार आला आणि लगेच गेला ही.. त्या खोलीत एक भला मोठा नाग बरेचदा येतो असं समजलं. अन्न धान्य साठवून ठेवलेली ती खोली असल्यामुळे उंदिर असतात तिथे, त्यांना खायला येतो ..असं सहज म्हणून तिथला पुजारी बोलला पण आमचा विचार मात्र बदलाच. आम्ही पोर्च मधेच आसन लावलं. संध्याकाळपर्यंत सगळं ठिक होतं पण संध्याकाळी त्याआश्रमातल्या झाडावर माकडांनी गर्दी केली. इथवर ठिक आहे हो, पण ह्या माकडांची पिल्लं फ़ारच धिटुकली आणि चिकित्सक. “आज ही चार कोण आलीयेत राहायला इथे? यांच्याजवळ बरच सामान दिसतय?, त्यातलं काही आपल्या कामाचं आहे का?” असे अनेक प्रश्न त्यांना पडले असावेत. जरा आम्ही इकडे तिकडे गेलो की एखादं पिलू यायचंच आमच्या सामानाची झडती घ्यायला. ही पिलं हुशार हं अगदी, मंदिरातल्या आवारातला नळ उघडून पाणी प्यायचीत ती. त्यांची मर्कट लीला थोडा वेळ बरी वाटली पण ही मंडळी रात्रभर जागणार झाडावर, आणि येणार अधून मधून, आम्ही झोपलो की हे नक्की माहित होतं. आम्ही सगळं सामान बांधून झोपलो खरं, पण धाकधुक होतीच… अणि एक पिलू बराच वेळ येत राहिलं.. मी सगळ्यातकडेला झोपली होती, ते पिलू येत गेलं वारंवार आणि हळू हळू मात्र त्याची माझी मैत्री झाली… मग मात्र त्याने त्रास दिला नाही. तिथेल्या बेंच वर ते बसायचं आणि तिथूनच खाणाखुणा करायचं. त्याला बहुतेक समजलं असावं, हे लोक आणि आपण, सगळेच कसल्यातरी शोधात आहोत आणि एकमेकांना इजा पोहचवून काही होणार नाहीये. त्याला समजलं की नाही माहित नाही, पण मला खरंच जाणीव

झाली, ती अशी की खरोखर माणूस, किंवा कोणताही प्राणी किंवा या सृष्टी मधील काहीही असू देत, प्रत्येकामधे एक नैसर्गिक समजूतदार पणा असतो, किंवा एक असं काहीतरी टॅलेंन्ट असतं ज्या मार्फ़त समोरच्या प्राण्यामधील आणि स्वत:मधील एक कॉमन तत्त्व समजून घेता येतं. समोरचा धोकादायक नाही ही खात्री पटली की दोघांच्याही मनातील भिती जाते. तसंच काहीतरी या पिलाच्या आणि माझ्या बाबतीत झालं आणि हळू हळू आम्ही दोघांनी एकमेकांकडे दूर्लक्ष केलं. मग मात्र मला शांत झोप लागली. खरंतर हा अनुभव नाहीये, पण या तत्वाचा फ़ायदा मला पुढे बरेचदा झाला.

मालसर हून पुढे शिनोरला मिलिंदजींच्या आश्रमात बालभोग केला आणि पुढे निघालो. मिलिंद हिंगणे आणि सौ हिंगणे यांनी नवीनच आश्रम प्रस्थापित केला होता. इथून पुढे आम्ही किनारा मार्ग धरला. वाट खरोखर कठीण होती, पण खूप मजा येत होती. आमच्यात अलिखित वाटणी झाली होती कामाची. मंदार आमच्यातला सगळ्यात लहान आणि सगळ्यात फ़िट मुलगा. मग तो पुढे जाऊन वाट आहे की नाही ते सांगायचा, आणि मग आम्ही त्याच्या मागे जायचो. करत करत आम्ही बरच अंतर चालून गेलो आणि अचानक आमच्या सगळ्यांचं लक्ष मैयावर वेधल्या गेलं. मी आणि बाबा आराम करत बसलो होतो. मंदार पुढे होता आणि वंदना ताई मागे. मंदार मागे चालत आला आणि आम्ही दोघांनी एकाच ठिकाणी इशारा केला.. मैयाच्या पाण्यावर संथ पणे हालचाल होत होती. काही तरी पुढे सरकत होतं, पाण्याखाली जात होतं आणि वर येत होतं… नीट बघितलं तेव्हा समजलं..ती मगर मैया होती. या अचानक दर्शनाने आम्ही सगळेच आनंदलो होतो. आणि आता समोर येणारी कठीण वाट अचानक सहज सोपी वाटू लागली होती.दुपारच्या भोजन प्रसादिची वेळ होत आली होती. आम्हाला भुका लागल्या होत्या. जवळ एक आश्रम आहे असं समजलं. ब्राम्हणगाव बहुधा या गावाचं नाव.. नक्की आठवत नाही पण इथे पूर्वी ब्राम्हण लोकच राहात असत आणि पूर आल्यानंतर हे गाव ओसाड झालं असं समजलं. इथे एक खूप सुंदर आश्रम दिसला. सुंदर बांधकाम, बगीचा, पाण्याच्या टाक्या अगदी सगळी व्यवस्था असेल असं वाटलं. अगदी मैयाच्या काठावर. वाटलं

इथे भोजन प्रसादी होईल, पण हा आश्रम बंदच होता. खूप हळहळ वाटली. या मार्गावर परिक्रमावासी फ़ार कमी येतात त्यामुळे आश्रम बंदच असतो असं समजलं. आम्ही पुढे निघालो. पुढे एका छोट्याश्या डोंगर वजा जागेवर ज्याला टीला असं म्हणता येईल, एक बंगाली बाबाची झोपडी होती, तिथे चहा घेतला, फ़रसाण खाल्लं. हेच झालं आजचं जेवण.

लोक मला अनेकदा विचारतात की काही वाईट किंवा अनैसर्गिक अनुभव येत नाहीत का? तर येत नाहीत असं नाही पण त्यांचं प्रमाण चांगल्या अनुभवांपेक्षा खूप कमी असतं आणि त्यांचा प्रभाव पण नगण्य असतो त्यामुळे अशा अनुभवांकडे आपसूकच दूर्लक्ष केल्या जातं. ते लक्षात पण राहात नाही, पण एक लक्षात आहे, तो सांगते. अर्थात याला मी वाईट नक्कीच म्हणणार नाही मात्र किंचित वेगळा किंवा अनपेक्षीत म्हणेन. यातूनही काही तरी धडा घेणे असेलच. पण त्या आधी एका अतिशय प्रसन्न जागेबद्दल सांगते जिथले कंपनं खूपच प्रभावी आणि सकारात्मक होते.

इथला आश्रम धारी बैरागी खूप प्रेमळ होता आणि कधी परिक्रमेची संधी मिळाली तर ही जागा सोडूच नये अशी ही जागा होती. चातुर्मास करण्याची इच्छा असेल तर मी तरी पहिलं प्राधान्य या जागेला देईल अशी ही जागा.

बरकाल असं या जागेचं नाव. आम्ही मैया किनारी चालत होतो. ऊन झालं होतं. इथे वाळू चा किनारा आहे. वाळूतून चालण तसं कठीण असतं कारण प्रत्येक वेळेला पाय उचालायला लागाणारी ताकत ही साध्या रस्त्यापेक्षा जास्त लागते वाळूमधे. त्यामूळे कमी वेळातही थकवा जास्त येत होता. या किनाऱ्याला मोठाली झाडं किंवा सावलीची ठिकाणं नाहीत. त्यामुळे चालत राहाणं हा मार्ग. मधे मधे इथे बरेच दगड पण आहेत. पात्रातले मऊ झालेले दगड बघण्यात, त्यातले काही वेचण्यात पण इथे माझा बराच वेळ गेला मात्र नंतर वजन झाल्यामुळे ते फ़ेकून दिले.. संचय नको.. परत एकदा समजलं.. असो, तर रस्त्याने जात असताना डावीकडे वर एक मंदिर दिसलं. खालून हे मंदिर अगदी सामान्य आणि लहानसं

असं वाटलं. तिथे जाऊ, थोडा आराम करू आणि पुढे निघू असा विचार करून आम्ही मंदिराच्या पायथ्याशी पोचलो.मंदिराच्या पायऱ्या मोठ्या आणि दगडी होत्या. उंच पाय-यांच्या दोन्ही बाजूला झाडं होती. साधारण २० -२५ पायऱ्या नंतर एक लाकडी बंद दरवाजा होता. इथवर सगळंच सामान्य होतं. मात्र त्या पायरीवर पाय ठेवला आणि मला जोडे काढण्याची तीव्र इच्छा झाली. कदाचित मंदिराच्या पायऱ्या आहेत म्हणून असेल. मी जोडे काढले आणि पायरीवर पाय देते तो त्या पायरीचा थंड स्पर्श माझ्यात अचानक चेतना भरून गेला. दारापर्यंत पोहचेस्तोवर माझा थकवा जवळ जवळ नाहीसा झाला होता. मंदार माझ्या पुढे होता, तो दार उघडून आत गेला होता आणि मी आणि वंदना ताई आता दारात येत होतो. मी दारातून आत पाहिलं आणि त्या जागेकडे, त्या मंदिराकडे, तिथल्या प्रसन्नतेकडे मी इतकी आकर्षित झाले, किंवा त्याचा प्रभाव इतका पडला की दारातून पाऊल आतमधे घालता घालता माझ्या तोंडून उदगार निघाले “ आज आपण इथेच राहूयात का?”..आणि गंमत माहितिये का, मी हे शब्द एकटीने बोलले नव्हते. मी आणि वंदना ताई दोघी सोबतच दारात पोहचलो होतो आणि अगदी हेच शब्द, एकाच वेळी आम्ही दोघीही बोललो होतो… . अगदी एकाच वेळी.. इतकच नाही तर समोर असलेला मंदार पण त्याच क्षणी म्हणाला “ मी ही हाच विचार करत होतो की आज इथे राहावं का?” म्हणजे आम्ही तिघंही एकाच वेळी एकच विचार करत होतो आणि याला मी तरी केवळ योगायोग म्हणू शकत नाही. तिथे असलेल्या प्रचंड सकारात्मक शक्तीचा आमच्या सगळ्यांवरच प्रभाव पडला होता हे निश्चित.इथे राहता येईल की नाही हे बघणं आवश्यक होतं. जागा आहे की नाही, कुणाची परवानगी घ्यायची हे अजून काहीच माहित नाही पण इथे मंदिराच्या अंगणातसुद्धा झोपायची तयारी आम्हा सगळ्यांचीच होती. इथेच राहायचं हे मनानी पक्कं केलं होतं. आम्ही आलेलं पाहून इथला आश्रमधारी बाहेर आला. सडसडीत बांध्याचा, पांढरी वस्त्र म्हणजे न शिवता गाठी मारून घातलेली कफ़नी त्यानी धारण केली होती. तरूण, तेजस्वी आणि खरोखरीच रूबाबदार म्हणतात नं तसा होता. मंदार नी लगेच सांगीतलं, “ताई हे बुआ एका हिंदी नटा सारखे दिसतात, रणदीप हूडा सारखे”  खरं सांगते, मंदार नी

सांगितल्या नंतर मला रणदीप हूडा हे नाव समजलं. मंदार नी मला फ़ोटो पण दाखवला रणदीप हूडा चा. म्हणजे बघितलं असेल मी ह्या नटाला आधी, पण मला काही नाव वगैरे माहित नाही.. असो तर ते बुआ कसे होते हे सांगण्यासाठी ह्या नटाचा उल्लेख.. बाकी त्याचा काही संबध नाही.. आपण बरकाल मध्येच आहोत, या बैरागी बाबा पुढे बरं का! प्रसन्न मुद्रेनी त्यांनी आमचं स्वागत केलं, पाणी दिलं आणि नंतर "बालभोग तो करलो" म्हणून तो आत गेला.. त्या नंतर त्यानी बालभोगासाठी जे काही आणलं त्यावर आम्ही चौघं ही अक्षरश: तुटून पडलो. अगदी लहान मुलं आवडत्या खाऊ वर कशी तुटून पडतात नं तसं झालं… किती खाऊ अन किती नको असं व्हायला लागलं. ती अनुभूतीच वेगळी होती..

खरं तर जे मिळेल ते जेवणं हा नियमच आहे परिक्रमेत पण आज जे मिळालं होतं ते खाताना "खाण्यात देखील इतका आनंद असतो" हे समजलं होतं. इतकच नाही तर आमच्या सगळ्यांच्या चेहऱ्यावर चा आनंद आम्ही सगळेच वाचत होतो, त्यामुळे अजूनच आनंद मिळत होता. आमचा हा आनंद पाहून तो बैरागी बाबा पण सुखावला होता, आनंदला होता. त्याच्या चेहऱ्यावरचा आनंद ही आमचा आनंद द्विगुणित करत होता आणि दुसरं म्हणजे त्यानी आणलेली थाळी ही अक्षयपात्रच होतं… कितीही खा, संपण्याचं नावच नाही! आमच पोट भरत आलं होतं पण मन भरत नव्हतं… आम्ही खात असलेला पदार्थ देखिल नेहमीचाच… पण आनंद मात्र वेगळा… तो दिवसच मंतरलेला… ते स्थानच अगळं वेगळं.. आणि तो बैरागी पण अनोखा… बरच सांगायचय अजून.. पण मोठा होतोय हा लेख, तेव्हा बरकाल च्या या दिवसाचं वर्णन आता पुढच्या भागात सांगते. आम्ही काय खात होतो हे ऐकल्यावर तुम्हाला गंमत वाटणारे, आणि आश्चर्य पण… पण भाग ३६ मधे.. नर्मदे हर.

*नर्मदा परिक्रमा – एक विलक्षण अनुभूती- भाग ३७*

*नर्मदे हर*

बरकाल च्या त्या दिवसाचं वर्णन मला आज सांगायचं आहे. तुम्ही वाट बघताय त्या पदार्थाची ज्यावर आम्ही लहान मुलासारखे तुटून पडलो होतो, अगदी चौघही. आम्ही असं काहीच वेगळं खात नव्हतो. बरकाल च्या साधू महारांजानी आम्हाला पाणी दिलं आणि “बाल भोग तो करलो ” असं म्हणत एका ताटा मधे एक पपई चिरून आणली. पपई सारखी पपई, त्यात काय वेगळं, असं तुम्हाला वाटणं स्वाभाविक आहे, अहो पण गंमत सांगते, इतकी रसाळ, गोड आणि तोंडात टाकल्या टाकल्या विरघळणारी पपई मी पहिल्यांदाच खाल्ली. इतका अलवार घास, की ओठाला लागला की घसा ओला होऊन जाई. ओठानीच खावी अशी पपई.. आता सांगा पपई वर का उगाच तुटून पडणारे आम्ही? जेव्हा त्या साधू महारांजांनी पपई आणली तेव्हा वाटलं, “बालभोगासाठी पपई?” आम्ही कहीतरी चिवडा फ़रसाण याची अपेक्षा करत होतो, त्यामुळे ही पपई पूर्ण संपेल असं ही आम्हाला वाटलं नाही, मात्र एक फ़ोड, अहो एक घास खाताक्षणीच त्या पपईचा फ़डशा पडला, आणि मग त्या साधूची अक्षय थाली सुरू झाली. ते ताट आमच्या पुढ्यात ठेवून तो आत गेला, त्यानी अजून एक ताट भरून पपई चिरून आणली..आम्ही ते दुसरं ताट देखिल संपवलं. खरं सांगते, हावरटासारखं केलं आम्ही… दुसऱ्या नंतर तिसरंही खाल्लं… पोट भरलं होतं खरं, पण मनच भरत नव्हतं.

त्या ठिकाणी राहण्याबद्दल आम्ही अजून त्या साधू महाराजांशी बोललो नव्हतो, पण आता तर इथेच राहायचं होतं. आम्ही ओळख करून घेण्यासाठी त्यांचा परिचय विचारला, “माताजी साधू का आगा पिछा नही पूछा करते, आप बस सेवा बताईये” त्यांनी परिचय

दिलाच नाही. मग आम्ही परिसर फ़िरलो. अरे हो, इथे जे मंदिर आम्ही खालून बघत होतो ते कुणाचं माहितीये? सूर्यप्रभेचं! मी सूर्यप्रभेचं मंदिर पहिल्यांदाच पाहिलं. सूर्यप्रभा म्हणजे सूर्याची पत्नी. मंदीर प्राचीन होतं. मंदिराचं कोरीव काम खूपच रेखीव होतं. मंदीराच्या मागे फ़ुलांचा फ़ळाचा सुंदर बगीचा होता. अंगणात बाक, आणि दगडी फ़रशी लावली होती आणि उजव्या बाजूला एक छोटासा ओटा, आणि ओट्यालगत खोली. त्या परिसराच्या कुठल्याही कोपऱ्यातून समोर वाहणारी नर्मदा माई दिसते. कुठलाच अडसर नाही. असं पूर्ण च्या पूर्ण पात्र या तीरापासून तर त्या तीरापर्यंत बघत बसावं. मग कधी त्यात "कोटी रतन ज्योती" चं दर्शन होतं तर कधी पोर्णीमेचं चांदणं उलटून तरंगू लागतं. आम्ही गेलो तेव्हा तिथी काय होती ते आता नक्की आठवत नाही पण पोर्णीमेच्या जवळपासची असावी.कारण त्या रात्री अम्ही अंगणात बसून जो नजारा पाहिला तो अवर्णनीय आहे. पण त्या आधी बाकी राहिलेल्या दिवसाचं वर्णन सांगते.

तर आता आम्ही साधू महाराजांना राहण्याबद्दल विचारलं. ते म्हणाले " वैसे तो कोई यहा ज्यादा रहता नही है पर एक रूम है, देख लीजीये, ठिक लगा तो साफ़ करवा देता हू" आम्हाला फ़क्त तिथे राहण्याची परवानगी हवी होती. आम्ही अंगणातसुद्धा राहयला तयार होतो आणि महाराज रूम बद्दल बोलत होते.

इथे आल्यापासून आनंदाची उधळण काय ती आमच्यावर होत होती. आनंद जेव्हा अनपेक्षीत पणे समोर येतो नं तेव्हा त्याचं रूपच वेगळं असतं बहुधा. बघा नं, एखाद्या गोष्टीची आपण खूप वाट बघतो आणि मग ती गोष्ट पूर्ण होते, यातला अनंद मोठा असतोच, पण कुठेतरी तो आनंद त्या अपेक्षेसाठी असतो, त्या फ़ळासाठी नाही. म्हणजे ती फ़लप्राप्ती तर झालेली असते मात्र "इतके दिवसांची इच्छा पूर्ण झाली" यातच माणूस जास्त समाधानी असतो, नाही का? आमचं मात्र उलटंच होत होतं. फ़राळासाठी सर्वसाधरण पणे चिवडा मिळतो, बिस्कीट मिळतात.. तशीच आमची अपेक्षा, आणि आम्हाला मिळाली रसाळ मधूर गोड पपई, अगदी

अनपेक्षीतपणे ती ही भरपूर, अगदी आम्ही नको नको म्हणेस्तोवर. मग आम्ही विचार केला होता इथे राहाण्याचा, अंगणातसुद्धा चालणार होतं आम्हाला आणि आम्हाला मिळाली छान ऐसपैस खोली. अंघोळीला बाथरूम… खरं सांगते, या सगळ्या सुखसोई आहेत. यांची आपल्याला इतकी सवय लागलीये की याला आपण प्राथमिक गरजा म्हणतो. या परिक्रमेत कमितकमी गरजा ठेवून कसं जगता येतं किंबहुना किती आनंदानी जगता येतं हे शिकायला मिळालं.

हो एक कबुल नक्की करेन. मी मोबाईल मात्र वापरला, पण खरं सांगते "त्या शिवाय जमत नाही" हे कारण नाही हं मोबाईल वापरण्याचं. माझा मुलगा आणि इतर घरच्या मंडळीना माझ्याबद्दल जाणून घेण्याची उत्सुकता होती आणि मला ही त्यांच्या संपर्कात राहायचं होतं म्हणून तो मोबाईल. पहिल्यांदाच मुलाला इतके दिवसांसाठी सोडून आले होते, तेवढ्या पुरता मोबाईल… परिक्रमेत अनेक ठिकाणी नेटवर्क नसायचं त्यामुळे रोज फ़ोन झाला असं फ़ारसं झालं नाही. पण जेव्हा नेटवर्क असायचं तेव्हा बोलणं व्हायचं… अर्थात ही लक्झरीच आहे, आणि याशिवाय ही आपण जगू शकतो हे नक्की..

तर आमची राहण्याची व्ययस्था झाली. साधू महाराजांनी आम्हाला खोली साफ़ करून दिली. दुपारचा आराम झाला आणि संध्याकाळ चा सोनेरी लाल प्रकाश पडू लागला. त्या दिवशीचा सूर्यास्त मी विसरूच शकत नाही. पश्चिम वाहिनी मैया त्या बिंबाला आपल्या कुशीत घेत होती जणू, आणि त्याच्या तेजानी पाण्याच्या लहरीवर उतरलेलं ते सोनेरी लाल जांभळं नक्षीकाम म्हणजे मैयात सोडलेल्या असंख्य दिव्यांसारखं वाटत होतं.. "कोटी रतन ज्योती" या मैयाच्या आरती मध्ये असलेल्या ओळींप्रमाणेच!

आमची संध्याकाळची आरती आणि श्लोक म्हणून झालेत. आता भोजनाची तयारी.

सकाळपासून हे साधू आमच्या सेवेत होते, म्हंटलं त्यांना मदत करावी. आम्ही विचारलं " महाराज जी भोजन बनाने मे आपकी मदत करे?" ते म्हणाले, " माताजी आराम किजिये,

सब हो जायेगा. ते स्वत: स्वयंपाक करू लागले. वरण, भात, भेंडीची भाजी असा बेत होता. वरण भात आणि भाजी तयार झाली होती, ती घेऊन ते अंगणात आले. तिथेच उघड्या आभाळाखाली आणि मैयाच्या समोर आजची अंगत पंगत होती. कणकेचा गोळा घेऊन ते साधू महाराज अंगणात आलेत आणि सोबत निखाऱ्याची शेगडी ही आणली. तिथे बसून त्यांनी आम्हाला गरम गरम पोळ्या वाढल्यात. खरं सांगते, एखादी बाई काय स्वयंपाक करेल इतका सुंदर स्वयंपाक होता. कुरकुरीत उभे काप केलेली भेंडीची भाजी, अतिशय चविष्ट सांबार वजा वरण, सुवासिक तांदळाचा भात आणि मऊसूत घडीच्या पातळ पोळ्या. त्या पोळ्या खाल्ल्या तेव्हा खूप लाज वाटली, वाटलं " बरं झालं आपण स्वयंपाक केला नाही, इतका सुंदर स्वयंपाक, इतक्या तलम पोळ्या मला करताच येत नाही" आग्रह करून करून महाराज आम्हाला वाढत होते. इतका आग्रह की "माताजी ये सब खतम करना है" असं म्हणत जायचे आणि वाढत जायचे.

"महाराज जी आप भोजन नही करेंगे" मी विचारलं, आणि ते उत्तर ऐकून डोळ्यात पाणीच आलं..ते म्हणाले, "मै तो फ़रियाली हू, ये सब नही खाता" हा साधू, जो इतका चविष्ट स्वयंपाक करतो, इतक्या आग्रहानी आम्हाला खाऊ घालतो तो या सगळ्याची चव देखील घेत नाही? सेवा भाव किती काठोकाठ भरला असेल त्याच्या मनात? त्याच्या हातच्या स्वयंपाकाला त्याच्या हातची चव नव्हतीच म्हणजे, चव होती ती त्याच्या आतल्या सद्भावनेची, त्याच्या विचार प्रक्रीयेची, त्याच्या सेवा भावनेची, आणि म्हणूनच तिथलं वातावरण देखिल तितकच शुचिर्मय होतं, आल्हाददायक होतं. हा साधू खरंच कुणी पुण्यात्मा होता जो काही कारणास्तव या देहात राहात होता असच वाटून गेलं.

रात्रीची पहिली झोप खूप छान लागली आणि सकाळी ३ वाजता जाग आली, खूप फ्रेश वाटत होतं. मी बाहेर गेली तसा बाबाही बाहेर आला. मग आम्ही दोघं बाप लेक पाण्यात पडलेलं चांदणं मूक होऊन वेचत बसलो. मी मनातल्या मनात माझा जप करत होती आणि

गुरुमंत्राचा प्रत्येक शब्द जणू आसमंतातून उतरून येत होता. मला पुन्हा एकदा प्रत्यय आला, "मन हे स्थीर करुनि पहा, रेवा तीरी सद्‌गुरूला" .. मोठ्या महाराजांच्या आरतीमधल्या या ओळी खरंच किती खऱ्या आहेत! तासाभरानी आम्ही पुन्हा आंग टाकलं, पण झोप लागली नाही.

सकाळी उठून पूजापाठ आटोपून बालभोगाची तयारी करायला गेलो तर कालच्या पोळ्या शिल्लक असल्याचं समजलं. वंदना ताईनी त्याचे चुरम्याचे लाडू बनवून दिले आणि त्या साधू महाराजांचा निरोप घेऊन आम्ही पुढच्या प्रवासाला निघालो. पण ही जागा काही मनातून जात नाही.. अजूनही हे प्रसंग तितकेच ताजे आहेत! मंदार, बाबा आणि वंदना ताई, तुम्ही जेव्हा हे वाचाल तेव्हा तुम्हीसुद्धा पुन्हा एकदा बरकाल च्या या मंदिराच्या आणि या मंतरलेल्या दिवसाच्या दुनियेत हरवून जाल हे नक्की, आणि वाचक हो, पुन्हा एकदा सांगते, एकदा संधी मिळाली न तर इथे नक्की नक्की जाऊन या. तुम्ही जाल तेव्हा हेच महाराज इथे असतील की नाही माहीत नाही, आम्ही मात्र भाग्यवान ठरलो आहोत त्या महाराजांना भेटून!

आम्ही किनारा वाटच धरली आणि पुढे जाऊ लागलो. गावं किनाऱ्यापासून जरा दूर असतात त्यामुळे आम्ही गावांमधे गेलो नाही. इथून पुढे आता बद्रिकाश्रमात थांबायचं असा विचार केला. "तुम्हाला काही वाईट अनुभव आलेत का?" असं मला अनेक जण विचारतात, त्याचं उत्तर देते. वाईट अनुभव अगदीच येत नाही असं नाही, पण ते खूप कमी असतात आणि मुळात आपल्या अपेक्षा कमी असल्यामुळे आणि या वाईट अनुभवांचा प्रभाव पण कमी असल्यामुळे ते फ़ारसे जाणवत नाही. म्हणजे परिक्रमेत जर तुमच्या मनाला फ़क्त चांगलं तेच धरायची सवय लागली तर हे वाईट देखील वाईट आहेत हे जाणवत नाहीत मात्र एरवी चा विचार केला तर वेगळा अनुभव म्हणता येतील नक्कीच, असे अनुभव देखिल येतात. त्यातलाच एक सांगते. अर्थात हा अनुभव वाईट नाहिये, पण आनंददायक नाहीयेच मुळी, सांगते.. पण

बरेच दा काय असतं नं हे असे अनुभव येणं ही गरजेचं असतं. नाहीतर चांगल्या अनुभवांची चव समजेल कशी नाही का?

बरच अंतर चालून गेल्यावर आम्ही बद्रिका आश्रमात गेलो. बद्रिकाश्रमा बद्दल जरा ऐकून होतो. जागा छान आहे, सोय़ी छान आहेत हे ही माहित होतं. आणि आता आमचं मन सोयींपेक्षा ही आनंदाच्या अनुभूतीच्या शोधात होतं. एकवेळ सोय कमी जस्त झाली तर चालेल, पण प्रसन्नता हवी, अशी मनाची अपेक्षा झालेली.. हो अपेक्षाच.. आणि जिथे अपेक्षा येते तिथे ती भंग ही होणारच नाही का? त्याचाच परिणाम म्हणजे हा पुढचा अनुभव, असं म्हंटलं तरी चालेल.बरकाल च्या मिळालेल्या आनंदा नंतर पुढेही तसाच आनंद मिळावा ही झाली इच्छा आणि बरकाल च्या आनंदा नंतर तसाच आनंद मिळाला पाहिजे, ही झाली अपेक्षा. या पाहीजे वर जेव्हा जोर येतो तेव्हा मग बाकी कुठल्या परिस्थितीला सामोरं जायला हे मन तयार होत नाही, आणि मग या “पाहीजे”  या अपेक्षेचा भंग झाला की आपण त्याला अनैसर्गिक किंवा दु:खद अनुभवाचं शीर्षक देऊन मोकळं होतो. थोडक्यात काय तर तो अनुभव जसा आहे तसाच असतो, तो वाईट का चांगला हे ठरवणं आपल्या मना वर असतं…  असो, म्हणून म्हणतेय, त्या वेळी अनैसर्गिक, विचित्र वाटलेल्या त्या अनुभवावार जेव्हा मी नंतर विचार केला तेव्हा तो तितकासा विचित्र नाही वाटला मला… तरीही सांगते पण पुढच्या भागात.. म्हणजे ३८ व्या भागात.

*नर्मदा परिक्रमा – एक विलक्षण अनुभूती- भाग ३८*

*नर्मदे हर.*

मागच्या अनुभवात मी फारसा सुखकारक नसलेला अनुभव आला असं सांगितलं होतं, तो अनुभव काय ते आता सांगते. आम्ही किनाऱ्याची वाट धरली होती. बरच उन होतं.आज बद्रिकाश्रमपर्यंत जाऊन मुक्काम करावा असं आम्हाला वाटत होतं. तहान देखील बरीच लागली होती. रस्त्यांनी चालत चालत आम्ही बद्रिकाश्रमापर्यंत येऊन पोहचलो देखील, पण इथे आमचा भ्रम निरास झाला. आमच्या अपेक्षे प्रमाणे इथे आम्हाला विश्रांतीला जागा, आसन लावायला जागा आणि भोजन प्रसादी मिळायला हवी होती. ते काही होऊ शकलं नाही.

अपेक्षा केली ते चुकलच होतं आमचं खरं, पण माणूसच ना शेवटी.. केली अपेक्षा..तसंही एका परीक्रमावासियाला काय अजून हवं असणार? निवांत झोप शरीरासाठी आवश्यक म्हणून ती हवी, आणि भोजन, ते ही जे असेल, जसं असेल तसं. अहो देहाचे चोचले जरी नाही तरी अजून आम्ही इतके का पक्के झालोत की याशिवाय राहता येईल आम्हाला? बाकी काही आम्हाला नको ही होतं. हो, एक स्त्री म्हणून स्वसुरक्षेची आणिक एक अपेक्षा. बस बाकी नाही. बरं अपेक्षा पूर्ण नाही झाली एकवेळ तरी चालेल पण प्रसन्न सकारात्मक वातावरण असलं की ते ही पुरेसं असतं. इथेच खरा अपेक्षा भंग झाला.

बरकालला आम्ही उघड्यावर देखील झोपायला तयार होतो कारण तिथल्या साकारात्माकतेनी आम्हाला मोहित केलंच होतं, आणि बहुधा तीच सकारात्मकता आम्ही इथे शोधली. झालं असं की आधी मंदार आश्रमाच्या कार्यालयात जाऊन आला. बाहेर येऊन “ इथे काही शक्य वाटत नाही , कारण इथला कार्याकर्ता नीट माहिती देत नाही, उलट चिडून

बोलतोय" असं त्यांनी सांगितलं. कुठला तरी एक अस्वच्छ खोलीचा कोपरा आहे असं तो म्हणाला म्हणे पण तिथे न पिण्याच्या पाण्याची व्यवस्था न आम्हा बायकांसाठी इतर व्यवस्था.. तरी हरकत नाही, आम्ही किल्ली मागितली तर म्हणे किल्ली नाहीये, ज्याच्याजवळ आहे तो कधी येईल ते माहित नाही… म्हंटल ते ही मान्य, तोवर कुठे आसन लावू ते तरी सांगा. तिथे आसन लावायला जागा विचारली असता आश्रमात जागाच नाही असं समजलं. मग आम्ही भोजन प्रसादीचं विचारलं असता जेव्हा ते ही नाही हे समजलं तेव्हा मन जरा खट्टू झालं, कारण भूक लागली होती. इथपर्यंत काही हा अनुभव वाईट नव्हताच. मात्र तिथल्या कर्मचाऱ्याची वागणूक ही अतिशय रूक्ष आणि उद्धट होती. सर्वसाधारण व्यक्तींचं असं वागणं स्वीकारता येत होतं आम्हाला पण आश्रमधारी व्यक्ती चं असं वागणं जरा वेगळंच वाटलं. तिथे थांबण्याची इच्छाच झाली नाही. थकल्या भागल्या परिक्रमावासी ना निदान पाणी तरी विचारावं.. बरं बाबा नको विचारूस तू, पण मागितल्यावर निदान नाही तरी म्हणू नये… त्या कर्मचा-यांनी दूर वर असलेल्या नळाकडे बोट दाखवलं… " वाहा जा के पी लो" .. वाटलं आपण तर आपल्या घरी असं कधीच कुणाशीच वागत नाही, आणि हे आश्रम धारी, परिक्रमावासी लोकांसाठी आश्रम उघडतात आणि साधं पाणी पण पाजत नाहीत? राग तर आलाच.. आश्रमाच्या नावाखाली नुसता पैसा जमा करून स्वतःची घर भरताहेत असही वाटलं. वाटलं मला की म्हणावं त्याला जाऊन "नही कुछ कर सकते तो कम से कम ठीक से बात तो करो " .. पण दुसऱ्या क्षणी वाटलं राहू दे.. त्याचं त्याच्यापाशी… तर असा अनुभव.

नंतर. ज्या वेळी शांततेनी या अनुभवावर विचार केला तेव्हा वाटलं, ठीक आहे नं. नसेल त्याला आपल्याला मदत करायची. आपण आश्रम आहे म्हणून गेलो तिथे, तिथे आपलं दाणा पाणी लिहिलेलं नसेल, म्हणून नाही मिळालं. मग लक्षात आलं क्रिया- प्रतिक्रिया चे सूत्र. तिथे जाताना आपली अपेक्षा इतकी तीव्र होती की त्याच्या मागे येणारी प्रतिक्रिया ही देखील तीव्रच असणार नं. बरकाल अगदीच उलट होतं अपेक्षाच नव्हती, त्यामुळे जे समोर येईल त्याचा स्वीकार करायचा होता आणि इथे मी माझ्या अपेक्षा कुणावर तरी लादणार होते, ज्याची कंपन

कदाचित आधीच त्या व्यक्तीवर जाऊन आदळली आणि त्या व्यक्तीची मुळातली नकारात्मकता म्हणा किंवा त्याची चिडचिड म्हणा किंवा जी काही त्याची मानसिकता असेल, त्या वेळची परिस्थिती असेल त्यात या माझ्या अपेक्षांच्या ओझ्याची भर पडून ती नकारात्मकता अजूनच तीव्र झाली. आम्ही सगळेच तहानलेले देखील होतो, पण तरीसुद्धा त्या आश्रमातल्या त्या नळावर जाऊन पाणी प्यायची पण इच्छा झाली नाही. आम्ही तसेच भुकेले तहानलेले पुढे निघालो.

बद्रिकाश्रमातून आम्ही नाराज होऊनच निघालो. मात्र पुढे नंदेरीयाला नंदिकेश्वाराचं दर्शन घेतलं. तिथे राहण्याची व्यवस्था नव्हती मात्र तिथे काही लोक कसली तरी पूजा करत होते. तिथे मंदिरातले मुख्य पुजारी बाहेर गेले होते मात्र एक व्यवस्थापक तिथे होते. आता आम्हाला खूपच भूक लागली होती. इथे आम्ही " चहा मिळेल का असं विचारलं"  आणि इथल्या माणसाने आम्हाला भरपूर आणि चवदार चहा करून दिला. आमचं पोटाच भरलं.इथे नं ,मला अजून एक गोष्ट सांगावीशी वाटते..

एका खूप म्हाताऱ्या आजी बाईंची. इथे आम्हाला चहाबरोबर काहीतरी दिलं होतं खायला, काय ते आठवत नाहीये पण वाटीत होतं काहीसं, कारण चाहाचे पेले आणि वाटी घासायला जेव्हा मी मंदिरा मागच्या टाकी जवळ गेले तेव्हा तिथे एक आजीबाई भजन म्हणत आणि भांडी घासत बसल्या होत्या. खूप भांडी होती त्यांच्या पुढ्यात आणि त्या शांतपणे घासत होत्या. " दे दे बेटा, मी साफ कर देती हु"  असं म्हणत त्यांनी मला वाटी पेला मागितला. खरं तर मी इतकी थकले होते न की एरवी मी दिला ही नसते माझे भांडे घासायला पण या आजींकडे आणि त्यांच्या पुढ्यात असलेल्या भांड्यांकडे पाहून मला माझी लाज वाटली… आणि त्या क्षणी वाटलं बसावं इथे हिच्या जवळ आणि भांडी घासायला मदत करावी हिला. वंदाना ताई ही आली तिथे, त्या आजीकडे पाहून तिलाही वाईट वाटलं, आणि न राहवून मी त्या आजीला विचारलं"  आपकी मदद कर दु मैया जी" ? तिनी जे उत्तर दिलं नं ते ऐकून आम्ही

फक्त तिला नमस्कार केला आणि आम्ही आमच्या मार्गाला पुढे निघालो. ती म्हणाली “बेटा अब यही मेरा काम है.. और यही मेरा भाग भी है.. भगवान की झुटन साफ करना तेरे भाग में नही और परिक्रमा करना मेरे भाग में नही” तू जा बेटा, जा के आराम कर.” किती सहज साधे पणाने तिने तिच्या भाग्याला न्याय दिला होता, आणि माझ्याही भाग्याची ओंजळ त्याच न्यायानी तिनी भरून काढली होती. इतक्या म्हाताऱ्या वयात मदत घेणं तिला काही गैर नव्हतं खरं तर पण मदत नको हे म्हणण्याची तिची पद्धत किती वेगळी होती नाही? आणि किती सहज आणि तितकीच सत्य!.. सत्य हे असं असत असेल.. अगदी स्फटिका सारखं पारदर्शक..अरे हो, स्फटिकावरून आठवलं पुढचं चंद्रीकेश्वराचं मंदिर..

पुढे जाऊन चंद्रीकेश्वराचं मंदिर होतं तिथे गेलो. हे मंदिर थोडं आडवाटेला आहे, खुपसे परिक्रमावासी इथे जातच नाही. आम्हाला कुणीतरी सांगितलं आणि आम्ही गेलो. इथे स्फ़टिकाचं शिवलिंग आहे आणि यातून सतत थेंब थेंब पाणी गळत असतं. या शिवलिंगामधे एका विशिष्ट कोनातून पाहीलं तर चंद्राकार चमकदार आकृती दिसते म्हणून याला चंद्रकांत म्हणतात आणि या जागेला चंद्रिकेश्वर असं म्हणतात. तिथे देखील छानसा चहा प्यायला मिळाला. आता मघाचा तो बद्रीका आश्रमातला राग वगैरे काही शिल्लक राहिलं नव्हतं. आम्ही आता इथून पुढे चांदोद च्या दिशेने पुढे जाऊ लागलो. वाटेत ऋणमुक्तेश्वाराच मंदिर होतं. ते बरच उंच होतं, भरपूर पायाऱ्या होत्या. बाबा थकला होता. वंदना ताईचं आधी ही दर्शन झालेलं होतं. मग मी आणि मंदार आम्ही जाऊन दर्शन घेऊन आलो. परिक्रमा पहिल्यांदाच करत होतो आम्ही दोघं ही आणि इथे मिळत असलेल्या सेवा भावी लोकांच्या सेवेचं ऋण आमच्या वर होतच.. शिवाय अजूनही काही ऋण असतील तर ते लवकर फितू दे बाबा अशी प्राथना केली आणि पुढे संगमाच्या दिशेने निघालो. कारानाली च्या आधी आणि चांदोद च्या नंतर आम्ही मुक्काम केला. पण ते नंतर सांगते..आधी सांगते एक गम्मत.

इथे ओर नदीचा आणि नर्मदा मैयाचा संगम लागतो. संगम स्नान पवित्रच असतं आणि ते करायाचं असं आम्ही ठरवलं. इथे उतरण्यासाठी एक जिना तयार केला होता. त्याच्या अरुंद पायाऱ्या होत्या. काही ठिकाणी पोती लावून पायाऱ्या केल्या होत्या. खोल आणि अगदिच अरुंद पायाऱ्या पाहून बाबाला जरा भीती वाटली. मंदार उतरून खाली गेला मग मी आणि वंदना ताई देखील खाली येऊ लागलो. बाबा मात्र येईना. “मी बसतो थोडा वेळ इथेच” , असं म्हणून बसून राहिला. आधी वाटलं बरं वाटत असेल कारण वरून संगमाचा नजारा खूपच सुरेख दिसत होता, म्हणून म्हणत असेल पण तसं नव्हतं. आम्ही सगळ्यांनी त्याला मदत करून, हात धरून खाली आणण्या चा प्रयत्न केला पण बाबा काही यायला तयार नाही. शेवटी मी पुन्हा वर गेले, आणि मी आणि बाबा फिरून येतो असं सांगितलं. पण मंदारला राहवलं नाही. पूर्ण खाली उतरलेला मंदार पण वर आला. वंदना ताई अर्ध अंतर उतरली होती, ती पण वर आली आम्ही सगळेच फिरून म्हणजे ३ किमी चक्कर मारून संगमावर गेलो. आहे की नाही मजा, इतकं थकलेलो असताना देखील आमच्या पैकी एकानेही ३ किमी फिरून जायला मागे पुढे पाहिलं नाही… कुठून येते ही शक्ती? कुठून येतात हे विचार?

संगमावर पाउल ठेवणंच खूप आनंद दायक होतं. पायाखाली मऊ सुत वाळू तळपायाला गुदगुल्या करत होती. पाणी तसं फार नव्हतं ओर नदीलापण नर्मदा मैला भरपूर पाणी होतं. एकीकडे अगदीच पाणी नाही आणि थोडं दूर नर्मदा मैयाकडे बघावं तर नावा चालताहेत! कमाल आहे की नाही? पण आहेच.. संगमाचं स्थान असच असतंय, विलक्षण. आम्ही आंघोळ करणार होतो पण उशीर होत होता. अंधाराच्या आत मुक्कामाला जायचं होतं आणि अजून कर्नाली तसं दूर होतं. आम्ही पुन्हा एकदा चहा घेतला आणि पुढे निघालो.

आम्ही कुबेर भंडारी बद्दल ऐकून होतो. कुबेराला इथेच धन प्राप्ती झाली होती असं म्हणतात. इथलं मंदिर खूप छान आणि श्रीमंत आहे असं समजलं होतं. संपत्तीची देवता ती, तिचा थाट काय साधासुधा असणारे? आम्हाला आता ते ऐश्वर्य बघायचं होतं. पण त्या आधी

आमचा मुक्काम कर्नालीला कुठेसा असणार होता. आम्ही रस्त्याने जात असता गुजरात च्या कर्नाली चे जुने दगडी वाडे बघत बघत जात होतो. आम्ही २०१७ मध्ये नसून १६०० च्या आसपास असू असं वाटावं इतके जुने वाडे आणि मंदिर तिथे होते, आणि मग एक मंदिर पाहीलं.. बाहेर छोटंसं… काय वाटलं देव जाणे, दर्शन घ्यावस वाटलं आणि पूजाऱ्याला बोलावून दार उघडून दर्शन घ्यावं म्हणून त्या पूजा-यांना बोलवायला त्यांच्या घरी गेलो, तिथेच अगदी, मागेच मंदिराच्या… नंतर काय झालं ते म्हणजे चमत्कारा पेक्षा कमी नाहीच. आम्ही नंतर अक्षरश: हरवून गेलो… खूप आनंद ही झाला… थोडी भीती ही वाटली.. खूप गप्पा ही केल्या.. आणि खूप काही अनुभवलं देखील.. पण काय? ते सांगते पुढच्या म्हणजे ३९ व्या भागात.



*नर्मदा परिक्रमा – एक विलक्षण अनुभूती- भाग ३९*

*नर्मदे हर.*

तर भाग ३८ मध्ये मी उल्लेख केला होता कर्नाली च्या एका मंदिरा चा. एक छोटं मंदिर होतं. ते बघण्याची इच्छा होती म्हणून तिथेच मागे राहणाऱ्या तिथल्या पूजा-यांना विचारलं. त्यांचं नाव शौचे गुरुजी. ते नाशिकचे राहणारे. आता योगायोग बघा. आम्ही अनेक मंदिर बघत बघत जात होतो. नेमकं हेच मंदिर बघावसं वाटलं. आणि इथले पुजारी ही महाराष्ट्रीय निघाले. त्यांनी चहाला आत बोलावलं आणि तिथून जे काय सुरु झालं ते विलक्षण आहे. लाकडी जुन्या वाड्याचं दार उघडून आम्ही आत गेलो. आत समोर बघतो तो मुरालीधराचं मंदिर. काळीशार आणि देखणी मूर्ती. असं वाटलं आता बोलेल की काय इतकी रेखीव. ते सगळं वातावरणच असं जादुई वगैरे म्हणतात नं तसं होतं. थांबा, नीट वर्णन करते म्हणजे जस च्या तसं सांगता येईल मला.

तर दारातून आम्ही आत गेलो, ती एक पडवी होती. चौकोनाकार. त्या पडवी चं छत हे जुन्या बांधणी चं होतं. उंच अगदी. वर माळया सारखं काहीतरी लाकडी पाटी लावून तयार केलेलं होतं आणि त्यावर कौलं घातलेली. खाली दगडी फरशी. साधारण ८ फुट रुंद आणि बरीच मोठी ती पडवी. अंगणाच्या चारही बाजूला, आतून चौकोन करावा तशी. मध्ये हे मुरलीधर मंदिर. मंदिराला मोठा गाभारा. आणि बराच मोठा सभामंडपाचा भाग. त्या सभा मंडपात आणि पडवी मध्ये भले मोठे जाड जुद खांब, त्यावर सुरेख नक्षी कोरलेली. मंदिरा समोर तुळशी वृंदावन आणि गाभाऱ्याच्या पुढे उभं राहिलं की येणारा मंद सुगंध. अरे हो, प्रकाश व्यवस्थेकडे विषेश लक्ष या बांधकामात दिलेलं आढळलं. सभा मंडपाच्या वरच्या

बाजूला एक चौकोन आकाशाकडे मोकळा सोडलेला आणि सभा मंडपाच्या वरच्या माळ्यावर आपल्याकडे बालकनी असते ना तशा बालकनी दिसत होत्या चारही बाजूनी. या आकाशाकडे उघड्या असलेल्या चौकोनातून प्रकाश आत येणार आणि एरवी पडवीला असलेली दारं उघडली तर. पडवी आणि मंदिरा च्या मध्ये एक चार फुट जागा सोडलेली होती, तीसुद्धा आकाशाला उघडी असणारी. म्हणजे खूप भक भक असा प्रकाश नाही की मरगळ वाटेल असं कोंदट वातावरण ही नाही. प्रसन्न आणि कमालीचं शांत. ही शांतता फक्त आवाज नसल्याची शांतता नव्हती,यात एक स्थीरता आणि एक गांभीर्य होतं. इथल्या भिंतीवर अनेक फोटो लागले होते. त्यात रामदास स्वामी, श्रीधर स्वामी, शिवाजी महाराज आणि किती तरी अनेक फोटो होते. या मंदिराच्या आत आम्ही आलो तेव्हा फक्त टीव्ही वर दिसणारे जुने वाडे काय ते बघितलेल्या आम्हाला आपण घड्याळ उलट फिरवून इथे आलो की काय असं वाटावं इतकं विलक्षण चित्र डोळ्यासमोर होतं.

मंदिराच्या मागून वर जाणारा लाकडी पाय-यांचा आणि उंच जिना चढून आम्ही वर गेलो. तिथे शौचे परीवाराचं वास्तव्य. अगदी साधी राहणी. गुरुजी कुणाला तरी वेद पठण शिकवीत होते. काकुंनी चहा केला. गप्पा झाल्यात आणि कुठे राहणार असं विचारल्यावर आम्ही चौघांनी ही इथेच राहू का म्हणून विचारलं. दोघांनी आनंदानी होकार दिला आणि आम्ही खाली पडवी मध्ये आसन लावलं. या वाड्याचा नक्की इतिहास माहित नाही मात्र शौचे यांच्याकडे तो २५० वर्षांपासून आहे. त्या आधी बडोद्याचे धायबर ( तिथल्या राज्यातील सरदार ) हे इथे राहत. यांनी हाच वाडा शौचे यांना इनाम स्वरूपात दिला असं समजलं. रात्री काकुंनी बटाट्याची भाजी कढी आणि पोळ्या / भात असा स्वयंपाक केला आणि आम्ही जेवून आसनावर आलो. रात्री मंदारला नारायण धारपांच्या अनेक गोष्टी आठवल्यात.. वाडा तसाच होता मात्र इथे अतिशय शुद्ध कंपन असल्याने तशी भीती देखील वाटली नाही.

इथला एक अनुभव नक्की सांगेन. इथे श्रीधर स्वामी यांचा एक खूप प्रेमळ फोटो आहे. या फोटोकडे बघता बघता मला अचानक माझं लहान पण आठवलं. मी हा फोटो माझ्या लहानपणी बघितलेला. अगदी जुना, कृष्णधवल. आमच्या बेडरूम मध्ये कपाटाच्या बाजूला लावलेला होता. मी असेन ५-६ वर्षांची. मी त्या फोटोकडे रोजच बघायचे. अर्थात हे सगळं मला अचानक फोटो पाहून आठवलं होतं. मला आठवत होतं की मी खालून वर त्या फोटोकडे बघत असे. त्या फोटो मध्ये मला माझ प्रतिबिंब पण दिसायचं आणि महाराजांचा फोटो पण. मग माझा हा खेळ बराच वेळ चालायचा. मला त्या वेळी श्रीधर स्वामी हे नाव माहित नव्हतं. पण मला त्यांच्या तेजस्वी आणि प्रेमळ स्मित हास्याची नेहमीच ओढ असायची. मी मनातल्या मनात त्यांना हसणारे आजोबा म्हणायचे हे ही मला आठवत होतं. लहानपणी हे आजोबा मला खूप आवडायाचेत हे ही मला आठवत होतं. आणि या वाड्यात हे सगळे जुने फोटो बघून मला ह्या सगळ्या गोष्टी इतक्या चटकन आठवल्या की जश्या काही काल घडलेल्या गोष्टी आहेत आणि न राहावून मी आईला फोन केला. आईला हे सगळं सांगितलं. सगळं आठवल्याचं ही सांगितलं, आणि आई जे म्हणाली ते ऐकून मी चार फुट वर उडालेच. आई म्हणाली “आपल्याकडे कधीच श्रीधर स्वामींचा फोटो नव्हता… अगदी कधीच नाही… ”

मग मला जे इतकं स्पष्ट आठवत होतं ते काय होतं? असं होणं अशक्य आहे! माझ्या डोळ्या समोर येणारे ते प्रसंग अगदी काल घडलेल्या गोष्टी सारखे समोर आले आणि एखादी खूप जुनी आणि आपली असलेली आणि आवडती गोष्ट खूप वर्षांनी आपल्याला परत मिळाली की कसा आनंद होतो नं तसा आनंद झाला मला. काही कळत नाही कारण मी कधीच श्रीधर स्वामींच्या उपासनेला आधी गेली नव्हते की कधी कुठे हा फोटो पाहिल्याचं आठवत नव्हतं. कारण दुसरीकडे कुठे ही मी तो फोटो इतका वेळ आणि इतका निरखून आणि इतका रोज रोज कसा बघेन?... . हा नक्कीच मला काहीतरी आठवण करून देणारा संकेत होता… काहीतरी होतं या मागे… आणि वाचकहो, परिक्रमा संपवून मी नागपूरला आले तेव्हा त्याचं उत्तर मिळालं. माझा एक खूप जुना मित्र मला अचानक व्हॅटस एप वर सापडला. मधली बरीच

वर्ष अगदी काहीही संबंध उरला नव्हता त्याच्याशी.आमच्या गप्पा झाल्या आणि त्यांनी सहज मला घरी बोलावलं. त्याच्या घरात पाउल ठेवलं तसे माझे डोळे भरून आले. त्याच्या घरी श्रीधर स्वामींचा हाच फोटो लावलेला आहे. त्याच्याकडे त्या वेळी स्वामींच्या पादुका यायच्या होत्यात, मी त्याला माझा अनुभव सांगितला आणि नंतर त्याच्या सोबत श्रीधर स्वामींच्या उपासनेला पण जाऊ लागले. त्याच्या घरी मला स्वामींच्या पादुकांच दर्शन पण झालं. माझ्या नकळत पणे स्वामींचे आशीर्वाद मला मिळत राहिले होते, आणि अजूनही मिळताहेत… आणि हाच तो संकेत असेल कदाचित.. “बाळ काळजी करू नकोस, मी तुझ्या सोबत आधी ही होतो, आताही आहे, आणि पुढेही असणार आहे” एवढी जाणीव फक्त मला त्यांनी करवून दिली.. तीही कुठे तर गुजरात मधल्या कर्नालीला शौचे यांच्या वाड्यात!माझ्या मागच्या जन्मीचं काहीतरी इथे येऊन पूर्ण झालं असं मला वाटून गेलं. खरंच मी किती म्हणून भाग्यवान? मला नाना महाराजांसारखे गुरु मिळालेत, मला शंकर महाराजांचं दर्शन झालं, मला श्रीधर स्वामींचा आशीर्वाद मिळतोय… ही परिक्रमा म्हणजे माझा भाग्योदय आहे असं म्हटलं तर चूक ठरणार नाही..

दुसऱ्या दिवशी मुरालीधराच दर्शन घेऊन आम्ही कुबेर भंडारीला आलो. इथे ही एक गंम्मत झाली.. मला कुणीतरी माझ्या नावाने आवाज दिला.. “ ओ सुरुचि ताई.. ओ ताई” .. इथे गुजरात मध्ये आम्हा चौघांखेरीज मला ओळखणार आहे कोण? ते एक साठीचे परिक्रमावासी होते. “ताई आपण तुमच्या परिक्रमेच्या दुसऱ्या दिवशी मोरटक्का च्या पुढे भेटलो होतो, तुम्ही मला तुमची कविता वाचून दाखवली होती… त्यात तुम्ही नर्मदा माई बद्दल लिहिलंय! अभंग लिहिले आहेत नं तुम्ही? छानच लिहिलेयेत! लिहा लिहा.. भरपूर लिहा, आणि पाठवा बरं का मला” त्यांनी मला ओळख देण्याचा प्रयत्न केला खरा पण मला काही केल्या आठवेना, आणि गंम्मत अशी की त्या वेळी माझ्यासोबत असलेली एकही मंडळी आता सोबत नव्हती त्यामुळे काही शहा निशा ही करता येत नव्हती. पण एक नक्की सांगते, मी माझ्या परिक्रमेच्या दुसऱ्या दिवशीपर्यंत नर्मदा माई वर एकही कविता केलेली नव्हती… अभंग तर मुळीच नाही… आणि

मला हे खात्रीपूर्वक माहितीये कारण माझ्या प्रत्येक कवितेच्या खाली मी तारीख लिहिलेली असते. मग हे कोण होते मला आवाज देणारे? मी ते मैयावर सोडलं मात्र यातून एक संकेत मिळाला, अर्थात ते ही मला नंतर समजलं… ते काका मला नर्मदे हर करून निघून गेले. न त्यांनी फोन नंबर दिला नं घेतला, न पत्ता दिला न घेतला.. मग अभंग पाठवायाचे कुठे? आणि अभंग तर मी एकही लिहिला नाहीये?... आणि हेच काहीतरी माझ्या मनात कुठेतरी फिरत असेल म्हणून की काय, पण त्याच दिवशी रात्री मला चक्क अभंग सुचला..मी तो लिहून ठेवला, आणि कदाचित हाच तो संकेत… माई वर काहीतरी लिहित राहणे, कदाचित हीच माझी माझ्या नर्मदा माउलीला शब्द पुष्पांची भेट… पण हा अभंग मी तुम्हाला आताच देणार नाहीये.. नाही नाही पुढच्या भागात पण देणार नाही, पण देईल नक्की एक दिवस.

तर आम्ही कुबेर भंडारी चं ऐश्वर्य बघून चकित झालो होतो. लख्ख चमकणाऱ्या त्या मूर्ती डोळयासमोरून हलत नव्हत्या मात्र आम्हाला पुढे जाणं भाग होतं. आता आमच्या चालण्याचा वेगही वाढला ओता आणि अंतरही. चुडेश्वर, मोरीया वगैरे गावं करत करत आम्ही तिलकवाड्याला पोहोचलो. माझ्यासाठी तिलकवाड्याला जाणं हे हे काही खूप वेगळं नव्हतं कारण मी फारसं त्याबद्दल ऐकलं नव्हतं. आम्ही हा प्रवास बऱ्यापैकी किनाऱ्याने केला होता, त्यामुळे असेल, पण चालून झालं होतं तरी तितकासा थकवा जाणवत नव्हता, हं थोडं फार थकायला होणं स्वाभाविक होतं. पण जस जसं तीलकवाडा जवळ जवळ येत होतं तसं तसं मन प्रसन्न होऊ लागलं होतं. वाटलं संध्याकाळ होतेय म्हणून असेल, मैया किनारी छानच वाटतं संध्याकाळी… . पण ते कारण नव्हतं, कारण वेगळं होतं. बरं ते कारण सांगण्या आधी एक अजून सांगते. इथे नर्मदा मैया उत्तरवाहिनी झाली आहे. आणि असे असल्याने इथे या स्थानाला महत्त्व प्राप्त झाले आहे. ज्यांना पूर्ण परिक्रमा पायी करता येत नाही त्यांनी जर उत्तर वाहिनी परिक्रमा केली तर पूर्ण पायी परीक्रमेचे फळ मिळतं. ही उत्तर वाहिनी परिक्रमा चैत्रात असते आणि असंख्य भाविक ही परिक्रमा करत असतात.

तर आता तिलकवाड्या बद्दल सांगते. इथे विष्णू गिरी महाराज असतात, पण या वेळी माझी त्यांच्याशी भेट होऊ शकली नाही, मात्र तरीही इथे मी जे २ दिवस राहिले ते दोन दिवस फारच आनंदाचे होते. इथे संपूर्ण मोकळीक होती. आपलाच आश्रम असल्यासारखे मी इथे वावरत होते. या वेळी इथे बरेच परिक्रमावासी तर होतेच शिवाय सेवा द्यायला येणारे अनेक लोक होते आणि जवळ जवळ सगळे मराठी होते. मोठा काळ अमराठी राज्यामध्ये घालवल्या नंतर खूप सारे मराठी लोकं भेटलेत तेव्हा जाणवलं की किती दिवसात आपण मनमोकळं मराठी बोलेलोच नाहीये… इथे मला देवेंद्र (दीक्षित) दादा सारखा भाऊ मिळाला.खूप खूप छान वाटलं, पण यासाठी मला आधीपासून प्रसन्नता जाणवत होती असं नाही… मला जे काही इथे आल्यावर मिळालं तो पुन्हा एकदा एक संकेत होता. अत्यंत महत्त्वाचा. माझी परिक्रमा, माझं अस्तित्व, माझी श्रद्धा, माझा विश्वास माझं भाग्य.. सारं सारं उजळून निघालय हे सांगणारा संकेत. भालोदपासून खरं तर मला मिळत होता मात्र मला समजायला वेळ लागला होता. कारण भालोदपासून पुढे असं काही होत होतं की हा केवळ योगायोग नाही. पुढे चीखलदाला तर कहरच झाला, पण तो नंतर सांगेन. आधी तिलकवाड्याला मी का ओढल्या जात होते ते सांगते, पण पुढच्या भागात… नर्मदे हर.

*नर्मदा परिक्रमा – एक विलक्षण अनुभूती- भाग ४०*

*नर्मदे हर.*

मी मागच्या भागात तिलकवाडा या गावाबद्दल बोलत होते. इथे मी जस जशी जात होते तसं मला फारच प्रसन्न वाटू लागलं होतं. सूर्य मावळतीला आलेला होता. सगळीकडे सोनेरी प्रकाश पसरला होता. मोठा पण कच्चा रस्ता होता आणि दूर वर हे गाव दिसत होतं. किनाऱ्या वरून आल्यामुळे आम्ही जरा वस्ती च्या दूर होतो. वंदना ताईनी आधीच फोन केला होता आणि आम्हाला घ्यायला शर्मा जी स्कुटी वरून आले होते. अर्ध्या रस्त्यात येऊन त्यांनी आमचं सामान आग्रहाने स्कुटी वर घेतलं आणि रस्ता दाखवून ते पुढे निघाले. अंधार पडायला आला होता. वाटेत चहा घेऊन आम्ही आश्रमात गेलो. इथे आमच्या आगोदर बरीच मंडळी येऊन पोहोचलेली होती. त्यातली काही परिक्रमावासी होती तर काही फक्त इथे भेट देण्यासाठी आली होती. आज अंधार पडून गेल्यामुळे हॉल बंद होता, आमचं दर्शन झालं नाही. रात्री जेवून आम्ही झोपलो मात्र दुसऱ्या दिवशी सकाळीच आधी मंदिरात जाऊ असं वाटलं. आज कोण का जाणे भालोद च्या प्रतापे महाराजांची आठवण येत होती. ते म्हणाले होते मला, तू गरुडेश्वरला आलीस की मला फोन कर, मी येईन तुला भेटायला. तिथली मोठ्या महाराजांची मूर्ती आठवत होती. मी आंघोळ आटोपून दर्शनाला गेले आणि बघते तर इथे ही मोठ्या महाराजांची मूर्ती.. ती पाहून मला गहिवरूनच आलं. काल उशीर झाल्यामुळे मी इथे येउ शकले नाही, आज मी इथे यायच्या आधी मला प्रतापे महाराजांची आठवण झाली.. काय पण नं किमया आहे सद्‌गुरु ची.. मी बाबाला म्हणाले होते कालच, “बघ, काहीतरी मला ओढतय ” हो अगदी असं म्हणाले होते मी.. आज आठवण ही आली मला मोठ्या महाराजांची आणि आता इथे ही मूर्ती दिसली, “मला नं आता माझ्या गुरुंची आठवण येतेय, माझ्या नानांची आठवण येतेय” .मी बाबाला म्हणाले. बाबा काही न बोलता फक्त हसला, म्हणाला “आता तू रडणार आहेस” , आणि असं म्हणत त्यांनी माझ्या पाठीमागे बोट दाखवलं, मी वळून पाहिलं

आणि खरंच माझ्या डोळ्यात पाणी आलं, कारण तिथे माझ्या नानांचा फोटो होता. मी इथे आली तेव्हा इथे काही लोक बसले होते, त्यामुळे मला तो फोटो आधी दिसला नाही, मी मात्र बराचवेळ बसून होते, अगदी आम्ही दोघं फक्त उरलो होतो आत, जवळ जवळ तासभर बसलो असू आम्ही, आणि आता इतक्या उशिरा माझ्या अगदी बरोबर पाठीमागे नानांचा फोटो होता… मी खरंच रडत होते, बघा न समोर माझ्या गुरुंचे गुरु, आणि पाठीशी सद्गुरू आणि नेमकं मी मध्ये बसलेली, आणि याच वेळी मला मोठ्या महाराजांची ही आठवण आली आणि माझ्या नानांची ही… हा संकेत होता मला… माझ्या वरच्या कृपेचा, माझ्याकडे माझ्या गुरुचं आणि मोठ्या महाराजांचं किती लक्ष असतं बघा.. . इथे मोठ्या महाराजांनी चातुर्मास केलाय, किती पावन असेल ही जागा, आणि इथे मला माझ्या नकळत असा संकेत मिळावा… पाठीशी गुरु माउली आणि समोर, म्हणजे मार्ग दर्शन करायला मोठे महाराज… अजूनही आठवलं की अंगावर काटा येतो.. आणि म्हणून मी ओढल्या जात होते… मी अजूनही इथेच बसले होते… बाबा मात्र उठून बाहेर गेला होता… आणि आता बाबाच्या रडण्याची वेळ आली होती… सांगते..

बाबा बाहेर गेला तेव्हा बाजूला एक हनुमानाचं मन्दिर आहे तिथे जाऊन आला. “खूप छान आहे हनुमानाचं मंदिर, लवकर चल, बंद होइल ते थोड्या वेळात” बाबांनी मला आग्रह केला आणि मी गेले पण. तिथेही खूप प्रसन्न वाटत होतं. आम्ही तिथे बसून वडवानल स्तोत्र, हनुमान चालीसा, रामरक्षा म्हंटली, थोडा वेळ बसलो आणि बाहेर आलो. बाबा म्हणाला, “आज दासबोध वाचूयात का?” पण हे मंदिर दुपारला बंद होणार होतं, आम्ही अजून एक दिवस इथेच थांबणार होतो, म्हणून ठरलं उद्या वाचूयात, याच मंदिरात. असं ठरवून आम्ही बाहेर आलो, तोच ते मंदिर बंद करणारा पुजारी आला. आम्ही त्यांना विचारलं, “उद्या दासबोध वाचायचा विचार आहे थोडा उशीर झाला तर चालेल का? “ते पुजारी जे बोलले ते ऐकून आता बाबा रडू लागला.. बाबा चा दासबोधाचा बराच अभ्यास आहे आणि रामदास स्वामी हेच त्याचं आद्य दैवत. दासबोध प्रचार कार्यात बाबा कायमच असतो. आणि इथे बाबाला दासबोध वाचावासा

वाटला .. हम्म, तर ते गुरुजी काय म्हणाले माहितीये का? ते म्हणाले, " अहो नक्की वाचा दासबोध, कितीही वेळ लागला तरी चालेल, तुम्हाला सांगतो, ह्या मारुतीची स्थापना स्वत: रामदास स्वामींनी केली आहे" .. आता सांगा का नाही रडू येणार बाबा ला? दुसऱ्या दिवशी आम्ही दोघांनी तिथे बसून संपूर्ण दासबोध वाचला.

या तिलकवाड्याला कमालच झाली नाही? आम्हा दोघांनाही आमच्या गुरुंनी अश्या प्रकारे शुभ संकेत दिलेत आणि आमच्या कडून योग्य ते कार्य करवून घेतलं. आता दोघांनाही अश्या म्हणजे एकाच प्रकारचा अनुभव एकाच दिवशी आणि एकाच ठिकाणी येणं याला तुम्ही तरी योगायोग म्हणाल का? मी तर नक्कीच नाही म्हणू शकणार. भालोद नंतर थोड्या थोड्या दिवसांनी असे अनुभव येत राहिले, म्हणजेच गुरु आपल्याकडे लक्ष ठेवून आहेत तेव्हा त्यांचे संकेत समजून घ्यावे, बाकी काय करायचे ते ते बघतील, आपण आपलं समोर येईल तशी परिक्रमा करत राहावी हेच आम्ही ठरवलं.

आता इथून पुढे गरुडेश्वर, म्हणजे पुन्हा मोठ्या महाराजांच स्थान!.. इथे काय नवीन पदरात वाढून ठेवलंय ते बघायला आता मन आसुसलं होतं. पुन्हा एक योगायोग झाला. माझी एक मैत्रीण गरुडेश्वरला येतेय असा तिचा फोन आला आणि त्याच संध्याकाळी मी आणि बाबा गरुडेश्वरला निघालो. वंदना ताईला आणि मंदारला पण विष्णू गिरी महाराजांची भेट घ्यायची होती म्हणून ते इथेच थांबले. मंदारला जुने सोबती पण इथे मिळाले होते एक विष्णू राउत आणि दुसऱ्याचं नाव आता आठवत नाहीये. त्याला सोबत होती आणि वंदना ताईचे यजमान येणार होते त्यामुळे तिला ही सोबत होतीच. इथे हा आम्हा चौघांचा गट तुटला, आम्ही पुढे निघालो.

गरुडेश्वरला पोचलो आणि तिथल्या ऑफीस मध्ये गेलो. रूम मिळेल का विचारलं तेव्हा १५० रुपये लागतील असं सांगितलं. आम्ही तयार झालो, आता डायरीत नावं लिहिणे बाकी होतं, तोवर जरा गप्पा झाल्यात. बाबानी नाव पत्ता वगैरे लिहिला आणि मी पैसे द्यायला पर्स बाहेर काढली तर तिथले कर्मचारी म्हणाले "पैसे नकोत" … अरे आताच तर १५० रुपये

म्हणाला होतात तुम्ही"  मी विचारलं. ते म्हणाले " तुम्ही नाना महाराजांच्या शिष्या आहात, पुरेसं आहे" . त्यांनी आमच्या कडून एकही रुपया घेतला नाही. ती रात्र निवांत गेली.

मी प्रतापे महाराजांना फोन लावला. ते मला भेटायला येणार होते. ते येईपर्यंत मी इथून पुढे निघणारच नव्हते, कारण याच्या पुढे मला त्या माउलीची भेट पुन्हा कधी कुठे घडेल हे माहित नव्हतं आणि मी आतुरतेने वाट बघत होते. तो दिवस ही गेला. म्हणजे आता तिसरा दिवस होता आमचा गरुडेश्वर चा. मला सकाळी सकाळी प्रतापे महाराजांचा फोन आला, " बेटा, मी येतोय आज" .. माझ्या आनंदाला पारावार राहिला नाही.. अगदी लागलीच सगळी तयारी, आरती पूजा सगळं आटोपून मी मैया किनारी जाऊन महाराजांची वाट बघू लागले. आता मला त्यांच्या भेटी शिवाय काही नको होतं. पण मी निदान चहा तरी प्यावा म्हणून बाबा मला हट्टाने तिथून घेऊन गेला… माझा चहा संपत नाही तो दुरून मला नाव येताना दिसली.. कुणी तरी म्हणालं, प्रतापे महाराज येताहेत… हातातला चहाचा कप मी तसाच ठेवून अक्षरश: धावत सुटले… मी त्यावेळी कशी आणि किती जोरात धावले याचं भान मला नव्हतं मात्र मी जी धावत गेले ते महाराजांच्या पायावर डोकं ठेवूनच शांत झाले… : अगं हळू बेटा, हळू… " असं म्हणत महाराजांनी प्रेमानी मला जवळ घेतलं आणि लहान मुल आईला भेटून कसं बिलगतं तिला, आणि आनंदानी त्या बाळाला कसं रडू येतं तसं झालं होतं मला. मला कश्या कश्याच भान नव्हतं. माझी माउली फक्त माझ्यासाठी धावत आली होती. खरं तर आज महाराजांकडे भालोदला ३० लोक जेवायला यायचे होते. असं असताना देखील ते फक्त माझ्यासाठी नर्मदा माई ओलांडून मला भेटायला आले होते.

मोठ्या महाराजांच्या पायावर घालायला म्हणून त्यांना नुकताच मिळालेला "जीवन गौरव "  पुरस्कार ही त्यांनी आणला होता. आम्ही मंदिरात गेलो. दर्शन घेतलं आणि तो पुरस्कार प्रतापे महाराजांनी पूजा-यांकडे दिला, मोठ्या महाराजांच्या पायाला लावून तो आता परत घ्यायचा होता. तेव्हा प्रतापे महाराज पूजा-यांना म्हणाले " हा महाराजांच्या पायावर घातलेला

पुरस्कार माझ्या हाती न देता माझ्या ह्या लेकीच्या हाती द्या, तिलाही असाच पुरस्कार मिळायचा आहे असा आशीर्वादच आहे तिला"  हे ऐकून तर मी खरंच भाग्यवान आहे याची मला खात्रीच पटली. महाराज पुढे म्हणाले "बेटा, तुझ्या सगळ्या जवाबदाऱ्या पूर्ण झाल्या की तुला मालासामोट ह्या आदिवासी क्षेत्रात काम करायचय, आणि तोवर तुला जितकं शक्य असेल तितकं समाजा साठी काहीतरी करावस तू.. करशील, खात्री आहे माझी"  मला जाणवलं की महाराजांचा माझ्यावरचा विश्वास आणि प्रेम खरंच किती गाढ आहे, एका माउली शिवाय ते तसं असूच शकत नाही. पण मला बरेचादा खंत वाटते की अजून तरी मी काही करू शकत नाहीये, पण करेन नक्की.. नर्मदा माई, माझे गुरु, आणि ही माउली हेच मला योग्य वेळी योग्य दिशा दाखवतील हेच खरं. असो.

आता गरुडेश्वरला काल मंदार,आणि पराडकर काका पुतण्या येऊन पोचले होते. गरुडेश्वरपासून ते पुन्हा आमच्या सोबत असणार होते. आता मंदार, सुदिन,पराडकर काका, मी आणि बाबा असे बऱ्यापैकी सोबत होतो. थोडंफार मागे पुढे व्हायचो पण तसे सोबतच होतो. त्या संध्याकाळी मैया किनारी आरती पूजा आटोपून आम्ही झोपी गेलो आणि सकाळी लवकर पुढच्या प्रवासाला निघालो. आता इथून पुढे गुजरात मधून पुन्हा एकदा मध्य प्रदेशात प्रवेश करायचा होता. गुजरातची श्रीमंती सोडून आता पुन्हा एकदा या गरीब पण मनाने मोठ्या असलेल्या लोकांच्या देशात काय काय अनुभव येतात हे बघण्यासाठी आम्ही तयार होतो. या वेळीपर्यंत मैया आपल्याला आता काय दाखवते? हा एकाच प्रश्न असायचा, बाकी काहीही नाही. जे येईल ते समोर ताट मांडल्या सारखं जेवून घ्यायचं आणि त्यातून नकळत पणे मिळणाऱ्या आनंदाच धनी व्हायचं इतकच आम्हाला माहित.

इथून पुढे वगाचला जायचं होतं. इथे लोकांना विचारून विचारून पुढे जायचं, तर आम्ही ७ किमी वाट चुकलो आहोत हे लक्षात आलं. आता ७ किमी मागे जाणं शक्य नव्हतं म्हणून पुढे गेलो आणि एका पोलीस स्टेशनला रस्ता विचारला. पोलिसांनी रस्ता ही सांगितला आणि

चहा ही पाजला शिवाय " माताजी आपको फ्रेश होना है तो यही हो लो, आगे जगह नही मिलेगा" असं ही सांगितलं. तिथे एक गेस्ट रूम होती तिथे मी फ्रेश झाले आणि आम्ही पुढे निघालो. परिक्रमावासी म्हटलं की लोक आपणहून पुढे येतात मदतीला हे काही आता नवीन नाही.

आम्ही पुढे निघालो. आजचा दिवस तसा प्रसन्न होता आणि आम्ही सकाळी लवकर निघालो होतो. अजून आमचं बालाभोग करून झालं नव्हतं. आम्ही पोलीस स्टेशन मध्ये थांबलो असताना मंदार, सुदिन आणि काका पुढे गेले होते पण फोन वर आम्ही बोलत होतो त्यामुळे ते कुठे थांबलेत याचा अंदाज मिळत होता. " या तुम्ही लवकर, बालाभोग करून पुढे जाऊ" सुदिन चा फोन झाला होता. रस्त्यात आम्हाला एकाने क्रीम चे बिस्कीट दिले आणि तिथे एक छोटीशी मैया माझ्या हातातल्या बिस्कीटाकडे बघून रडू लागली. मी ते बिस्कीट तिला दिले आणि तिच्या आईने लगेच आम्हाला १० बिस्किटाच्या पुड्याचा एक मोठा पुडा दिला.. अगदी नाही नाही म्हणता ना देखील! मैयाचं हे असच आहे.. *तुम्ही तुमच्यातल अगदी तिळभर द्या कुणाला काढून, ती तुम्हाला मणभर परत करेल*, कितीदा तरी अनुभवलंय हे.. अगदी तिथेच पुढे पुन्हा असाच अनुभव आला. एक कुणी परिक्रमावासी रिक्षाने जाणार होता. त्याच्याजवळ सुटे पैसे नव्हते म्हणून त्याने आमच्याकडे सुटे आहेत का विचारलं. माझ्याकडे २० रुपयाची नोट होती, ती मी दिली, "तो म्हणाला मला ५ रुपयेच हवे आहेत, सुटे हवेत फक्त" मी ही त्याला म्हणाले " चाय पी लेना बाबाजी" , आणि आम्ही पुढे निघालो. एका दुकानात आम्हाला चहाला बोलावलं. आता आम्हाला खरंच चहा नको होता, " बोहोत चाय होगया बाबूजी, आप पानी पिला दो" असं म्हणत आम्ही चहाला नकार दिला तर या माणसाने अर्धा लिटर दुधाचं पाकिटच आमच्या हाता ठेवलं! आम्ही त्या बाबाला चहाला पैसे दिले होते, मैयांनी आम्हाला ते असे परत केले. अश्याच प्रकारचा एक विलक्षण आणि अविश्वसनीय अनुभव बाकानेर च्या नंतर कल्याण पुरा लागतं तिथल्या लाल पुरी महाराजांचा, पण तो आता सांगणार नाही. आपण काल्याणपुराला पोहचू तेव्हा सांगेन. मी विसरले तर आठवण करून द्या मला मंडळी. खरं

सांगू का, जेव्हा मी हे अनुभव लिहिते नं तेव्हा मला तुम्ही समोर बसून ऐकताय असच वाटतं, आणि म्हणून हक्कानी तुम्हाला मी मला आठवण करून द्या असं ही सांगते.. असो.. तर कल्याण पुरा चा अनुभव नंतर..

आता आपण सुदिन आणि मंडळी थांबली तिथे बालभोगा साठी पोहोचलो. खूप भूक लागली होती. जलेबी पोहाची ऑर्डर देऊन झाली होती. आमच्या कडचं दुधाचं पाकीट आम्ही त्या दुकानदाराला दिलं, कारण आम्ही दुध पिणार नव्हतो आणि तसं ठेवून ते नासून गेलं असतं, आम्हाला तर आता भरपूर बालभोग करायचा होता. आधी पोहे झाले २ २ प्लेट, मग जिलेबी पण खाल्ली आम्ही, आणि नंतर पैसे विचारले तर हा माणूस घेईना… अरे देवा, इथल्या इथे असा हा तिसरा अनुभव, पण त्याचे पैसे बरेच झाले असावेत, पराडकर काकांनी त्याला पोह्याचे पैसे घ्यायला लावलेत, जिलेबीचे मात्र त्याने घेतले नाहीत… आम्ही पुढे निघालो आणि आता पुढे “पैसे घेणार असशील तर ऑर्डर देतो” बाबा असं विनवून मगच ऑर्डर द्यायची असं ठरवलं आम्ही. कुणी स्वत:हून दिलं तर एकवेळ सेवा म्हणून ठीक आहे पण बिचाऱ्या गरीबाचा धंदा असताना इतकं मोठं बिल न देणं हे काही योग्य नाही हो वाटत!..

असो.. आम्ही वाडिया, खापरिया, उन्डवा करत करत पुढे गेलो.. उन्डवापासून नर्मदा केनल लागतो, याच्या काठा काठांनी जा असं आम्हाला सांगण्यात आलं, पण भला मोठा रस्ता हा, संपता संपेना.. प्रत्येक पुला पाशी पोहोचलं की कुणीतरी सांगायचं, “ये नही अगले पूल के पास गाव है, तो अगला पूल काही यायला तयार नाही. अहो संध्याकाळ होत आली तरी राहण्यासारखं काही ठिकाण सापडेच ना! इथे काहीच नव्हतं आणि, एखाद दुसरं सर्किट हाउस … बस.. आज आमचं आधीच ३७ किमी चालून झालं होतं तरीही अजून काही सोय होत नव्हती.. मग राहण्याचं ही अजून माहित नाही तर जेवणाच काय झालं असेल आमच्या? झाली असेल का काही सोय? की रस्त्यावरच झोपायला लागलं आज आम्हाला? सांगते, मात्र ४१ व्या भागात.

*नर्मदा परिक्रमा – एक विलक्षण अनुभूती- भाग ४१*

*नर्मदे हर.*

मागच्या भागात मी तुम्हाला नर्मदा कॅनाल बद्दल सांगितलं होतं. लांबच्या लांब काढलेला हा कॅनाल काही केल्या संपेना.आमचं आधीच ३७ किमी चालून झालं होतं. अगदी रस्त्यावर झोपावं लागलं तरी चालेल पण आता अजून चालायला नको होतं आम्हाला. आम्ही सगळेच थकलो होतो. शेवटी आम्ही खोडीयार नावाच्या एका गावात थांबलो, इथे जागा शोधू लागलो. चालता चालता सुदिनला एक मंदिर दिसलं. आता भिक्षा मागू आणि इथेच राहू असं ठरलं. पण ते मंदिर कुणाचं तरी खासगी मंदिर होतं. तेव्हा तिथे अनुमती घेणं गरजेचं होतं. सुदिन आणि मंदार पुढे गेले, त्यांनी त्या घरी चौकशी केली. वर वर पाहता हे काही शक्य होणार नाही असं वाटत होतं कारण ह्या घरासमोर बसलेले गृहस्थ आमच्याकडे बराच वेळपासून बघत तर होते मात्र त्यांनी एकदाही आम्हाला बोलावलं नाही किंवा स्वत:हून ते बोलले देखील नाही. आम्ही जागा शोधतोय हे त्यांना माहित होतं खरं, त्यामुळे ते काही परवानगी देतील असं वाटत नव्हतं. आम्ही भोजन प्रसादीची अपेक्षा तर सोडूनच दिली होती. निदान रात्र काढायला डोक्यावर छत मिळावं बस!

सुदिन आणि मंदार त्यांच्याशी काय बोलले माहित नाही पण आम्हा सगळ्यांना चहा प्यायला त्यांनी आत बोलावलं.. व चहा झाला, आता जेवण नसलं तरी चालेल, आता बस अंग टाकलं की झालं… खूप थकवा आला होता आज, पहिल्यांदाच आज ३७ किमी चालण झालं होतं. तिथल्या मंदिरात मी कुणालाही न विचारता सामान ठेवून दिलं. तेव्हा कुणी काही म्हणालं नाही. मग मात्र सरळ सरळ इथे मंदिरात राहू का असा प्रश्नच विचारला आम्ही. " आपके

भोजन का क्या?" त्या काकांनी विचारलं, त्यावर सुदिन म्हणाला " हमे जो मिलेगा वो खा लेते है, खिचडी भी चलती है" , त्यावर ते काका म्हणाले हम भिल जाती से है… ते ऐकून समजलं की हा माणूस आम्हाला आत का बोलावत नव्हता. आम्हाला जातीपातीचं काही नाही हे समजल्यावर मात्र तो बोलका झाला. ते इथलं मोठं प्रस्थ. कांतिलाल भिल असं त्याचं नाव. पूर्व विधायक होता तो. त्याची मुलं बाळं शिकली सवरलेली होती. ऐसपैस मोठं घर होतं. मग त्यांनी आम्हाला समोरच्या खोलीत बसायला सांगितलं. माझे पाय दुखताहेत म्हटल्यावर एका बादलीत मिठाचं गरम पाणी आणून दिलं मला. गरम पाण्यात पाय शेकून होईस्तोवर घरातल्या माताजींचा स्वयंपाक पण तयार झाला. मिक्स भाजी, कढी, खिचडी, मक्याचे वडे आणि खीर असं चवदार आणि पोटभर जेवण झालं. मंदिरात आसन लावायला एक मोठी सतरंजी देखील त्यांनी दिली आणि अशा प्रकारे काहीही अडचण न येता मैयांनी आमची व्यवस्थित सोय केली. दुसऱ्या दिवशी पोह्यांचा बालभोग करून इथून पुढे निघालो.

आज तरी वगाचला पोहोचण गरजेचं होतं. अंतरही तसं फार नसलं तरी २५ किमी होतंच. काल आम्हाला निवाऱ्या साठी जागा शोधावी लागली होती, ते तसं आज होऊ नये असं आमच्या मैयाला वाटत असावं. आमची कालची वणवण तिला बघवली नसावी आणि आम्ही त्या बद्दल तिला अवाक्षरानेही तक्रार केली नव्हती म्हणून असेल कदाचित, आज आम्हाला निवाऱ्याला छान जागा मिळाली होती. सकाळ च्या चालाण्या नंतर आम्ही एका शिव मंदिरात आराम केला आणि छान चहा आणि फुटाणे खाल्ले. थोडे खारे दाणे ही होते, ते ही खाल्ले. आमचं सकाळ चं जेवण हेच. लांबच लांब रस्ता होता. वाटेत आम्हाला एका माणसानी गाडी थांबवून नर्मदे हर केलं. तो म्हणाला " यहा आगे मंदिर है, वाहा आओ आप, मै भी पोहोचता ही हु" त्याला शेतावरून माल पाठवायचा होता पुढच्या गावात, पेरू होते त्याच्या जवळ. आम्हाला ही त्यांनी भरपूर पेरू दिलेत. त्याचं काम करून तो परतला तोवर आम्ही धोबीघाट काढला होता. आज मी सगळ्यांना कामाला लावलं होतं. मी सगळ्यांचे कपडे धुवून दिले होते आणि पिळून वाळत टाकायचं काम ज्याचं त्याचं ज्यांनी त्यांनी करायचं. एका नळावर आम्ही

सगळे टीम वर्क नी कपडे धुवत होतो. खरंच ते कपडे धुण्याच कामसुद्धा किती एन्जाॅय केलं आम्ही.

असं करत करत आम्ही छापरीया , कवाट करून हाफेश्वरला जायचं ठरवलं. आज कवाटला खूप दिवसांनी इथे खानावळीत जेवलो. दुसऱ्या दिवशी हाफेश्वरला गेलो. तिथे महिलांसाठी कपडे बदलायची काहीही सोय नव्हती. पण स्नान तर करायचं होतं. हाफेश्वाराचा कळसही आता दिसत नाही. हे मंदिर पूर्ण पणे पाण्याखाली गेलं आहे. आपले तीर्थ असे पाण्याखाली जाताना पाहून फार हळहळल वाटते. चीखलद्याच मंदिर, शुलपाणेश्वराच मंदिर, राजघाट चं मंदिर.. कितीतरी क्षेत्र पाण्याखाली जाणार आहे हे खरं तर फार मोठं नुकसान आहे आपल्या संस्कृतीचं. असो

तर हाफेश्वराला स्नान केलं खरं पण आता कपडे बदलायाचे कुठे?, तिथे न झाडी न खोल्या

न काही. मी तशीच ओल्या कपड्यांनी जागा शोधात असताना मला एक जागा सापडली. एक कार उभी दिसली, त्या कारच्या मागे जाऊन कपडे बदलायचं मी ठरवलं. कार मध्ये कुणीही नव्हतं, मात्र कार च्या मागे अजिबात जागा नव्हती. तिथे खाली मैयापर्यंत फक्त खोल उतार होता. पुरुष मंडळी चं आवरणं सुरु होतं आणि त्यांचं आटोपायाच्या आत मला माझं आवरण गरजेचं होत… हा उतार बराच सरळ उतार होता, म्हणजे टेकडीच्या उतारावर थोडी उभं राहायला जागा, बाकी काही नाही. तिथली माती ही भुसभुशीत, म्हणजे जरा पाय घसरला की मैया मधेच जाणार मी… .. पण तिथे एक झाड होतं, त्याची एक फांदी जमिनीवर आडवी आलेली होती. आणि एक दगड होता मोठा, त्यावर मी बसू शकत होते. ती फांदी माझे कपडे ठेवायचा स्टेन्ड झाली आणि तो दगड म्हणजे माझ्या ड्रेसिंग टेबल चा स्टूल. मला सावध असणं गरजेचं होतं. मी माझी लुंगी झाडावर टाकून आडोसा तयार केला आणि अगदी सावकाश तयार झाले. इतकं सावकाश मी या आधी कधी ही तयार झाले नसेन. इथे आरसा

नव्हता, सौंदर्य प्रसाधनं नव्हती तरीही स्त्री सुलभ आनंद काही कमी झाला नाही. किंबहुना अगदी सावकाश तयार होण्यात पण मजा असते याची प्रचीती झाली… … . हा झाला विनोदाचा भाग, पण खरंच सांगते, त्या दगडाचा काय तो आधार होता. माझ्या ओल्या कपड्यांमुळे तिथे जरा पाणी पाणी झालंच होतं आणि अशात तोल जाणं, किंवा पाय घसरणं सहज शक्य होतं. मदतीला कुणीही नाही, मदतीलाच काय तर मी पडले तरीही कुणाला सांगू शकणार नाही इतकी मी दूर होते… मन शांत ठेवून धीराने आणि संयमाने माझं आटोपून मी जेव्हा वर आले तेव्हा एकदा खाली वाकून पाहिलं तर माझं मलाच आश्चर्य वाटलं… अश्या जागेवर ओल्या कपड्यांनी उतरण्याच धाडस माझ्यात आलच कस कोण जाणे! असो.. झालं एकदाचं.

इथून पुढे आम्ही बखतगड मार्गे मध्य प्रदेशात शिरलो. हे क्षेत्र अत्यंत गरीब आहे. पण मनाची श्रीमंती बघाल तर धनाच्या श्रीमंताना लाजवेल अशी. साकडी चा अनुभव असाच आला आम्हाला पण त्या आधी काजळ माता मंदिरा बद्दल सांगते. अनुभव म्हणून नाही पण, वाटतंय सांगावसं. इथे आश्रम तर छान होता. आजूबाजूला काही नाही. आश्रमात एक देऊळ होतं देवीचं. इथले बाबा जरा वेगळेच होते. त्यांचे नियम खूप, आणि ते पाळले जाताहेत की नाही याकडे त्यांचं पूर्ण लक्ष असायचं. दिसायला ही हे बाबा जरा विचित्र दिसतात. त्यांचा एक डोळा मधेच बारीक होऊन जातो बोलता बोलता. आणि मुळातच त्यांच्या चेहऱ्यावर अति चाणाक्षतेचे भाव होते. ते सतत काहीतरी प्लॅनिंग करताहेत असं वाटायचं. सुदिन नी तर त्यांना “झोल बाबा ” असच नाव दिलं होतं. तिथे असलेल्या स्टाफला त्यांची भीती वाटते हे उघड उघड दिसत होतं. तिथे अनेक परिक्रमावासी होते, सगळे पुरुष मी एकटीच माताराम. ते बाबा मला म्हणाले “माताराम आप अंदर रूम मे आसन लगाव, बाकी लोग बाहर सोयेंगे” मी चक्क नाही म्हणून सांगितलं. “मै अकेले अंदर नही आसन लगाउन्गी, जहा मेरे साथवाले है मै वही रहूंगी” इथे त्यांच जरा गाडं अडलं. त्यांना मी बाहेर झोपलेलं नको होतं आणि मी आत एकटी आसन लावायला तयार नाही. जेवणं झाली, भजनं झाली सगळं सगळं झालं ..पण मी अडून राहिले

.शेवटी त्या बाबांनी आम्हा पाचही जणांना आता आसन लावू दिलं. मैया आपलं रक्षण करतेच पण एक स्त्री म्हणून आपण जागरूक असलेलं बरं… त्या बाबांना काय वाटलं माहित नाही पण दुसऱ्या दिवशी सकाळी त्यांनी मला त्यांच्या खोलीत बोलावलं. “ हम किसी के खोली मे नाही जाते बाबाजी, जो बोलना है यही से बोलिये” मी दारातच उभं राहून आवाज दिला. ते बाबाजी उठून बाहेर आले. मला एक टिकलीच पाकीट देऊन नमस्कार केला, म्हणाले “मेरे लिये तुम माता समान ही हो, तुम्हारा सम्मान करना था इसीलिये अंदर बुला रहा था” … मला वाईट काही अनुभव आला नाही, मैयांनी मला वेळोवेळी जागरूक राहण्याची बुद्धी दिली. ते साधू नसतील ही वाईट, पण मी सावध असणं गरजेचं आहे अन होतं ही.

उमरी च्या काजल माता मंदिरातून पुढे निघालो. हा भाग जरा जास्त खडकाळ आणि रुक्ष आहे , इथे आराम करावा म्हंटल तर मोठी झाडं पण नाही. सकाळी प्रचंड थंड आणि दुपारी बऱ्यापैकी गरम असं काहीसं हवामान. अगदी उन्हाळ्या सारखं गरम नसलं तरी पाठीवर ओझं घेऊन चालायचं काही तितकंसं सोपं नाही. आम्ही आपलं चालतोय चालतोय सकाळपासून काही पोटात नाहीये, जवळचं पाणी पण संपलय आणि इथे दूर दूरवर काही दिसत नाही. एखादी हापशी पण नाहीये इथे. उंच पठारासाराख्या भागावर चढत जायचं, दोन्ही भाजुला खोलगट भाग आणि मधून वरून रस्ता. असलीच एखादी झोपडी तर ती खाली खोलगट भागात.. कधी एकदा हा भाग संपतो असं वाटू लागलं. थोड्या वेळाने रस्त्यात एक बस स्टॉप लागला. आम्ही चक्क २ तास इथे झोपलो होतो. या वेळी आमची म्हणजे माझी-बाबाची आणि मंदार व कंपनीची चुकामुक झाली. त्यांना कुणीतरी जेवायला बोलावलं आणि ते थांबले, आम्हाला ते दिसले नाही म्हणून आम्ही पुढे निघून गेलो. आज आम्ही उपाशीच राहू की काय असं वाटलं, पण असं होत नाही. पुढे एका घरी आम्हाला ही भोजन प्रसादीला बोलावलं. पण या घरी राहण्याची व्यवस्था होऊ शकणार नव्हती. आणि तसंही अजून जेमतेम दुपार होती. आम्ही जेवून पुढे निघालो आणि चालू लागलो. इथे रस्त्यात आम्हाला एक पिवळी साडी नेसलेली बाई भेटली, म्हणाली “साकडी मे रुकने की व्यवस्था है छकना भगत के घर

” . ती बाई माझ्या विशेष लक्षात राहिली कारण तिचं नागाच्या आकाराचं मोठं कुंकू. नाकापासून तर अगदी केसापर्यंत तिनी ते कुंकू लावलं होतं. तिचे डोळे अगदी गोल आणि मोठे होते आणि तिच्या साडीचा रंग अगदी भडक पिवळा असा होता. हे आता सांगायचं कारण असं की ही बाई आधीही आम्हाला रस्त्यात दिसली होती आणि हसली होती आमच्याकडे पाहून. पण तेव्हा तिची विचित्र वेशभूषा एवढं कारण पुरेसं होतं, आणि आता आम्ही जवळ जवळ १०-१२ किमी पुढे आल्यावर पुन्हा ती बाई कशी काय दिसली आम्हाला? कारण ती बाई पण पाई होती आधीच्या भेटीत आणि आमच्या विरुद्ध दिशेला चालत होती… . हे शक्य नव्हतं पण काही गोष्टी आपल्याला नाही समजत, त्या पुढे समजतात… ह्याचा उलगडा मी पुढे सांगणार आहे.

छकना भगत चं घर शोधत शोधत आम्ही निघालो. बरच अंतर चालून आल्यावर समजलं की आताशा कुठे साकडी आलंय आणि ह्या छकना भगतच घर तर अजूनही ७ किमी दूर आहे. आता पायातली ताकत संपली होती. जरा विश्राम तरी करावा म्हणून आम्ही जागा शोधात होतो तेव्हा एका घराच्या अंगणात एक गोठा दिसला. मी पुढे होऊन विचारलं, “ यहा थोडी देर विश्राम कर सकते है”  एक छोटीशी, १०-१२ वर्षाची मैया होती (परिक्रमेत आपण कोणत्याही स्त्रीला मैया, माताराम, माताजी असंच संबोधतो), तिनी आपल्या भावाला बोलावलं, आणि त्यांनी तिथे विश्राम करण्याची परवानगी दिली. चहा पाजला. मला तर इथून उठावसंच वाटत नव्हतं. पराडकर काका , सुदिन आणि मंदार मागे होते, तासाभरात ते ही पोहचले. आज काही इथून पुढे जायची इच्छा होईना. घर तसं गरीब होतं. आम्ही गोठ्यात राहायला ही तयार होतो. सगळ्यांची अवस्था एकसारखी होती. शेवटी मी त्या मुलाला , मैया च्या भावाला विनवलं. आज आम्हाला इथे राहू दे. आम्हाला काही नको, फक्त एक सतरंजी दे खाली घालायला बस… .नैकू सास्ते त्याचं नाव, जातीचे पावरा हे लोक. त्यांनी त्याच्या वडिलांना विचारलं, लाल्या सास्ते पावरा, त्याचं उत्तर एकून खूप वाईट वाटलं. ते म्हणाले “ रहने को कुछ नही समस्या, पर हम

गरीब है, आपके लिये बोहोत नही कर पायेगे" आम्हाला काही नको होतं, फक्त आता आराम करायचा होता बस. आम्ही म्हटल, कोई बात नही, हमे कूछ नही चाहिये.

आम्ही त्या घराची अवस्था बघत होतो. त्यांच्याकडे ८ अपत्य होती. त्यातल्या मोठ्या मुलाला त्यांनी शिकायला नंदुरबारला ठेवलेलं. आणि घरी फक्त शेती, ती ही अश्या खडकाळ भागात! वडील थोडं फार टेलरिंग चं पण काम करत. मुली होत्या ६, त्यातल्या ५ मुलींची लग्न अजून बाकी होती. मोठी मुलगी पण माहेरी आली होती काही दिवसांसाठी… आणि भरीस भर आता आम्ही ही आलो होतो. दोन वेळच जेवण कठीण आणि त्यात घरी पाहुणे, तेही न ओळखीचे न काही… आम्ही ठरवलं, रात्री फक्त चहा प्यायचा बाकी चं उद्या पाहू… पण आपल्या ठरवल्याने काय होतंय?

आमची आरती आणि श्लोक आटोपले. आम्ही आरती करत असताना घरातील सगळी आणि आजूबाजूची ही काही मंडळी जमा झाली होती. आमच्या घरात समोरच्या खोलीत आरती करा अशी नैकू नी मागणी केली होती. त्याप्रमाणे आम्ही आत आरती आणि रोज चे श्लोक म्हंटले. त्यात नर्मदाअष्टक, रामरक्षा, भीमरूपी, हनुमान चालीसा, संकटोद्धारण स्तोत्र आणि मैयाची आरती असं असायचं. हे सगळं होईस्तोवर सर्व मंडळी बसून राहिली. त्यांच्या चेहेऱ्यावरचं समाधान स्पष्ट दिसत होतं. आता आम्ही आमचं सामान घेऊन पुन्हा बाहेर जाणार तर लाल्या जी आम्हाला म्हणाले, " अंदर ही आसन लगाव, भोजन मी चावल बनादू?" आत आसन लावायचं ठीक, पण भोजन करायचं नाही असा विचार होता… पण लाल्या आणि लाल्याची बायको ऐकायला तयार नाही, मग फक्त थोडा थोडा भात खाऊ असं सांगितलं.. तरीही जेवणात मक्याची रोटी, शेव भाजी आणि वरण भात इतकं सगळं होतं. आम्हाला खूप लाजीरवाण झालं. त्यांच्या हातावर पैसे घालावे तर घेणार नाही हे माहित होतं, आणि काही तरी त्यांच्या हाती लागावं अशी फार इच्छा होती, म्हणून मग एक उपाय काढला, मी माझे २ ड्रेसेस लाल्या जी कडून लहान करवून घेतले, आणि भैरव नी अंकलेश्वरला दिलेल्या ३ ड्रेसेस पैकी

एक कोरा ठेवलेला होता तो त्यांच्या मुलीला दिला. अर्थात ड्रेसेस मोठे करण्याचे पैसे घ्यावे लागतील या अटीवरच काम सांगितलं. घरून निघताना तिथल्या लहान मुलांच्या हातात आम्ही प्रत्येकानी आपापल्या इच्छेप्रमाणे आणि ऐपती प्रमाणे (जवळ किती पैसे आहे तीच ऐपत) खाऊ साठी पैसे घातले. अर्थात या सर्वांनी त्यांनी केलेल्या मदतीची भरपाई होणार नव्हती, किंबहुना ती कधीच होणे शक्य नव्हते, पण त्यांनी जे प्रेम आणि जिव्हाळा आम्हाला दिला होता त्याची फक्त पावती म्हणू याला. त्या एका रात्रीत आमच्या मध्ये इतकं प्रेम निर्माण झालं की तिथून आमचा पाय निघेना आणि त्या घराच्या मंडळीच्या डोळ्यांच्या धारा थांबेनात… . सुदिन तर अजूनही नैकू च्या सम्पर्कात आहे, आणि त्याची खुशाली तो मला कळवत असतो.

मैया कधी काय दाखवेल तेच समजत नाही. जिथे आपलं दाणापाणी तिनी लिहून ठेवलं असेल ते मिळाल्या शिवाय राहात नाही, जिथे आणि जसं तुमच्या साठी तिथे आणि तसं मिळेल.. मग कुलूप लागलेल्या घरीही कुलूप उघडवून तुमची इच्छा पूर्ण केली जाईल! मैया अनाकलनीय आहे. ती काहीही करू शकते… काय झालं माहितीये का, बाबा च्या नकळत त्याच्याकडून मैयाला चेलेंज दिल्या गेलं.. मुद्दाम नाहीच दिलं त्यानी, पण झालं असं नकळत, आणि मैया नी ते पूर्ण केलं.. तिथल्या तिथे.. दाखवून दिलं आम्हाला की ती अशक्यातली गोष्ट पण शक्य करू शकते.. तसे संकेत पण देते ती… आपण मूर्ख असतो की ते आपल्याला समजत नाही… काय चेलेंज केलं बाबा नी? कसं पूर्ण केलं तिनी ते? आणि हो, त्या पिवळ्या साडीवाल्या बाईचं काय? सांगते पुढच्या भागात.

*नर्मदा परिक्रमा – एक विलक्षण अनुभूती- भाग ४२*

*नर्मदे हर.*

मागच्या भागात मी तुम्हाला चेलेंज बद्दल बोलले होते, पिवळ्या साडी वाल्या त्या बाई बद्दल बोलले होते, आठवतंय नं? तर आज तेच सांगणार आहे. तर आम्ही साकडी हून निघालो. आता धार जिल्ह्यातून आम्ही जात होतो. आजचा मुक्काम आम्ही कवाडाला हनुमान मंदिरात करणार होतो. आम्ही तिथे गेलो. आजही अंतर बरंच झालं होतं. हा भाग सगळा भकास आहे.. नितळ रस्ताच काय तो दिसतो, बाकी आजूबाजूला रुक्ष आहे सगळं. एक प्रकारची भयाणता आहे या भागात. तर आम्ही या हनुमान मंदिरात गेलो. हातपाय धुतले. तिथे असलेल्या साधू नी खुणेनीच आम्हाला झाडाखाली टाकलेली चटई दाखवली. आम्ही आपलं तिथे बसून राहिलो. कुणी पाणी विचारलं नाही की कुणी चहा विचारला नाही. तास झाला, दोन तास झाले, हे साधू महाराज आपले गांजा पीत बसलेले. फक्त कुणी चप्पल घालून पाण्याच्या टाकी जवळ गेलं की ते मोठ्यांदा ओरडायचे. आमच्या पैकी प्रत्येकानी त्यांच्याशी बोलण्याचा प्रयत्न केला पण ते हुं नाही की चू नाही. आजची रात्र इथेच उघड्यावर आणि उपाश्या पोटी काढावी लागणार असं वाटत होतं. तिथे खूप डास होते. बसणं पण अशक्य झालं होतं. शिवाय नं बाथरूम न काही! अहो बाहेर जावं लागणार ते ठीक आहे पण बाहेरसुद्धा आडोसा म्हणून साधं एक झाड पण नाही. आंघोळीला टाकी, मैयापासून दुरून जातो इथून रस्ता, त्यामुळे मैया ही जवळ नाही. मी कसं काय करावं? प्रश्नच होता… रात्री अंधार झाल्याशिवाय फ्रेश होता येणार नव्हतं आणि प्रात: विधी सकाळी लवकर उठून उघड्यावरच आटोपावे लागणार होते. झोप होईल की नाही ही गाढ शंका होती आणि हे साधू महाराज अतिशय निवांत पणे खाटेवर लोळून गांजा पीत

होते, ते ही कसे माहितीये का? नागाच्या फण्याखाली, कमलासनावर विष्णू जसे एक हात डोक्या खाली घेऊन आरामात पहुडलेले असतात नं अगदी तसे.

आम्ही समोरच्या दुकानात जाऊन आलो. तिथे चहा विचारला, नाही मिळाला. काही खायला आहे का विचारलं, विकत घेऊ, असं वाटलं पण फक्त पारले जी. आता पारले जी खाऊन खाऊन वीट आला होता. इतका की परिक्रमा झाल्या नंतर मी अजूनही पारले जी खात नाही, हो फक्त दुसऱ्या परिक्रमेत मात्र नाईलाज म्हणून खाते आहे. तर आज नक्कीच उपाशी राहावं लागणार असं दिसत होतं. भूक पण लागलेली होती आणि हे बाबाजी काहीही बोलायला तयार नाही. इलाज नाही.

आता अंधार पडू लागला तशी थंडी वाढू लागली. खरं तर तिथे एक खोली होती, रिकामीच होती पण कुणाला नं विचारता कसं काय जायचं तिथे? काही वेळाने मंदिराच्या मागच्या बाजूला जरा हालचाल दिसली. तिथे एक छोटसं स्वयंपाकघर होतं, वाटलं चला आपल्यासाठी काहीतरी तयार होतंय. पण फारसं काही वाटलं नाही. बऱ्याच वेळाने एक माणूस बाहेर आला, म्हणाला "सुबह का खाना बचा है चाहो तो खा सकते हो" खरं सांगते भूक लागली की सगळं पोटात जातं. आपल्या घरी चालतात जिभेचे चोचले. जेव्हा काहीच मिळत नाही तेव्हा अन्नाची किंमत कळते आपल्याला. त्या माणसांनी आम्हाला ११ पोळ्या, एका मोठ्या पातेल्यात वरण आणि एका भांड्यात भात दिला. आमच्या जवळ ताटल्या नव्हत्या. तसं परिक्रमेला निघताना आम्ही ताट वाटी पेला घेतलं होतं, पण माझं ताट तुटल्यामुळे मी ते टाकून दिलं. बाबा कुठेतरी त्याचं ताट विसरला होता. मंदार नी एक ताटली काढली, त्यात पोळ्या घेतल्या आणि त्यावर थोड थोडं वरण घेऊन खायचं असं करत आम्हा पाचांमध्ये त्या अकरा पोळ्या आणि भात असं एकत्र जेवण झालं. वरण मला फार तिखट झालं होतं, पण इथे दुसरा उपाय नव्हता. पाण्याच्या घोटा बरोबर गीळणे हाच उपाय. तसंही चव ही फक्त जीभे पुरती असते, एकदा का अन्न पोटात गेलं की त्याचं काम शरीराला उर्जा देणं, ती मिळाली की झालं.

आणि आम्हाला चवी पेक्षा ती भूक भागवण जास्त महत्त्वाचं होतं. अश्या प्रकारचं जेवण मिळणं हे एका अर्थी आम्हाला शिकवणच होती, जे मिळेल ते स्वीकारण्याची आणि हे असं जेवण ही पहिली पायरी, जिभेवर ताबा मिळवण्याची. जेव्हा एक एक करून सर्व अवयवांवर आणि इंद्रियांवर ताबा मिळवता येईल तेव्हा कुठे परम सुखाचे दरवाजे उघडले जातील, आम्ही इथे फक्त एका जेवणाने पाणी पाणी झालेलो… असो..

जेवण तर आटोपलं, आता परीक्षा नं दोन. अत्यंत थंडी, डास, वटवाघूळ, माकडं, जमिनीवरचे प्राणी या सगळ्यांमध्ये रात्र काढायची. तशी थोडीफार सवय झाली होती प्राण्यांची एव्हाना पण थंडी जरा जास्तच. आम्ही आसन लावायची तयारी केली तेव्हा पहिल्यांदा हे साधू महाराज बोलले… "वो खोली खोल लो, अंदर आसन लागा लो" .. काय म्हणून आनंद झाला … सगळा स्वर्ग मिळावा असं वाटलं. एक शिकवण आणिक मिळाली, खरतर नेहमीच मिळत आली या परिक्रमेत पण अमलांत उतरायला वेळा लागतो. ती अशी की *आपण ज्या गोष्टी च्या मागे धावतो नं ती गोष्ट आपल्या पुढे धावत असते,* *अगदी नेहमीच, आपण धावायचं थांबलो की ती गोष्ट ही धावायची थांबते, आणि जर ती आपल्या प्रारब्धात असेल तर आपण तिच्या मागे धावायची गरज नसते, तीच आपल्याकडे धावत येते.* आपण जर याकडे नीट लक्ष दिलं तर समजतं आपल्याला, आपण कायम धावतच असतो. जेव्हा थांबतो तेव्हाच खरं काय ते साध्य होतं. धावण्यावर ताबा तर मिळवता आला पाहिजे ... याचं एक कारण आहे. आपलं मन.. खरं म्हणजे या मनाची एक गंमत आहे बघा. आपण कायम या मनाचे चोचले पुरवत असतो. *जिभेच्या चोचल्यांना पाण्याच्या घोटाबरोबर उडवून लावता येतं तसं मनाचं का करता येत नाही?* जिभेची व्याप्ती ही मुखापर्यंत आहे मात्र मनाची व्याप्ती सगळीकडे आहे, आपणच दिलीये ती, आपल्या ही नकळत. आपण बोलताना माझं मन असं म्हणतो, म्हणजे मी मालक आणि हे मन माझं… खरं तर मी मालक असल्यामुळे या मनाने माझ्या हुकुमा प्रमाणे वागायला हवं, होतंय उलट.. मी या मनाच्या हुकुमाची गुलाम झालीये. मी याच्यावर ताबा मिळवायच्या आधीच याने माझ्यावर ताबा मिळवून झालेला आहे. इथे लढाई मोठी आहे, *आधी मला या

मनाच्या ताब्यातून मुक्त व्हायचय आणि मग त्यावर शिरजोर होऊन त्याच्यावर ताबा मिळवायचा आहे… * कठीण आहे, पण हे केलं तरच जे साध्य करण्यासाठी हा जन्म झाला आहे ते साध्य होऊ शकेल. अन्यथा व्यर्थ. हे कसं करायचं हे मला विचारू नका हं… ते मला जमलं असतं तर मी इथे तुमच्या आमच्यात राहूनही तुमच्या आमच्यात राहिले नसते. पण निदान हे असं असतंय याची थोडी कल्पना तरी आली हे काय कमी आहे का? शिवाय माझी माय माझ्या प्रारब्धा नुसार मला काय द्यायचं ते देणार आहेच, हा विश्वास असताना हे नक्की सांगते की तिने मला जे जे दाखवलं आहे, जी जी प्रश्न आणि त्याची उत्तर तिने मला जशी जशी दिली आहेत त्यांच्या मागे काही कारणं नक्की असणारेत, आणि नेहमी प्रमाणे मला ती नंतर कळतील… त्या पिवळ्या साडी वाल्या बाई सारखी…

हो हो सांगते त्या पिवळ्या साडी वाल्या बाई बद्दल, पण आधी इथे काय झालं ते तर सांगू देत. तर आम्ही खोलीत आसन लावलं, आमचं जेवणं ही झालं होतं. थंडीपासून बचाव ही झाला होता. आणि आता आम्ही दुसऱ्या दिवशी सकाळी लवकर उठलो. अंधारातच प्रात:विधी आटोपून घेतले. इथे चहा पाणी काहीही होणार नाही हे आम्हाला माहित होतं. माझी तर आज अंघोळ ही होणार नव्हती कारण इथे टाकी शिवाय काही सोय ही नव्हती. आम्ही निघालो. मंदार आणि मंडळी पुढे होती आणि आम्ही मागे होतो. भकास रस्ता, एखाद दुसरं घर, खूप वारा, अश्या अवस्थेत आम्ही आपलं चालतोय, पोटात काहीही नाहीये, अगदी चहा पण नाहीये सकाळपासून पोटात.. नऊ-साडे नऊ होऊन गेले, आम्ही सकाळी ६ वाजता चं निघालेलो, माझ्यातले त्राण आता संपले होते. रात्री चं जेवण झालं होतं पण नीट असं नव्हतं झालं, थंडी चा निदान चहा तरी हवा होता. आम्ही चालतच होतो, वाटेत एका घरासमोर एक ओटा दिसला, त्या ओट्यावर मी बसले, आणि बाबाला म्हणाले, “काहीतरी कर न बाबा, मला खूप भूक लागलीये” बाबा नी त्याच्या जवळ असलेले दोन पार्ले जी चे बिस्कीटं काढले.. एक मला दिलं आणि एक स्वत: घेतलं. ते कोरडं बिस्कीट घशा खाली जाणार नाही म्हणून पाण्यासोबत मी खात होते, आणि अचानक माझ्या मनात विचार आला. मी बाबाला म्हणाले, “बाबा, इथे मागे

जे घर आहे नं त्यांनी दार उघडून जर आता आपल्याला चहा दिला तर किती मजा येईल नाही? काळा पण चालेल, पण आता हवाय रे जरा" बाबा जोरात हसला, म्हणाला, " अगं मागे तरी बघ, त्या घराला केवढं मोठं कुलूप आहे?, तुला काय वाटलं, तुझी नर्मदा माई येईल, दोन तळहातावर दोन चहाचे मोठाले पेले घेऊन आपल्या समोर उभी राहील, आणि म्हणेल, बाबांनो, माझ्या दाराशी आले आहात, चहा पिऊन जा?, अगं मागण्या आधी एकदा मागे वळून बघायचं तरी, चल आता, मुकाट्याने बिस्कीट खा, हवं तर ५ मीनीट आराम कर, आणि चला मग, पुढे बघू चहाचं काय होतंय ते" त्याचं काही चूक नव्हतं म्हणा, मी मागे वळून तरी बघायला हवं होतं बोलायच्या आधी.. मी विचार करत बसले तसा मला भास झाला, ती पिवळी साडी वाली बाई बहुधा मी पुन्हा एकदा बघितली… पण मी इतकी भुकेली झाले होते की बहुधा त्या पिवळ्या साडी वाल्या बाईकडे मी लक्ष दिलच नाही. आता आम्ही निघणार तोच एक मोटारसायकल येऊन थांबली. नवरा बायको होती ती दोघं, बाई खाली उतरली, तिने कुलूप उघडलं, आणि नवरा म्हणाला "बाबाजी, मेरे चौकट पे आये हो, चाय तो पिते जाओ" इतकच नाही, तर जेव्हा घरातून ती बाई चहा घेऊन आली तेव्हा तिने दोन मोठे पेले भरून आणले होते, तळहातावर.. आमच्या समोर येऊन ती उभी राहिली, म्हणाली, काली चाय है माताजी, पर मेरे घर आये हो, चाय तो पीनी पडेगी" … . बाबा नी नर्मदा माईला चेलेंज केलं होतं नं, तुझी नर्मदा माई, तळहातावर चहाचे कप घेऊन येईल आणि म्हणेल की माझ्या घरी आलेय, चहा पिऊन जा..? नर्मदा माईनी ते स्वीकारलं आणि पूर्ण करून दाखवलं.. त्याच कुलूप बंद घरातून मैया नी मला काळा चहा पाजला, अगदी जसा मला हवा होता तसा, आणि बाबा बोलला होता तेच शब्द तो माणूस ही बोलला, आणि बाबानी सांगितलं होतं तसंच ती बाई तळहातावर चहाचे मोठे पेले घेऊन आली… .काय म्हणावं याला? योगायोग? छे.. माझी माई माझी प्रत्येक इच्छा पूर्ण करते… आणि ती आहे हे ती दाखवून ही देते..

तुमच्या एक लक्षात आले का? जेव्हा जेव्हा माझी सोय होत नाही असं मला जाणवलं तेव्हा तेव्हा ही पिवळी साडी वाली बाई मला दिसली, आणि ती दिसल्यावर माझी सोय झाली,

पण जोवर मला हे समजत नव्हतं तोवरच ती मला दिसत होती. जेव्हा माझ्या हे लक्षात आलं त्यानंतर तिचं दिसणं बंद झालं. मग ती बाई नक्की कोण असावी बरं? हे काय मी वेगळं सांगायला हवय? पण हे असच असतं, जेव्हा ती आपल्याला दर्शन देते नं तेव्हा आपल्याला समजतच नाही. तिच्या त्या रुपात म्हणा किंवा असं काहीतरी होतं की आपली मतीच काम करत नाही. असं मारुती रायांनी दर्शन दिलेलं मी तुम्हाला २७ व्या भागात सांगितलं होतं, तेव्हाही माझी अशीच मती निकामी झाली होती. आता पुन्हा एकदा सांगते हा अनुभव, कारण हा याच भागात घडलेला आहे.

आम्ही चहा पिऊन पुढे निघालो त्यावेळी बाबा अतिशय दु:खी झाला होता. आपण माईला चेलेंज केलं याचं त्याला फार वाईट वाटत होतं. रामदास स्वामी आणि हनुमान हे त्याचं आद्य दैवत. बाबा मारुतीरायाची करुणा भाकू लागला. आज बाबाचा पाय पण फ़ार दुखत होता. अगदी २ किमी चाललो ना की तो बसून जात, इतका त्रास होत होता. मग मी बाबाला म्हंटलं “एखादा रिदम धरून चाललास तर कदाचित पाय कमी दुखेल” त्यालाही ते पटलं, आणि दोघांनी हनुमान चालिसा चा रिदम ठरवला. हनुमान चालिसा एकदा म्हणायला साधारण ४ मिनिट लागतात. आम्ही ठरवलं, ११ वेळा अहुमान चालीसा होईस्तोवर थांबायचं नाही. म्हणजे साधारण ४५ मिनिटे सलग चालायचं. असं केलंलं हे तंत्र बरच उपयोगी पडलं. मग आम्ही तेच वारंवार करू लागलो. या वेळी अधुन मधून आम्हाला एक परिक्रमावासी दिसत असे. त्यांच्या जटा होत्या, काळी सावळी पण सुदृढ शरीरयष्टी, ६ फ़ूट उंची, कमरेला पांढरा पंचा, हाती कमंडलू, असे बाबा होते ते. ते आम्हाला अधुन मधूनच दिसत. शक्यतो आम्ही जेव्हा ४५ मिनिटाचा टप्पा पार करून आराम करत असू तेव्हा ते आमच्या पुढे जात असत. मात्र आम्ही त्यांच्या पुढे गेलेलं मला आठवत नाही.

तर धरमाराय नावाच्या गावा जवळची ही गोष्ट. एका ठिकाणी आम्ही आराम करत असताना ते पण तिथे आले आणि आमच्या समोरच्या खडकावर बसले. नर्मदे हर झालं. मी

त्यांना विचारलं “महारज जी, परिक्रमा मे हो?, कहासे उठायी आपने परिक्रमा?” ते म्हणाले “हा. वैसे तो मै परिक्रमा मे ही हू, कई सालों से परिक्रमा कर रहा हू” . माझे प्रश्न पुन्हा सुरु झाले, मी विचारलं “कोई और भी रास्ता है क्या? आगे पिछे तो आप दिखते नही हो, बस बीच बीच मे दिखते हो?” आम्ही रस्ता मार्गाने जात होतो. मला वाटलं हे महाराज किनाऱ्यावरून जात असतील आणि अधून मधून रस्त्यावर येत असतील, म्हणून मी त्यांना हा प्रश्न विचारला होता. ते म्हणाले “रास्ते तो बहोत होते है, तुम बुलाते हो तो मै आ जाता हू यहा, अब इतनी बार बुलाया तो आना तो पडेगा ना! नही बुलाओगे तो नही आउंगा” , मला काही कळेना, मी कधी या बाबांना बोलावलं? म्हंटलं जाऊ दे, हा कुणी ब्रम्हचारी बैरागी बाबा दिसतोय, बोलला असेल असच काहीबाही. ते साधू महाराज निघून गेले. मी आणि बाबा पण थोड्या वेळाने निघालो, मात्र मनात विचार येतच राहिला.. मी या बाबांशी तर बोलले पण नाही आधी, मग मी बोलावलं असं ते बाबा का म्हणाले? उत्तर सापडे ना.. म्हंटलं जाऊ दे, आपण आपला हनुमान चालिसा सुरू करू… . अहो काय सांगू, असा विचार मनात येतो न येतो तोच समजलं, आतापर्यंत किमान ५५ वेळा तरी हनुमान चालिसा म्हणून झाला असेल आमचा! इतका धावा तर आपण त्या मारुती रायांचाच करतोय… अगदी निरपेक्ष भावनेनी! “हा. वैसे तो मै परिक्रमा मे ही हू, कई सालों से परिक्रमा कर रहा हू” . रास्ते तो बहोत होते है, तुम बुलाते हो तो मै आ जाता हू यहा, अब इतनी बार बुलाया तो आना तो पडेगा ना! नही बुलाओगे तो नही आउंगा” .. बाबांचे शब्द माझ्या कानात घुमू लागले आणि समजलं… हे तर खुद्द मारुती राया! पण ते त्या वेळी काही लक्षात आलं नाही.

आम्ही डहीला नं जाता कुआ वरून धरमारायला गेलो. तिथे छान जेवण झालं दाल बाटी चं, मात्र सवय नसल्याने माझं पोट बिघडलं.. खूप दुखू लागलं. दोन दिवस पोट काही थांबे ना. आता डॉक्टरला दाखवल्या शिवाय काही खरं नाही म्हणून कोटेश्वरला गेल्यावर डॉक्टर चा शोध घेऊ लागलो, मात्र इथे मला एक अनमोल ठेवाच मिळाला, आयुष्यभराचा… आजही मी तो जपून आहे असा, काय ते सांगते पुढच्या भागात.

*नर्मदा परिक्रमा – एक विलक्षण अनुभूती- भाग ४३*

*नर्मदे हर.*

तर मागच्या भागात मी माझं पोट दुखत होतं ते सांगत होते. आम्ही कसं बसं कोटेश्वरला पोचलो. तिथे दगडू महाराज आश्रमात गेलो. तिथे काही काही सोय नव्हती. आसन लावायची जागा पण नव्हती, जी जागा होती अतिशय अस्वच्छ होती आणि मला खूप त्रास होत होता. मला सारखं टॉयलेटला जावं लागणार होतं. तिथे ती ही सोय नव्हती. आम्ही तिथून निघून कुणाच्या तरी घरी आश्रय घ्यायचं ठरवलं, चार किमी चालत जाऊन हे करावं लागणार होतं. ते ही मागे जावं लागणार होतं. पण त्या आधी डॉक्टरला दाखवणं गरजेचं होतं. आम्ही चौकशी केली तेव्हा समजलं की चांगला डॉक्टर कुक्षी मधेच मिळेल, ते १४ किमी दूर होतं. मी फार फार गळून गेले होते, मला खूप अशक्तता आली होती आणि २ किमी चालून झाल्यावर मला चक्कर येऊ लागले. आता मला भरती करून घेतील की काय अशी वेळ आली होती आणि आम्ही अर्ध्या रस्त्यात होतो, जिथे वाहन ही नाही आणि कसली सोय ही नाही. झाडाखाली मी बसून होते आणि बाबा वाहन शोधायला रस्त्यावर उभा होता. अशात मला एक फोन आला. माझ्या मैत्रिणी च्या नवऱ्याचा. मैया पण कशी कनवाळू आहे बघा, फोन तर सहज आला होता, परिक्रमेची चौकशी करण्यासाठी, आणि माझी तब्ब्येत बरी नाही समजल्यावर मैयांनी या माझ्या मैत्रिणीच्या नवऱ्याकरवी माझी सोय करून दिली.

माझ्या या मैत्रिणी चं सासर कुक्षी चं. नरेन जी म्हणजे माझ्या मैत्रिणी चे यजमान, त्यांनी सहज म्हणून फोन केला होता मात्र मी इतकी आजारी आहे समजल्यावर कुक्षीला आपल्या भावाला फोन केला आणि आमच्या साठी गाडीची व्यवस्था केली. आम्हाला घ्यायला कुक्षी हून

गाडी आली. नरेन जी चे भाऊ आणि भावजय दोघंही हातातली काम सोडून आम्हाला घ्यायला आलीत. आम्ही डॉक्टरकडे गेलो. तिथे मला इंजक्शन देऊन तास भर झोपवून ठेवलं आणि मग मात्र हे भैया भाभी आम्हाला घरी घेऊन गेले.

घरी नरेनजींच्या आईनी माझ्यासाठी एक मास्टर बेड रूम तयार करून ठेवली होती. मी गेल्या गेल्या त्यांनी मला लिंबू सरबत करून दिलं, आईच्या मायेनी मला जवळ घेत त्या म्हणाल्या “बेटा अब चिंता मत करना, तुम तुम्हारे अपने घर मे, अपने मां की गोद मी है” . मला खरंच तेव्हा आई जवळ असल्यासारखंच वाटू लागलं. लिंबू सरबत पिऊन मी झोपले, मां पूर्ण वेळ माझ्या खोली च्या आसपासच होत्या, मध्ये मध्ये येऊन माझ्याकडे लक्ष देत होत्या. त्यांनी बाबाची पण खूप काळजी घेतली. घरातली सगळी लहान मुलं “बुआजी बुआजी” म्हणत मला येऊन भेटून जात. संध्याकाळपर्यंत मला जरा बरं वाटलं. रात्री माझ्यासाठी मुगाची मऊ खिचडी केली होती. माझी औषधं मां मला स्वतःच्या हातानी देत. रात्री त्या माझ्या बाजूलाच झोपल्या होत्या. आणि सकाळी माझ्यासाठी एक सरप्राईज माझी वाट बघत होतं. नरेन जी सकाळी अचानक तिथे आले होते…

रितू भावसार आणि तिचे यजमान नरेन जी हे आमचे खूप जवळचे मित्र. माझा ओंकार आणि यांची आरुषी हे अगदी पहिलीपासूनचे मित्र, त्यात मी आरुषीची आवडती शिक्षिका, आणि आमचं राहणं अगदी शेजारी. यांची आरुषी प्रत्येक काम मला विचारून करायची, आणि रोज मला भेटल्या शिवाय तिला जमायचं नाही. आमच्या या दोन कुटुंबात खूप सख्य आहे. त्यात माझा आणि नरेन जींचा वाढदिवस एकाच दिवशी, ३० जानेवारीला आणि सचिन म्हणजे माझा नवरा आणि रितू या दोघांचा वाढदिवस अगदीच आगेमागे, म्हणे १४ आणि १७ नोव्हेंबर चा. तेव्हा आमचे वाढदिवस पण एकत्र साजरे व्हायचे बरेचदा. आणि मग मात्र त्यांची बदली मंगलोरला झाली, त्यानंतर कुक्षीला त्यांची माझी ती पहिलीच भेट, ती ही अचानक… त्यांना पाहिल्यावर मला खूप भरून आलं..त्यांनाही अश्रू पुसल्यावाचून राहता आलं नाही, आणि गंमत

माहितीये का, ही तारीख होती ७ जानेवारी ची. नरेन जी काही कामांनी कुक्षीला येणार होते आणि म्हणून त्यांचा वाढदिवस साजरा करण्याची तयारी त्यांच्या घरच्यांनी करून ठेवली होती. माझा पण वाढदिवस तेव्हाच असतो हे समजल्यावर मां नी माझाही वाढदिवस साजरा केला, तो ही खूप वेगळ्या पद्धती नी.

भावसार कुटंब हे गायत्री परिवारात सक्रीय आहे. गायत्री उपासना त्यांच्या कडची प्रमुख उपासना असते. त्यांच्याकडे घरातल्या प्रत्येकाचे जन्म दिवस हे त्या त्या व्यक्तीकडून गायत्री यज्ञ करवून साजरे केले जातात. घरात गोडधोड केल्या जातं आणि त्या त्या व्यक्ती कडून घरच्या देवाची पूजा आणि नैवेद्य दाखवल्या जातो. घरची लहान मोठी सगळी मंडळी त्या व्यक्तीला औक्षवण करतात आणि आपापल्या परिने भेट वस्तू देतात. संध्याकाळी भजन ठेवल्या जातं आणि आजूबाजूच्या लोकांना बोलावून काहीतरी नाश्ता दिल्या जातो. रात्री सगळं कुटंब एकत्र देवळात जातं आणि घरी आल्यावर सगळी मंडळी रात्रीच्या स्वयंपाकाला लागतात. अगदी प्रत्येक लहान मुलसुद्धा आपापल्या परिनी मदत करतं. तीन मुलं तीन सुना आणि नातवंड असं हे कुटुंब. त्यातले नरेन आणि रितू मंगलोरला असतात पण वाढदिवस शक्यतो कुक्षीला केला जातो. तसं झालं नाही तरी मां यज्ञाच विडिओ रेकोर्डिंग करून त्यांना तो पाठवतात.. तर असा असतो इथला विलक्षण वाढदिवस आणि माझाही वाढदिवस असाच साजरा झाला. ते ही नरेन जीं च्या सोबत.माझ्याकडून गायत्री यज्ञ झाला, आणि नेमका त्याच दिवशी गायत्री कलश कुक्षी मध्ये आला होता, त्याचं दर्शन ही झालं.. २०१८ सालचा वाढदिवस मी कधीही विसरू शकणार नाही. इथे मला एक आई मिळाली, एक परिवार मिळाला.. यांना मी कुक्षी मां असं नाव दिलय.

माझी तब्येत पूर्ण बरी झाल्यावरच मांनी मला तिथून जाऊ दिलं. तेही नरेन जी स्वत: मला सोडायला आले होते. वाटेत थांबून माझ्या आवडीचं डेअरी मिल्कसुद्धा घेतलं. त्यांना निरोप देताना पुन्हा एकदा या घरून मला मिळालेल्या प्रेमाची, त्या आईच्या मायेची उतराई

होऊ शकणार नाही हे जाणवलं आणि डोळ्याच्या कडा ओलावाल्यात. नरेन जींनी पण भरल्या डोळ्याने निरोप दिला आणि आम्ही चीखलद्याच्या वाटेने निघालो.

चीखलद्याला आम्ही लवकर पोहोचलो. तिथल्या मंदिरात आमचा मुक्काम होता. अतिशय प्राचीन असं हे मंदिर आहे. मंदिरा च्या आवारात बरीच लहान मोठी मन्दिरं आहेत. इथे एक खोली आहे आणि या खोली मध्ये एक देव्हारा आहे. या खोलीत मोठ्या महाराजांनी म्हणजे वासुदेवानंद सरस्वती महाराजांनी चातुर्मास केला होता, तिथेच त्याच खोलीत मला आसन लावायची संधी मिळाली. इतकंच नाही तर “हे मंदिर तुम्ही असेपर्यंत तुमच्या ताब्यात आहे” असं म्हणून तिथल्या पूजा-यांनी या मंदिराच्या किल्ल्या पण माझ्याकडे दिल्या. मी देखील अतिशय आनंदानी त्या मंदिराची पूजा केली, तिथे जप केला. मला खूप खूप आनंद झाला कारण जिथे जिथे मोठ्या महाराजांनी चातुर्मास केला आहे तिथे तिथे त्या त्या खोलीत जप करण्याची संधी मला मिळाली आहे.

तुम्ही माझे मागचे अनुभव वाचलेत, त्यात मी दोन तीनदा चीखल्द्याचा उल्लेख केलेला आठवत असेल. इथे एक वेगळाच अनुभव आला असं मी तुम्हाला सांगितलं होतं. खरतर इथला दिवस खुपच छान गेला. चुलीवरचा स्वयंपाक करून खाण्यातली मजा, आनंद सगळं अनुभवलं आणि आम्ही आनंदाने झोपी गेलो. मात्र थोड्याच वेळाने मी ओरडू लागले, मला खूप घाम फुटला होता. ऐन जानेवारी महिन्यात मी घामाने थबथबले होते. मी बाबाला उठवलं आणि त्याला रामरक्षा म्हणायला लावली… कारण मी जे पाहिलं होतं ते खूप वेगळं होतं. माझ्या कल्पने बाहेर, खरं म्हणजे माझ्या विचाराच्या ही बाहेर होतं ते, आणि हो, एक नक्की सांगते, ते स्वप्न नव्हतं.. कारण मी ते पाहिलं तेव्हा माझे डोळे उघडे होते.. मला झोप लागली नव्हती हे मला माहित होतं कारण त्या वेळी त्या खोलीत असलेलं त्यांच वास्तव्य, त्यांचा आवाज मी स्पष्ट ऐकला होता… .. पण वाचक हो या भागात नाही सांगता यायचं, बराच मोठा होईल हा भाग.. तेव्हा हा वेगळाच अनुभव सांगते पुढच्या म्हणजे ४४ व्या भागात.

*नर्मदा परिक्रमा – एक विलक्षण अनुभूती- भाग ४४*

*नर्मदे हर.*

मागच्या भागात मी तुम्हाला सांगत होते तो आगळा वेगळा अनुभव, चिखलद्या चा. तर आम्ही सगळं आवरून झोपलो. अतिशय पवित्र ठिकाणी आम्ही आज राहिलो होतो. इथे, म्हणजे याच खोलीत मोठ्या महाराजांनी चातुर्मास केला होता, आणि म्हणूनच मला आश्चर्य वाटलं की असा अनुभव इथे का यावा? सांगते. मी जप करत करत लोळत पडले होते, माझा डोळा लागतो न लागतो अशी स्थिती. मी झोपले नव्हतेच पण खूप झोप येत होती मला, आणि आता मी डोळे बंद करणार तोच माझ्या डोळ्यासमोर धूसर धूर पसरल्याचं मला जाणवलं. त्या धुरातून एक अस्पष्ट आकृती पुढे आली. तो एक मानवी आकार होता. ती आकृती स्पष्ट झाली आणि तिचं रुपांतर एका म्हाताऱ्या बाई मध्ये झालं. त्या बाईचे केस पांढरे फेक आणि मोकळे असून हलके कुरळे आणि खांद्या एवढे लांब होते. तिनी लाल आणि काळ्या फ्रेम चा चष्मा पण लावला होता. ती विवस्त्र होती आणि रडत होती. अतिशय केविलवाणी दिसत होती. तिनी तिचे दोन्ही हात माझ्याकडे लांब केले. ते सुरकुतलेले होते. हिरव्या नसा दिसतील इतकी ती बाई म्हातारी आणि तब्ब्येतिनी खचलेली दिसत होती. दोन हात लांब करून ती मला विनवणी करत होती, गयावया करत होती. “मला खूप त्रास होतोय गं. हे लोकं मला खूप छळताहेत, मला वाचव.. माझी मदत कर, मला यातून बाहेर काढ” . तीचा आवाज खूप केविलवाणा आणि आर्त होता.. आणि मी खूप हतबल असल्यासारखं मला वाटत होतं. तो धूर पुन्हा दाट झाला. ती बाई हळू हळू आकार बदलू लागली आणि एक १५-१६ वर्षांचा मुलगा त्या धुरातून पुढे आला, ती बाई आणि तो मुलगा दिसायला बरेच सारखे होते, त्या दोघांच चरचरीत नाक आणि बोलके डोळे अगदीच एकसारखे.. आणि हा मुलगा दिसायला सुरेख मात्र अत्यंत दु:खी होता.

विवस्त्रच होता, गुडघ्यात मान घालून बसला होता. त्याच्या ओठाखाली उजव्या हाताला असलेला तीळसुद्धा मला स्पष्ट आठवतोय. तो रडत होता, त्याच्या गालावर अश्रुंचे डाग पडले होते. तो अगदीच असहाय होता, मी त्याला खुणेनीच विचारलं “काय झालं” .. त्यानी माझ्याकडे पाठ केली. त्याच्या पाठीवर शरीराच्या आत असलेल्या सगळ्या अवयांची चित्र गोंदवलेली होती.. आणि मध्ये मध्ये रक्ताचे थेंब दिसत होते.. तो म्हणाला “ मला हे सगळं खूप त्रास देतय, मला यातून मोकळ कर” .. त्याचं ते दु:ख मला बघवत नव्हतं.. मी त्याला हात लावायला हात पुढे केला तर माझ्या हाताला फक्त खूप थंड असं काहीतरी जाणवलं, स्पर्श झाला नाही.. आणि मी भानावर आले… बाबा बाबा म्हणून ओरडू लागले… मी घामानी चिंब भिजले होते..

पण एक सांगू का, मला या दोघांनी काही इजा केली नाही, मला त्यांची भीती पण वाटली नाही, पण असं माझ्यासोबत पहिल्यांदाच झालं. मला एक एक बारकाई व्यवस्थित आठवते, एक एक संवाद व्यवस्थीत आठवतो, हे स्वप्न नव्हतं हे मी नक्की सांगू शकते. पण मला माझ्या आजूबाजूचं भान नव्हतं त्यावेळी हे ही नक्की. ही दोघं नक्की कुणीतरी होतीत. ती मला मदत मागत होतीत. त्यांचा हेतू मला त्रास देण्याचा नव्हता हे मला स्पष्ट समजत होतं, मी त्यांची मदत करू शकत नाही हे ही मला माहित होतं कारण ती वेगळ्या योनीतली आहेत हे मला समजत होतं… बाबानी रामरक्षा म्हंटली, मला झोप लागेस्तोवर तो माझ्या डोक्यावर हात ठेवून बसला होता. मी सकाळी उठले तेव्हा मी शांत झाले होते, आणि शांतपणे मी बाबाला सगळं सांगितलं देखील, पण मनातून मी अस्वस्थ होते. हे नक्की काय होतं आणि असं का झालं, आणि मलाच ते दोघं का दिसले हे मला समजत नव्हतं. मात्र ते माझ्या आजूबाजूलाच आहेत असा भास मला दुसऱ्या दिवशी सकाळी देखील होत राहिला. दुपार नंतर मात्र अचानक नाहीसा झाला. नंतर मात्र पुन्हा कधी असं झालं नाही मात्र याचा उलगडा मला पुढे महेश्वरला झाला. मी हा अनुभव फार कुणाला सांगीतला नाही कारण लोक विश्वास ठेवत नाही, मात्र मला याचा उलगडा झाल्या नंतर तो पटला ही आणि समजला ही. मी महेश्वर आल्यावर तो सांगेन असा विचार केला होता मात्र तुमची उत्कंठा न वाढवता मी तुम्हाला आताच सांगते.

महेश्वरला मला एक संन्यासी भेटलेत. त्यांचे पण मला बरेच अनुभव आलेत पण ते मी आपण महेश्वरला पोहोचल्यावर सांगेन. आता फक्त या अनुभवाचा उलगडा तेव्हा सांगते. मी दोन संन्याश्यांना ह्या अनुभवा बद्दल विचारलं आणि दोघांनी ही जवळपास एकाच प्रकारचा उलगडा दिला म्हणून मी तोच ग्राह्य धरते आहे. तर कल्याणपूर नावाच्या गावाला जेव्हा मी गेले तेव्हा तिथे लाल पुरी महाराज होते, त्यांच्याशी मी या अनुभवाची चर्चा केली. त्यांनी संध्याकाळी दिवा लावाला तेव्हा मला बोलावून घेतलं आणि माझ्याकडून गीतेचा १५ वा अध्याय वाचवून घेतला. हा रोज म्हणायचा असं सांगितलं आणि त्या दोघांची आठवण करून हा अध्याय म्हणायचा आणि त्यांच्या मुक्तीसाठी प्रार्थना करायची असं सांगितलं. बिचारे दु:खी जीव आहेत, गती साठी यत्न करताहेत असं सांगून अजिबात भय वाटेल असे ते दोघं नाही, याची शाश्वती दिली. मात्र ते नक्कीच कुणी परायोनितले लोक आहेत हे ही खात्री पूर्वक सांगितले. महेश्वरला हृदय गिरी महाराजांनी अजूनच स्पष्ट सांगितलं. ते म्हणाले " देखो, ये एकदम आम बात है, डरने की जरुरत नही है, तुम अब नर्मदा किनारे श्रद्धा पूर्वक चल रहे हो, साथ मे ध्यान और पूजा पाठ भी कर रहे हो, ऐसे मे तुम्हारा मन शुद्ध होता जा रहा है, जैसे जैसे तुम्हारी साधना बढेगी वैसे इस प्रकार के की अनुभव तुम्हे आयेंगे. इसका कारण मै तुम्हे बताता हु. तुम साधना मे आये हो किंतु अभी तुम नये हो, तुम्हारा मन साधना मे तो आ रहा है लेकीन अभी स्थीर नही है, लेकीन स्थीरता के पथ पर है. मनकी ऐसी स्थिती जो दोनो ही तरफ मतलब सांसारिक जीवन मे और अध्यात्म की और भी आधी आधी है वह मन थोडा कमजोर हो जाता है और परायोनीयो के लिये तुमसे संपर्क बनाना आसांन हो जाता है. जैसे तुमने कहां की वो तुम्हे तकलीफ देने के लिये नही आये थे, पर तुम्हारी मदद मांगने के लिये आये थे, वही सच है. तुम उन्हे बताओ की तुम उनकी मदद नही कर सकती, क्युं की तुम उतनी ताकतवर नही हो. लेकीन उनको उनके भोग को भोगने की क्षमता मिले इसके लिये तुम मां नर्मदा से जरूर प्रार्थना करोगी. परिक्रमा वासीयोंकी कोई इच्छा मां अधुरी नही रखती यह सब जानते है, और इसी लिये वे परायोनी के जीव भी तुम्हे संपर्क करते है. तुम्हारे मन की स्तिथी उस वक्त बोहोत

ही शुद्ध रही होगी और मन ईश्वर मे विलीन रहा होगा, तभी तुम्हारा संपर्क उनसे हो पाया. ईश्वर को उनके लिये प्रार्थना करो. गीता के १५ वे अध्याय का उनके लिये रोज पाठ किया करो ” . हे ऐकून मला जरा धीर आला. तेव्हापासून रोज गीतेचा १५ वा अध्याय माझ्या वाचनात आहे.

इथून पुढे आम्ही बोधवाडा सेमारदा अचोदा असं करत काल्याणपुरालाला पोहोचलो, मात्र काल्याणपुराच्या अगोदर थोडी माहिती म्हणून सांगते. बोधवाड्याला अति प्राचीन मंदिर आहे जे श्री यंत्राच्या आकाराचं आणि बांधणी चं केलं आहे. त्याच्या वरच्या भागातून बघता आजही सात पदर दिसून पडतात. या मंदिराला आपण कोणत्याही एका बाजूने बघितलं तरीही सात पदर आपण मोजू शकतो. हे मंदिर देखील डूब क्षेत्रात येत असल्याने अश्या प्रकारची ऐतिहासिक आणि उर्जेचा विचार केला असता वैद्न्यानिक बांधकाम असलेली ठिकाण पाण्याखाली जाऊ नये असं वाटत. श्री यंत्राचा आकार आणि बांधणी अशी असते की त्याच्या मध्यवर्ती सर्व बाजूनी सकारात्मक उर्जा फिल्टर होऊन येते आणि एकत्रित होते, आणि अशा ठिकाणी इथे अतिप्राचीन शिवलिंगाची स्थापना केली आहे. इथला नंदी मात्र जुना खणल्याने नवीन लावण्यात आला आहे मात्र खणलेली मूर्ती आपल्याला बघायला मिळते. बोधवाड्याला जाता रस्त्यात एक वडाचं प्राचीन आणि भलं मोठं झाड आहे. जवळ जवळ सात वडाची झाडं एकत्र येऊन हे तयार झालं आहे. इथे विलक्षण सकारात्मक उर्जा जाणवते. या झाडाची काय नक्की महती आहे माहित नाही पण हे झाड उभ्यापेक्षा आडवं वाढलेलं आहे आणि पारंब्या समोर येऊन छान जाळी तयार झाली आहे. या झाडाखाली प्रत्येक परिक्रमावासी थांबतो आणि इथे थांबल्या नंतर परिक्रमावासियांचा थकवाच जातो असं मी ऐकलं ही होतं आणि अनुभवलं ही आहे.

बोधावाडा इथे एक रात्र मुक्काम करून आम्ही सेमारादाला गेलो तिथे षणमुखानन्दांनी बांधलेलं सुंदर नर्मदा मंदिर आहे. इथे सगळ्या सोयी आहे. या मंदिराची गंमत अशी की हे

मंदिर एका रात्रीत उभं झालं असेल यावर विश्वासच बसत नाही. इथून पुढे आम्ही धनखेडी, बाकानेर करत लुनेरला जाणार होतो पण रस्त्यात काल्याणपुराला थांबलो. बाकानेरला त्या दिवशी काहीतरी कारणाने हिंदू मुस्लीम दंगल झाली होती, त्यामुळे वातावरण जरा तापालेलं होतं. अशात एका मन्दिरातल्या एका पूजा-यांनी आम्हाला एक मोलाचा सल्ला दिला. काही हिंदू दुकानदारांनी आमची मदत केली आणि आम्ही त्या वातावरणातून सुखरूप बाहेर पडलो खरं, पण त्या वेळीची परिस्थिती तणावपूर्णच होती. संध्याकाळचे ४ वाजून गेले होते, आणि ज्या वेळी आसरा घ्यायचा त्या वेळी आम्ही पुढे निघालो होतो. मात्र काल्याणपुराच्या लाल पुरी महाराजांची भेट आणि त्या पुढचा अनुभव हे दोन्ही अविश्वसनीय आहेत. मी मागच्या भागात काल्याणपुराच्या अनुभवाचा उल्लेख केला होता. तो मी पुधःच्या भागात सांगणार आहे. शिवाय गंगा कुंडाबद्दल आणि इथे आलेल्या वेगळ्या अनुभवाबद्दल पण पुढे सांगते .. आणि हो, तो मोलाचा सल्ला आणि बाकानेर च्या दुकानादारांनी केलेली मदत पण सांगते… ४५ व्या भागात.

*नर्मदा परिक्रमा – एक विलक्षण अनुभूती- भाग ४५*

*नर्मदे हर.*

मागच्या भागात मी तुम्हाला बाकानेर मधल्या तणाव ग्रस्त स्तिथी बद्दल सांगत होते. तिथूनच आता पुढे जाऊयात.खरं तर आम्ही बाकानेरला थांबायचं ठरवलं होतं, आम्ही एका मंदिरात पण गेलो होतो, पण तिथल्या पूजा-यांनी आम्हाला तिथून पुढे जायचा सल्ला दिला. ते म्हणाले, इथे तुम्ही सुरक्षित नाही असं नाही पण इथलं वातावरण आज काही ठीक नाहीये. मंदिर तसं शहराच्या मध्यभागी आहे, आणि हा भाग संवेदनशील भाग आहे. एकदा का अंधार पडला की कुणी फारसं बाहेर पडणार नाही आज, मग तुमच्या जेवणा खाण्याचं आणि सुरक्षिततेचं कोण बघणार? त्यापेक्षा तुम्ही पुढे जा. तिथल्या दोन तीन हिंदू दुकानदारांनी ही हाच सल्ला दिला. आम्हाला भरपूर गूळ दाणे, बिस्कीट, शीतपेयाच्या दोन बाटल्या असं बरच सामान दिलं, म्हणजे रात्री आम्हाला भोजन प्रसादी नाही मिळाली तरी त्या सामानावर आमचं भागू शकेल इतकं सामान देऊन आम्हाला अंधाराच्या आत बाकानेर सोडा असं सांगितलं. निदान या संवेदनशील भागाच्या तरी दूरच जा असा सल्ला दिला. आम्ही तो ऐकला आणि पुढे निघालो.पुढे बरच अंतर मुस्लीम वस्तीच होती. आमच्याकडे लोक बघत होती आणि तणाव आहे हे ही आम्हाला दिसत होतं. खरं तर माणसं वाईट नसतात हो, परिस्थिती वाईट असते. माणूस म्हटलं की त्यात माणुसकी चा अंश ही नाही असं कसं होईल? म्हणजे धर्म कोणताही असू देत, माणूस हा कुठेतरी माणूस असतो, मात्र या वेळीची परिस्थितीच वाईट होती अन्यथा काही मुस्लीम बांधवांचा दमगढ च्या आधी मला आलेला अनुभव अंगावर काटा आणणारा आहे. त्यावेळी मला त्यांच्यातली माणुसकीच नाही तर त्यांच्यात असलेली ईश्वरी प्रवृत्ती ही प्रकर्षाने दिसली, त्यांचं नर्मदा मैया वरचं प्रेम ही दिसलं, पण तो अनुभव आपण दमगढला

जाऊ तेव्हा सांगेन, आधी आता बाकानेर. तर लोकांच्या चेहऱ्यावर आम्हाला तणाव स्पष्ट जाणवत होता, आम्ही झपाझप पावलं टाकत २ तासात जवळ जवळ १२-१३ किमी चालून पुढे आलो. इथे दूर एक छोटीशी वस्ती दिसत होती. कल्याणपूरा असं या वस्तीचं नाव. ही वस्ती पूर्ण हिंदू वस्ती आणि बाकानेरपासून तशी लांब. इथे राहायाचं ठरवलं पण ठिकाण सापडेना. एक पन्नाशीच्या बाई दिसल्या, म्हणाल्या "हमारे घरमे रह सकते थे लेकीन काम शुरू है, तो जगह नही है पर भोजन कर ही सकते है.. रहने के लिये आप शिवमंदिर चले जाओ" . आम्ही शिवमंदिरात गेलो.

तिथे लालपुरी बाबा म्हणून एक साधू महाराज असतात. अगदी म्हातारेसे. त्यांच्याकडे एकच खोली. एक लहानसं हनुमान मंदिर आणि एक शिव मंदिर. आम्ही तिथे गेलो तेव्हा त्या बाबांनी आम्हाला बाहेर आसन लावायला सांगितलं. आपापला स्वयंपाक करून घ्या असं सांगितलं मात्र ते स्वयंपाकाच्या मदतीला आलेच. इथे चूल बाहेरच आहे. एक टाकी आहे आणि भांडे कुंडे ठेवायची जागा ही बाहेरच आहे. टाकी खाली एक मोठा टब ठेवलाय तिथे असतात सगळी भांडी. टाकीलाच लागून खाली दोन कप्पे केले आहेत तिथे किराण्याचं सामान असतं. असं मस्त हवेशीर स्वयंपाक घर होतं यांचं, खूप आवडलं मला. पावसात मात्र ते काय करतात ते काही माहित नाही, मी विचारलं पण नाही. मला इथे एक रात्र काय ती घालवायची होती. असो.

तर स्वयंपाक पाणी, जेवणं झाली. साधू बाबांनी रामचरित मानस चं बाल कांड वाचून समजावून सांगितलं. रात्री चे साडेबारा झाले होते. रामहृदय म्हणून आम्ही झोपणार होतो आता. आणि काय झालं माहितीये का? हे बाबा खूप अस्वस्थ वाटू लागले अचानक. आम्हाला वाटलं म्हातारे आहेत, थकले असतील, म्हणून त्यांना आराम करू देऊ आणि आपण पण आराम करू असं म्हणत आम्ही बाहेर आलो. त्यानंतरही साधू बाबांच्या खोलीतला लाईट बराच वेळ सुरूच होता. मलाही नीट झोप येत नव्हती. बाबाही तसा जागाच होता. आणि लाल पुरी बाबा

खोलीतून बाहेर आले. त्यांनी आमच्याच बाजूला आसन लावलं. मी विचारलं त्यांना "क्या हुआ बाबा? भीतर क्यू नही सोये? बाहर क्यू आ गये इतनी थंडी मे?" तर त्यांनी माझ्या प्रश्नाचं उत्तर दिलच नाही.

ते उठून बसले, ते पाहून मी पण उठून बसली. ते उठून माझ्या जवळ आले, माझ्या डोक्यावर हात ठेवला. त्यांच्या डोळ्यात माझ्यासाठी खूप प्रेम होतं आणि ते जे काही आता बोलले ते ऐकून माझ्या अंगावर काटाही आला आणि माझ्या आत, खूप खोलात काहीतरी हलतंय असं मला जाणवू लागलं. माझा माझ्या कानांवर विश्वास बसेना, पण माझे डोळे मला जे दाखवत होते ते मला जास्त पटत होतं. लाल पुरी बाबांना जे बोलायचं होतं ते बोलून ते पुन्हा आपल्या जागेवर जाऊन झोपलेसुद्धा मात्र मी नंतर कितीतरी वेळ तशीच तिथेच बसून राहिले. कारणही तसंच होतं. सांगते.

तुम्हाला आठवतंय का? अनुभव मालिकेच्या अकराव्या भागात मी तुम्हाला एका संन्यास्याबद्दल सांगितलं होतं ते? खलघाटला मला एक राजबिंडा सन्यासी भेटला होता, आठवतंय का? खलघाटला झालेला संवाद मी तुम्हाला पुन्हा एकदा सांगते म्हणजे तुमची लिंक लागेल नीट.

मी खलघाटला जातानाची गोष्ट आहे बघा. "अभी कितना दूर है खल घाट" असं विचारल्यावर तो थांबला, म्हणाला, "माई आपण फक्त चालत राहायचं असतं, बाकी विचार करायचा नसतो" , मग मझ्याकडे पाहून म्हणाला, प्रश्न पडतात तुम्हाला, पण विचारत नाही तुम्ही..चांगलय, आपल्या प्रश्नांची उत्तरं आपल्यालाच शोधायला लागतात… .आता तुमच्या मनात जे प्रश्न आहेत ते सुटतील लवकर… फ़क्त एक करा, राम सोडू नका." आणि झपाझप पावलं टाकत तो पुढे निघून गेला.

पुढे खलघाट आश्रमात भोजन प्रसादी झाल्यावर मी राम मंदिरा समोरा बसली होती तेव्हा तो संन्यासी तिथे आला, त्या राम मूर्तीकडे बोट दाखवलं आणि म्हणला… . "राम… …

.राम राम मैया जी… ” असं म्हणत तो संन्यासी निघून गेला, आणि मी त्या पाठमोऱ्या संन्याशाकडे बघत राहीले… तो आपल्या खोलीत निघून गेला आणि मग माझी नजर त्या संन्याशाने दाखवलेल्या रामाच्या मुर्तीवर स्थीर झाली. भान आलं तेव्हा १२ वाजले होते… आठवतंय हे बोलणं? मला एकदम हाच प्रसंग आठवला, कारण लाल पुरी बाबा माझ्या डोक्यावर हात ठेवून हेच म्हणाले होते *“बेटा, राम को कभी मत छोडना, उनको कभी दूर मत रखना” .. तेच शब्द, फक्त भाषा वेगळी*. खलघाट चा तो राजबिंडा संन्यासी मराठीतून बोलला आणि हे लाल पुरी महाराज हिंदीतून. *असं कसं कुणी दोन संन्यासी वेगवेगळ्या ठिकाणाचे, मला एकच संदेश देतात? आणि शब्दश: सारखाच? आणि सांगू, दोन नाही, तीन संन्यासी.. पुढे मांडूला ही हाच प्रकार घडला, हाच संदेश मिळाला.. ह्याच शब्दात! असे शब्द अन शब्द कसे एकसारखे राहू शकतात?* याचा ही उलगडा महेश्वरला झाला, उलगडा नाही म्हणता येणार, पण संदेश समजवल्या गेला काहीसा, असं म्हणू, पण ते मी आत्ता नाहीच सांगणारे, कारण अजून इथेच म्हणजे कल्याणपुराचा एक अजून अनुभव बाकी आहे. सांगते

तर “राम को मत छोडना” असं म्हणून ते बाबा आपल्या जागेवर जाऊन झोपले, आणि मी मात्र बराच वेळ तिथेच, होती तशीच बसून राहिले.

माझ्या मनात काय सुरु होतं त्यावेळी हे काही आता आठवत नाही. बऱ्याच वेळाने मी आडवी झाले, स्लीपिंग बॅग मध्ये शिरले, पडून राहिले पण झोप काही लागेना. तरी साधारण रात्रीचे अडीच तरी वाजले असतील, माझं सगळं मन त्या लाल पुरी महाराजांकडे होतं, त्यांच्या डोळ्यातलं प्रेम, आस्था आणि आपुलकीचे भाव आणि कळकळ मला आठवत होती. मी लालपुरी बाबांकडे पाहिलं. कृष शरीर यष्टीचा हा म्हातारा साधू अंगावर एक चादर घेऊन होता फक्त, कडाक्याच्या थंडीत! कुडकुडत होता अक्षरशः आणि मी मात्र उबदार स्लीपिंग बॅग मध्ये लोळत पडले होते. मला माझी लाज वाटत होती, पण थंडीमुळे बाहेर पडायची हिम्मत होईना. मात्र एक क्षण असा आला की माझ्या थंडी पेक्षा माझी लाज मोठी होऊन गेली. मी

स्लीपिंग बॅग च्या बाहेर आले, स्लीपिंग बॅग घेतेली आणि लाल पुरी महाराजांजवळ गेले, “महाराज जी, आपको बहोत सर्दी लग रही है, आप को ये मेरी स्लीपिंग बॅग दू क्या? ये मेरी ओढी हुई है पर इसके इलावा मेरे पास और कुछ नही है, मै यही आपको दे सकती हू” ते म्हणाले “ दे दो बेटी, अब इस बूढे शरीर को सच मे जरुरत है” . मी त्यांना त्या बॅग मध्ये कसं जायचं ते सांगितलं आणि त्या बॅग मध्ये शिरल्यावर त्यांना झोप पण लागली. उत्तर रात्रीचे काही तास मला थंडीत घाललावे लागले पण त्या म्हाताऱ्या साधूला शांततेनी झोपलेलं पाहून त्या थंडीला ही मला फार त्रास द्यावासा वाटला नसेल!

सकाळी बाबा उठल्यावर त्याला रात्रीचा हा प्रकार समजला आणि तो म्हणाला “ तू चांगलंच काम केलं गं पण आता आज आणि पुढच्या रात्री तू काय करणारेस? तुझ्या जवळ काहीही नाहीये, मी तुला एक चादर देईनही पण त्यानी भागणार आहे का?” खरं तर त्याच्या प्रश्नाचं उत्तर माझ्याकडे ही नव्हतं, आणि माझ्या मनाला हा प्रश्न शिवला पण नाही. “बघू” , असं एका शब्दात उत्तर देऊन हा विषय इथेच थांबला. बालाभोग करून, लाल पुरी बाबांचा निरोप घेऊन आणि “राम को मत छोडना” हा संदेश मनाशी पक्का करून मी पुढे निघाले. जेम तेम ३ ते ४ किमी अंतर पार करून झालं असेल नसेल, म्हणजे लाल पुरी महाराजांच्या आश्रमातून निघून जेम तेम तास भर झाला असेल नसेल तोच एक असा काही विलक्षण अनुभव आला की आजही आठवलं की शहारून यायला होतं. मैया आपल्या बरोबर चालत असते आणि ती सर्वज्ञ आहे हे माहित असूनही ती जे अनुभव देते ते त्या वेळी तिच्या कुशीत शिरून समर्पण करायलाच भाग पाडतात. आपण परिक्रमा करत रहावी आणि तिच्या लीला बघत राहाव्या, बस, बाकी काही काही नको असं आणि फक्त असंच वाटू शकतं. मला जो अनुभव आला तेव्हा माझ्या समोर एक व्यक्ती येऊन उभी राहिली, आणि त्या व्यक्ती नी जे केलं, आणि जे बोललं ते पाहून मी उभ्या जागी मटकन खालीच बसले! आनंदाने रडावं की आश्चर्याने रडावं हेच कळेना. मात्र त्यावेळी माझ्या समोर उभी असलेली व्यक्ती अजिबात गोंधळलेली नव्हती आणि मी मात्र अजिबात भानावर नव्हते. कसं? कसं कळतं तिला? अगदी नेमकं? मला मात्र

काहीच कळत नव्हतं… पण तुम्हाला जेव्हा हे कळेल तेव्हा तुमची अवस्था माझ्यापेक्षा वेगळी नसणार हे निश्चित! मी जशी मटकन खाली बसले ना, तसाच काहीसं तुम्हालाही होणारे. सांगणार आहे मी तुम्हाला सगळं, अगदी एकूण एक सविस्तर.पण पुढच्या म्हणजे ४६ व्या भागात.

नर्मदा परिक्रमा – एक विलक्षण अनुभूती- भाग ४६*

*नर्मदे हर.*

तर मागच्या भागात मी सांगत होते लाल पुरी बाबांच्या कडून बाहेर पडल्यावरचा अनुभव. मी स्लीपिंग बॅग लाल पुरी महाजांना दिली होती आणि आता माझ्याजवळ पांघरायला काहीही नव्हतं. आम्ही बाहेर निघालो आणि थोड्याच वेळात एक माणूस माझ्या पुढे येऊन उभा राहिला… तो जे काही बोलला ते ऐकून मी रडूच लागले, मटकन खालीच बसले असं मी तुम्हाला मागच्या भागात सांगितलं होत, तर असं काय झालं होतं ते आता सांगते. तर आम्ही निघालो, वाटेत एक कार आम्हाला बघून थांबली. एक पन्नास पंचावन वयाचा माणूस खाली उतरला. नर्मदे हर झालं, आणि त्याने मला प्रश्न केला "मैयाजी, मुझे आपको कुछ देना है, आप ले कर जाओगे क्या?" परिक्रमावासीयांची सेवा म्हणून बहुतेकदा लोक शिधा देतात. मागे एकदा एका भाविकाने मला खूप शिधा दिला होता त्यात २ किलो तांदूळ, एक किलो डाळ, तेल मीठ मसाले, असं सगळं दिलं आणि आमच्या सामानासोबत ते वाहून नेणं आम्हाला कठीण होऊ लागलं होतं, म्हणून तो अनुभव गाठीशी ठेवूनच मी उत्तर दिलं "बाबा जी, आपको मना नही करेंगे लेकीन ऐसा कुछ मत दिजीयेगा जो हमे लेकर जाने मे भारी हो जाये, बाकी आपकी श्रद्धा का सम्मान तो हमे करना ही है" त्याने पण लगेच सांगितलं की जे काही तो मला देणार आहे ते अगदी हलकं आहे आणि आमच्या कामात पडणार आहे. तो म्हणाला, " नही मैयाजी, एकदम हलका है और आपको जरूर काम आयेगा, बस एक बात है, बाबाजी के लिये नाही है, सिर्फ आपके लिये है, बाबाजी को हम चाय पिलायेंगे लेकीन जो देंगे वो तो आपकेही काम की चीज है, उसे आप ही रखीयेगा" . मनात विचार केला असं काय देणारे बाबा हा? बघू, " ठीक बाबा जी, दे दो" … .. त्यांनी मला काय द्यावं हो? विश्वासच बसणार

नाहीये तुमचा… आणि हे ऐकून माझी अवस्था काय झाली असेल याची तुम्ही कल्पना करू शकता… सांगते.. तो माणूस कार पाशी गेला, एक पांढऱ्या रंगाची चांगली मोठी प्लास्टिकची पिशवी घेऊन आला आणि म्हणाला " मैयाजी दो कम्बल है, हलकी है बोहोत, लेडीज वाली है और ल्म्बाई थोडी कम है, पार आपको आ जायेगी, बाबा जी को छोटी हो जायेगी. आप लोगे तो मन को शांती मिल जायेगी" ... मी आताच लाल पुरी बाबांच्या आश्रमातून निघाले होते, माझी स्लीपिंग बॅग त्यांना देऊन.. आणि तासाभरातच कसा काय माणूस भेटावा माला, ते ही दोन फ्लीस ब्लँकेट्स घेऊन.. आणि ते ही फक्त माझ्यासाठी?... मी ती पिशवी हातात घेतली आणि मटकन खालीच बसले, रडूच लागले. कसं? कसं तिला कळतं मला कशाची गरज आहे ते? कसा हा माणूस अगदी आजच मला भेटावा? याच्या जवळ माझ्या गरजेचीच गोष्ट नेमकी कशी असावी? नेमकी माझ्याच गरजेची? मी आणि बाबा दोघं ही होतो तिथे, पण बाबाला द्यायला ह्याच्याजवळ काही नव्हतं आणि मला देण्यासाठी होतं, तेच जे मला प्रवासात लागणारे!!

मी शांत झाले आणि ठरवलं, विचारायचं याला, कुणी सांगितलं रे बाबा तुला जा आणि हिला मदत कर म्हणून? असा कसा आलास तू अगदी देवासारखा माझ्या गरजेची वस्तू घेऊन?... विचारलं मी, तर म्हणाला, "घर के लिये लेकर जा रहा था, आपको दूर से ही देख लिया था, अचानक खयाल आया, आप परिक्रमावासी काफी कष्ट उठाते हो, सोचा आपके पास ओढने के लिये कूछ होगा भी या नही? आपको देखा मैने मैया जी और मन किया बस, ये तो आपको ही देना चाहिये, फिर क्या एक बार आपको देने का खयाल मन मे आया तो अब तो आपको देना ही था, घर के लिये और ले लुंगा बाद मे." त्याचं हे बोलणं ऐकून मी तर निःशब्द झाले होते… हे सगळं कसं होतं ते कधीच समजत नाही आपल्याला, आणि हे असं होतं हे ती दाखवत जाते, नेहमीच… आम्ही पुढे निघालो.

खरं आता लुनेरला थांबून आराम करावा असं वाटत होतं पण देव जाणे तिथे थांबायची इच्छाच झाली नाही. वेळही होता, पुढे निघालो तर सगळा शेतातला रस्ता. पाणी मागायला देखील कुणी नाही. आधी लुनेरपर्यंत आणि नंतर पुढे १२ किमी चालून झालं होतं आणि आता थकवा आला होता, भूकही लागली होती. संध्याकाळ असल्यामुळे शेतांमध्ये ही कुणी नाही, मात्र दूर हायवे चा आवाज येत होता. रस्त्यात मात्र मैयांनी आमची सोय केलीच. इतक्या मोठ्या परिसरात फक्त एक झोपडी आम्हाला दिसली. तिथे पाणी मागितलं, मैयाजींनी पाणी आणि सोबत ताक ही आणलं. ताक म्हणजे माझ्यासाठी अमृत आहे माहितीये का? खूप आवडतं मला.. अगदी मी ताकावर जगू शकेन, इतकं.. आणि अश्या थकलेल्या वेळी ते मला नं मागता मिळत गेलय ! असो, तर माझी पाण्याची तहान चक्क ताकावर शमवण्यात आली. इथे नं अजून एक गम्मत झाली. "दाने दाने पे लिखा होता है खाने वाले का नाम "हे आपण नेहमीच म्हणतो नं? ते इथे इतकं सत्य होतं माहितीये का? इथे, या झोपडीत, म्हणजे बालीपुरा गाव बरं का हे, तर या मैयांनी कणकेचे मोठाले लाडू पण आम्हाला दिले, आणि सोबत एक लाडू एका पिशवीत भरून दिला. म्हणाली, " मैया जी, अभी थोडी देर पहले यहाँ से एक परिक्रमावासी बाबा भी आगे निकल गये है, ज्यादा दूर नही गये होंगे, आप तेज चलते हो, पकड लेना उन्हे, और ये लड्डू उनको दे देना" ठीके, देईन मी.. असं म्हणत निरोप घेतला आणि निघालो. आता एकच ध्यास होता. हा लाडू ज्याच्या नावे लिहिला होता त्याला पोहोचवणे. कसं असतं नं, त्या वेळी मला अजून काही दिसत नव्हतं, माझ्या नजरेसमोर फक्त तो भुकेला परिक्रमा वासी येत होता, ज्याच्या नशिबात हा लाडू लिहिला होता. आणि मैयाची इच्छा होती ती, एक म्हातारा संन्यासी एका झाडाखाली बसलेला दिसला. बालीपुरा मधल्या झोपडी वाल्या मैयांनी वर्णन केला तसाच … नर्मदे हर झालं, आणि मी त्याला त्याच्या नावाचा लाडू दिला. सांगितलं, मागे जी झोपडी लागली नं, त्या मैयांनी तुम्हाला बघितलं होतं, म्हणून तुमच्या साठी पाठवलाय. तर तो संन्यासी काय म्हणतो, "मुझे तो कोई झोपडी दिखी ही नही, आप अपने खाने मे से मुझे दे रहे हो, मेरे लिये तो आप ही मैयाजी हो" असं म्हणत त्यांनी मला नमस्कार केला… .. काय ही किमया

तिची, जिथे आम्ही थांबलो ताक घेतलं, लाडू खाल्ले, त्याच रस्त्याने हा संन्यासी पण आला होता खरं. पण याला कशी काय नाही दिसली झोपडी? आणि त्या मैयांनी जर या संन्याश्याला पाहिलं होतं तर तेव्हाच थांबवून का नाही दिला लाडू? पाहिलं तर होतं कारण झोपडीतल्या मैया ने या संन्याश्याचं अगदी तंतोतंत वर्णन केलं होतं.. ह्या मैयाचं नं काही काळात नाही. मी मात्र फार आनंदात होते कारण काही का असेना लाडू त्याच्यापर्यंत पोहोचवण्यात माझ्या या देहाचा, आत्म्याचा थोडाफार सहभाग झाला हेच माझं भाग्य. तिच्या भक्तांची सेवा करण्यात केवढा आनंद आहे खरंच… खरं तर सेवा ही नाही म्हणता येणार याला, एक लाडू पोहचवणे काही सेवा झाली का? पण तो लाडू खाताना त्या थकलेल्या जीवाच्या चेहऱ्यावरचा आनंद जितका मौल्यवान आहे नं तितकं काही काही नाही. सहज विषय निघतोय म्हणून सांगते, मला अनेकदा लोक म्हणतात, काय मिळतं गं तुला असं भटकून… मी ही सांगते गमतीत.. जे तुम्हाला नाही मिळत ना ते.. पण गमतीचा भाग बाजूला ठेवून विचार केला तर समजतं, हे जे काही मला मिळतंय न त्याची तुलना कशाशी ही होऊ शकत नाही आणि भौतिक जगात सर्वोच्च स्थान घेतलेल्या आणि अत्यावश्यक असलेल्या “पैसा” नामक क्षणभंगुर वस्तू शी तर अजिबात होऊ शकत नाही. कारण पैशाने सर्व विकत घेता येईलही, पण समाधान आणि आत्मशोध हा विकत घेता येणार नाही. आता आत्मशोध मी घेतलाय का हे विचाराल तर मी म्हणेन तो प्रत्येकाचा वेगळा आहे. मला तो काव्यात, लिखाणात, परिक्रमेत मिळेल, तर अजून कुणाला तो कलेत, स्वयंपाक करण्यात मिळेल… हवा असतो तो फक्त एक साक्षात्कार. मला तो माझ्या मैयाकडे मिळाला आणि म्हणून आज मी सर्वसुखी व्यक्ती आहे.. “जगी सर्व सुखी असे कोण आहे, विचारी मना तूची शोधून पाहे” याचं उत्तर मला माझ्यात सापडतं, मी जगात सर्वसुखी आहे हे म्हणण्याचे अनुभव मला माझ्या मैयांनी दिलेत… असो..

पुढचा मुक्काम आमचा रामधामला होता. तिथून पुढे आमची बी जे पी चे मंडलाध्यक्ष श्री श्रीमाली यांची भेट झाली, त्यांची ही बरीच मदत झाली. त्यापुढचा मुक्काम छीतरीला झाला, अगदी उघड्यावर.. आणि मग मांडूला पुन्हा एकदा अनेक अनुभव आले… मागच्या भागांमध्ये

सांगितलेले दोन संन्यासी आठवतात नं? “राम को मत छोडना” सांगणारे? एक खलघाट चा राजबिंडा संन्यासी, आणि एक लाल पुरी बाबा. ज्यांना मी स्लीपिंग बॅग दिली..आता तिसरा संन्यासी काय म्हणाले ते सांगणारे, आणि हो शेंगदाणे खाता खाता आमच्या हातात चांगले किलोभर रसरशीत टपोरे बदाम येऊन पडलेत माहितीये? कसे?..सांगणारे, आणि गम्मत सांगते, मंडू उतरलो नं तेव्हा बगवानिया हून कुणीतरी खास आम्हाला घ्यायला आलेलं.. कोण? अहं, ह्या सगळ्या प्रश्नांची उत्तरं देणारे मी पण ४७ व्या भागात.

नर्मदा परिक्रमा – एक विलक्षण अनुभूती- भाग ४७*

*नर्मदे हर.*

छीतरीला उघड्यावरचा मुक्काम झाला असं मी मागच्या भागात सांगितलं. तिथे बांधकाम अजून सुरूच होतं. नाही म्हणायला डोक्यावर छत होतं पण वारा अडवायला म्हणून काही नाही. सोसाट्याचा वारा आणि जानेवारी महिना. आम्ही हळू हळू जंगलाकडे जात होतो. तिथे त्या संध्याकाळी कोल्ह्यांची फौज बघितली आम्ही. बरीच दूर होती पण रात्री ती जवळपास वावरू शकतात याची खात्री पटली होती, आणि आज आम्हाला दारं किंवा भिंती नावाचा प्रकारच मिळाला नव्हता. आम्ही जिथे झोपलो होतो तिथून समोर आणि उंचावर दिसत होतं मंडू, म्हणजेच मांडवगड. राणी रुपमतीचं राज्य! आणि हा भला मोठा पहाड आम्हाला चढून जायचा होता.रात्री श्रीमाली साहेब आम्हाला स्वत: भेटायला आले आणि त्यांनी बराच खाऊ आमच्यासाठी आणला. आमचा सगळ्यांचा बालाभोग होईल इतका. दुसऱ्या दिवशी सकाळी आम्ही मांडू साठी निघालो. भला मोठा घाटाचा रस्ता मजल दर मजल करत पार करेस्तोवर आम्हाला दुपारचे दोन वाजलेत. घाट चढून वर आलो ते निळकंठ महादेवाचं अतिप्राचीन मंदिर दिसलं. बऱ्याच पायाऱ्या खाली उतरून पाण्याच्या झाऱ्याखाली असलेल्या या मंदिरात गेलो तो सगळा थकवाच नाहीसा झाला. तिथे एक तरुण संन्यासी रामायण वाचत बसला होता. येणारे जाणारे त्या संन्याश्याला नमस्कार करून जात होते. तिथे एक अखंड जल कोष आहे, त्यातलं पाणी कितीही दा काढून घ्या, ते संपतच नाही.. ते पाणी पिऊन मी या संन्यासी महाराजांच्या समोर बसले. इतर लोकांसारखी मला अजिबात घाई नव्हती, किंबहुना या मंदिराची रचना आणि याचं राजकीय महत्त्व, तसंच हा जलकोष आणि याच रहस्य मला माहित करून घ्यायचं होतं आणि अजूनही एक महत्वाची गोष्ट होती. ती म्हणजे या संन्याश्याच्या डोळ्यातले रामायण

वाचाताचे भाव मला तिथून पुढे जाऊ देत नव्हते. एक एक शब्द आणि ते उच्चारताना त्यांच्या डोळ्यातलं प्रेम इतकं विलोभनीय होतं की ज्याला ते दिसेल तो पुढे जाउच शकणार नाही.

मला बसलेलं पाहून त्या सन्याश्याने हातानेच "थांबा" अशी खुण केली आणि आम्ही थांबलो. त्याचं वाचन झालं तोवर अजून अर्धा तास तरी झाला असेल. नर्मदे हर झालं. चौकश्या झाल्या आणि मग त्याने आम्हाला मागच्या बाजूला नेलं. तिथे त्यांची खोली होती. चहा झाला, भोजन प्रसादी चा आग्रह झाला, पण त्यांना आमच्यासाठी वेगळी प्रसादी तयार करावी लागेल म्हणून आम्ही नको असं सांगितलं तर जवळ जवळ किलोभर द्राक्ष आणि डझनभर संत्री आमच्या पुढ्यात आणून ठेवली. खूप सत्संग झाला. ते महाराज म्हणाले "लोग चले जा रहे थे, लेकीन आप तो बैठ ही गये? ऐसा क्यू?" मी पण जे होतं ते सांगितलं, "आप जिस प्रेम से रामायण पाठ कर रहे थे वह सुनकर और देखकर रुकने का मन किया इसलिये रुक गये" ते म्हणाले "मै तो रोज ही ऐसे ही रामायण पाठ करता हू. कितने ही परिक्रमावासी आते है, दर्शन कर के चाले जाते है, आप मे कोई तो बात होगी जो आप रुक गये, इसे समझने की कोशिश नही करोगी आप?" मी काय कोशिश करणार? मला पामराला काय समजणार? मी म्हटल "आप ही बताइये" … मी विचारण्याचीच देरी की काय, महाराज बोलू लागले. "माताजी सब कूछ जो केवल संयोग लगता है वो संयोग नही होता, उस हर क्रिया के पिछे संदेश होते है. आप को यहा रुक कर रामायण सुनने मे भी संदेश है, शायद पहले से कोई इशारा आपको मिल चुका है, और मेरे जरीये आप को याद दिलाया जा रहा है" म्हणजे मला काहीतरी संदेश मिळालाय आधीच आणि आता त्याची पुन्हा आठवण हे संन्यासी करून देणार, असं हे म्हणत होते आणि तरी मला समजत नव्हतं, की नक्की त्यांना मला काय सांगायचंय, कसली आठवण करून द्यायचीये.. मी विचारात मग्न झालेले पाहून ते मला म्हणाले "अरे माताजी कहां खो गये आप? इधर उधर खोने से कोई मतलब नही, आप को तो वही खोना है जहा पे आप बैठ कर हमे सुन रही थी. जिस प्रेम के साथ हम रामायण पढ रहे थे, उसी प्रेम से तुम रामायण सुन रही थी ना? जैसे तुमने मुझे देखा था वैसे ही मैने भी तुम्हे देखा

था. हम दोनो मे दो चीजे बिलकुल एक सी थी, एक प्रेम और दुसरा राम. प्रेम की तो कोई कमी मुझे आप मे नही दिखती, क्युं की आप मा हो *लेकीन आपको राम से दूर नही होना है.. उन्हे कभी नही छोडना*"

त्या संन्यास्याचं हे वाक्य ऐकून माझ्या अंगावर काटा आला आणि कालचक्र फिरावं तसं झालं. मला एकदम आठवला तो खलघाट चा राजबिंडा सन्यासी, आणि त्यांनी मला दिलेला संदेश, भाग ११ मध्ये मी सांगितलय बघा या बद्दल. या संन्याश्या कडून मी ऐकलेलं पाहिलं वाक्य होतं "फक्त एक करा, राम सोडू नका" … राम, राम राम मैयाजी असं म्हणत तो त्याच्या खोलीत निघून गेल्या नंतर मी रात्री बारापर्यंत रामाच्या मूर्ती समोर बेभान होऊन बसले होते … तो, रामाची जाणीव करून देणारा पहिला संन्यासी… दुसरा संन्यासी म्हणजे अभिराम दास त्यागी महाराज, रामानंद आश्रमातले, २८ व्या भागात मी यांच्या बदल लिहिले आहे मग लाल पुरी महाराज, हेच वाक्य फक्त हिंदीतून सांगणारे आणि राम हृदय वाचून

दाखवणारे… आणि आता हा चौथा.. पुन्हा तेच वाक्य, अगदी तेच शब्द मला चवथ्यांदा सांगत होता हा.. "राम को मत छोडना… " वरून पुन्हा आधी मिळालेल्या संदेशांची आठवण ही करून देत होता… कसं शक्य आहे? चार वेगवेगळे संन्यासी, चार वेगवेगळ्या ठिकाणी माझ्याशी बोलतात, मात्र एकच वाक्य, अगदी शब्दशः सारखं वाक्य मला सांगतात… कसं शक्य आहे? आणि राम सोडायचा नाही म्हणजे नक्की काय करायचं? त्याचं उत्तर काही सापडेना, पण हो, रामायण वाचा, जसं जमेल तसं, एकदा तरी पूर्ण, आणि शक्य असल्यास ११ दा पूर्ण , असं मला ह्या संन्यास्यानी सांगितलं आहे.. अजून माझं पूर्ण वाचून झालं नाहीये पण त्यात माझ्या सगळ्या प्रश्नांची उत्तर असणारेत असं ही हे सन्यासी म्हणाले.. मी निर्बुद्ध आहे, जेवढं स्पष्ट सांगितलं तेवढच समजलंय मला, पण त्या मैयांनी जेव्हा चारदा मला एकच संदेश वेगवेगळ्या संन्याश्यान करवी दिलाय त्या अर्थी त्यात काहीतरी नक्की आहे इतकच मला समजतंय.

तिथून पुढे मंडू चं निसर्ग सौंदर्य बघत बघत मुक्कामी पोचलो, भोजन प्रसादी आदी झाली आणि झोपी गेलो. दुसऱ्या दिवशी पुन्हा पुढचा प्रवास सुरु. आज सकाळी लवकर निघालो खरं पण बालभोग काही झाला नव्हता. वाटलं वाटेत काही तरी खाऊ पण इच्छाच झाली नाही. बरच अंतर चालत आलो, आणि मग एका झाडाखाली बसलो. आमच्या जवळ शेंगदाणे होते. पावभर शेंगदाणे ठेवायचे कुठे म्हणून मी ते रात्रीच पाण्याच्या बाटलीत ठेवले होते, म्हटल भिजवून सकाळी खाऊयात, तर तेच खात आम्ही झाडाखाली बसलो होतो. ते भिजवलेले दाणे खाता खाता मला नं बदामांची आठवण आली. मी बाबाला म्हणाले "दाण्या ऐवजी बदाम असते तर किती मजा आली असती नाही?" बाबा ही म्हणाला मला "बेटा हे गरीबांचे बदामच आहेत, खा आता" ..

आम्ही असं बोलत असतानाच आमच्या समोरून एक पांढऱ्या रंगाची कार गेली बरं का. त्यात बसलेली बाई खूपच सुरेख होती दिसायला. गोरी पान, लांब केस, पांढरी साडी, कुणाचं ही लक्ष वेधून घेईल अशी.. मी तिच्याकडे बघत होते आणि कार पुढे निघून गेली… आणि गम्मत माहितीये का, थोडं पुढे जाऊन ती कार थांबली, बाई खाली उतरली, डिकी उघडून एक पिशवी घेतली तिनी आणि आमच्या दिशेला येऊ लागली.. मी लगेच बाबाला म्हटलं " ए बाबा, ती खाऊ घेऊन येतेय का रे आपल्यासाठी, किती सुंदर आहे नं ती?" भूक लागली असल्यामुळे असेल, मला तर खाउच असेल असं वाटलं. ती आली, " मैने अगर कोई खाने की चीज दीयी तो लोगे आप?" खूप आनंदाने मी लगेच हो म्हणून सांगितलं, आणि ती पिशवी तिनी माझ्या हाती दिली. आमच्यातले दाणे पण खाल्ले तिनी, म्हणाली "मै राखी व्यास, रतलाम से हु, घुमने आई हु, इसमे रतलाम की सेव है, सोचा आपको पसंद आयेगी" … वावा तिखट शेव होती त्यात… ती बाई आमचा निरोप घेऊन गेली आणि लागलीच मी शेवेची पिशवी बाहेर काढली, पण हे काय, खाली अजून एक पिशवी होती, ती कशाची आहे हे बघण्यासाठी मी ती दुसरी पिशवी ही बाहेर काढली आणि बघते तर काय, चांगले एक किलो बदाम होते त्यात… . अहो आत्ता दाणे खाताना मी बदामाची आठवण काढली होती नं, अगदी १५

मिनिटापूर्वी… . आणि मिळाले होते मला बदाम! मला माझीच लाज वाटू लागली… किती? किती मागतेय मी मैयाला, आणि तीसुद्धा देतेय नुसती… काय हे?.. पण माणूसपणात अडकून आहोत आपण.. किती समजलं, कळलं तरी वळत नाहीच… . " आई आता मला कसलीच इच्छा होऊ देऊ नको, हे ही मी मागितलंच तिला!..

पुढे गेलो तो अनेक परीक्रमावासियांची भेट झाली. हा चढलेला पहाड आता उतरायचा होता. कठीणच होता तसा. उतरताना गुडघे जातात अगदी असं ऐकलं होतं. पण जायचं तर होतं. आम्ही निघालो. थोडं अंतर उतरून होत नाही तर दोन लहान लहान मुलं बसलेली दिसलीत. लहान मुलं दिसालीत नं की माझ्यातली शिक्षिकाच जागी होते.. " क्या नाम है बेटा? कहां राहते हो? स्कूल जाते हो? माझे प्रश्न सुरु झाले.. त्यांनी ही उत्तरं दिली. ते बगवानिया चे, म्हणजे उतरल्या उतरल्या लागतं ते गाव, मांडू च्या पायथ्याचं. " यहा क्या कर रहे हो? माझे प्रश्न पुन्हा सुरु झाले, त्यावर त्यातला एक म्हणाला, बकरी चराने आया हु, तर दुसरा त्याला म्हणतो "ए तुम झूठ क्यू बोला, तेरे पास बकरी नही है? मग मी पुन्हा विचारलं, किसालीये आये हो बेटा, अपने दोस्त के साथ आये हो क्या? तर तो चटकन म्हणतो "तुमको लेने आया हू, धीरे धीरे मत चलो, मेरे पिछे चलो" … मला गंमतच वाटली त्याची, पण खाली उतरल्यावर समजलं, तो खरंच आम्हाला घ्यायला आला होता. त्याच्या आईनी सांगितलं होतं, परिक्रमावासी को ले आना.. आमच्यासाठी त्याच्या घरी भोजन प्रसादी तयार होती. आणि गम्मत सांगू का, हा भला मोठा पहाड आम्ही फक्त १ तास १० मिनिटात उतरलो होतो.. काहीही त्रासाविना!आता तो कोण होता? का त्याच्या आईनी आम्हाला घेऊन ये असं सांगितलं? आम्हीच कसे काय, इतरांना तो का घेऊन गेला नाही, ते काही काही माहित नाही.. आज दिवस भरात आलेल्या अनुभवांनी मी सुन्न झाले होते, माझ्या मनानी विचार करणं थांबवून दिलं होतं, आणि तेच कदाचित आवश्यकही होतं. कारण पुढे जे काही वाढून ठेवलं होतं अजूनच वेगळं होतं. माझ्या आयुष्याची दिशा बदलली ती महेश्वरपासून… इथे माझी भेट "साक्षी" शी झाली.. भेट काय,

मीच झाले साक्षी, असं म्हणा हवं तर! आम्ही धामानोद च्या आधी मुक्काम केला आणि महेश्वरकडे निघालो. पण तिथे नेमकं काय झालं? कसं झालं याची कल्पना देते..

मी नागपूरची राहणारी हे मी तुम्हाला सांगितलंय… पण आता मी इंदोरला असते हे ही तुम्हाला माहितीये… मी इंदोरला कशी आली हे मात्र तुम्हाला माहित नाहीये… आणि याचं उत्तर आहे "अचानक" … मी ध्यानी मनी ही नसताना नागपूर सोडून दिलं… कायमचं सोडलं नागपूर, का? त्याचं उत्तर महेश्वर च्या अनुभवात आहे. असं काय घडलं महेश्वर ला? काय काय बदल झालेत माझ्या आयुष्यात? आणि ही साक्षी कोण? सांगते पण पुढच्या भागात.

नर्मदा परिक्रमा – एक विलक्षण अनुभूती- भाग ४८

नर्मदे हर

मागच्या भागात मी माझ्या आयुष्याची दिशा बदलली असं सांगितलं होतं. कुण्या साक्षीचा ही उल्लेख केला होता. ते सगळं आता या भागात सांगते. तर महेश्वरला पोहोचायला आम्हाला संध्याकाळ झाली. तिथल्या बाजारातून जाताना “श्री राधे ज्वेलर्स” म्हणून एका सराफा दुकानदाराने ने चहाला बोलावलं. त्यालाच विचारलं आम्ही, कुठल्या आश्रमात राहावं ते. आधी त्यांनी वेगळ्याच आश्रमाचा पत्ता दिला होता, पण मग आम्ही चालू लागल्यावर तो आमच्या मागे धावत आला “ आप तो जगन्नाथ धाम जाओ, वहा आपकी व्यवस्था करा दीई है ” असं सांगितलं. आपण काय परिक्रमावासी, एक रात्र थांबायचं न पुढे निघायचं, मग कुठेही थांबा..आम्ही जगन्नाथ धामला गेलो.

तिथे समोर जगन्नाथ मंदिर आहे आणि त्यासमोर संथ वाहणारी नर्मदा माई. प्रसन्न वातावरण. मी पायऱ्या चढून वर गेली तो एक अतिशय तेजस्वी आणि तरूण सन्यासी बसलेला होता. नर्मदे हर झालं, चौकशी झाली आणि अचानक नजर रोखून तो संन्यासी माझ्याकडे एकटक पाहू लागला. मला संकोचल्या सारखं झालं, मी नजर दुसरीकडे वळवली आणि आत निघून गेले. आत एक माताजी स्वयंपाक करत होत्या. चहा झाला, ते मघाचे सन्यासी ही आता आमच्या समोर येऊन बसले, पण आता ते एक टक बघत नव्हते. ते मला म्हणाले “साक्षी जी

आप को एक काम बताऊ?, उपर तीन सफेद चादरे रखी है, ले आओगे?” रस्ता विचारून मी वर गेले, तिथे तीन कपाटं होती, आणि एक लाकडी पेटी होती. मी काही हात लावला नाही त्या कपाटांना, ती पेटी उघडली, तीत चादरी होत्या, त्या घेऊन खाली गेले.

“अरे वा साक्षी, तुम ले आई चादरे?” ते म्हणाले.. मग मी त्यांना सांगितलं, माझं नाव साक्षी नाही सुरुचि आहे. तर म्हणाले यही तो समझाने की कोशिश कर रहा हू, तुमको साक्षी होना है. जब तुम आई थी तब हम तुम्हारे तरफ देख कर सोच रहे थे की शायद हम तुम्हे जानते है, या शायद इंस वास्तू से या इस स्थान से तुम्हारा कोई पुराना रिश्ता है.. और अब हमे पता चला है की हम सही सोच रहे है. हमने तो तुम्हे नही बताया था न की चादरे कहां रखी है, और तुम ले आई… कैसे?.. मी म्हंटल त्यांना, “ आपकी अल्मारीयोको बिना पूछे कैसे हाथ लगाती मै, इसलिये पेटी मे देखा, तो वहा चादरे मिल गयी” .. ते म्हणाले, “ पेटी भी तो मेरी ही है? उसे कैसे हाथ लगा लिया? तब नही लगा की स्वामीजी से पुछना चाहिये? क्युं की तुम्हे पता था की हो न हो चादरे और कही नही है, तुम तो अल्मारियो की तरफ गयी भी नही?.. है ना?”

असं झालं होतं खरं. मी त्या कपाटा जवळ फिरकली पण नव्हती. असेलही काही संबध … असेलही मी कुणी साक्षी.. पण तरी मला आठवत नाहीये, आणि माझा विश्वास पण बसेना.. आणि असं असलं जरी तरी या जन्मी मी सुरुचि आहे, मग मी साक्षी का बनायचं? तुम्हे साक्षी होना है याचा अर्थ काय? मी त्या स्वामीजीं ना विचारलं तर मोठ्यांदा हसू लागले. म्हणाले “मैने तुम्हे पुराने जनम की साक्षी होने को कब कहां? तुम तुम्हारा पुराना जनम छोड के आई हो, अब इस जनम में हो, तो इस जनम की बात करो. मैने तुम्हे इस जनम मे ही साक्षी होने को कहां है.. सामाझाता हू…

मला कळत नव्हतं तरी मी ऐकायचं ठरवलं, आणि मग हळू हळू कळू लागलं. “साक्षी होना” म्हणजे नक्की काय हे समजल्यावर मात्र खूप आनंद झाला. सांगते. ते स्वामीजी म्हणाले, तुमको हर चीज देखनी जरूर है, समझनी जरूर है, लेकीन उसपर तुम्हे प्रतिक्रिया

देनी नही है. तुम्हे जो भी करना है वह तुम्हारा कार्य है यही समझ के करना है…  तुम्हे द्रष्टा बनना है. चलो और आसान करके बताता हू. तुमने कभी फिल्म तो देखी होगी? उस फिल्म का तुम आनंद तो लेती हो, लेकीन क्या उसमे तुम्हारा सक्रीय सहभाग होता है? नही ना? तुम फिल्म देखती हो. कभी आनंद होता है, कभी दुख होता है, उसे वही छोडकर अपनी जिंदगी फिर से जीने लगती हो, उस आनंद या दुख को गले लगाकर नही रखती हो, क्युंकी वो सत्य नही है यह तुम्हे पता होता है. इसी प्रकार तुम्हारे आसपास होने वाली घटनाओ को तुम्हे फिल्म की तर्ह देखकर छोड देना है, उसे मन मे नही रखना है.

त्यांनी बोलावं आणि मी ऐकत बसावं असं मला वाटत होतं. साक्षी होणं म्हणजे काय हे शिकणं देखील मला आनंद देणारं होतं तर मग मुळात साक्षी होणं हे कितीतरी आनंद दायक असेल? आणि हे समजावताना हे स्वामीजी मला जे जे म्हणून उदाहरण देत होते ते अगदी रोजच्या जीवनातले असल्यामुळे समजण बरंच सहज होत होतं मला.  ते पुढे म्हणाले, “चलो एक और उदाहरण देता हू. कोई कोर्ट केस नजर के सामने लाओ. अब इस केस मे कोई एक गुनाहागार है, कोई पुछताछ कर रहा है, और किसी एक ने गुनाह होते हुये देखा है, और वह गवाही देने के लिये आया है. अब जो गवाही दे रहा है, उसने गुनाह किया नही है, ना ही उसका उस घटना से वास्तविकता मे कोई संबंध रहा है. ना ही उसके जीवन पर इस गुनाह का, उस गुन्हेगार का कोई प्रभाव पड रहा है, वो तो सिर्फ साक्ष दे रहा है की हा, ये घटना जब हुई थी तब मैने इसे होते हुये देखा था…  यही तो साक्ष है.. तुम्हे यही तो करना है. उस गवाही देने वाले की तरह सिर्फ देखना है.. सब कुछ… जैसे तुम वहा हो, पर उनका तुमपर कोई प्रभाव है ही नही, क्यू की वास्तविकता मे तुम तो तुम हो ही नही…  जैसे फिल्म मे तुम्हारा रोल नही है वैसे यहा भी नही है.

साक्षी को ना आरंभ है ना अंत है, वो तो चिरकाल है, वो तो बस है, वही तो बस सत्य है. बाकी जो चल रहा है, वो चलकर रुक जायेगा, साक्षी तो वही रहेगी. चलो एक और उदाहरण

देता हू. आईना तो तुम रोज देखती हो. अब बताओ, आईने ने कभी तुम्हारी जगह किसी और का प्रतिबिंब दिखाया है? कभी ऐसा हुआ है तुम निकल आई और प्रतिबिंब वही आईने मे रहा गया? नही न? आईना तुम्हे उतनाही दिखायेगा जितना है. तब तक ही दिखायेगा जब तक तुम उसके सामने खडी हो. जैसे ही तुम चली जाओगी, आईना फिरसे साफ, चमकिला सां हो जायेगा… वो कभी कोई बिंब पकड के नही रखेगा है ना?.. तुमको उस आईने जैसा होना है मेरे बच्चे.. एकदम चमकिला, साफ, शुद्ध… और केवल साक्षी..बनोगे ना साक्षी?"

हे सगळं ऐकल्यावर मला खरंच आपण साक्षी आहोत असच वाटू लागलं. आणि नसले तरी आता मला साक्षी बनायचं आहे हे मात्र मी ठरवून टाकलं. किती सरळ आणि सोपं आहे हे सगळं, फक्त ते करता आलं तर! ते करायाला कठीण मात्र. आपण किती गुंतून जातो नं छोट्या छोट्या गोष्टींमध्ये? आपल्या आयुष्यात होणाऱ्या अनेक गोष्टी ज्याचा खरंच आपल्याशी संबंध नसतो तिथे ही गुंततो आपण, आणि इथे आपल्याला आपल्याच आयुष्यात होणाऱ्या घटनांकडे त्रयस्थासारखं बघायचं आहे. आणि माहितीये का, प्रत्येक संत महात्मा आपल्याला वेगवेगळ्या शब्दात हेच तर सांगत असतात. सियाराम बाबा म्हणतात "मै तो बस तमाशा देखता हू, जब ये खतम हो जायेगा तो दुसरा शुरू हो जायेगा, ना इसके खत्म होने का दुख, न उसके शुरू होने का सुख.. देखते रहो बस!" म्हणजे हे साक्षी होणंच नाही का? फिल्म सारखं बघणे सगळीकडे… मागे एका अनुभवात मी तुम्हाला "इदं न मम" हा मंत्र मला एका सन्याश्याने दिलेलं सांगितलं होतं की… ते म्हणजे तरी वेगळं काय? जे काही माझ्या हातावर पडतंय ते पडतंय त्या ईश्वराच्या कृपेने, पण म्हणून ते माझं नाहीच.. तेच काय, माझं काहीच नाही… पण ते पडतंय एवढी साक्ष फक्त काय ती माझी.. साक्षी होणं याला नाही का म्हणता येणार? काय नं सुंदर अवस्था असेल ती? दु:ख ही नाही आणि सुख ही नाही… . जे आहे, जसं आहे, तसं आहे म्हणून आहे, आणि जे नाही म्हणून नाही…

हे खरं मला समजलं होतं, पटलं ही होतं पण आपल्या सारख्या साधना शून्य व्यक्तीला असं साक्षी होणं सोपं आहे का हो? मला हे आवडलं ही होतं पण अजून ही काही गोष्टीतून माझं मन निघता निघेना. त्याला कारण ही होतं म्हणा! मला अजून बरच काही समजून घ्यायचं होतं, बऱ्याच गोष्टींचा उलगडा व्हायचा होता. आज तर महेश्वर चा पहिलाच दिवस होता.. मात्र इथून माझ्या आयुष्याची दिशा बदलली असं मी म्हणालेय… मी ३ दिवस होते इथे आणि हे तीनही दिवस माझ्यासाठी खूप महत्वाचे आहेत. दुसऱ्या दिवशी जो संवाद झाला त्या वेळी मी पुरती गोंधळात पडले, मला सावरायला वेळच लागला..कारण हा संवाद होता माझ्या नाळेशी जोडलेला… माझ्या आईशी आणि माझ्या बाळाशी पण… . पण तो संवाद आणि ती स्थिती, आता नाही सांगता येणार… पुढच्या भागात सांगते

नर्मदा परिक्रमा -एक विलक्षण अनुभूती – भाग-४९

नर्मदे हर..

मागच्या भागात मी महेश्वरला झालेल्या गोष्टींबद्दल सांगत होते.आज तर महेश्वर चा पहिलाच दिवस होता.. मात्र इथून माझ्या आयुष्याची दिशा बदलली असं मी म्हणालेय… मी ३ दिवस होते इथे आणि हे तीनही दिवस माझ्यासाठी खूप महत्वाचे आहेत. दुसऱ्या दिवशी जो संवाद झाला त्या वेळी मी पुरती गोंधळात पडले, मला सावरायला वेळच लागला..कारण हा संवाद होता माझ्या नाळेशी जोडलेला… माझ्या आईशी आणि माझ्या बाळाशी पण… . पण तो संवाद आणि ती स्थिती मला मागच्या भागात सांगता आली नव्हती, ती आता सांगते, पण थोडं आधीपासून.

रात्रीचा हा "साक्षी" चा संवाद ऐकून मी झोपी गेले. बाबा कधीचाच झोपून गेला होता. मला रात्रभर व्यावस्थित अशी झोप लागली नाही मात्र थकवा ही आला नाही. साक्षी होणे या एका विचारावर माझी रात्र आनंदाने सरत गेली होती. मला स्वामीजी आणि माताजी आवर्जून साक्षी म्हणतात.. अजूनही! किंबहुना साक्षी हेच माझं नाव असावं इतकी सहजता त्यांच्या मला साक्षी बोलावण्यात असते, आणि तितकीच माझ्या प्रत्युत्तराला पण! तर दुसऱ्या दिवशी सकाळी मला लवकर जाग आली, अगदी साडे चार ला. परिक्रमेत तशीही लवकर उठण्याची सवय होऊनच जाते.

मी खाली गेली तर माताजी आणि स्वामीजी उठले होते. माताजी स्वयंपाक घरात काहीतरी काम करत होत्या आणि स्वामी जी अंगण झाडत होते. मीसुद्धा जवळ असलेला एक खराटा घेतला आणि अंगण झाडू लागले. आमचं अंगण झाडून झाल्यावर माताजीन्नी मला बसवलं, मला ओवाळलं आणि भिजवलेले तीळ वाटून केलेलं उटण माझ्या अंगाला लावून म्हणाल्या " जाओ अब मैयाजी मे स्नान करके आओ, तुम्हारे लिये एक काम रक्खा है" ती संक्रांत होती. मी स्नान करून आल्यावर माझ्याकडून मंदिराची साफ सफाई आणि पूजा करवून घेतली. अगदी फुलं तोडण्यापासून ते नैवेद्याचा स्वयंपाक आणि नैवेद्यसुद्धा माझ्या हाताने दाखवला आणि हे सगळं करताना कधी माताजी तर कधी स्वामीजी माझ्या सोबत होते, एखाद्या आईने बोट धरून लहान मुलाला चालायला शिकवावं तसं एक एक गोष्ट ते मला सांगत होते. "चलो आज दो चीजे हो गयी, परिक्रमावासी के हाथ से पूजा हुई और तुम्हारे कर्मो मे अगर कोई बडा भोग होगा तो भी कट गया होगा, मंदिर मे सफाई करने का मौका मिले तो कभी मत छोडना, उससे कर्म कम हो जाते है" हे ऐकून खूप समाधान वाटलं, वाटलं चला, काही भोग तर झाले बाबा कमी… आणि सगळं आटोपल्यावर मी तिथेच मंदिराच्या खाली मैयाच्या घाटावर बसले तेव्हा झाला आजचा संवाद.. माझ्या नाळेशी जोडलेला, ज्याबद्दल मी मागच्या भागात बोलत होते नं तोच..

कालचा संवाद, आज सकाळपासून झालेल्या घडामोडी, ते बगीचातून फुलं तोडण, आपल्याच धुंदीत मस्त श्लोक म्हणण, मनसोक्त पूजा करणं.. कितीतरी दिवस इतकं निवांत पणे मी हे केलंच नव्हतं. शाळेची घाई, त्यात घाई घाईत पूजा, आणि सुट्टीच्या दिवशी बाकी कामांची रीघ लागलेली. इथे मात्र मी आणि माझी मैया… आणि हा निवांत पणे स्वत:ला समजून घेण्याची संधी..मला हे सगळं हवं हवं सं वाटत होतं. काळ इथेच थांबून रहावा असं वाटत होतं. मी पायरीवर बसले होते, माझ्यासमोर मैया होती आणि अचानक मला रडू आलं.. रडू म्हणजे अगदी हलकं नाही बरं का, आवंढेच येऊ लागले. मी हमसून हमसून रडू लागले.. माझा हा निवांतपणा, माझं हे समाधान , माझी ही मैया, हे सगळं सोडून मला परत जावच लागेल या

विचारांनी असेल बहुधा.. पण मला इथेच थांबून राहावंसं वाटत होतं.. परिक्रमा संपूच नये कधी असं वाटत होतं. मला रडताना ऐकून स्वामीजी तिथे आले, आणि हा संवाद सुरु झाला.

"क्या हुआ? क्यू रो ही हो साक्षी?" त्यांनी माझ्या डोक्यावर हात ठेवला, आणि मला म्हणाले "मुझे बताओ, शायद तुम्हारी समस्या दूर हो जाये" . मी मला जे जे वाटत होतं ते ते सांगितलं. मी माझी द्विधा मनस्थिती सांगितली. मला इथेच राहावंसं वाटत होतं, पण माझं घर, माझा नवरा, माझा मुलगा, माझे आईवडील, माझं विश्व तिकडे माझी वाट बघत असणारे हे मला माहित होतं. माझा जीव अडकला होता माझ्या नाळेशी.. बाकी सगळ्यांचं एक वेळ ठीक होतं हो, पण माझं लेकरू? माझा एकुलता एक मुलगा? त्याच्यासाठी तरी मला जायलाच हवं होतं.. आई आहे मी त्याची आणि आज सगळ्यात जास्त जर कुणाला माझी गरज असेल तर ती माझ्या लेकराला आहे, आणि त्यामुळे माझं इथून जाणं हे निश्चित आहे… आणि इथे मी माझ्या माई ला, माझ्या आईला सोडून जाऊ तरी कशी? काही कळत नव्हतं… अशा परिस्थितीत समोर घडेल ते साक्षी होऊन बघणं कसं जमेल मला? मी नं माझ्या मैयाला सोडू शकत होते, न माझ्या लेकराला… मी जरा शांत झाल्यावर मला स्वामीजी म्हणाले.. "बस इतनी सी बात? और तुम इतना रो राही हो? सुनो, अब तुम्हे जाना तो है ना तुम्हारे बेटे के लिये? तो जाओ ना? जो मैया तुम्हे बुला सकती है, उसे नही पता क्या तुम्हारे बेटे के बारेमे? वो नही चाहेगी की तुम उसकी मैया बनो, जैसे वो तुम्हारी मैया है? तुम्हारे फर्ज से दूर वो कभी नही करेगी तुमको साक्षी! और फिर तुम्हारे फर्ज पुरे करने के बाद तो तुम आ ही सकती हो… हे ऐकून मला जरा धीर आला, आणि मग मात्र ते जे काही बोलले तो खरा संवाद.

मी शांत झालेले पाहून ते म्हणाले, "साक्षी एक बात बोलू, यहा कोई किसीका कुछ नही होता है. हर कोई अपने अपने रास्ते चल रहा है. तुम कैसे कहती हो की ओंकार तुम्हारा बेटा है, जरा बताना तो?" हा कसा प्रश्न आहे? ९ महिने पोटात सांभाळलेल्या पोटच्या गोळ्याला मी माझं बाळ कसं नको म्हणू? लहानाचा मोठा केलाय त्याला, माझंच बाळ आहे ते, माझा जीव

की प्राण आहे तो··· . मी सांगितलं त्यांना.. ते म्हणाले “हा वो तो सही है, लेकीन तुम कौन हो?” आता मात्र मला उत्तर देता येईना. जिथे मीच कोण हे माहित नाही तिथे माझं कोण, माझं काय, याबद्दल काय बोलू मी? माझा झालेला गोंधळ स्वामीजींना लक्षात आला. ते हसले, म्हणाले ” इस जनम मे तुम सुरुचि हो, हा मरे लिये तुम साक्षी हो, और आगे न जाने क्या होगी, पर ये नाम तो केवल इस देह के है, सच कहे तो तुम परमात्मा का अंश हो जो अपने मार्ग मे चल रही हो, वैसे ही तुम्हारा बच्चा है, जो अपनी मार्ग मे चल रहा है. सामाझाता हू.

समझो की तुम्हे नागपूर से मुंबई जाना है, तब तुम क्या करोगी? तुम नागपूर से मुंबई जाने वाली गाडी देखोगी, बस देखोगी, ट्रेन देखोगी या फ्लाईट देखोगी, है न? उसके बाद तुम एक कोई वाहन तय करोगी, मानो की ट्रेन! अब तुम अपने हिसाब से जानेवाली, सही समय पर, और सही जगह पर पहुचाने वाली कोई एक ट्रेन को चुनोगी जो तुम्हे तुम्हारे ध्येय के सबसे पास, और उचित समय पर पहुचा सके.. ठीक है न? तुम खुद चुनती हो ना तुम्हारे सफर का वाहन? बस इतना ही तो आसान है! हम सब एक सफर कर है, हर एक का सफर अलग है लेकीन ध्येय एक है.. मोक्ष! इस सफर मे कोई आगे है तो कोई पिछे है.. लेकीन जाना सबको वही है.. सब अपना अपना वाहन खुद चुनते है, जैसे तुम्हारे बेटे ने तुम्हे चुना है. जब एक जन्म से निकल कर दुसरे जन्म की स्थीती मे आत्मा प्रवेश कर रहा होता है तब उसे पुरा ज्ञान होता है, लेकीन जनम मे नही होता. जब वो जन्म लेता है तब वो देह के पिंजरे मे बंद होता है जहा से उसे उस जनम के पहले और बाद का ज्ञान नही होता, वह जनम के बंधन मे इस तर्ह बांध लिया जाता है की उसे कुछ भी याद नही रहता. जब वो अपना जन्म खत्म कर मुक्त होता है तब उसे फिरसे उसके ध्येय की याद आती है और वह रास्ते खोजता है की कौनसा रास्ता उसे अपने ध्येय तक पहुचा सके. वह ऐसे माता पिता की खोज करता है जो उसका हाथ पकड कर ध्येय के सबसे करीब ले जाये. तुमने तुम्हारे माता पिता के घर शायद इसीलिये जन्म लिया की वही माता पिता तुम्हे तुम्हारी नर्मदा मैया तक पहुचा सके! और तुम्हारे बच्चे ने भी तुम्हारे

कोख से अपने ध्येय के लिये ही जन्म लिया है. तुम्हारा और उसका और कोई रिश्ता है ही नही! तुम दोनो ही इस सफर यात्री हो जो थोडे समय के लिये साथ मे सफर कर रहे हो" …

माझ्यासारख्या सर्व साधारण व्यक्तीच्या भावनांवर झालेला हा आघाताच होता एक प्रमाणे. एका झटक्यात मी माझ्या आई वडिलांपासून आणि माझ्या मुलापासून वेगळे झाले होते.. एका क्षणात माझा आणि त्यांचा संबध फक्त सहप्रवाश्या इतकाच राहिला होता, आणि हे इतक्या लवकर आत्मसात करणं मला कठीण जात होतं.. आतापर्यंत चा हा सगळ्यात मोठा धडा होता मिळालेला, आणि सगळ्यात कठीण! "इदं न मम" मला समजून झालं होतं, पण अंगवळणी पडलं नव्हतं हे आज समजलं, कारण आजवर माझे आई वडील आणि माझा मुलगा ह्या दोघांना मी माझ्यापासून वेगळे समजतच नव्हते. पण आपण एकट आलेलो आहोत, आणि एकटच जायचं आहे, आपला प्रवास हा एकट्याचाच प्रवास आहे हे कित्येकदा ऐकलेलं, कित्येकदा वाचलेलं असूनसुद्धा ते भिनायची सुरवात आजवर झालीच नव्हती. अनेकदा अनेक गोष्टी आपल्याला माहित असतात, समजत असतात, पण आपल्याकडून घडत नसतात… तसं काहीसं होत होतं… हळू हळू माझं एक मन या सत्याला आत्मसात करण्याची तयारी करत होतं आणि दुसरं अजूनही या धक्क्यातून बाहेर यायला तयार नव्हतं. तोंडानी बोलणं खूप सोपं असतं हो.. क्लासला गेलेल्या मुलाला घरी यायला तासभर उशीर होऊदेत, तेव्हा आपली जी घालमेल होते ना ती या ममते पोटीच, जीव्हाळयापोटीच न? जिथे हे "माझे" पण येतं नं, गुंता होतो नं जिथे, तिथे गाठ पडणार, आणि गाठ पडली सोडवायला कठीण अगदी.. खरंच कठीण असतं हे असं एकदम पटवून घेणं… . पण सांगू.. हे एकदा पटलं की मार्ग सुलभ होतात.. माझा सुन्न चेहरा आणि शून्य प्रतिसाद पाहून महाराज पुढे बोलू लागले… " होता है साक्षी, अभी अभी समझ रहा है तुमको, ये अवस्था होना स्वाभाविक है, चिंता की बात नही है. थोडा और सामाझाता हू तो तुम्हे एकदम शांती मिलेगी. हा ये सच है की वह तुम्हारा कोई नही है, लेकीन इस देह की वजह से तुम एकसाथ हो, तो इसको थोडा आसान बनाते है… देखो ,अब तुम पुरी तऱ्ह से समझ जाओगी" . खरं तर ते आता काय म्हणताहेत याची मला जरा भीतीच

वाटली, पण ते जे काही बोलले त्या नंतर मात्र माझं मन अगदीच शांत झालं… पण हा संवाद देखील महत्वाचा आणि मोठा आहे. याच भागात नाही सांगता यायचा.. खरं तर हा अपूर्ण संवाद आणि अजूनही माझ्या आयुष्याच्या बदलत्या दिशेचा आणिक एक अनुभव आहे… माझं नागपूर कसं अचानक सुटलं त्याचा.. पण पुढच्या भागात आधी हा संवाद पूर्ण करेन…



नर्मदा परिक्रमा – एक विलक्षण अनुभूती- भाग ५०

नर्मदे हर..

तर मागच्या भागात मी म्हणाले होते की महेश्वर चा अजून  एक संवाद आणि एक अनुभव बाकी आहे. माहं मन शांत झालं होतं. स्वामीजी बोलत होते आणि मी ऐकत होते. ते म्हणाले "तो इस जनम मे, याने की जब तक तुम्हारा और तुम्हारे बच्चे का देह है, याने की जब तक तुम दोनो ही इस पिंजरे मे बंद हो तब तक तुम चाहो या ना चाहो तुम्हे साथ रहना तो है, और जिसके लिये तुम इस जनम मे आये हो, वह कार्य भी पुरा करना है. तुम्हे माँ होने का कर्तव्य निभाना है, और उन्हे बेटा होने का…  वह तो तुम अबतक निभाती आ  रही हो, और आगे भी निभाओगी.. सवाल तो इसके बाद का है…  तुम्हे यह सब करने के लिये मै मना नही कर रहा हू, लेकीन यह पिंजरा जब खुल जायेगा, जब तुम्हे आझादी मिलेगी, तब तुम्हे जाना होगा, आगे की ओर.. हम सब इस पिंजरे मे ही इतना खो जाते है की यहा से निकलना ही नही चाहते… और पिंजरा तो जीर्ण हो चुका है, टूट चुका है, लेकीन हम उसे छोड ही नही पाते है …  तकलीफ तो तब होती है…  और इसीलिये इस सत्य को समझने की जरुरत तो है ही.. अपने आप को याद दिलाने की जरुरत तो है ही.. जितना जल्दी समझ जाओगी उतना ही जल्दी आगे होने वाली तकलीफ से बच पाओगी साक्षी. यही तो है तुम्हारा "साक्षी"   होना..

हे साक्षी होणं आता मला समजू लागलं होतं, आवडू ही लागलं होतं आणि माझ्या मनानी त्याचं साक्षी होणं मान्य ही केलं होतं, फक्त त्याची सवय व्हायला वेळ लागणार होता हे नक्की. आणि या साक्षी होण्यात सगळाच साक्षी भाव होता. माझं म्हणून मी जे काही म्हणते त्या

सगळ्याशी  माझा असलेला संबंध हा एकीकडे मान्य होत होता तर दुसरीकडे तो आहे याचा फक्त स्वीकार होत होता. इथे अमान्य असं काहीच नव्हतं. होता तो फक्त स्वीकार, मग तो कुठलाही असो, कशाचाही असो… अगदी माझी परिक्रमा एक दिवस संपून जाणार म्हणून उद्विग्न झालेल्या माझ्या मनाच्या अवस्थेपासून सुरु झालेला हा संवाद आणि ही विचार प्रकिया मला पुन्हा याच ठिकाणी आणून ठेवत होती, मात्र आता त्यात स्वीकार होता…  हो माझी परिक्रमा एक दिवस संपून मला घरी परत जायचं आहे आणि जर असं घडायचं आहे तर तिथे माझा पूर्ण स्वीकार असणं म्हणजेच माझं साक्षी होणं आहे..मला साक्षी व्हायचंय आणि म्हणून मी हे स्वीकारायला हवं.. पण माहितीये का? जेव्हा तुम्ही इतक्या शुद्धतेने एखाद्या गोष्टीचा स्वीकार करता नं तेव्हा कुठेतरी तुमच्या मनाची काळजी घेणारी ती माउली तुमच्याकडे बघत असते. तुमच्याही पेक्षा तुमच्या भावनांची, तुमच्या निस्सीम प्रेमाची ती नर्मदा मायसुद्धा भुकेली असावी कदाचित की काय माहित नाही पण, तिच्या लेकरांना समाधान मिळत राहील याच्याकडे तिचं फार लक्ष असतं.. असाच हा पुढचा अनुभव.. पुन्हा त्याच सुरवातीच्या संवादा नंतरचा.

तर जेव्हा मला स्वामीजी म्हणाले की “तुम बादमे भी मैया किनारे आ सकती हो” , आणि त्या नंतर जेव्हा साक्षी होण्याचा आणि नाळेच्या संबंधांचा खुलासा झाला त्या आधीचा हा संवाद आहे, फक्त त्याचा परिणाम एका अनुभवात झाल्यामुळे तो नंतर सांगतेय. मी रडत असताना माझी समजूत काढायला स्वामीजी म्हणाले होते “रो क्यू रही हो? तुम्हे मैया किनारे आना है ना, आ जाओ… ”  माझं घर दार सोडून मला येता येणार नाहीये म्हणून मी अधिकच त्रस्त झाले होते तेव्हा स्वामीजी मला म्हणाले .. “उनको छोडकर नाही आ सकती तो सबको लेकर आजाओ..” मला सांत्वना द्यायला म्हणत असावे ते असं वाटलं मला.. मुलगी रडतेय, धीर द्यावा तिला म्हणून बोलले असतील ते असं वाटलं.. मात्र ते अजून एक वाक्य बोलले होते. ते म्हणाले, “साक्षी, तुम या तो १ साल मे, या तो ५ साल मे मैया के पास आ जाओगी., ५ साल के अंदर नही आयी तो दसवे साल सब छोड के आओगी..”. मी या बोलण्यावर अजिबात विश्वास

ठेवला नव्हता कारण माझ्या मते हे मला धीर देण्यासाठी केलेलं वाच्य होतं. पण बरेचदा तसं नसतं… किंबहुना जे आपल्याला अजिबात महत्वाचं वाटत नाही तेच कधी कधी सगळ्यात जास्त महत्वाचं ठरतं. इथेही तसंच झालं.

माझं महेश्वर चं दाणा पाणी संपायला आलेलं. स्वामिजींकडून अनेक टिप्स आणि खूप सारा सत्संग घेऊन मी निघाले. ते नंतरही मला फोन वर अनेक गोष्टी सांगत असत..पण ते नंतर सांगते.. आता सांगते मी महेश्वर हून निघून दहा दिवसात मला आलेला हा तो महत्वाचा अनुभव. मी महेश्वर हून पुढे निघाले आणि माझ्या यजमानांचा मला फोन आला एक दिवस. "अगं तुला एक महत्वाचा निर्णय सांगायचा आहे" ते म्हणाले. "आपल्या राहुल नी नवीन कंपनी सुरु करायचं ठरवलंय आणि मी पण त्याच्यासोबतच काम करायचं ठरवलं आहे तेव्हा तू परीक्रमेहून आलीस की आपण इंदोरला शिफ्ट व्हायचय" .. राहुल, माझा दीर इंदोरला असायचा तेव्हा आणि आम्ही नागपूरला, आणि आता आम्ही इंदोरला शिफ्ट होणार होतो.. म्हणजे स्वामीजी म्हणाले ते खरं होतं तर… मी परिक्रमा पूर्ण करून आले आणि २ महिन्याच्या आत इंदोरला शिफ्ट झालेसुद्धा… "घरवालो को छोड के नाही आ सकती तो उन्हे लेकर आजाना" हे स्वामीजी म्हणाले होते ते अगदी खरं ठरलं होतं..माझ्या मैयांनी आणि माझ्या गुरुंनी मला त्यांच्या जवळ बोलावून घेतलं होतं. इंदोरला माझं गुरूस्थान आहे, नाना महाराज तराणेकरांच आणि इंदोरपासून फक्त ७० किमी वर माझी मैया आहे. माझ्या आयुष्याची दिशा बदलत गेली ती अशी. मी नागपूर सोडून कुठे कधी जैन हे स्वप्नातही वाटलं नव्हतं मला, पण ते झालंय.. माझ्या हातून नक्की काहीतरी करवून घेण्याची गुरुंची आणि मैयाची इच्चा दिसतेय पण मक्की काय ते अजून नीट समजलं नाही.. मला घाई नाहीच कारण जे जेव्हा करणं माझ्या भाग्यात असणार ते तेव्हा तेव्हा होणार याची मला आता खात्री आहे.

माझी परिक्रमा सुरु असताना आणि नंतर देखील या महेश्वर च्या महाराजांशी माझा संपर्क कायम होताच, आणि तसतसे अनुभव पण मला आले. त्यातला एक इथे आवर्जून सांगते,

पुढचे मात्र जसं जसं आपण परिक्रमेत पुढे जाऊ तसतसे सांगेन. आम्ही म्हणजे मी आणि बाबा बरगी कॉलनी वरून पुढे निघालो तेव्हाची गोष्ट बरं का. त्या दिवशी स्वामीजींचा मला फोन आलेला. "साक्षी कैसे हो? आज हमने एक निर्णय लिया है, तुम्हारी परिक्रमा पूर्ण होणे के बाद तुमको महेश्वर आना है, और वो भी जल्दी… तुम्हारे लिये कूछ खास है.. भाग खुलने वाले है तुम्हारे, लेकीन आज की बात सुनो आज तुम्हे तीन अलग अलग जगह पार की लोग रास्ता बतायेंगे, लेकीन जो रास्ता कोई चाय या हॉटेल वाला बातायेगा वही लेना, कल माताजी को सपना आया है, इसलिये बाता रहा हू"   मला जरा आश्चर्य वाटलं पण काय हरकत आहे ऐकून घ्यायला.. म्हणून मी लक्षात ठेवलं.

आम्ही तिलावारा घाटला जायला निघालो. फार रमणीय रस्ता, जंगलातून जाणारा, पहाड, पळसाची झाडं लागलेली.. (हा अमरकंटक हून ओमकारेश्वरला येताना चा अनुभव आहे, पण महेश्वर च्या महराजांचा आहे म्हणून आता सांगतेय, अजून आपण अमरकंटकला पोचायचे आहोत, या भागाचे अनुभव लिहिताना या अनुभवाची आठवण करून देईनच पुन्हा) पहाड चढून उतरून अधून मधून टुमदार कसबे वजा गावं लागायची, असा हा रस्ता. एका गावात आम्हाला एका दुकानात चाहावाल्यांनी थांबवलं… त्यांनी चहा पाजला आणि "तिलावारा घाट क्यू जा राहे हो, उलटा हो जायेगा ना.. यहासे आगे निकलके दाये मोड पे जाना, सीधा त्रिशूल घाट जाओगे"   त्याच्या या सांगण्यावरून तिथेच असलेल्या एका त्याच्या गी-हाईकाच दुमत पण झालं त्याच्याशी…  मात्र चहा वाल्याचं ऐक असा फोन सकाळीच झाला होता आणि म्हणून आम्ही त्याचं ऐकलं, आणि आता त्रिशूल घाटाकडे निघालो. वाटेत नाना खेडा नावाचं गाव लागतं, तिथे मुक्काम केला, तर तिथल्या माणसाने सांगितलं की तुम्ही उजवीकडे गेले असते तर तिल्वारा घाट लागला असता, आता उलटं जाऊ नका उद्या, त्रिशूल घाट जवळ आहे, तिकडे जा, पण दुसऱ्या दिवशी सकाळी पुन्हा एका चहावाल्याच्या दुकानात असताना त्याने सांगितलं, तिकडे कशाला जाताय, एक वाट शेतातून जाते, एक दोन नाले पार करावे लागतात, पण तुम्ही सरळ जा तुम्हाला डूंडवारा नावाचं गाव लागेल, तिथून भेडाघाटला जा

सरळ. तसंच झालं, आम्ही सरळ भेडाघाटला पोचलो देखील… जवळ जवळ ३० किमी चा रस्ता कमी झाला होता आमचा…

पुढे परिक्रमा झाल्यावर मी ओंकारेश्वरला पोहोचली तेव्हा तिथे दारात माझं स्वागत करण्यासाठी हे महेश्वर चे स्वामीजी उभे होते. मला हे अनपेक्षित होतं. माझ्या कधीची, कान्यापुजानाची सगळी व्यवस्था झाली होती आणि एक स्कोर्पियो गाडी माझी वात बघत होती. माझं सगळं आटोपून झालं आणि स्वामीजी मला महेश्वरला घेऊन गेलेत. तिथे गेल्यावर माझ्याकडून यज्ञ करवण्यात आला. माझ्या हातून रामजन्म करवण्यात आला. तो रामानावामिचा दिवस होता. आणि नंतर नं मागता मला एक अद्‌भुत भेट मिळाली. मला बीजमंत्राची दीक्षा मिळाली. बीज मंत्राची दीक्षा मागूनही न मिळणारी आणि ती जेव्हा न मागता आणि सन्यासिनी कडून मिळणं हे केवढं भाग्य! त्या जपाचे अनुभव अजूनच वेगळे आहेत, पण ते सांगू केव्हातरी.

असे अजूनही अनुभव आहेत, पण ते नंतर सांगते, आधी सांगते मंडलेश्वरला जाताना चा आणि तिथला अनुभव, गुरु कसे आपल्याकडे लक्ष ठेवून असतात आणि कशी आपल्याला सतत आठवण देतात त्याची आलेली प्रचीती आणि नर्मदा मैयाचे दुस-यांदा झालेले दर्शन… .आणि ते दर्शन का झालं त्या मागचं कारणसुद्धा! हा अनुभव आहे गंगातखेडी चा, इथून आम्ही रस्ता चुकलो. जवळ जवळ २२ किमी चालून झालं असेल पण या रस्त्यात न अन्न मिळालं नं पाणी… पण तरीही आम्ही तहानलेले ही नव्हतो, आणि भुकेलेले तर अजिबात नाही? असं कसं होईल, काहीही न मिळता?.. सांगते, पण पुढच्या भागात.

**ई साहित्य प्रतिष्ठानचं हे बारावं वर्षं. सुरूची नाईक यांचं ई साहित्यवरचं हे पहिलंच पुस्तक. त्या ई साहित्य प्रतिष्ठानच्या संस्थापक सदस्य आहेत.**

सुरूची नाईक गेली चौदा वर्षे लिहीत आहेत. काव्य, ललित, सामाजिक, आध्यात्मिक अशा विविध विषयांवर त्या लिहीतात. त्यांच्या ब्लॉगवर त्यांचं लेखन वाचता येईल. या लेखनादरम्यान त्यांनी इतर लेखक कवींसह पुढाकार घेऊन ग्रुप बनवला ज्याचे रुपांतर ई साहित्य चळवळीत झाले. त्या आपल्या लेखनातून अनेक प्रयोग करत असतात. आणि इतर प्रायोगिक साहित्यिकांना बळही देत असतात. नेटाक्षरी या काव्यसाप्ताहिकाच्या त्या संपादक होत्या. असे अनेक तरूण लेखक खूप छान लिहीत आहेत. मोठ्या लेखकांच्या तोडीस तोड आहेत. पण त्यांना योग्य असा प्लॅटफ़ॉर्म मिळत नाही. त्यांची पुस्तकं प्रकाशित करायला प्रकाशक धजावत नाहीत. कारण त्यांचे नाव प्रसिद्ध नसल्यामुळे त्यांच्या पुस्तकांची विक्री होईल की नाही याबद्दल प्रकाशक साशंक असतात. आणि जर या लेखकांची पुस्तके वाचकांसमोर आलीच नाहीत तर लोकांना त्यांचे नांव कळणार कसे? या दुष्टचक्रात सापडून अनेक नवतरूण लेखकांच्या पिढ्या बरबाद झाल्या.

पण आता असे होणार नाही. इंटरनेटच्या सहाय्याने नवलेखकांना वाचकांच्या नजरेपर्यंत पोहोचवण्याचे काम आता अनेक संस्था करत आहेत. ई साहित्य प्रतिष्ठान ही त्यातील एक. सुमारे ५ लाखांहून अधिक वाचकांपर्यंत या नवीन लेखकांना नेण्याचे काम ही संस्था करते. पूर्ण विनामूल्य. लेखकांनाही कोणताही खर्च नाही. आणि आज ना उद्या लेखकांना भरघोस मानधन मिळवून देण्यासाठी ई साहित्य प्रतिष्ठानचे प्रयत्न चालू आहेत.

नवीन लेखक यायला हवेत. भक्कमपणे उभे रहायला हवेत. त्यांना त्यांच्या त्यांच्या दर्जानुसार मानमरातब मिळावा. मानधन मिळावे. परदेशातील आणि दूरच्या खेड्यापाड्यांवरील नववाचकांना दर्जेदार साहित्य मिळावे.

ई साहित्य प्रतिष्ठान

अनेक नवनवीन ताकदवान लेखक ई साहित्याकडे वळत आहेत. त्यांना त्यांच्या कसानुसार प्रतिसादही मिळतो. कुणाला भरघोस तर काहींच्या वाट्याला टीकाही येते. या टीकेला positively घेऊन हे लेखक आपला कस वाढवत नेतात.

प्रफ़ुल शेजव, भाग्यश्री पाटील, कोमल मानकर, सुरज गाताडे, अनूप साळगावकर, बाळासाहेब शिंपी, चंदन विचारे, यशराज पारखी, चंद्रशेखर सावंत, संयम बागायतकर, ओंकार झांजे, पंकज घारे, विनायक पोतदार, चंद्रकांत शिंदे, चारुलता विसपुते, कार्तिक हजारे, गणेश सानप, मनोज चापके, महेश जाधव, मनोज गिरसे, मृदुला पाटील, निलेश देसाई, सनहा पठाण, संजय बनसोडे, संजय येरणे, शंतनू पाठक, श्रेणिक सरडे, शुभम रोकडे, सुधाकर तळवडेकर, दिप्ती काबाडे, भूपेश कुंभार, सोनाली सामंत, केतकी शहा, विनिता देशपांडे, सौरभ वागळे, सुरूची नाईक, शुभम पाटील, आशिष कर्ले, सौरभ कोरगांवकर, महेश पाठाडे  असे अनेक तरूण लेखक सातत्यपूर्ण लेखन करत आहेत. ई साहित्यकडे हौशी लेखकांची कमी कधीच नव्हती. आता हौसेच्या वरच्या पायरीवरचे, लेखनाकडे गंभीरपणे पहाणारे आणि आपल्या लेखनाला पैलू पाडण्याकडे लक्ष देणारे तरूण लेखक येत आहेत. ही नवीन लेखकांची फ़ळी मराठी भाषेला नवीन प्रकाशमान जगात स्थान मिळवून देतील. त्यांच्या साहित्याच्या प्रकाशाला उजाळा मिळो. वाचकांना आनंद मिळो. मराठीची भरभराट होवो. जगातील सर्वोत्कृष्ट साहित्यिक प्रसवणारी भाषा म्हणून मराठीची ओळख जगाला होवो.

या सर्वात ई साहित्याचाही खारीचा वाटा असेल हा आनंद.

आणि या यशात ई लेखकांचा सिंहाचा वाटा असेल याचा अभिमान.

## बस्स. अजून काय पाहिजे?

आमेन

सुनील सामंत

ई साहित्य प्रतिष्ठान